# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## सोमवार, दिनांक २८ ऑगस्ट, २०२३ / भाद्रपद ६ , १९४५ (शके)

## लक्षवेधी सूचनांवरील प्रलंबित निवेदनांच्या प्रतींचे वितरण

**१२१.** सर्व सन्माननीय विधानसभा सदस्यांना कळविण्यात येते की, विधानसभेचे सन २०२३ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन सोमवार, दिनांक १७ जुलै, २०२३ रोजी विधान भवन, मुंबई येथे सुरु होऊन शुक्रवार, दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी संस्थगित झाले.

संस्थगित झालेल्या व्दितीय सत्रात एकूण २३५ स्वीकृत लक्षवेधी सूचनांचे जोडपत्र दिनांक ४ ऑगस्ट, २०२३ रोजी अमुद्रित स्वरुपात सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले होते. त्यापैकी आता २३५ निवेदनांपैकी ९२ निवेदने शाखेत प्राप्त झाली असून ती यासोबत वितरीत करण्यात येत आहेत.

**विधान भवन,**
**मुंबई,**
**दिनांक : २८ ऑगस्ट, २०२३**

**जितेंद्र भोळे**
**सचिव-१ (कार्यभार),**
**महाराष्ट्र विधानसभा.**

**याची प्रत :**

१. महाराष्ट्र विधानसभेचे सर्व सन्माननीय सदस्य.
२. महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व पक्ष कार्यालये.
३. संगणक कक्ष (website.)
४. अनुवाद कक्ष
५. प्रतिवेदन कक्ष

गृह (परिवहन) विभाग
लक्षवेधी सूचना क्र.४९६

## महाराष्ट्र विधानसभा
## सन-२०२३ चे पावसाळी अधिवेशन

ॲड.आकाश फुंडकर, वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.४९६ पुढील प्रमाणे आहे:-

"खामगांव तालुका हा बुलढाणा जिल्हयातील मोठा तालुक्याचे ठिकाण असणे, या आगारात एकुण ६९ बसेस मंजूर असणे, परंतु त्यापैकी ५० टक्के बसेस बंद व नादुरुस्त असणे, अनेक बसेस कोरोना काळात मालवाहतुकीसाठी बदल करण्यात आल्या असणे, महामारीनंतर या बसेसचा प्रवाशी वाहतुकीस वापर करणे, सद्यस्थितीत खामगांव आगारात केवळ ३० बसेस उपलब्ध असणे, यामुळे शाळकरी विद्यार्थ्यांना शाळेत पोहचण्याकरीता उशीर होत असणे, महाराष्ट्र शासनाने महिलाकरीता तिकीटांमध्ये ५० % सवलत जाहीर करणे व ती सवलत माहे एप्रिल पासून सर्व महाराष्ट्र भर लागू केली असणे, यामुळे महिलांची एस.टी. बसने प्रवास करणाऱ्यांच्या संख्येत मोठ्या प्रमाणात वाढ होणे, यामुळे महसूलात सुध्दा वाढ होणे, फक्त आषाढीवारीलाच महामंडळाला २७ कोटी ८८ लाखांचे उत्पन्न होणे, अशी परिस्थिती असतांनाही याच आषाढी वारीसाठी खामगांव येथून दिनांक २५ जून, २०२३ पंढरपूरला प्रवाश्यांना घेऊन जाणारी बस चिखली येथे तीन तास बंद असणे, त्यामुळे बसमधील महिला वयोवृध्द प्रवाश्यांना उन्हामुळे अतोनात त्रास झाला असणे, बस नादुरुस्त असल्यामुळे तिची दुरुस्ती करण्याबाबत किंवा पर्यायी बस पाठविण्याबाबत विभाग नियंत्रक, बुलढाणा यांना स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच विधानसभा सदस्य यांनी वारंवार फोन करणे, मॅसेजव्दारे माहीती देणे, परंतु कोणताही प्रतिसाद दिला नसणे, तसेच मॅसेज बघूनसुध्दा पर्यायी व्यवस्था केली नसणे, याबाबत विभाग नियंत्रक, बुलढाणा व महामंडळाच्या प्रति प्रवाश्यांमध्ये रोष निर्माण झालेला असणे, खामगांव आगारात बसेस उपलब्ध करुन न देणे, चालक, वाहक आणि पदोन्नती प्रक्रियेत आर्थिक देवाणघेवाण करुन मोठया प्रमाणात भ्रष्टाचार करणे, लोकप्रतिनिधीना सौजन्याची वागणूक न देणे, या प्रकरणी विभाग नियंत्रक, बुलढाणा यांच्यावर कडक कार्यवाही करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## निवेदन
### {श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री (परिवहन)}

खामगाव आगारात सद्यस्थितीमध्ये ५१ नियतांकरीता ५२ बसेस (मालवाहतूक ट्रक वगळून) उपलब्ध आहेत. खामगाव आगारातील ५ बसेसचे मालवाहतूक ट्रकमध्ये रूपांतरण करण्यात आलेले आहे. सन २०२३-२४ मध्ये संचित जून २०२३ पर्यंत खामगाव आगाराची मार्गबंद वाहनांची व मार्गस्थ बिघाडाची स्थिती खालीलप्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| सरासरी मार्गबंद वाहने | ६.९९ |
| मार्गबंद वाहनांची टक्केवारी | १३.२१% |
| मार्गस्थ बिघाडाचा दर प्रति १०,००० किमी | ०.४० |

खामगांव बसस्थानकात एकूण ५२४ फे-यांचे आगमन व निर्गमन करण्यात येते. त्यापैकी खामगांव आगाराच्या २१२ फे-यांव्दारे प्रवाशी वाहतूक करण्यात येते. त्यापैकी विद्यार्थी फे-या नियमित व निश्चित वेळेत मार्गस्थ करणेबाबत दक्षता घेण्यात येते व त्याबाबत संबंधित आगाराला वेळोवेळी सुचित करण्यात येते. महाराष्ट्र शासनाने महिलांकरीता तिकीटांमध्ये ५० % सवलत जाहीर केली असुन दि.१७/०३/२०२३ पासून संपुर्ण महाराष्ट्रात सदर सवलत लागू करण्यात आली आहे.

- खामगांव आगाराची माहे-एप्रिल,२०२३ ते दि.२५ जुलै,२०२३ पर्यंतची प्रवाशी संख्येचा तपशील पुढीलप्रमाणे.

| अ.क्र. | तपशील | प्रवाशी संख्या | टक्केवारी | उत्पन्न (रु) |
|---|---|---|---|---|
| १ | एकूण प्रवाशी संख्या | १८४२३९९ | १००% | ५,१०,४२,३२६/- |
| २ | महिला प्रवाशी संख्या | ७०२०८१ | ३८.१०% | १,७०,७३,०८९/- |

आषाढी- पंढरपूर यात्रेसाठी खामगाव येथून दि.२५.६.२०२३ रोजी पंढरपूरकडे जाणारी बस क्र. एमएच-४० वाय-५७६८ ही चिखली नजिक इंजिन गरम होऊन पाणी फेकत असल्याने मार्गस्थ बिघाड झालेले होते. सदर मार्गस्थ बिघाडाची माहिती सुमारे १९.०० वाजता दूरध्वनीद्वारे आगार व्यवस्थापक, राप चिखली आगार यांना प्राप्त झाली. माहिती प्राप्त झाल्यानंतर ताबडतोब १९.१५ वाजता चिखली आगारातील यांत्रिक कर्मचारी खुर्दे व जोशी यांना मार्गस्थ बिघाडाचे काम करण्यासाठी पाठविण्यात आले. परंतु सदर बसचे काम होऊ न शकल्याने तसेच चिखली आगारातील बहुतांश बसेस आषाढी - पंढरपूर यात्रेकरीता गेल्याने त्यावेळी तात्काळ देण्यासाठी पर्यायी बस चिखली आगारामध्ये उपलब्ध नव्हती. परंतु त्या नंतर नियतावरून आलेले बाहन क्र. एमएच ४० वाय-६२७६ हे देखभाल करून सुमारे २१.०० वाजता मार्गस्थ बिघाड बसेसला पर्यायी बस म्हणून देण्यात आले व प्रवाशांना मार्गस्थ करण्यात आले. मार्गस्थ बिघाड बस दुरूस्त करण्यासाठी यांत्रिक कर्मचारी दूरध्वनी आल्यानंतर ताबडतोब पाठविण्यात आलेले होते. प्रवाशांची गैरसोय होवु नये म्हणुन मार्गावरील इतर बसेसमध्ये प्रवाशांचे पुढील प्रवासाची सोय करण्यात आली. तसेच जे प्रवासी इतर बसेसमध्ये जाण्यास इच्छुक नव्हते त्यांचेकरिता रा.प. चिखली आगारातून पर्यायी व्यवस्था म्हणुन बस उपलब्ध करुन देण्यात आली होती.

रा.प.बुलढाणा विभागात सन २०२१ मध्ये वाहतूक नियंत्रक व सहाय्यक वाहतूक निरीक्षक पदाची खात्यातंर्गत बढती लेखी परिक्षा घेण्यात आलेली आहे. त्यानुसार वाहतूक नियंत्रक पदात ०३ कर्मचारी उत्तीर्ण झालेले असून त्यांना बढती पदी नियुक्ती देण्यात आलेली आहे. सहाय्यक वाहतूक निरीक्षक पदात ०८ कर्मचारी उत्तीर्ण झालेले असून, त्यापैकी ०४ कर्मचा-यांना बढती पदी नेमणूक देण्यात आली असून उर्वरित ०४ कर्मचा-यांनी बढती नाकारलेली आहे. तसेच चालक, वाहक, सहाय्यक तसेच शिपाई व तत्सम संवर्गातील कर्मचा-यांना लिपीक-टंकलेखक संवर्गात पदोन्नतीबाबतची कार्यवाही परिपत्रकीय सुचने नुसार माहे ऑगस्ट २०२३ पर्यंत करण्यात येणार आहे. चालक वाहक आणि पदोन्नती प्रक्रिया रा.प. नियमानुसार करण्यात आलेली असून त्यामध्ये आर्थिक देवाणघेवाण झाल्याबाबत तक्रार प्राप्त झालेली नाही. लोकप्रतिनिधींना सन्मानाची वागणूक देण्यात येते.

*****

गृह (परिवहन) विभाग
लक्षवेधी सूचना क्र.४९७

## महाराष्ट्र विधानसभा

## सन-२०२३ चे पावसाळी अधिवेशन

**अॅड.आकाश फुंडकर, वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.४९७ पुढील प्रमाणे आहे:-**

**"परिवहन महामंडळाची खामगांव शहराला लागून शेगांव रोडला लागून राष्ट्रीय महामार्गावर स्वत:च्या मालकीची जागा असणे, सद्याचे बसस्थानक हे शहरामध्ये असणे, मोठया प्रमाणात बसेस शहरातून जात असल्यामुळे वाहतुक कोंडीची समस्या उद्भवणे, सद्याची अपुरी पडत असल्यामुळे बस चालकांना, वाहकांना व प्रवाश्यांना देखील याचा त्रास होत असणे, शेगांव रोड येथील डेपोला लागून असलेली जागा ही खूप मोठी असून वाढती लोकसंख्या व खामगांव शहराचे वाढते क्षेत्रफळ लक्षात घेता नवीन बसस्थानक हे खामगांव शहरातील परिवहन मंडळाच्या जागेत करण्याची आवश्यकता असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.""**

## निवेदन

## {श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री (परिवहन)}

रा.प.महामंडळाची खामगाव शहराला लागून खामगाव-शेगाव रोडवर राष्ट्रीय महामार्गावर स्वमालकीची एकूण ४.१५ हेक्टर जागा आहे. सदर जागा सन १९७८ मध्ये ताब्यात घेण्यात आली. या जागेमध्ये खामगाव आगाराच्या इमारतीचे सन १९८३ मध्ये बांधकाम करण्यात आले व तेव्हा पासून आगार कार्यान्वित आहे. त्याठिकाणी बसेस दुरुस्ती व देखभालीचे कामकाज चालते सदर आगारामध्ये प्रशासकीय कार्यालय, आगार कार्यशाळा, चालक वाहक विश्रांतीगृह आहे. आगाराची जागा सोडून उर्वरीत अंदाजे १.५० हेक्टर रिक्त जागेमध्ये व्यापारी संकुल व किरकोळ विक्रीसाठी आय.ओ.सी.एलचे पेट्रोल पंप (४५X४५=२०२५चौ.मी.) प्रस्तावित आहे.

सर्व्हे नं.३३ डी, २३ मध्ये एकूण क्षेत्रफळ १.१६ हेक्टर या जागेमध्ये खामगाव शहरामध्ये जुन्या राष्ट्रीय महामार्ग क्र.६ वर खामगाव बसस्थानकाची सध्याची इमारत आहे. सदर जागा १९७८ साली ताब्यात घेण्यात आली होती व सन १९९२ साली बसस्थानक इमारतीचे बांधकाम पुर्ण करण्यात आले. बसस्थानकामध्ये एकूण ९ फलाट आहेत. तसेच हिरकणी कक्ष, स्टॅण्ड इनचार्ज रुम, पोलीस चौकी, बुकस्टॉल, फ्रुटस्टॉल, उपहारगृह, प्रसाधनगृह, जेनेरीक मेडीकल, रसवंतीगृह, केशकर्तनालय इ. आस्थापना बसस्थानकात आहेत. बसस्थानकाचे आधुनिकीकरण व नुतनीकरणाचे काम करण्यात आले आहे.

खामगाव बसस्थानकाचे आधुनिकीकरण व नुतनीकरण करण्याचे काम दि.१८.०७.२०१९ रोजी पुर्ण झालेले असून सद्यस्थितीत बसस्थानकावर प्रवाशांसाठी सर्व सुविधा उपलब्ध आहेत व बसस्थानक सुस्थितीत आहे.

सध्याचे कार्यरत बस स्थानक हे खामगाव शहरात असल्यामुळे प्रवाश्यांच्या दृष्टीने सोईस्कर आहे. खामगांव - शेगांव रोडवरील रा.प.महामंडळाच्या जागेत नवीन बसस्थानक केल्यास प्रवासी दुरावण्याची शक्यता नाकारता येत नाही. तसेच वाहतूकीच्या दृष्टीने बसस्थानकाची जागा पुरेशी आहे. व बसस्थानकावरील वाहतूक सुरळीतपणे चालू आहे त्यामुळे सध्यास्थितीत नवीन बसस्थानक हे खामगाव आगाराच्या जागेत स्थलांतरीत करण्याची आवश्यकता नाही.

*****

गृह (परिवहन) विभाग
लक्षवेधी सूचना क्र.९४४

## महाराष्ट्र विधानसभा
## सन-२०२३ चे पावसाळी अधिवेशन

**श्री.समाधान अवताडे, वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.९४४ पुढील प्रमाणे आहे:-**

**"राज्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना ये-जा करण्यासाठी मुख्य साधन म्हणून एसटी बसची ओळख असणे, माहे जुलै, २०२३ व त्या सुमारास स्थानिक लोकप्रतिनिधी म्हणून पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यात गाव भेट दौरा केला असता सदर गाव भेट दौऱ्यात पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील एसटी बस सेवा शाळेच्या वेळेत मिळत नसल्यामुळे विद्यार्थ्यांना जीव मुठीत घेऊन मिळेल त्या वाहनांनी प्रवास करावा लागत असल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे, विद्यार्थ्यांना शाळेत ने-आण करणाऱ्या वाहनावर लक्ष ठेवणे तसेच त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी प्रत्येक शाळेत शालेय परिवहन समिती स्थापनेचे शासनाने निर्देश दिलेले असणे, त्यानुसार मुख्याध्यापकांच्या अध्यक्षतेखाली समिती कार्यरत असून ही समिती पालक, विद्यार्थीसंघाचा प्रतिनिधी, वाहतूक पोलीस निरीक्षक, मोटार व निरीक्षक, बस कंत्राटदार प्रतिनिधी, स्थानिक प्रतिनिधी असणे, वेळेत मुबलक एसटी बसेस सोडाव्यात अशी मागणी येथील पालक व विद्यार्थी, सदर संघटना तसेच स्थानिक लोकप्रतिनिधींकडून वारंवार होत असणे, तरीदेखील प्रशासनामार्फत आवश्यक ती कारवाई न केल्यामुळे वेळेत व मुबलक प्रमाणात एसटी उपलब्ध होत नसणे, अनेकदा बस अथवा एसटी वेळेवर उपलब्ध न झाल्याने विद्यार्थी मिळेल त्या वाहनाने प्रवास करत असणे, सदर मिळेल त्या वाहनाने प्रवास करत असल्यामुळे विद्यार्थ्यांचे प्रचंड हाल होत असणे, तसेच कधी कधी माल वाहतूक करणाऱ्या टेम्पो सारख्या वाहनाच्या पाठीमागे उभे राहून प्रवास करत असताना अचानक विद्यार्थ्यांचा हात निसटून अपघात होऊन मोठ्या प्रमाणावर जखमी तर काही विद्यार्थ्यांना प्राण देखील गमवावे लागलेले असणे, यामुळे येथील स्थानिक विद्यार्थी व त्यांच्या पालकांमध्ये स्थानिक एसटी प्रशासनाविरुद्ध मोठ्या प्रमाणावर चीडीचे व असंतोषाचे वातावरण निर्माण होणे, यामुळे शासनाने शाळेच्या वेळात मुबलक प्रमाणात एसटी बसेस उपलब्ध करून देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.""**

## निवेदन
## {श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री (परिवहन)}

पंढरपूर व मंगळवेढा तालुक्यातील शालेय विद्यार्थ्यांसाठी रा.प.महामंडळाच्या पंढरपूर आगारामार्फत १०४ व मंगळवेढा आगारामार्फत १७६ शालेय फे-या चालनात आहेत. सदर फे-या शाळेच्या वेळेत सुरु असून त्या वेळेत सोडण्यात येत आहेत. विद्यार्थ्यांची सोय होण्याच्या दृष्टीकोनातून प्रत्यक्ष शाळेस भेट देऊन माहे जुलै २०२३ मध्ये पंढरपूर आगारामार्फत २१३७ व मंगळवेढा आगारामार्फत २३७५ विद्यार्थ्यांना पासेस वितरीत करण्यात आलेले आहेत, त्याचा तपशील खालीलप्रमाणे.

| आगार | मार्ग | सध्या आगाराची एकुण नियते | सध्या आगाराच्या एकुण फे-या | चालनात असलेल्या शालेय फे-यांची संख्या | देण्यात आलेल्या विद्यार्थी पास संख्या | शाळा/ महाविद्यालये संख्या |
|---|---|---|---|---|---|---|
| पंढरपूर | ओझेवाडी,सरकोली, तिसंगी, गादेगाव, त.शेटफळ, शेळेवे, तावशी, तन्हाळी, नेपतगाव, चळे, मुंढेवाडी, पिराची कुरोली, पोहोरगाव, येवती, विटे, विरवडे | ९१ | ४५४ | १०४ | २१३७ | ४९ |
| मंगळवेढा | पडळकरवाडी, मानेवाडी, उमदी, हुलजंती,पौट,हजापूर, मुंढेवाडी,आंधळगाव, भालेवाडी, वडदेगाव, असवेवाडी, धर्मगाव, शिरनांदगी,वठाण, लवंगी | ५३ | ३२० | १७६ | २३७५ | ४२ |

मा.विधानसभा सदस्य यांनी मागणी केल्याप्रमाणे मंगळवेढा-लवंगी, सिंधेवाडी, वठाण, गुंजेगाव, हुन्नुर, भोसे, मारोळी, अरळी या मार्गावर फे-यांमध्ये वाढ करण्यात आलेली आहे. तसेच पंढरपूर-तनाळी मुक्कामी फेरी गुंजेगाव पर्यंत विस्तारित करण्यात आलेली आहे.

लोकप्रतिनिधी, ग्रामस्थ, मुख्याध्यापक व विद्यार्थी यांच्या मागणीनुसार फे-यांमध्ये वाढ करण्यात येत आहे. विद्यार्थ्यींची कोणतेही गैरसोय होणार नाही. याची दक्षता घेण्यात येत आहे.

रा.प.बस वेळेवर उपलब्ध न झाल्याने विद्यार्थ्यांनी मिळेल त्या वाहनाने प्रवास केल्यामुळे तसेच टेम्पो सारख्या वाहनाच्या पाठीमागे उभे राहून प्रवास केल्यामुळे त्यामुळे विद्यार्थ्यांना प्राण गमवावे लागण्याच्या कोणत्याही घटनेची नोंद नाही.

*****

एच-१०८६ -१३अ•
H:\१२३\अधिवेशन २०२३\पावसाळी २०२३\लक्षवेधी १४४.doc

**लक्षवेधी सूचना क्र. १४२६**

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन-२०२३ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन**

**श्री. प्रमोद (राजू) रतन पाटील, मा. विधानसभा सदस्य यांनी नियम क्र.१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

"" उबेर ह्या अनधिकृत खाजगी व्यवसायिक टॅक्सी सेवेत कार्यरत असलेल्या एवरेस्ट फ्लीट्स ह्या नावे असलेल्या गाडी आणि ड्रायवर परविणाऱ्या खाजगी कंपनीच्या एक ड्रायव्हरच्या अशलाघ्य वर्तनामुळे श्री. समीर बिवलकर, जेष्ठ रंगकर्मी व्यक्तींना आपला प्राण गमवावा लागणे, दिनांक २८ जून २०२३ रोजी रात्रौ ९.३० वा त्यासुमारास ठाणे शहरातील राम मारुती रोड ह्या ठरलेल्या पिकअप पॉईंट वर न येता दूरवर त्यांना येण्यास भाग पाडणाऱ्या मो. इम्रान ह्या टॅक्सी चालकाने हुज्जत घालत प्रवास सुरु केला, गिरगाव साठी बुक केलेल्या उबेर टॅक्सी तो एव्हराई नगर इथून बांद्रा कुर्ला संकुलात जाणाऱ्या उड्डाण पुलावर गाडी नेल्यामुळे श्री. बिवलकर व त्यांच्या पत्नीने त्याला असे का केले, अशी विचारणा केल्यावर गाडी चालक इम्रान ह्याने अरेरावीची भाषा वापरून भांडण करू लागणे, त्याचे पर्यावसान असे झाले की त्यांना सुमारे रात्री १०.३० वाजता बि.के.सी. संकुलात त्या दाम्पत्यांना रस्त्यावर उतरण्यास भाग पाडणे आणि तिथून पोबारा करणे, ह्या घटनेमुळे अत्यवस्थ झालेल्या श्री. समीर बिवलकर ह्यांना तीव्र हृदयवीकाराचा झटका आला आणि त्यांचा जवळच्या रुग्णालयात जातांना रिक्षामध्ये दुर्दैवी मृत्यू होणे, त्यांना वांद्रे येथील गुरुनानक रुग्णालयात ब्रॉट डेड (BD) घोषित करणे, सदर बाब लक्षात घेता शासन "उबेर" व "एवरेस्ट फ्लीट्स" ह्यांच्या मालकांवर आणि मो. इम्रान ह्या चालकावर culpable homiside हया भा.द.वी. कलम २९९ अंतर्गत सदोष मनुष्यवदाचा गुन्हा दाखल करून, उबेर कंपनीस महाराष्ट्रामधून व्यवसाय करण्यास बंदी घालून कारवाई करण्याची शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.""

**निवेदन**

**{श्री. एकनाथ शिंदे, मा. मुख्यमंत्री (परिवहन)}**

उपरोक्त घटनेच्या अनुषंगाने खेरवाडी पोलीसांनी नमुद घटनेच्या अनुषंगाने तपासणी केली असता श्री. समीर बिवलकर यांचे वय ५८ होते ते बेस्ट मध्ये कारकून म्हणून सेवानिवृत झाले होते. त्यांच्या कुटुंबात हृदयविकाराची पार्श्वभूमी होती. दि.२८/०६/२०२३ रोजी श्री.समीर व संगिता बिवलकर हे त्यांचे कामानिमित्त ठाणे येथे गेले होते. त्यांना ठाणे ते गिरगाव असा प्रवास करीत असताना अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांना गुरुनानक हॉस्पिटल, वांद्रे (पूर्व) येथे दाखल केले असता, तेथिल डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले व त्यांचा तीव्र हृदयविकाराने मृत्यु झाल्याचे प्रमाणपत्रात नमूद केले आहे.

रोटा H/1017 (750-8-23)

याबाबत गुरुनानक हॉस्पिटल व मृत श्री.बिवलकर यांचे नातेवाईक यांच्याकडून सदर घटनेबाबत पोलीस ठाणे, खेरवाडी यांना कळविण्यात आलेले नाही.

दि.२९.०६.२०२३ रोजी श्री. सागर बिवलकर मृत श्री. समीर बिवलकर यांचे लहान बंधू यांनी मृत श्री. समीर विभाकर बिवलकर यांचा मृत्यु हा तिव्र हृदयविकारामुळे झाल्याने त्यांच्या मृत्युस मो. इम्रान हा उबेर चालक कारणीभूत नसल्याचे तसेच स्व. श्री.समीर यांचे मृत्युस कोणीही कारणीभूत नसल्याचे सांगितले असून तसा त्यांचा सविस्तर जवाब खेरवाडी पोलीस ठाणे येथे नोंद करण्यात आला आहे. सदर घटनेच्या अनुषंगाने उबेर इंडिया सिस्टीम प्रा.लि. या कंपनीस दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात याव्यात असे परिवहन आयुक्त यांना कळविण्यात आले आहे.

केंद्र शासनाने दिनांक २७.११.२०२० रोजी जारी केलेल्या Motor Vehicles Aggregator Guidelines, २०२० च्या अनुषंगाने ॲप आधारीत टॅक्सी सेवा देणाऱ्या कंपन्यांवर नियंत्रण ठेवण्यासाठी दाखल करण्यात आलेल्या जनहित याचिका(एल) क्र. ९७७५/२०२० मध्ये दि.०७.०३.२०२२ रोजी मा. उच्च न्यायालयाने दिलेल्या आदेशानुसार राज्यात Motor Vehicles Aggregator Guidelines, २०२० दि.०७.०३.२०२२ पासून लागू करण्यात आले आहे.

सदर याचिकेत न्यायालयाने आदेशीत केल्याप्रमाणे Maharashtra Regulation of the Aggregators Rules, २०२२ अस्तित्वात येण्यापूर्वी तात्पुरत्या स्वरुपात (Provisional License) ॲप बेस्ड वाहनांसाठी परवानगी देण्याच्या अनुषंगाने सक्षम प्राधिकारी व अपिलीय प्राधिकारी (Competent Authority and Appellate Authority) घोषित करण्याची अधिसूचना दि.०९.०३.२०२२ रोजी शासनाने जारी केली आहे.

त्यानुसार मोटार वाहन अधिनियम, १९८८ च्या कलम ९३ मधील तरतुदी, केंद्र शासनाच्या दिनांक २७.११.२०२० मधील मार्गदर्शक सूचना तसेच मा. उच्च न्यायालयाचे दिनांक ०७.०३.२०२२ रोजी दिलेल्या निर्देशानुसार व उक्त शासन अधिसूचनेच्या अधिन राहून उबेर इंडिया सिस्टीम प्रा.लि. या कंपनीस अनुज्ञप्ती जारी करण्यात आली आहे.

**************

गृह विभाग

लक्षवेधी सूचना क्र.१६१७

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३चे व्दितीय अधिवेशन

श्री. संजय जगताप, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

““ पुरंदर (जि. पुणे) तालुक्यातील मौजे काळेवाडी दिवे घाट तालुका पुरंदर येथे वाहन तपासणी केंद्र कार्यरत असून त्यासाठी साधारणता २८ एकर जागा उपलब्ध करून देण्यात आलेली असणे, सदर केंद्रात वाहन तपासणीची कामे व इतर संलग्न कामे परिवहन विभागाकडून केली जाणे, सदरील जागेमध्ये येणाऱ्या चालकांकरीता व कार्यालयीन कामकाजाकरिता पुणे शहरालगत मोठ्या प्रमाणावर जागा उपलब्ध असल्याने राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्र होण्याच्या दृष्टीने आराखडा तयार करणे, तरी मौजे- काळेवाडी दिवेघाट तालुका पुरंदर (जि. पुणे) येथे राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्राचा आराखडा तयार करण्याकरीता संबंधितांना तत्कालीन मा.उप मुख्यमंत्री यांच्या स्तरावरुन आदेश देऊनसुध्दा त्याची अंमलबजावणी अद्याप झालेली नसणे, त्यामुळे तेथील जनतेत रोष व्यक्त होत असतानाही शासनाकडून कारवाई करण्यास होत असलेला विलंब, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.””

---

मा. मुख्यमंत्री श्री. एकनाथ शिंदे यांचे निवेदन

मा. उप मुख्यमंत्री कार्यालयाचे दि.१०.१२.२०२१ रोजीच्या पत्रान्वये काळेवाडी, दिवेघाट ता. पुरंदर, जि. पुणे येथील शासनाच्या २८ एकर जागेमध्ये वाहन निरीक्षण व वाहन तपासणी केंद्र कार्यरत असून या केंद्रामध्ये सोयीसुविधा उपलब्ध करण्याकरीता विकास आराखडा तयार करण्यात यावा असे निर्देश दिले होते.

जनहित याचिका क्र.२८/२०१३ (श्रीकांत कर्वे वि. महाराष्ट्र शासन) मध्ये मा. उच्च न्यायालय, मुंबई यांनी दि. १८.०२.२०१६ रोजी शासनाने विविध ठिकाणी स्वयंचलित तपासणी केंद्र (Automated Testing Centers ) स्थापन करावेत, असे आदेश दिले होते. त्यानुसार शासन निर्णय क्र. एमव्हीडी - ०२१९/प्र.क्र.५७/परि.४, दि.२७.०७.२०२२ अन्वये रस्ता सुरक्षा निधीतून ताडदेव (मुंबई), तळोजा (पनवेल), हिंगणा (नागपूर), भोसरी (पिंपरी- चिचवड), दिवेघाट (पुणे) कोल्हापूर, औरंगाबाद, अमरावती, नांदिवली (कल्याण) व मर्फी (ठाणे) या १० ठिकाणी ARAI, पुणे या संस्थेमार्फत वाहन निरीक्षण व परीक्षण केंद्र (I & C Centres) उभारण्याकरिता रु.२०७.९८ कोटी इतक्या खर्चास प्रशासकीय मान्यता दिली आहे. सदर ठिकाणी वाहन निरीक्षण व परिक्षण केंद्र स्थापन करण्यासाठी परिवहन आयुक्त कार्यालयाने दि.१२.०८.२०२२ रोजी निविदा प्रसिध्द केली आहे. याप्रकरणी सेवापुरवठादाराची निवड करण्याची बाब कार्यवाही खाली आहे.

सध्या मौजे काळेवाडी, दिवेघाट ता. पुरंदर, जि. पुणे येथील शासनाची २८ एकर जागा उपलब्ध असून सदर ठिकाणी २५० मीटर लांबीचे ब्रेक टेस्ट ट्रॅक कार्यान्वित आहेत.

मा. उप मुख्यमंत्री कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या निर्देशानुसार दिवेघाट, ता. पुरंदर, जि. पुणे येथील वाहन निरीक्षण व परिक्षण केंद्रासाठी उपलब्ध असलेल्या जागेत राज्यस्तरीय प्रशिक्षण

केंद्राचा आराखडा व इतर सोयी-सुविधा तयार करणेबाबत परिवहन आयुक्त कार्यालयाने अहवाल सादर केला असून त्यामध्ये खालील बाबींचा समावेश आहे.

१) अधिकारी व कर्मचारी यांचेकरीता राज्यस्तरीय प्रशिक्षण केंद्र उभारणे:- अंदाजे १०० प्रशिक्षणार्थीसाठी सुसज्ज प्रशिक्षण केंद्र उभारणे, १०० प्रशिक्षणार्थी व १०० अधिकारी/कर्मचारी यांचेसाठी अद्यायावत निवासी सोयीसह परेड व प्रशिक्षण सुविधा, योगासन हॉल, मेडिकल क्लिनिक, डिपार्टमेंटल स्टोअर्स इत्यादी अद्यायावत सुविधा निर्माण करणे.

२) ब्रेक टेस्ट व इतर कामकाजासाठी येणाऱ्या तसेच प्रस्तावित वाहनचालक/मालकांसाठी सुविधा :- या कामासाठी दैनंदिन ३ ते ४ हजार वाहन मालक/चालक यांची भेट अपेक्षित आहे. त्यांच्यासाठी बाथरुम, कॅन्टीन, पिण्याचे पाणी, प्रतिक्षा कक्ष, रेलींग व ई-व्हेईकल चार्जीग पॉईंट, वाहन तपासणीकरिता २ रॅम्प, सिम्युलेटर्स, व्याख्यान कक्ष, अधिकारी कक्ष, इत्यादी सोयी सुविधा उपलब्ध करून देणे.

३) वाहन योग्यता नूतनीकरण कामकाजासाठी नियुक्त असणाऱ्या अधिकाऱ्यांकरिता कक्ष उभारणे:- वाहन योग्यता नूतनीकरण कामकाजासाठी नियुक्त अधिकारी जसे प्रादेशिक परिवहन अधिकारी तथा वरिष्ठ अधिकारी, उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, तसेच सहा. प्रादेशिक परिवहन अधिकारी, कार्यकारी अधिकारी यांचेकरिता एकूण ४३ कक्ष तसेच प्रत्येकी एक सुसज्ज संगणकीय कक्ष , कर्मचारी कक्ष, भोजन कक्ष, कॉन्फरन्स हॉल उभारणी करणे.

प्रादेशिक परिवहन अधिकारी, पुणे यांना काळेवाडी, दिवेघाट, ता. पुरंदर, जि. पुणे येथील वाहन निरीक्षण व परिक्षण केंद्रासाठी उपलब्ध असलेल्या जागेत विविध सोयी सुविधा तसेच उपरोक्त सोयी सुविधांसाठी लागणारी जागा, जागेचे स्थान निश्चिती व त्याअनुषंगाने करावे लागणारे बांधकाम व पायाभूत सुविधा यांचा आराखडा व अंदाजपत्रक अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पुणे यांचेकडून तयार करुन घेण्याबाबत परिवहन आयुक्त स्तरावरुन सूचित करण्यात आले आहे.

***************

लक्षवेधी सूचना क्र.५७४

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री.रवींद्र धंगेकर,श्री.संजय जगताप,श्री.बाळासाहेब थोरात,श्री.नानाभाऊ पटोले,श्री.अमिन पटेल, श्री.अस्लम शेख,श्री.विजय वडेट्टीवार,प्रा.वर्षा गायकवाड,श्री.संग्राम थोपटे,श्री.सुनिल केदार, श्री.बळवंत वानखडे,कुमारी प्रणिती शिंदे,श्री.विश्वजित कदम,वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम,१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे :-

" पुणे शहर हे विद्येचे माहेरघर म्हणून ओळख असली तरी या शहरात शिक्षणासाठी बाहेरगावाहून व परदेशातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना अनेक अडचणी सामोरे जावे लागत असणे, विद्यार्थ्यांना विशेषत: विद्यार्थ्यांनींची राहण्याची व्यवस्था शासकीय वसतिगृहात होत नसल्याने होत असलेली कोंडी, शासकीय वसतिगृहात काहींना प्रवेश मिळतो तर काहींना मिळत नसणे, त्यामुळे विद्यार्थीनींना खाजगी वसतिगृहात प्रवेश घेण्याची वेळ येणे, आधीच शिक्षणाकरीता कॉलेजच्या फीपेक्षा जास्त पैसे देऊन प्रवेश घ्यावा लागते आणि नंतर वसतिगृहाकरिता अव्वाच्या सव्वा पैसे भरावे लागत असल्याने त्यांच्यावर ओढावलेले आर्थिक संकट,त्याचबरोबर खासगी वसतिगृहात आधीच तीन महिन्यांचे भाडे जमा करावे लागत असणे, त्यातच खाजगी होस्टेलच्या किंमतीत झालेली ३० टक्के वाढ, बाहेर गावाहून आलेल्या विद्यार्थ्यांना हे परवडणारे नसल्याने त्यांना शिक्षणापासून वंचित राहण्याची येत असलेली वेळ, उच्च शिक्षणासाठी पुण्यात येणाऱ्या विद्यार्थ्यांना विशेष बाब म्हणून सुरक्षित, स्वच्छ आणि परवडेल अशा दरात राहण्याची सुविधा करण्याकरीता शासकीय वसतिगृहे वाढविण्याची नितांत आवश्यकता, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने निर्णय घेण्याची गरज, याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

.......................................................................................................................................

### मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांचे निवेदन

राज्यात सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाच्या अधिनस्त एकूण ४४१ शासकीय वसतिगृहे कार्यरत असून यामध्ये मुलांची-२२९ तर मुलींची-२१२ वसतिगृहे आहेत. या वसतिगृहामध्ये अनुसूचित जाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती इतर मागास प्रवर्ग व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थी हे शिक्षण घेत आहेत.या वसतीगृहामधून विद्यार्थ्यांना मोफत निवास, भोजन,निर्वाहभत्ता, शैक्षणिक साहित्य इत्यादी सोयी सुविधा देण्यात येतात. पुणे जिल्हयामध्ये एकूण २३ शासकीय वसतिगृहे मंजूर असून यामध्ये मुलांचे-१३ व मुलींच्या १० वसतिगृहांचा समावेश आहेत. पुणे जिल्हयात मुलांच्या १३ वसतिगृहाची मान्य संख्या १३६७ इतकी असून सद्यस्थितीत १२४१ विद्यार्थी प्रवेशित आहेत. तर मुलींच्या १० वसतिगृहाची मान्य संख्या ९७० इतकी असून ७२५ मुली प्रवेशित आहेत. विभागांतर्गत वसतिगृहाच्या प्रवेशासाठी शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता दिनांक २७.०६.२०२३ पासून प्रवेश प्रक्रिया सुरु करण्यात आली असून दिनांक ३१.०८.२०२३ पर्यंत पूर्ण करण्यात येत आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने दिनांक २१ डिसेंबर २०१८च्या शासन निर्णयान्वये मागासवर्गीय मुलामुलींच्या शासकीय वसतिगृहातील प्रवेशासाठी आरक्षण निश्चित करण्यात आले असून त्यानुसार अ.जा.-८० %, अ.ज.- ३ %, वि.जा व भ.ज.- ५ %, आर्थिकदृष्टया मागास व इमाप्र-

५ %,विमाप्र- २ %, दिव्यांग- ३ %, अनाथ २ % याप्रमाणात आरक्षणानुसार वसतिगृहामध्ये विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार प्रवेश देण्यात येतो.

पुणे शहरामध्ये सद्यस्थितीत १००० क्षमतेचे वसतिगृह मंजूर असून यामधील २५० विद्यार्थी क्षमतेचे युनिट क्र. १ चे वसतिगृह विश्रांतवाडी,पुणे येथे कार्यरत आहे. उर्वरित २५० विद्यार्थी क्षमतेच्या तीन वसतिगृहांच्या इमारतीचे बांधकाम शांती नगर, विश्रांतवाडी, पुणे येथे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सुरू असून आतापर्यंत ९० % काम पूर्ण झालेले आहेत. तथापि,सदर इमारतीमधील उद्‌वाहन व्यवस्था, भोगवटा प्रमाणपत्र, अग्निशमन व्यवस्था इ. कामे प्रगतीत असून सदरील कामे तातडीने पूर्ण करण्यासाठी विभाग प्रयत्नशील आहे.

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत चालविण्यात येणारी वसतिगृहे ही अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी आहे. परदेशातून येणाऱ्या विद्यार्थ्यांच्या वसतिगृह प्रवेशाबाबत कोणत्याही सुचना/ नियमावली नाही. त्यामुळे परदेशातून येणाऱ्या विद्यार्थ्यांना वसतिगृहामध्ये प्रवेश देण्यात येत नाही. पुणे जिल्हयातील एकूण २३ शासकीय वसतिगृहामध्ये गुणवत्तेच्या आधारे प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांना विनामुल्य भोजन, निर्वाह भत्ता, स्टेशनरी, शैक्षणिक साहित्य, शैक्षणिक सहल प्रवास खर्च, रेनकोट, गमबुट, छत्री,ॲप्रन,बॉयलर सुट इ. सोयी सुविधा देण्यात येतात. वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांच्या सुरक्षेकरिता बाह्यस्त्रोत यंत्रणेमार्फत सुरक्षारक्षक पुरविण्यात आले असून वसतिगृहातील स्वच्छतेची कामे बाह्यस्त्रोत यंत्रणेमार्फत करण्यात येते. तसेच, वसतिगृहांमधील स्वच्छता व सुरक्षितता यांचे पर्यवेक्षण व नियंत्रण सबंधित वसतिगृहाचे गृहपाल यांचेकडून करण्यात येते.

वसतिगृहामधील प्रवेशित विद्यार्थ्याच्या अडी-अडचणीचे निराकरण करण्याकरीता जिल्हा स्तरावर विद्यार्थी यांचेसमवेत संवाद साधून विद्यार्थ्यांच्या समस्या/अडचणीचे वसतिगृहातच संवाद उपक्रमाच्या माध्यमातून निराकरण करण्यात येते. याशिवाय वसतिगृहामधील भोजनाची गुणवत्ता नियंत्रणाकरीता वसतिगृहामध्ये भोजन समिती, क्रिडा समिती, आरोग्य समिती, अभ्यास समिती, स्वच्छता समिती, सांस्कृतिक समिती, शिस्त समिती इ. समित्या कार्यान्वीत करण्यात आल्या असून यामध्ये विद्यार्थ्यांचा सहभाग असतो.

अनुसूचित जाती प्रवर्गातील विद्यार्थी वसतिगृह प्रवेशास पात्र असूनही वसतिगृहास प्रवेश न मिळाल्यास अशा विद्यार्थ्यांना भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेसाठी अर्ज केल्यास त्यांना स्वाधार योजनेचा लाभ देण्यात येतो. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजने अंतर्गत पुणे जिल्ह्यामध्ये शैक्षणिक वर्ष २०२१-२०२२ मध्ये १४६२ विद्यार्थ्यांना तर सन २०२२-२०२३ या शैक्षणिक वर्षामध्ये ३४२७ विद्यार्थ्यांना लाभ देण्यात आलेला आहे.

*****************

H-1075-1A

e.

लक्षवेधी सूचना क्र.९४०

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री.सुभाष धोटे,श्री.नानाभाऊ पटोले,श्री.बाळासाहेब थोरात,श्री.विजय वडेट्टीवार,श्री.विकास ठाकरे,श्री.सुनिल केदार,ॲड.यशोमती ठाकूर(सोनावणे),श्री.बळवंत वानखडे,श्री.अमिन पटेल, श्री.अस्लम शेख, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम,१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

" राज्यातील चंद्रपूर जिल्हयातील सामाजिक न्याय विभागाचे वसतिगृह शैक्षणिक सत्र सुरू होऊन सुध्दा विद्यार्थ्यांसाठी अद्याप खुले झाले नसणे, अनेक शाळा, कनिष्ठ महाविद्यालयांचे निकाल जाहीर झाले असून विद्यार्थ्यांची वरच्या वर्गात बढती झाल्याने पुढील शिक्षणासाठी वसतिगृहांची आवश्यकता असणे, अनेक विद्यार्थी हे ग्रामीण भागातील असल्याने वसतिगृहाच्या माध्यमातून शहराच्या ठिकाणी प्रवेश घेऊन आपले शिक्षण पूर्ण करण्याकरिता शहराच्या ठिकाणी येत असणे, जवळपास ६० ते ७० टक्के विद्यार्थी वसतिगृहात प्रवेशित असून शैक्षणिक सत्र सुरू होऊन बराच कालावधी लोटल्याने संबंधित विद्यार्थ्यांना अनंत अडचणींचा सामना करावा लागत असणे, शासनाच्या दिरंगाईमुळे वसतिगृहाच्या भोजनगृहाचे कंत्राट अद्याप दिले न गेल्याने विद्यार्थ्यांची गैरसोय होत असणे, भोजन व्यवस्था निश्चित करणे, वसतिगृहाची साफसफाई करणे इत्यादी बाबी शासनस्तरावर पूर्ण करून घेणे अनिवार्य असतानाही याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष तसेच टाळाटाळमुळे असंख्य विद्यार्थी,पालक यांच्यात शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना,याबाबत शासनामार्फत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना "

........................................................................................................................

### मा.मुख्यमंत्री,महाराष्ट्र राज्य यांचे निवेदन

मागासवर्गीयांची शैक्षणिक,सामाजिक व आर्थिक उन्नती तसेच त्यांचे राहणीमान उंचावून समाजातील इतर घटकाप्रमाणे त्यांना जीवन जगता यावे तसेच त्यांना उच्च शिक्षणाच्या संधी उपलब्ध व्हाव्यात या उद्देशाने सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडून शासकीय वसतिगृहाची योजना राबविण्यात येते.या वसतीगृहामधून विद्यार्थ्यांना मोफत निवास,भोजन, निर्वाहभत्ता, शैक्षणिक साहित्य इत्यादी सोयीसुविधा देण्यात येतात.चंद्रपूर जिल्हयात मागासवर्गीय मुलामुलींची एकूण ११ शासकीय वसतिगृहे सुरू असून यामध्ये मुलांची-०५ तर मुलींच्या-०६ वसतिगृहांचा समावेश आहेत. सर्वसाधारणपणे इयत्ता १० वी,१२ वीचा निकाल लागल्यानंतर शासकीय वसतिगृहे सुरू करण्यात येतात. त्यानुसार चंद्रपूर जिल्ह्यातील कार्यरत ११ शासकीय वसतिगृहांपैकी १० वसतिगृहे वेळेवर सुरू करण्यात आलेली आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील केवळ मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, राजूरा येथील भोजन पुरवठादाराने भोजन पुरवठा बंद केल्याने तसेच कार्यरत अन्य भोजन पुरवठादार भोजन पुरवठा करण्यास तयार नसल्याने सदरील शासकीय वसतिगृह वेळेत सुरू होवू शकले नाही. शैक्षणिक सत्र सन २०२२-२३ या वर्षामधील विद्यार्थ्यांची वार्षिक परीक्षा सुरू असल्याने दिनांक ०१.०७.२०२३ ते दिनांक१०.०७.२०२३ या कालावधीत निवासी विद्यार्थ्यांची गैरसोय होवू नये म्हणून मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह, राजूरा या वसतिगृहाचे गृहपाल यांचेमार्फत जेवणाचे डबे पुरविण्यात आले आहे.

(क्र.मा.प.

शोप्र. ळ्य - १०७६ (७५०-८-२३)

वसतिगृहातील प्रवेशित विद्यार्थ्यांना शासन नियमाप्रमाणे भोजन पुरवठा करणे आवश्यक असून पुरवठादारास दिलेल्या दराने भोजन पुरवठा करू शकत नसल्याने सहाय्यक आयुक्त,समाज कल्याण, चंद्रपूर यांचेकडून भोजन पुरवठा करण्यासाठी वर्तमानपत्रामध्ये जाहिरात देण्यात आली होती. तथापि, जिल्हयातील भोजन पुरवठादार मंजूर दराने भोजन पुरवठा करण्यास तयार नव्हते.

शासकीय वसतिगृहे व शासकीय निवासी शाळांतील प्रवेशित विद्यार्थ्यांना भोजन पुरवठा करण्यासाठी सन २०१८-१९ मध्ये ई-निविदा प्रक्रीया राबविण्यात आलेली होती.तथापि,ई निविदा प्रक्रीयेस दोन वर्षापेक्षा अधिक कालावधी झाला असल्याने सदरील ई-निविदा प्रक्रीया रद्द करण्यात आलेली आहेत. दरम्यान,कोविड-१९ चा प्रादुर्भाव कमी झाल्यानंतर शासकीय वसतिगृहे व शासकीय निवासी शाळांतील प्रवेशित विद्यार्थ्यांची भोजनाची गैरसोय होऊ नये म्हणून भोजन ठेक्याची निविदा प्रक्रीया पुर्ण होईपर्यंत प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण यांचे स्तरावर स्थानिक पातळीवर भोजनाची तात्पुरती व्यवस्था करण्याबाबत निर्देश देण्यात आले होते.त्यानुसार प्रादेशिक उपायुक्त,समाज कल्याण,नागपूर यांनी दिनांक १८.०७.२०२२ च्या आदेशान्वये रू.३४१५/-या दराने भोजन पुरवठा करण्याचे आदेश देण्यात आलेले आहेत. दिनांक ११.०७.२०२३ ला मागासवर्गीय मुलांचे शासकीय वसतिगृह,राजूरा या वसतिगृहासाठी स्थानिक स्तरावरील भोजन पुरवठादार यांना तात्पुरत्या स्वरूपात भोजनाचे कंत्राट देऊन सदर वसतिगृह दिनांक ११.०७.२०२३ पासून सुरू करण्यात आले आहे. चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व शासकीय वसतिगृहात नियमितपणे स्वच्छता करण्यात येत असून स्वच्छतेबाबत कोणतीही तक्रार नाही. शासकीय वसतिगृहे व शासकीय निवासी शाळांमधील प्रवेशित विद्यार्थ्यांना भोजन व दूध पुरवठा करण्यासाठी राबविण्यात आलेली ई निविदा प्रक्रीया अंतिम करण्याची कार्यवाही सुरू आहे. सद्यस्थितीत चंद्रपूर जिल्ह्यातील सर्व शासकीय वसतिगृहे सुरू करण्यात आलेली असून विद्यार्थ्यांना नियमित भोजन पुरवठा करण्यात येत आहे.

****

H-1076-1A

लक्षवेधी सूचना क्र.१३८४

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे व्दितीय अधिवेशन

श्री. नारायण कुचे वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"केंद्र सरकार व राज्य सरकार प्रत्येक गरीबाला स्वत:चे हक्काचे घर मिळावे म्हणून महत्वाकांक्षी योजना राबवित असणे, त्यात केंद्र सरकारने प्रधानमंत्री आवास योजना सुरू करणे, तसेच त्याच धरतीवर रमाबाई घरकुल योजना, तसेच यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजना राज्य सरकारने सुरू केलेली असणे, या योजनांसाठी ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना १ लक्ष २० हजार इतके अनुदान देण्यात येणे, शहरी भागासाठी प्रधानमंत्री आवास योजनेला व रमाबाई घरकुल योजनेला २ लक्ष ५० हजार इतके अनुदान देण्यात येणे, परंतु ग्रामीण भागामध्ये देण्यात येणारे १ लक्ष २० हजार अनुदान हे तुटपुंजे असल्याने ग्रामीण भागातील लाभार्थ्यांना घर पूर्ण न होता ते अर्धवट राहणे, त्या लाभार्थ्यांना पूर्ण घर बांधण्याकरीता अनुदान वाढवून देण्याची आवश्यकता असणे, त्यामुळे रमाबाई घरकुल योजनेसाठी २ लक्ष ५० हजार व यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत करीता २ लक्ष ५० हजार असे अनुदान वाढ करण्यात यावी, जेणेकरून ग्रामीण भागातील नागरिकांच्या घरांचे स्वप्न पूर्ण होईल, सद्य परिस्थितीचा विचार केला असता लोखंड, सिमेंट, विटा, मजुरी व इतर साहित्याच्या किंमतीत वाढ झाली असल्याने २ लक्ष ५० हजार रुपये अनुदान शासनाने मंजूर करणे गरजेचे असणे, यावर शासनाने तात्काळ निर्णय घेऊन अनुदान वाढविण्याकरीता करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन -

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागामार्फत राज्यातील अनुसूचित जाती व नवबौध्द घटकांतील कुटुंबांचे राहणीमान उंचवावे व त्यांचा निवाऱ्याचा प्रश्न सुटावा म्हणून ग्रामीण व शहरी भागांमध्ये त्यांच्या स्वत:च्या जागेवर अथवा कच्च्या घराच्या ठिकाणी पक्के घर बांधून देण्यासाठी सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने शासन निर्णय दिनांक १५ नोव्हेंबर,२००८ व शासन निर्णय दि. ९ मार्च, २०१० अन्वये रमाई आवास योजना राबविण्याची कार्यपध्दती व लाभार्थ्यांची पात्रता निश्चित केली आहे. त्यानुसार योजनेची प्रत्यक्ष अंमलबजावणी सन २०१०-११ या वर्षापासून ग्रामीण भागासाठी जिल्हास्तरावरील जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा व शहरी भागासाठी महानगरपालिका, नगरपालिका/नगरपरिषद व नगरपंचायत या स्थानिक यंत्रणांमार्फत सुरु आहे.

केंद्रीय प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) मधील लाभार्थ्यांना ग्रामविकास व जलसंधारण विभागाच्या दि.१४.१०.२०१६ रोजीच्या शासन निर्णयान्वये देण्यात येणारे अनुदान विचारात घेऊन रमाई आवास योजना ( ग्रामीण व शहरी ) करिता विभागाच्या दि.७.१.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये खालीलप्रमाणे अनुदान निश्चित करण्यात आले आहे.

१. रमाई आवास योजनेंतर्गत (ग्रामीण), प्रति घरकूल (शौचालय बांधकामासह) अनुदान साधारण क्षेत्र रू.१,३२,०००/- व नक्षत्रग्रस्त व डोंगराळ क्षेत्रासाठी (शौचालय बांधकामासह) रू.१,४२,०००/- निश्चित करण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

२. शौचालय बांधण्यासाठी लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या रू.१२०००/- ची प्रतिपुर्ती पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाकडून करण्यात येते.

३. प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण) मधील लाभार्थ्यांप्रमाणे रमाई आवास योजनेच्या लाभार्थ्यांना MGNREGA अभिसरणाव्दारे साधारण क्षेत्रासाठी रू.१७,२८०/- व नक्षलग्रस्त व डोंगराळ क्षेत्रासाठी रू.१८,२४०/- अनुदान उपलब्ध करून देण्यात येते.

४. रमाई आवास योजनेसाठी शहरी भागातील (महानगरपालिका, नगरपालिका,नगरपरिषद, आणि नगरपंचायत) वैयक्तीक लाभार्थ्यांकरीता प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) प्रमाणे (३० चौ.मी. घरकुल बांधकामासाठी) लाभाची रक्कम व लाभार्थ्यांची पात्रता त्यामध्ये बदल करण्यास मान्यता देण्यात आलेली असून वार्षिक उत्पन्न रू.३.०० लक्ष पर्यंत असलेल्या लाभार्थ्यांना घरकुल बांधकामासाठी रू.२.५० लक्ष अनुदान अनुज्ञेय आहे.

५. वरीलप्रमाणे ग्रामीण व शहरी भागातील सुधारित अनुदान सन २०१६-१७ या आर्थिक वर्षापासुन लागू करण्यात आलेला आहे.

ग्रामविकास विभागाने पंतप्रधान आवास योजना- शहरी च्या धर्तीवर प्रधानमंत्री आवास योजना-ग्रामीण अंतर्गत अनुदान रू.१.२० लक्ष वरून, रू.२.५० लक्ष वाढवून मिळण्याबाबतचा प्रस्ताव केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाकडे दि.२५.११.२०२० रोजी सादर करण्यात आला असता, केंद्र शासनाने सद्यस्थितीत कुठल्याही प्रकारची वाढ करता येणार नाही, असे दि.२.१२.२०२० रोजीच्या पत्रान्वये ग्रामविकास विभागास कळविले आहे. तसेच त्यानंतरीही दि.१.८.२०२२ रोजी पुन्हा केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाकडे अनुदान वाढीची मागणी केली असून अद्याप केंद्र शासनाकडून कोणताही प्रतिसाद प्राप्त झालेला नाही.

राज्य शासनामार्फत राबविण्यात येणाऱ्या रमाई आवास योजना, यशवंतराव चव्हाण मुक्त वसाहत घरकुल योजना ह्या केंद्रीय पंतप्रधान आवास योजनेच्या धर्तीवर राबविण्यात येत असल्याने केंद्रीय पंतप्रधान आवास योजनेच्या अनुदानात वाढ झाल्यास त्याप्रमाणे शासन स्तरावर योग्य तो निर्णय घेतला जाईल.

******************

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक २४५**

**श्रीमती मनिषा चौधरी,** वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"मुंबई बोरिवली (प) येथील गणपत पाटील नगर लिंक रोड येथे सुमारे १५ ते २० हजार झोपडया असून तेथील राहणाऱ्या नागरिकांसाठी प्रत्येकाला वीज, पाणी या योजने अंतर्गत सर्वांना सुविधा उपलब्ध करून देण्यात येणे, त्यासुविधा मिळणेकरीता MCZMA ची परवानगी घेण्यात आलेली असणे, परंतु अद्याप गटारे, पायवाटा, पथदिवे, शौचालय या सारख्या मूलभूत सुविधा उपलब्ध नसणे, सदर ठिकाणी wet land ची हद्द निश्चित करण्यात येणे, सदर ठिकाणी राहणाऱ्या झोपडी धारकांना त्याच ठिकाणी घर देण्याची मागणी करण्यात येणे, याबाबत उक्त विषयबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा. मंत्री महोदयांना निवेदन देऊनही अदयापपर्यंत कोणतीही कार्यवाही न होणे, गणपत पाटील नगर येथील नागरिकांना मुलभूत सेवा सुविंधापासून वंचित रहावे लागत असल्यामुळे झोपडीधारक यांच्यामध्ये पसरलेले असंतोषाचे वातावरण, शासनाबद्दल निर्माण झालेली तीव्र चीड व संतापाची भावना, उक्त ठिकाणी शासनाने तात्काळ मुलभूत सुविधा उपलब्ध करुन देण्याची गरज, सदर झोपडपट्टी क्षेत्र म्हणून घोषित करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया.."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

गणपत पाटील नगर वसाहत न.भू.क्र. ५३२ अ या खाजगी जागेवर स्थित असून, सदर खाजगी क्षेत्र सुमारे ७०.९० हेक्टर वने म्हणून अधिसूचित आहे. सदर झोपडपट्टीखालील काही क्षेत्र हे कांदळवन व खाजगी वन म्हणून घोषित केलेले आहे. गणपत पाटील नगरमध्ये काही जागा सरकारी व खाजगी मालकीची आहे. उपजिल्हाधिकारी (अति/निष्का) बोरीवली-२ यांचेमार्फत सदर खाजगी मिळकतीबाबत गलिच्छ वस्ती घोषित करण्याच्या अनुषंगाने जमिनीची मोजणी होऊन नकाशा तयार झालेला नाही. नगर भूमापन अधिकारी, बोरीवली यांचेमार्फत मोजणी झाल्यानंतर पुढील कार्यवाही करण्यात येणार आहे.

गणपत पाटील नगर ही दहिसर (प.) येथील १२० फुट रुंद लिंकरोड लगत अंदाजे २५ ते ३० एकर खाजगी जमिनीवर मोठी झोपडपट्टी सदृश वसाहत आहे. सदर झोपडपट्टी गलिच्छ वस्ती घोषित नसल्यामुळे सदर ठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत पायवाटा, गटारे, पथदिवे इत्यादी सुविधा पुरविण्यात येत नाहीत. तथापि मानवतेच्या दृष्टीकोनातून सदर ठिकाणी बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत साफसफाई, धुम्रफवारणी, किटकनाशक फवारणी इत्यादी सुविधा पुरविण्यात येतात. तसेच सदर परिसरात रोगराई पसरु नये म्हणून नागरिकांचे लसीकरण शिबिरे आयोजित केली जातात. लहान मुलांना जंताचे व विटॅमिन "ए" ची औषधे देण्यात येतात.

गणपत पाटील नगर परिसरातील घरोघरी जाऊन आरोग्य विषयक जनजागृती कार्यक्रम राबविले जातात. गणपत पाटील नगर गल्ली नंबर १४ च्या बाहेर लिंकरोड लगत "स्वच्छ भारत मिशन" अंतर्गत ६० आसनी शौचालयांची व्यवस्था करण्यात आली आहे. तसेच "सर्वांसाठी पाणी" या बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या धोरणानुसार गणपत पाटील नगर येथे दिनांक २४.०७.२०२३ पर्यंत एकूण १२७५ जलजोडण्या दिल्या आहेत.

********

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री.किसन कथोरे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

" ठाणे जिल्ह्यातील कुळगाव बदलापूर नगरपालिकेस राज्य शासनाने कोविड निवारणाकरिता खर्च झालेल्या कामांसाठी २०.०० कोटी रुपये सन २०२२ मध्ये वितरीत करण्यात येणे, सदरचा निधी कोविड निवारणासाठी आलेला असताना हा निधी झालेल्या विविध विकास कामांवर म्हणजेच धनकचरा बिले देण्यावर व इतर कामांवर खर्च केलेला असणे, परंतु कोविड-१९ च्या कालावधीमध्ये भोजन व्यवस्था ठेकेदार, वैद्यकीय औषधे व साहित्य पुरविणाऱ्या ठेकेदाराची देयके आजतागायत प्रलंबित ठेवण्यात येणे, त्याचप्रमाणे नगरपरिषद लेखा व वित्त विभागाने ठेकेदारांची सुरक्षा अनामत रक्कम सुमारे ११००० कोटी रुपये कोविड कालावधीत खर्च केलेली असणे, सदरची रक्कम काम पूर्ण झाल्यानंतर थर्ड पार्टी ओडीट करून ठेकेदार मागणी करत असूनही ठेकेदारांना सुरक्षा अनामत रक्कम दिली जात नसणे, नगरपरिषदेकडे शिल्लक निधी नसतानाही कोणाच्या तरी दबावाला बळी पडून किवा टक्केवारीच्या मोहामुळे तरतूद नसतानाही विकास कामांना आणि त्यातही गरजेची व अत्यावश्यक कामे नसतानाही ठेकेदाराचे हित जोपासण्यासाठी विविध विकास कामांना मंजूर देण्यात येणे यामध्ये प्रत्येक वार्डात कमानी बसविणेपों, सेल्फी पोईनटचे बांधकाम करणे, विविध ठिकाणी आर्ट ग्यालऱ्या बसविणे अशा प्रकारच्या गरजेच्या नसलेल्या कामांना निधी वितरीत करून नागरिकांच्या व शासनाच्या पैशाचा दुरुपयोग करण्यात येणे, याबाबत शासनाने करावयाची व करण्यात येणारी कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया "

## <u>मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन</u>

कुळगांव बदलापूर नगरपरिषदेने कोविड कालावधीत गौरी हॉल, जान्हवी हॉल व BSUP येथे कोविड रुग्णालये स्थापन करून रुग्णांकरीता उपचार व्यवस्था उभी करुन आरोग्य सेवेसाठी स्वनिधीतून नगरपरिषदेने खर्च केला. सदर खर्चाची प्रतिपुर्ती करण्यासाठी State Disaster Relief Fund मधून सुमारे ४५ कोटी इतके अनुदान उपलब्ध करून देण्याबाबतचा प्रस्ताव प्राप्त झाला. तसेच नगरपरिषदेच्या विविध मुद्दयांच्या अनुषंगाने झालेल्या बैठकीत नगरपरिषदेकडे निधी कमी पडत असल्याची बाब निदर्शनास आल्यानंतर कोविड निवारणाकरीता नगरपरिषदेने केलेल्या खर्चाची प्रतिपुर्ती म्हणून रु.२० कोटी इतका निधी मुख्यमंत्री सहायता निधीतून उपलब्ध करून देण्यात आला. सदर निधी कोविडच्या बाबींवरच खर्च करणे अपेक्षित नव्हते. कोविड बाबींसाठी नगरपरिषदेचा सुमारे ४५ कोटी रुपये इतका खर्च झाला होता. कोविड कालावधीमधील भोजन व्यवस्था ठेकेदार व औषधे पुरवठा करणाऱ्या एजन्सीची देयके नगरपरिषदेकडे प्रलंबित नाहीत. तसेच नगर परिषदेच्या लेखा वित्त विभागाकडे सुमारे ११ कोटी एवढी रक्कम सुरक्षा अनामत म्हणून जमा होती.

केंद्र शासनाच्या भविष्य निर्वाह निधी विभागाच्या तपासणीमध्ये काही ठेकेदारांनी कामगारांच्या भविष्य निर्वाह निधीची रक्कम भरली नसल्यामुळे भविष्य निर्वाह निधी विभागाने नगर परिषदेच्या लेख्यांची तपासणी करून नगर परिषदेचे सुरक्षा अनामतीचे खाते कर्मचारी भविष्य निर्वाह निधी अधिनियम १९५२ मधील कलम-७ अ अन्वये नोटीस देऊन सील केले. सदर भविष्य निर्वाह निधीबाबत सुनावणी घेऊन ज्या ठेकेदारांनी भविष्य निर्वाह निधीचा भरणा केला नव्हता, त्याबाबत तपासणी करुन त्यांची सुरक्षा अनामत रक्कम नगरपरिषदेने अदा केली नाही. याप्रकरणी नगर परिषदेने मा.उच्च न्यायालयात रिट याचिका क्र.४९७३/२०२१ दाखल केली होती. भविष्य निर्वाह निधी संगठण, ठाणे यांनी वर्ग करुन घेतलेल्या रकमेपैकी ५०% टक्के रक्कम व्याजासह कुळगाव बदलापुर नगरपरिषदेस परत करण्याचे आदेश मा.न्यायालयाने दिले आहेत. त्यानुसार पात्र ठेकेदारांना क्रमाने सुरक्षा अनामत रक्कम अदा करण्यात येत आहे. तरतूद नसताना कोणत्याही विकास कामांना नगरपरिषदेने परवानगी दिलेली नसून स्थानिक लोकप्रतिनिधी तसेच नागरिकांच्या मागणीनुसार केवळ अत्यावश्यक कामेच करण्यात येत आहेत. कोरोना कालावधीनंतर कमानी बसविणे, सेल्फी पॉइंटचे बांधकाम करणे व नवीन आर्ट गॅलरी तयार करणे अशा प्रकारची कामे घेण्यात आलेली नाहीत.

******

रोटा/एच-१०९४[७००-८-२०२३]•

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन**

**लक्षवेधी सूचना क्रमांक ५११**

**श्री. भास्कर जाधव,** वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"सिटी सर्व्हे क्र. २०/७६, दादर नायगाव डीव्हीजन, शारदा मेन्शन, डॉ.बाबसाहेब आंबेडकर मार्ग, दादर (पूर्व), मुंबई-४०००१४ हा भूखंड महाराष्ट्र प्रादेशिक रचना अधिनियम १९६६ च्या कलम १२६ अन्वये सार्वजनिक आरोग्य हेतूसाठी (Public Sanitary Convenience & amp; Road Depot) राखीव असणे, परंतु या भूखंडावर सन १९८६ पासून बेकायदेशीर इमारत उभी करुन या इमारतीचा वापर सुरुवातीपासून औद्योगिक तत्वावर करण्यात येणे, या इमारतीमध्ये असलेल्या काही मजल्यावर बियरबार, डान्सबार, वेश्या व्यवसाय चालत असल्याचे वेळोवेळी पोलीसांच्या धाडीत उघडकीस येणे, मा. महानगरपालिका सहाय्यक आयुक्त, एफ/साऊथ, परेल तसेच आयुक्त, मुंबई महानगरपालिका, प्रधान सचिव, नगरविकास यांचेकडे याविरोधात करण्यात आलेल्या असंख्य तक्रारी, सहाय्यक पालिका आयुक्त एफ/साऊथ यांनी बारमालक व अन्य व्यक्तींशी केलेल्या आर्थिक हातमिळवणीमुळे कोणत्याही प्रकारची कारवाई करण्यात आलेले अपयश, तक्रारदार महेश काशिनाथ सुर्वे यांना सहाय्यक अभियंता, महानगरपालिका, मुंबई (ई.प्र.) यांनी ENG/५५३२/(B.P.) दिनांक ३ एप्रिल, २०१८ रोजी भूखंड क्र. २०/७६ दादर-नायगाव डिव्हीजनवरील इमारतीच्या धारिणीमध्ये Addition/Alteration चा प्रस्ताव वास्तुविशारदाने सादर केल्याचे आढळून येणे, मात्र धारिणीतील नोंदीनुसार सदर प्रस्तावाला इमारत प्रस्ताव विभाग (शहर) या कार्यालयाने कुठलीही मंजूरी दिलेली नसल्याचे कळविणे, तसेच २६ एप्रिल, २०१९ रोजीच्या पत्र क्र. ACFC/२०७/P४/CO/BF पत्रामध्ये शारदा मेन्शन व शारदा दोन्ही इमारती वाचवण्याचा प्रयत्न करणे, शारदा मेन्शनमधील अनधिकृतरित्या काढलेल्या स्टेअरकेस व पोटमाळयासंदर्भात मा. उच्च न्यायालयातील रिट पिटीशन क्र. २६४१/२०१३ वर मा. उच्च न्यायालयाचे सदर भागांवरती कारवाई करण्याचे आदेश देऊनसुध्दा गेल्या १० वर्षापासून कोणतीही कारवाई न करणे, सदर बेकायदेशीर बांधकाम व बेकायदेशीर बांधलेल्या जागेत सुरु असलेल्या डान्सबार, बियरबार व देशी दारु विक्रीच्या धंद्यांच्या विरोधात महेश काशिनाथ सुर्वे यांनी मुंबई महानगरपालिका यांचेकडे वारंवार तक्रारी करुनही कारवाई करण्याऐवजी देण्यात आलेली परवानगी, बेकायदेशीर धंद्यांना देण्यात आलेले संरक्षण, यामुळे तक्रारदार तसेच सर्वसामान्य जनतेचा महानगरपालिकेवरील उडालेला विश्वास, प्रचंड संतापाची व चिडीची निर्माण झालेली भावना, याबाबत शासनाने गांभीर्याने चौकशी करुन तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

**मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन**

दादर (पूर्व), मुंबई येथील सिटी सर्व्हे क्र. २०/७६ दादर नायगांव डिव्हीजन हा १४१३.०५ चौरस मीटर इतका भूखंड श्रीमती अनिता शेट्टी व श्री. अशोक शेट्टी यांचे नावे असून, त्यातील ७७३ चौरस मीटर इतका भूखंड महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम १२६ अन्वये सार्वजनिक प्रयोजनासाठी राखीव आहे. त्याव्यतिरिक्त उर्वरित भूखंडावर शारदा मेन्शन इमारत स्थित असून, सदर इमारतीत बे वॉच बार आहे.

या भूखंडावरील जुन्या इमारतीच्या कम्पलसरी ओपन स्पेसमध्ये व राखीव जागेवरील निरनिराळ्या भागांतील एकूण ६ अनधिकृत बांधकामांपैकी ४ बांधकामांना मुंबई महानगरपालिका अधिनियम १८८८ च्या कलम ३५१ अन्वये व २ बांधकामांना महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ च्या कलम ५५ अन्वये नोटीसा बजावण्यात आल्या आहेत.

सदर सर्व नोटीशींना मा. दिवाणी न्यायालयाने स्थगिती आदेश दिले. तथापि, सदर सर्व दाव्यांमध्ये बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत प्रतिज्ञापत्र सादर करण्यात आल्यानंतर ६ पैकी ५ दाव्यांमध्ये मा. दिवाणी न्यायालयामार्फत स्थगिती आदेश उठविण्यात आले व उर्वरित १ दाव्यामध्ये मा. दिवाणी न्यायालयाचा स्थगिती आदेश कायम आहे. मा. दिवाणी न्यायालयाने स्थगिती आदेश उठविलेल्या ५ दाव्यांमध्ये नोटीसधारकाने मा. उच्च न्यायालयात अपील केले असून, सदर प्रकरणांमध्ये मा. उच्च न्यायालयाने स्थगिती आदेश दिले आहेत. सदर सर्व प्रकरणांमध्ये स्थगिती आदेश आजतागायत कायम असून, स्थगिती आदेश उठल्यानंतर बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत योग्य ती निष्कासन कारवाई करण्यात येणार आहे.

मे. बे वॉच आस्थापनेस बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत उपहारगृहाचे अनुज्ञापत्र देण्यात आले आहे. तसेच, दुसऱ्या मजल्यावरील शारदा लॉजिंग हाऊसला दुसऱ्या मजल्यासाठी व कंट्री लिकर बार आणि हेअर कटींग सलून इत्यादी अनुज्ञापत्रे बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत देण्यात आली आहेत. तसेच, बृहन्मुंबई महानगरपालिकेमार्फत करण्यात आलेल्या संयुक्त पाहणी दरम्यान सदर आस्थापनांनी आरोग्य विभागाच्या अटी-शर्तींचा भंग केल्याचे निदर्शनास आल्यामुळे पाहणी अहवाल देऊन कारवाई करण्यात आली आहे.

माहे जून १९९६ रोजी मे. हॉटेल आभार या नावाने एफएल-३, क्र. ४६२ ही अनुज्ञप्ती श्रीमती अनिता शेट्टी यांचे नावे मंजूर करण्यात आली आहे. सदर अनुज्ञप्तीच्या नावामध्ये सन २००२ मध्ये "हॉटेल बेवॉच" असा बदल झाला आहे. तसेच, श्री. विश्वनाथ भांडारकर यांचे नावे मंजूर असलेली सीएल-३ क्र. ३८ ही अनुज्ञप्ती श्री. अशोक शेट्टी यांच्या नावे वर्ग झाले असून, मे. शारदा कन्ट्रीबार या नावाने माहे एप्रिल, २००१ मध्ये १८८ एच. इस्माईल मेन्शन, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर (पूर्व), मुंबई-४०००१४ या ठिकाणी स्थलांतरीत झालेली आहे. मे. हॉटेल बे वॉच या अनुज्ञप्तीविरुध्द अनुज्ञप्ती विहित वेळेनंतर उघडी ठेवून व्यवहार चालू असल्याच्या तक्रारी भ्रमणध्वनीवर प्राप्त होत असतात. सदर तक्रारींच्या अनुषंगाने कार्यवाही दरम्यान आढळून आलेल्या दोन विसंगती प्रकरणी मे. हॉटेल बे वॉच या अनुज्ञप्तीस रु. ५०,०००/- प्रत्येकी तडजोड शुल्क / दंड आकारण्यात आला आहे. तथापि सदर अनुज्ञप्ती रात्री विहीत वेळेनंतर सुरु असल्याचे निदर्शनास आले नाही. भोईवाडा पोलीस ठाणे हद्दीत सदर बार आस्थापनेवर दिनांक ०१.११.२०१८ रोजी कारवाई करण्यात आली असून, सदर ठिकाणी वेळोवेळी पोलीसांकडून बारची तपासणी करण्यात येत असते आणि काही आक्षेपार्ह आढळून आल्यास तात्काळ कारवाई केली जाते.

********

एच-११३५ -१अ.

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पावसाळी अधिवेशन

**श्री.रवींद्र धंगेकर,श्री.संजय जगताप,श्री.बाळासाहेब थोरात,श्री.नानाभाऊ पाटोले,श्री.अमिन पटेल, श्री.अस्लम शेख, श्री.विजय वडेट्टीवार, प्रा.वर्षा गायकवाड, श्री.संग्राम थोपटे, श्री.सुनिल केदार, श्री.बळवंत वानखडे, श्री.कुणाल पाटील, कुमारी प्रणिती शिंदे, श्री.विश्वजित कदम, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"पुणे शहराला ८ वर्षपूर्वी स्मार्टसिटी योजनेत सामावून घेण्यात येणे, परंतु मागील ८ वर्षात या योजनेंतर्गत कोणतेच विकासात्मक काम झालेले नसल्याचे निदर्शनास येणे, तसेच या कामांच्या निविदांमध्ये कोटयावधी रुपयांचा घोटाळा झाला असून या संपूर्ण योजनेची पुणे शहरासाठी श्र्वेतपत्रिका जाहीर करण्याची मागणी विविध संघटनाकडून जून,२०२३ च्या दरम्यान करण्यात येणे, या योजनेंतर्गत पुणे शहरासाठी आलेला कोटयावधी रुपयांचा निधी केंद्र शासनाकडून आलेल्या सल्लागार कंपन्यांवर खर्च करण्यात येणे, केंद्रानेच पाठविलेल्या अधिकाऱ्यांना लाखो रुपयांचे मानधनासाठी खर्च करण्यात येणे, असे असूनही पुणे शहरात अर्धवट केलेले प्रकल्प, शहरातील अनेक रस्त्यांची अनाकलनीय मोडतोड आणि चौकाचौकात जाहिरातींचे अशोभनीय विद्युत खांब उभे केलेले असणे, पुणे शहरातील वाहतुकीच्या समस्येवर कोणता तोडगा काढला नसून अवैध पार्किंगमुळे स्मार्ट सिटी म्हणून जाहिर करुन मोठमोठया जाहिराती दाखूवन गेल्या ८ वर्षात कोणतेच ठोस विकासात्मक कामे झालेली नसल्यामुळे पुणे शहरातील नागरीकांना पायाभूत सुविधांच्या विविध समस्यांना वारंवार सामोरे जावे लागत असल्यामुळे शहरातील नागरीकांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची भावना, याबाबत राज्य शासनाने करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

### -:मा.मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन:-

महाराष्ट्र राज्यामध्ये सन २०१५-१६ पासून स्मार्ट सिटी अभियान राज्यातील (ठाणे, पुणे, सोलापूर, औरंगाबाद, नाशिक,कल्याण-डोंबिवली,पिंपरी-चिंचवड,नागपूर) या ८ शहरांमध्ये राबविण्यात येत आहे.सदर अभियानाकरिता केंद्र शासनाकडून ५०%, राज्य शासनाकडून २५% व संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेकडून २५% अशा पध्दतीने निधी प्राप्त होतो.

पुणे स्मार्ट सिटी योजनेंतर्गत सदर अभियान राबविण्यासाठी विशेष उद्देश वाहन (SPV) म्हणून पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड ची स्थापना करण्यात आली असून ते दि.२३/०१/२०१६ रोजी कार्यान्वित झाली. महानगरपालिका अधिनियम, १९४९ च्या कलम ६६ (अ) व ६६ (४१-अ) च्या तरतूदीनूसार व शासन निर्णय दि.११.०४.२०१६ अन्वये पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड ची स्थापना करण्यात आली आहे. पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लि. मार्फत औंध,बाणेर, बालेवाडी येथील एकूण ६३ विविध प्रकल्पांसाठी अंदाजे रक्कम रु.११४८.८६ कोटीचे कार्यादेश देण्यात आले आहेत. सदर एकूण ६३ प्रकल्पांपैकी ४६ प्रकल्प पूर्ण झाले असून १० प्रकल्प प्रगतीपथावर आहेत. उर्वरीत ७ प्रकल्प हे निधी अभावी व जागेच्या कायदेशीर व तांत्रिक अडचणींमूळे प्रलंबित आहेत.

पुणे स्मार्ट सिटी अंतर्गत कामांच्या निविदा प्रक्रिया महाराष्ट्र शासनाच्या खरेदी प्रक्रियांच्या मार्गदर्शक तत्वांना अनूसरुन राबविण्यात आलेल्या आहेत. तसेच सर्व निविदा प्रकल्पांचे अंतर्गत व वैधानिक लेखापरीक्षण हे Certification Engineers International Ltd (CEIL) व Standardization Testing & Quality Certification

(STQC) बाहय लेखा परीक्षण करण्यात आले असून College of Engineering Pune (COEP) यांचेकडून बाहय तांत्रिक लेखा परीक्षण करण्यात आले आहे. सदरच्या लेखापरिक्षणामध्ये निदर्शनास आलेल्या त्रुटींचे निराकरण संबंधित ठेकेदाराकडून करण्यात आले आहे. सदर योजनेची पुणे शहरासाठी श्वेतपत्रिका जाहीर करण्याबाबत जून,२०२३ च्या दरम्यान कोणत्याही संघटनेकडून मागणी करण्यात आलेली नाही.

पुणे स्मार्ट सिटी योजनेंतर्गत नियुक्त सल्लागार हे केंद्र शासनाकडून नियुक्त झालेले नसून स्मार्ट सिटी प्रकल्प राबविण्यासाठी निविदा प्रक्रीयेअंतर्गत प्रकल्प सल्लागारांची नियुक्ती करण्यात आलेली आहे व सदर सल्लागार कंपन्यांची देयके ही निविदा प्रस्तावातील अटी व शर्तींना अनुसरुनच अदा करण्यात आलेली आहेत.

पुणे स्मार्ट सिटी योजनेंतर्गत पुणे स्मार्ट सिटी डेव्हलपमेंट कॉर्पोरेशन लिमिटेड करिता सद्य:स्थितीत मुख्य कार्यकारी अधिकारी पदावर राज्य शासनाकडून अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आलेली असून इतर अधिकारी व कर्मचारी यांची नियुक्ती कंत्राटी स्तरावर अनुभव व मुलाखतीच्या गुणांकन पध्दतीने करण्यात आलेली आहे.

सदर प्रकल्पांपैकी पुणे स्मार्ट सिटी अंतर्गत निवडण्यात आलेल्या क्षेत्र आधारीत विकास कामांतर्गत औंध, बालेवाडी व बाणेर या भागातील नवीन रस्त्यांची विकासकामे आणि नूतनीकरणाची कामे पुणे महानगरपालिकेच्या Urban Street Design Guideline नुसारच करण्यात आलेली आहेत. त्याची देखभाल व दुरुस्ती पुणे स्मार्ट सिटी कडून आवश्कतेनुसार करण्यात येते.

पुणे स्मार्ट सिटी अंतर्गत राबविण्यात आलेल्या स्मार्ट एलिमेंट प्रकल्पांतर्गत १६१ जाहिरातींचे विद्युत खांब पुणे महानगरपालिकेच्या समन्वयाने जागा निश्चित करुन उभे करण्यात आले असून त्याची देखभाल व दुरुस्ती पुणे स्मार्ट सिटी तर्फे नियमितपणे करण्यात येते.सदर विद्युत खांबावर प्रसारित होणारे संदेश हे पुणे महानगरपालिका, हवामान खाते (IMD), तसेच पुणे पोलिसांकडून प्राप्त होत असून ते पुण्यातील नागरिकांच्या जनहितार्थ तसेच आपातकालीन माहिती व सूचना देण्यासाठी उपयुक्त ठरत आहेत. तसेच या विद्युत खांबाद्वारे नवीन येणाऱ्या शासकीय योजनांची जनजागृती विनामुल्य करण्यात येत आहे.

पुणे स्मार्ट सिटी मार्फत अॅडॅप्टीव्ह ट्रॅफीक मॅनेजमेंट सिस्टीम (ATMS) ही स्वयंचलित वाहतुक नियंत्रण सिस्टीम बसविण्यात येत असून त्याव्दारे वाहतुकीचे सुयोग्य आणि स्वयंचलित नियंत्रण होऊ शकणार आहे. प्रत्येक चौकात बसविलेल्या बेल कॅमेऱ्याव्दारे १०० मीटर्सपर्यंत वाहन संख्या किती आहे याचा आढावा घेऊन त्याअंतर्गत असलेल्या कंट्रोलरव्दारे सिग्नल यंत्रणेत तत्काळ बदल करुन वाहतुक कोंडी सोडविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. त्यानुसार कर्वे पुतळयापासून खंडोजीबाबा चौक, टिळकरोड, स्वारगेट सेव्हनलव चौक ते कावडे चौक फातिमानगर पर्यंतचे सर्व सिग्नल्स एका कॉरीडॉरमध्ये येतील. या कंट्रोलरमार्फत सिग्नलचे सिंक्रोनायझेशन करण्यात येत असून त्यामुळे एका चौकात हिरवा दिवा लागल्यानंतर त्यापुढील चौकात पुन्हा लाल दिव्याला थांबावे लागणार नाही. त्यामुळे शहरातील वाहतुक सुरळीत होईल. या प्रणालीमध्ये बसविण्यात येणाऱ्या ब्लूटोड युनिटद्वारे वाहतुकीचा वेग, वाहनांचे वर्गीकरण इत्यादीबाबत माहिती मिळेल. सध्या पुणे स्मार्ट सिटीव्दारे फेज १, २ व ३ अंतर्गत एकुण ९० चौकांमध्ये ही प्रणाली कार्यान्वित झाली आहे. त्यामुळे कर्वे रस्ता, टिळक रस्ता, स्वारगेट ते फातिमानगर या रस्त्यांवरील वाहतुकीची कोंडी होत नसल्याचे दिसून येत आहे. या ९० चौकांमध्ये पादचाऱ्यांसाठी स्वतंत्र सिग्नल यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असल्याने पादचाऱ्यांसाठी रस्ता ओलांडणे अधिक सुलभ झाले आहे.

H-1123-1A

************************

लक्षवेधी सूचना क्र.६२१

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

मा.श्री. निलेश लंके, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.६२१ पुढीलप्रमाणे आहे :-

"माहे जून, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात व त्या सुमारास घणसोली नवी मुंबई येथील सेक्टर १६ मधील भूखंड क्र.१०६ मध्ये मार्केट होण्यासाठी दिनांक १३ डिसेंबर, २०१९ रोजी म.न.पा. मध्ये ठराव मंजूर होऊन म.न.पा. ने सदर भूखंडावर मार्केटचे आरक्षण टाकल्याची बाब उघडकीस येणे, सध्या या भूखंडावर भूमाफियांनी सहा मजली इमारतीचे अनधिकृत बांधकाम केल्याच्या तक्रारी स्थानिक नागरिक तसेच माजी नगरसेवक व्दारकानाथ भोईर यांनी सिडको व अतिक्रमण विभागाकडे पुराव्यासह वारंवार केल्याची बाब प्रसिध्दीस येणे, या बेकायदेशीर बांधकामांविरोधात व्दारकानाथ भोईर यांनी घणसोलीचे विभाग अधिकारी, उपायुक्त परिमंडळ दोन म.न.पा. अतिक्रमण, विभाग प्रमुख, सिडको अनधिकृत बांधकाम विभाग मुख्य नियंत्रक, ठाणे जिल्हाधिकारी, म.न.पा. आयुक्त इत्यादींकडे पुराव्यांसह लेखी तक्रार करुनही या अनधिकृत बांधकाम विरोधात व भूमाफियांविरोधात कोणतीच कारवाई करण्यात न आल्याने नागरिकांच्या मनामध्ये म.न.पा. च्या कारभाराबद्दल निर्माण झालेला अविश्वास, सेक्टर नंबर १६ मधील भूखंड क्र.१०६ या २६ चौरस मीटर भूखंडावर नवी मुंबई म.न.पा. व सिडको यांनी मार्केटचे आरक्षण टाकले असून सुध्दा सदर भूखंडावर अनधिकृत बांधकाम सुरु असल्याचे निदर्शनास येऊनही ते थांबवण्याचे कोणतेही प्रयत्न सिडको वा म.न.पा. ने केल्याचे न दिसून येणे, सिडको तसेच म.न.पा. तील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे भूमाफियांना मिळत असलेले सरंक्षण व सहकार्य असल्याबद्दल नवी मुंबईतील लाखो रहिवाशांच्या मनात निर्माण झालेला अविश्वास व म.न.पा. प्रशासन कारवाईस हेतूत: करीत असलेली अक्षम्य दिरंगाई यामूळे नागरिकांच्या मनात निर्माण झालेली तीव्र चीड व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

## मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

नवी मुंबई येथील मौजे-घणसोली मध्ये सेक्टर-१६, भूखंड क्र.१०६, क्षेत्र २,६८६ चौ.मी. हा सिडकोच्या मालकीच्या भूखंड १२.५% योजनेअंतर्गत वाटपासाठी आरक्षीत आहे. सदर भूखंडावर नवी मुंबई महानगरपालिकेने दि.१३.१२.२०१९ रोजी ठराव मंजूर करून मार्केटचे आरक्षण टाकले आहे. तथापि, सदरचा भूखंड सिडकोकडून नवी मुंबई महानगरपालिकेस हस्तांतरित झालेला नाही. या भूखंडावरील अनधिकृत बांधकामाबाबत माजी नगरसेवक श्री.व्दारकानाथ भोईर यांनी महानगरपालिकेच्या अतिक्रमण विभागाकडे तसेच सिडको महामंडळाकडे जून २०२३ मध्ये तक्रार केली आहे. सिडको महामंडळाच्या दि.२६.८.२०२२ रोजीच्या स्थळपाहणी दरम्यान या भूखंडावर श्री.राहुल पाटील (विकासक) यांचेकडून आर.सी.सी. चे Footing बांधकाम चालू असल्याचे निदर्शनास आले. त्यानुषंगाने सदर अनधिकृत बांधकामाबाबत सिडकोमार्फत दि.१५.९.२०२२ रोजी चौकशी नोटीस व दि.१७.१०.२०२२ रोजी महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम, १९६६ अंतर्गत विकासकास नोटीस देण्यात आली आहे. नवी मुंबई महानगरपालिकेमार्फत निधी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ५४ अन्वये दि.१८.७.२०२२ रोजी नोटीस बजावण्यात आली आहे. सदर अनधिकृत बांधकामाविरोधात उक्त

अधिनियमातंर्गत रबाळे पोलीस स्टेशन, नवी मुंबई येथे दि.४.१०.२०२२ रोजी संबंधीतांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दरम्यान, अनधिकृत बांधकामाबाबत दिलेल्या नोटिसी विरोधात श्री.नरेश वसंत पाटील यांनी मा.दिवाणी न्यायालय, वाशी येथे आर.सी.एस. क्र.३८८/२०२२ अन्वये दावा दाखल केला आहे. सदर दिवाणी दाव्यामध्ये नवी मुंबई महानगरपालिका व सिडको महामंडळ प्रतिवादी आहेत. मा.न्यायालयाने दि.४.१०.२०२२ रोजीच्या आदेशान्वये "जैसे थे" (status quo) परिस्थिती ठेवण्याचे आदेश दिले आहेत. मा. न्यायालयाचे "जैसे थे" परिस्थिती ठेवण्याचे आदेश असतांना देखील विकासकाने बांधकाम चालु ठेवले असल्याबाबतचे सिडकोमार्फत छायाचित्र व पंचनामासह अतिरिक्त म्हणणे (Additional Say) मा. न्यायालयात दाखल करण्यात आले आहे. सदर अनधिकृत बांधकामधारकास मुलभूत सोयी-सुविधा जसे पाणी पुरवठा, वीज पुरवठा, इत्यादी न देण्याबाबत आयुक्त, नवी मुंबई महानगरपालिका व कार्यकारी अभियंता, विद्युत महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कं.लि. यांना सिडकोमार्फत कळविण्यात आले आहे. प्रस्तुत प्रकरणी पुढील सुनावणी दि.१७.८.२०२३ रोजी असून प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे.

*******

नगर विकास विभाग
लक्षवेधी सूचना क्र. ६४३

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन

श्री. प्रकाश (दादा) सुंदरराव सोळंके, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र. ६४३ पुढीलप्रमाणे आहे:-

"नगरपरिषद, माजलगाव (जि.बीड) स्थाई समिती ठराव क्रं.४३ ते ४९ महाराष्ट्र नगरपरिषद, नगर पंचायत औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ३०८ अन्वये तहकूब करण्याबाबत मुख्याधिकारी, माजलगाव, नगरपरिषद जि.बीड यांनी दिनांक ४ जानेवारी, २०२२ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, बीड यांना अहवाल दिलेला असणे, तत्कालीन नगराध्यक्षांनी दिनांक १७ डिसेंबर, २०२१ रोजी स्थायी समितीची बोगस सभा दाखवुन ठराव क्रं.४३ ते ४९ पारित करणे, तत्कालीन नगराध्यक्षांनी नियमबाह्य पध्दतीने बोगस ठराव घेवुन नगर परिषदेची व शासनाची दिशाभूल करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्यात यावे असे मुख्याधिकारी यांनी दिलेल्या अहवालात नमूद असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा. मुख्यमंत्री यांचे निवेदन

माजलगाव नगरपरिषदेच्या स्थायी समितीने दि. १७ डिसेंबर, २०२१ रोजी माजलगांव नगरपरिषदेच्या प्रशासकीय इमारतीकरीता फर्निचर व विद्युत उपकरणे खरेदी करण्याच्या निविदा प्रक्रियेस मान्यता देणे, माजलगाव शहरातील नळ कनेक्शनबाबत सर्वेक्षण करणे, पाणी पुरवठा योजना चालविणे व देखभाल दुरुस्ती करणे, बाह्य यंत्रणेद्वारे मनुष्यबळ पुरवठाबाबत विचारविनिमय करणे, घनकचरा व्यवस्थापन क्षेपणभूमीवर विद्युत जोडणी व अस्तित्वातील लाईट शिफ्टिंग करण्याच्या कामासाठी मागविलेल्या ई-निविदेस कार्योत्तर मान्यता देणे, नगरपरिषदेतील कर्मचाऱ्यांचे निलंबन मागे घेण्यास मान्यताबाबत विचार विनिमय करुन निर्णय घेणे, अशा प्रकारचे ठराव क्र.४३ ते ४९ पारित केले होते.

सदर ठरावांची नोंद सभा इतिवृत्तांत नोंदवहीत घेण्यात आली असून, सभेची विषयसूची दि. १३ डिसेंबर, २०२१ रोजी काढण्यात आल्याचीही नोंद घेण्यात आली.

माजलगांव नगरपरिषदेच्या स्थायी समितीने दिनांक १७ डिसेंबर, २०२१ रोजीच्या सभेकरीता दि.१३ डिसेंबर, २०२१ रोजी विषयसूची (अजेंडा) निश्चित करण्यात आली. तथापि, याबाबत मुख्याधिकारी, माजलगांव नगरपरिषद किंवा सभा अधिक्षक यांना कोणतीही कल्पना देण्यात आली नव्हती. तत्कालीन नगराध्यक्षांनी परस्पर सभा घेतली व सभा इतिवृत्तांत नोंदवहीमध्ये ठराव पारीत केल्याबाबत नोंदी घेतल्या. त्यामुळे मुख्याधिकारी, माजलगाव नगरपरिषद यांनी सदर ठराव क्र.४३ ते ४९ तहकुब करण्याचा अर्ज

विलंब माफीसह मान्य करण्याबाबत महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम, १९६५ चे कलम ३०८ अन्वये जिल्हाधिकारी, बीड यांना दि.१४ जानेवारी, २०२२ रोजीच्या अर्जान्वये विनंती केली. तसेच सभा न होताच बोगस ठराव घेणाऱ्या व सभेला उपस्थित असलेल्या सदस्यांच्या सह्यांची समक्ष पडताळणी करून नियमबाह्यपणे बोगस ठराव घेवून नगरपरिषदेची व शासनाची दिशाभुल करणाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याबाबतही अर्जात नमूद केले.

महाराष्ट्र नगरपरिषदा, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम १९६५ चे कलम ३०८ नुसार नगरपरिषदेने किंवा कोणत्याही समितीने या अधिनियमाच्या किंवा इतर कोणत्याही कायद्याच्या किंवा नियमांच्या तरतूदीविरूध्द किंवा शासनाच्या निर्देशाविरुद्ध ठराव केला असेल तर, असा ठराव मिळाल्याच्या दिनांकापासून तीन दिवसाच्या कालावधीत अशा ठरावाची अमंलबजावणी निलंबित करण्यासाठी किंवा ते करण्यापासून प्रतिबंध करण्यासाठी तो ठराव जिल्हाधिकारी यांच्याकडे मुख्याधिकारी यांनी पाठवावा. तसेच असा प्रस्ताव मिळाल्याच्या दिनांकापासून जिल्हाधिकारी यांनी तीस दिवसांच्या कालावधीच्या आत अशा प्रस्तावावर निर्णय घ्यावा, अशी तरतूद आहे.

सदर प्रकरणी जिल्हाधिकारी, बीड यांच्याकडे दि.२८ जून, २०२३ रोजी संबंधितांची सुनावणी घेण्यात आली. सदर सुनावणीमध्ये मुख्याधिकारी, माजलगांव नगरपरिषद यांचा अर्ज व तद्नुषंगिक अभिलेख विचारात घेऊन, सदर ठराव क्र. ४३ ते ४९ तहकुब करण्याबाबत विहीत कालावधीमध्ये अर्ज सादर न केल्यामुळे मुख्याधिकारी, माजलगाव नगरपरिषद यांचा अर्ज जिल्हाधिकारी, बीड यांच्या दि.२८ जून, २०२३ रोजीच्या आदेशान्वये नामंजूर करण्यात आला आहे.

**********

## महाराष्ट्र विधानसभा

**नगर विकास विभाग** **लक्षवेधी सूचना**

### सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी अधिवेशन

**श्रीमती देवयानी फरांदे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

" नाशिक महानगरपालिकेअंतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस कमी होत असणे, गेल्या २५ वर्षात इंजिनियरची देखील बदली न झाल्यामुळे अनेक जागा रिक्त असणे, टेक्निकल काम करणाऱ्या इंजिनियर्सची संख्या देखील मोठ्या प्रमाणावर कमी होणे. नाशिक महानगरपालिकेत कार्यरत असणारे वरिष्ठ इंजिनिअर रिटायर होत असल्यामुळे अनुभवाचा कमी निर्माण होणे काम करणाऱ्या अनुभवी व्यक्तींना मदत वाट देण्याबाबत कुठलीही तरतूद महानगरपालिका अधिनियमात नसल्यामुळे अनुभवी व्यक्तींना मुदतवाढ देता येणे महानगरपालिकेत पात्र उमेदवार नसल्यामुळे कमी शैक्षणिक पात्रता असणाऱ्या व कमी अनुभव असणाऱ्या व्यक्तीकडे कार्यभार सोपविण्यास भाग पडणे, अनेक ठिकाणी एकाच व्यक्तीकडे दोन ते तीन पदांचा कार्यभार असणे. याचा विपरीत परिणाम नाशिक महानगरपालिकेच्या कामकाजावर होणे, कामावर योग्य सुपरयोजन होऊ न शकल्यामुळे रस्त्यांचा व इमारतीचा दर्जा दिवसेंदिवस खराब होत असणे, यामुळे नाशिक महानगरपालिकेचे होत असणारे आर्थिक नुकसान, शासनाचे सदर बाबीकडे होत असणारे दुर्लक्ष, त्यामुळे नागरिकांमध्ये निर्माण झालेली असंतोषाची भावना, याबाबत शासनाने तत्काळ करावयाची कारवाई व प्रतिक्रिया. "

### मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

नाशिक महानगरपालिकेच्या आस्थापनेवर गट-अ ते गट-ड संवर्गात मध्ये एकुण मंजुर पदे- ७७१७ असुन कार्यरत पदे-४४२३ असुन आज रोजी नाशिक महानगरपालिकेची ३२९४ पदे रिक्त आहेत. नाशिक मनपातील अधिकारी / कर्मचारी हे वयोमानाने सेवानिवृती / स्वेच्छा निवृत्ती / मयत यामुळे कार्यरत कर्मचाऱ्यांची संख्या कमी होत आहे. तसेच नाशिक महानगरपालिकेत सद्यस्थितीत अभियंता संवर्गातील विविध २७५ पदे मंजुर असुन त्यापैकी १०५ पदे भरलेली आहेत व १७० पदे रिक्त आहेत. नाशिक महानगरपालिकेचा विविध संवर्गांचे सेवाप्रवेश नियमास जून, २०२३ अन्वये शासनाने मंजुर दिलेली असून सुदरील पदांची सरळसेवा भरती करण्यासाठी नाशिक मनपाच्या अभियंता व इतर

संवर्गातील आकृतीबंधातील पदे दि. १६.०४.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये मंजूर करण्यात आली आहेत, व सद्यस्थितीत कर्मचारी भरतीबाबतची प्रक्रिया प्रस्तावित असून, नाशिक महानगरपालिकेत इंजिनअर संवर्गातील पदावर पात्र अधिकारी / कर्मचारी यांना नियमानुसार पदोन्नती व पदोन्नतीने बदल्या सन २०२१ मध्ये देण्यात आलेल्या आहे. नाशिक मनपा अधिनियमामध्ये अधिकारी / कर्मचारी नियत वयोमानाने सेवानिवृत्ती झाल्यानंतर त्यांना मुदतवाढ देणेबाबत कोणतीही तरतूद नाही.

नाशिक महानगरपालिकेत कनिष्ठ अभियंता / उप अभियंता या पदावर कामकाज करणेकामी पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध नसल्याने सद्यस्थितीत कार्यरत अधिकारी यांचेकडुन कामकाजाची निकड विचारात घेता अतिरिक्त स्वरुपात कामकाज सोपविण्यात आलेले आहे. अतिरिक्त कार्यभार सोपविलेल्या अधिकारी/कर्मचारी यांचेकडुन सर्व कामांवर महानगरपालिकाद्वारे योग्य पध्दतीने सनियंत्रण ठेवण्यात येते. महानगरपालिका अंतर्गत केलेल्या कामाचा दर्जा योग्य पध्दतीने राखण्यात येतो व यामुळे कोणतेही आर्थिक नुकसान झाल्याची बाब आढळुन आली नाही.

******************

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्रमांक १३००**

**श्रीमती विद्या ठाकूर,** वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"मुंबई शहर व उपनगरातील धोकादायक इमारतीमधील रहिवाशांच्या पुनर्वसनाचे कोणतेच धोरण नसणे, परिणामी त्या रहिवाशांवर बेघर होण्याची पाळी येणे, बऱ्याचशा इमारती खाजगी मालकाच्या असल्याने त्यात राहणाऱ्या रहिवाशांना कोणत्याही धोरणाअंतर्गत घर न मिळणे, त्यामुळे मोठया प्रमाणात नागरिक बेधर होत असल्याचे निदर्शनास येणे, सरकारने याबाबत अद्यापी कोणतेही धोरण तयार न करणे, सर्व कायदे मालकाच्या बाजुने असल्याने भाडेकरूवर मोठया प्रमाणात होत असणारा अन्याय, मुंबईतील अशा प्रकारच्या धोकादायक इमारतीत राहणाऱ्या लोकांच्या मनात सरकार विरुध्द पसरलेला असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा. मुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सॅप प्रणालीमधील उपलब्ध आकडेवारीनुसार महानगरपालिकेमार्फत सुरु असलेल्या विविध प्रकल्पांतर्गत एकूण १२,२२८ प्रकल्पबाधित असून, त्यापैकी ४३४१ प्रकल्पबाधितांना पीएपी सदनिकांचे वाटप करण्यात आले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक १६.०७.२०१९ रोजीच्या परिपत्रकानुसार विविध प्राधिकरणांकडून प्रकल्पबाधितांकरिता हस्तांतरीत झालेल्या सदनिका संगणकीय प्रणालीद्वारे प्रथमतः विभागात नंतर परिमंडळात व त्यानंतर परिमंडळाच्या उत्तर दिशेला वितरीत करण्यात येतात.

बृहन्मुंबई महानगरपालिका क्षेत्रातील अत्यावश्यक नागरिक निवासी प्रकल्पबाधितांना आर्थिक ऐच्छिक मोबदला देण्याकरिता बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या दिनांक ०३.०७.२०२३ रोजीच्या सुधारीत परिपत्रकानुसार दिनांक १७.०४.१९६४ पूर्वीच्या क्षमापित अथवा मंजुरीप्राप्त अधिकृत निवासी बांधकामांना किमान रु. २५ लाख व कमाल १२९२ चौ. फुट इतक्या बांधकाम क्षेत्राकरिता सिद्धगणक प्रमाणित दरानुसार आर्थिक मोबदला देय आहे. त्याचप्रमाणे संरक्षणपात्र झोपडीधारकांना किमान रु. २५ लाख व कमाल रक्कम रु. ४० लाख इतका आर्थिक मोबदला देण्याचे निश्चित करण्यात आले आहे.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध प्रकल्पांमुळे बाधीत होणाऱ्या पात्र प्रकल्पबाधितांना पीएपी सदनिका उपलब्ध करुन देण्याची प्रक्रिया पारदर्शक करण्याकरिता ऑनलाईन पध्दतीने सदनिका वितरित करण्यात येतात. तसेच, सदर माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर सर्व नागरिकांकरिता उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

मा. उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दिनांक २३.०९.२०१९ रोजीच्या आदेशानुसार, प्रकल्पबाधितांकरिता माहुल येथील सदनिकांचे वाटप बंद करण्यात आले आहे.

*******

लक्षवेधी सूचना क्र.४११
सामान्य प्रशासन विभाग

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन**

**श्री.बाळासाहेब थोरात, श्री.नानाभाऊ पटोले, श्री.राजेश टोपे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.४११ पुढीलप्रमाणे आहे:-**

"महाराष्ट्रातील मराठा आरक्षण सर्वोच्च न्यायालयाने माहे मे, २०२३ मध्ये रद्द केल्यानंतर पुर्नविचार याचिकाही सर्वोच्च न्यायालयाने नुकतीच फटाळण्यात येणे, राज्यात मराठा समाजाच्या आरक्षणाबाबत निर्माण झालेले गंभीर प्रश्न, मराठा समाजास आरक्षणापासून वंचित रहावे लागण्यासारखी निर्माण झालेली स्थिती, त्यामुळे राज्यात अनेक भागात आरक्षण समर्थनार्थ दीर्घ काळापासून सुरु झालेली तीव्र स्वरुपाची आंदोलने, काही ठिकाणी आंदोलनास लागलेले हिंसक वळण, अद्यापही आंदोलने सुरु असणे, यात तोडगा न निघाल्यास परिस्थिती स्फोटक होण्याचा निर्माण होणारा धोका, राज्य शासनाने केलेल्या कायद्याची अंमलबजावणी सुरु राहवी व मराठा समाजास आरक्षण मिळावे यासाठी विशेष प्रयत्न करण्याची गरज, तसेच आर्थिकदृष्टया मागास प्रवर्गाच्या आरक्षणाप्रमाणे मराठा समाजाच्या आरक्षणाला केंद्र शासनाने घटनात्मक संरक्षण देण्याची कार्यवाही करावी, यासाठी राज्य शासनाने केंद्र शासनाकडे आग्रही मागणी करण्याची आवश्यकता यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा.मुख्यमंत्री यांचे निवेदन

मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.५.५.२०२१ च्या आदेशान्वये सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (SEBC) वर्गाचे आरक्षण रद्द केल्यामुळे राज्य शासनाने त्याविरोधात पुर्नविचार याचिका क्र.१४/२०२२ दाखल केली होती. सदर पुर्नविचार याचिका दि.११.४.२०२३ रोजी फेटाळण्यात आल्यामुळे त्याविरुध्द मा.सर्वोच्च न्यायालयात उपचारात्मक याचिका (Curative Petition) दाखल केली आहे. सदर उपचारात्मक याचिकेमध्ये तसेच, मराठा आरक्षण प्रकरणी उद्भवणा-या सर्व न्यायालयीन प्रकरणी शासनाच्या वतीने प्रभावी बाजू मांडण्यासाठी ज्येष्ठ विधिज्ञांचा एक टास्क फोर्स स्थापन करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

मा.सर्वोच्च न्यायालयाने उपचारात्मक याचिका (Curative Petition) फेटाळल्यास मराठा समाजास आरक्षण देण्यासाठी त्या समाजाचे सामाजिक व शैक्षणिक मागासलेपण तपासण्यासाठी एक समर्पित मागासवर्ग आयोगाचे गठन करण्यात येईल.

सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (मराठा समाज) वर्गातील घटकांना विविध सवलती देण्यासंदर्भात सामान्य प्रशासन विभाग दि.९.१०.२०२० च्या शासन निर्णयान्वये निर्णय घेण्यात आला आहे व त्यानुसार अंमलबजावणी करण्यात येत आहे.

आरक्षणाची ५० टक्क्याची मर्यादा उठविण्याचा अधिकार केंद्र शासनास आहे. त्यामुळे मा.सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायनिर्णयामध्ये आरक्षणाची निश्चित केलेली ५० टक्के इतकी मर्यादा शिथिल करुन भारताच्या संविधानात यथोचित सुधारणा करण्याचा ठराव महाराष्ट्र विधानमंडळाने दि.५.७.२०२१ रोजी केला असून, सदर ठराव उचित कार्यवाही करण्यासाठी केंद्र शासनास पाठविला आहे.

मराठा आरक्षण आंदोलनामध्ये मृत्युमुखी पडलेल्यांच्या वारसांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळात नोकरीत घेण्याचा निर्णय शासनाने घेतला आहे. त्यानुसार मराठा आरक्षणाच्या आंदोलनामध्ये मृत्युमुखी पडलेल्या आंदोलनकर्त्यांच्या पात्र २० वारसांना महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाने नियुक्ती दिलेली आहे. २ उमेदवारांवर एफ.आय.आर. दाखल असल्याने न्यायालयीन प्रकरण प्रलंबित आहे. ७ उमेदवारांनी नियुक्तीचे हक्क राखून ठेवलेले आहेत. ६ उमेदवारांनी महामंडळात नोकरी करण्यास नकार दिलेला आहे. एका उमेदवाराचा तपशील उपलब्ध नसून ६ उमेदवारांनी इतर कारणांमुळे आत्महत्या केलेली आहे. तसेच, मराठा आरक्षणाच्या आंदोलनामध्ये मृत्यूमुखी पडलेल्या ३६ मृत व्यक्तींच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहायता निधीतून प्रत्येकी रु. १०.०० लाखाचे अर्थसहाय्य प्रदान करण्यात आलेले आहे.

सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय दि.२९.५.२०२३ अन्वये मराठवाड्यातील मराठा समाजास कुणबी प्रमाणपत्र देण्याच्या प्रक्रियेमध्ये सुसुत्रता येण्यासाठी व यावर अभ्यास करुन अहवाल देण्यासाठी / शिफारशी करण्यासाठी अपर मुख्य सचिव (महसूल) यांचे अध्यक्षतेखाली समिती गठित करण्यात आली आहे. सदर समितीची बैठक आयोजित करण्याचे प्रस्तावित आहे.

*******

## सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.१४८३**

**श्री.प्रकाश आबिटकर, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१४८३ पुढीलप्रमाणे आहे :-**

" "राज्यातील नागरीकांना शासकीय सेवा विहीत वेळेत उपलब्ध होत नसल्याने राज्यात महाराष्ट्र लोक हक्क अधिनियम २०१५ ची निर्मिती करण्यात येणे, राज्यात पात्र व्यक्तीना पारदर्शक, कार्यक्षम व समय उचित लोकसेवा देण्याकरीता आणि त्यासंबंधीत व तदानुशंगीक बाबींकरीता तरतूद करण्यासाठी दिनांक २८ एप्रिल, २०१५ प्रस्थापित करण्यात येणे, या अधिनियमानुसार नागरीकांना शासकीय अधिकारी व कर्मचारी यांचेकडून कामकाजामध्ये होणाऱ्या दप्तर दिरंगाईस आळा बसावा व विहित कालावधीमध्ये सेवा पुरविण्यात यावी हा मुख्य उद्देश अधिनियमाचा असणे, परंतू प्रत्यक्ष मात्र शासनाच्या कोणत्याही विभाग व कार्यालयांमध्ये महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमाप्रमाणे कामकाज होताना दिसत नसणे, यामुळे सर्वसामान्य नागरीकांना सरकारी कार्यालय / दप्तर या ठिकाणी वेळोवेळी फेऱ्या माराव्या लागणे, यामध्ये त्यांचा वेळ, पैसा वाया जाणे, तसेच काही प्रसंगी अधिकारी व कर्मचारी यांना त्यांची आर्थिक मागणी पुर्ण केल्यानंतरच काम हाणे असा पायंडा सर्वत्र पडलेला दिसून येत असुन ही बाब लोकशाहीच्या दृष्टीने फार गंभीर स्वरुपाची असणे, महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २०१५ नुसार कोणत्याही साध्या संचिकेवर / प्रकरण / पत्र निर्गत करण्याकरीता ७ दिवसांत निर्णय देणे बंधनकारक असणे, तसेच त्वरीत / तात्काल संचिकेवर १ दिवसात निर्णय देणे बंधनकारक असणे, तातडीच्या संचिकेवर चार दिवसात निर्णय देणे बंधनकारक असणे, खात्यांअतंर्गत संचिकेवर ४५ दिवसांत निर्णय देणे बंधनकारक असणे, विविध खात्यांशी संबंधीत ३ महिन्यांच्या आत निर्णय देणे बंधनकारक असणे, परंतू प्रत्यक्षात मात्र अशा पध्दतीने कामकाज होताना दिसून न येणे, याबाबत संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचेकडून वेळोवेळी दिरंगाई होत असल्याचे निदर्शनास येणे, याबाबत महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियमामध्ये नमूद केलेल्या तरतूदीनुसार संबंधीत अधिकारी किंवा कर्मचारी यांनी त्यांना नेमून दिलेले काम किंवा त्यांच्याशी संबंधीत काम पार पाडत असताना कसूर केल्यास किंवा जाणून बुजुन किंवा हेतू पुरस्कर विलंब केल्यास महाराष्ट्र हक्क अधिनियम कलम १२ पोटकलम (१) अन्वये, महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम १९७९ अन्वये शिस्त भंगांच्या कारवाईस पात्र राहतील अशा पध्दतीचे स्वरुप असतानाही याबाबत काणेतीही कार्यवाही संबंधित विभागांकडून न होणे, यामुळे सर्वसामान्य नागरीकांमध्ये असंतोषाचे वातावरण तयार झालेले असणे, लोकसेवा हक्क आयोगाच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे राज्यातील सर्वसाधारण नागरिकांना गतिमान पारदर्शी आणि विहित वेळेत त्यांची सर्व शासकीय कार्यालयातील कामे होण्यासाठी मदत होणार असणे, परंतु सध्या स्थितीमध्ये फक्त संपूर्ण राज्यातील ५०६ पैकी ४०९ सेवा या कायद्याद्वारे ऑनलाईन दिल्या जात असणे, सदर कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होण्यासाठी महाराष्ट्र शासनाच्या सर्व विभागातील सेवा या कायद्याअंतर्गत आनने बाबत शासनाने निर्णय घेणे आवश्यक असणे, सद्यस्थितीत फक्त ऑनलाईन सेवा दिल्या जात असणे त्याचा फारसा उपयोग सर्वसामान्य जनतेला होत नसून ऑफलाईन सेवा देणेबाबत शासनाने वेळेत निर्णय घेणे आवश्यक असणे, सेवा हमी कायद्याच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सद्यस्थितीत उपलब्ध असलेला कर्मचारी वर्ग याच्यासाठी आवश्यक तो आर्थिक निधी यासाठी मंजुरी देण्याची अत्यंत आवश्कता असणे, सेवा हमी कायद्यात सर्वसामान्य नागरिकांचे विहित वेळेत काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर दप्तर दिरंगाई खाते अंतर्गत चौकशी व दोषी आढळल्यास कठोर कायदेशीर कारवाई करणे बाबत स्वतंत्र आस्थापना निर्माण करून या कायद्याची प्रभावी अंमलबजावणी करण्याबाबत शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका. ""

---

## निवेदन

- महाराष्ट्र राज्यात पात्र व्यक्तींना पारदर्शक, कार्यक्षम व समयोचित लोकसेवा देण्याकरिता आणि तत्संबंधित व तदानुषंगिक बाबींकरिता तरतूद करण्यासाठी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ दिनांक २८ एप्रिल, २०१५ रोजी अंमलात आला आहे. सदर अधिनियमातील तरतूदीनुसार प्रत्येक सार्वजनिक प्राधिकरणाने ते पुरवीत असलेल्या लोकसेवा, पदनिर्देशित अधिकारी, प्रथम व द्वितीय अपील प्राधिकारी व सेवा देण्याबाबतची नियत कालमर्यादा इ.बाबींसह ५११ सेवा अधिसूचित करण्यात आलेल्या आहेत. तसेच या अधिनियमातंर्गत अधिकाधिक लोकसेवा अधिसूचित करण्याबाबत शासन आणि राज्य सेवा हक्क आयोगाकडून कार्यवाही सतत चालू असते.
- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या तरतूदीनुसार अधिसूचित करण्यात आलेली सेवा जनतेस विहीत कालमर्यादेत पुरविण्यात आली नाही तर, सदर अधिनियमाच्या तरतूदीमध्ये सेवा प्राप्त होण्यास होणा-या विलंबाबाबत प्रथम अपिल प्राधिका-याकडे प्रथम अपिल, द्वितीय अपिल प्राधिका-यांकडे द्वितीय अपिल तसेच राज्य सेवा हक्क आयुक्तांकडे तृतीय अपिल करण्याची तरतूद करण्यात आली आहे. सदर अधिनियमातील तरतूदीनुसार संबंधित अपिल प्राधिकारी हे सेवा देण्यास कसूर करणाऱ्या पदनिर्देशित अधिका-यांवर शास्ती लावू शकतात. तसेच सदर अधिका-यांविरुध्द वर्तणूक व शिस्तभंगविषयक नियमानुसार सुमचित अशी शिस्तभंगाची कार्यवाही देखील सुरु करु शकतात.
- महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ हा दि. २५ मे, २००६ च्या अधिसूचनेन्वये दि.०१जुलै,२००६ पासून राज्यात लागू करण्यात आला आहे. सदरहू अधिनियमातील प्रकरण तीन मधील कलम ८ ते १२ नुसार प्रत्येक शासकीय कर्मचारी त्याला नेमून दिलेली किंवा त्याच्याशी संबंधित असलेली शासकीय कर्तव्ये किंवा शासकीय काम अत्यंत दक्षतेने आणि शक्य तितक्या शीघ्रतेने पार पाडण्यासाठी कायदेशीररित्या बांधील आहे. सदर अधिनियमातील कलम १० मध्ये धारिका निकाली काढण्यासाठी कालमर्यादा निश्चित करण्यात आली आहे व या कालमर्यादेचे पालन न झाल्यास शिस्तभंगाची कारवाई करण्याची तरतूद करण्यात आलेली आहे.

**महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५अन्वये अधिनियमातील कलम १० च्या तरतूदी पुढीलप्रमाणे आहेत.**

१. कलम १० (१) साधारणतः कोणतीही फाईल विभागातील किंवा कार्यालयातील कोणत्याही शासकीय अधिकारी / कर्मचारी यांचेकडे सात कामाच्या दिवसांपेक्षा अधिक काळ प्रलंबित राहणार नाही.

२. तात्काळ आणि तातडीच्या स्वरूपाच्या फाईल, त्या प्रकरणाच्या निकडीनुसार शक्य तितक्या शीघ्रतेने आणि प्राधान्याने, तात्काळ फाईल शक्यतो एका दिवसात किंवा दुसऱ्या दिवशी सकाळी आणि तातडीच्या स्वरूपाची फाईल शक्यतो चार दिवसांत निकाली काढण्यात येईल.

३. दुसऱ्या विभागाकडे अभिप्रायार्थ पाठविण्याची आवश्यकता असलेली फाईलच्या संबंधात तीन महिन्यांच्या आत निर्णय घेण्यात येईल.

४. एखाद्या शासकीय अधिकारी/कर्मचारी यांनी त्यांना नेमून दिलेले किंवा त्यांच्याशी संबंधित असलेले शासकीय कर्तव्य किंवा शासकीय काम पार पाडण्यास जाणूनबुजून किंवा हेतुपुरस्सर विलंब लावल्यास किंवा दुर्लक्ष केल्याचे निदर्शनास आल्यास अशा शासकीय अधिकारी/कर्मचारी यांच्याविरुध्द त्या अधिकारी/कर्मचारी यांना लागू असलेल्या शिस्तभंगविषयक नियमाखाली शिस्तभंगाची कारवाई करण्यात यावी. तसेच त्यांच्या गोपनीय अहवालात अशा कर्तव्यपालनातील कसुरी संबंधात नोंद करण्यात यावी.

५. प्रकरण निकाली काढण्यासाठी निर्धारित केलेल्या कालावधी अंतर्गत कामाचे दिवस अंतर्भूत आहेत.

६. महाराष्ट्र शासकीय कर्मचाऱ्यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडताना होणाऱ्या विलंबास प्रतिबंध अधिनियम,२००५ यामधील तरतूदींची प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी दि.९.७.२०२२ च्या शासन परिपत्रकान्वये सूचना देण्यात आल्या आहेत.

**अ) <u>कलम १० मधील कोणतीही तरतूद खालील बाबींना लागू होणार</u> नाही.**

(एक) न्यायप्रविष्ट बाबी

(दोन) लोक आयुक्त आणि अन्य घटनात्मक संस्था, आयोग,

(तीन) न्यायिकवत बाबी

(चार) अन्य शासनांची प्रकरणे

(पाच) विधी विधानांशी संबंधित

(सहा) मंत्रिमंडळास सादर होणारी मुख्य धोरणात्मक प्रकरणे.

➢ महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ अंतर्गत अधिसूचित करण्यात आलेल्या सेवा हया ऑनलाईन स्वरुपात देण्यात याव्यात याबाबत सर्व मंत्रालयीन विभागांना व त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व शासकीय कार्यालयांना दि.२८.११.२०२२ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये सुचित करण्यात आले आहे. तसेच नागरिकांना अधिसूचित सेवा हया आपले सरकार पोर्टल व मोबाईल ॲप वर ऑनलाईन पध्दतीत देण्यात येत आहेत. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ च्या कलम ७ नुसार शासन नियतकालमर्यादेत संबंधित लोकसेवा पुरविण्यासाठी माहिती तंत्रज्ञानाचा वापर करण्याकरिता सर्व सार्वजनिक प्राधिकरणाला प्रोत्साहन व प्रेरणा देण्यात येत आहे. तसेच अधिनियमाच्या कलम २० नुसार नियत कालमर्यादेत लोकसेवा संस्कृती विकसित करणे आवश्यक आहे. त्यानुसार अधिसूचित सेवा ऑनलाईन देण्यात येत आहेत. अधिसूचित सेवा ऑनलाईन दिल्यामुळे नागरिक आपल्या अर्जाची स्थिती जाणून घेऊ शकतात, मिळालेल्या प्रमाणपत्राची वैधता तपासु शकतात.

➢ **कोविड महामारीच्या काळात आपले सरकार आरटीएस पोर्टलवर नोंदणीकृत नागरिकांच्या संख्येत २८ लाखांवरून मार्च २०२१ पर्यंत ४२ लाख आणि मार्च,२०२२ पर्यंत ५७ लाख इतकी लक्षणीय वाढ झाली आहे**.

➢ आयोग स्थापन झाल्यापासून दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंत ११,५२,३९,८२३ अर्ज ऑनलाईन प्राप्त झाले असून १०,९९,७५,८५१ अर्जावर संबंधित पदनिर्देशित अधिकाऱ्यांनी कार्यवाही केली आहे व निपटाऱ्याचे प्रमाण ९५.४३% आहे.

- महाराष्ट्र सेवा हक्क आयोगाच्या सन २०२१-२२ च्या वार्षिक अहवालानुसार महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ च्या संदर्भात एकंदरित ५११ सेवांपैकी संबंधित ३४५ सेवांची कामगिरी समाधानकारक आहे. खालील तीन निकषानुसार १६६ सेवांची असमाधानकारक आहे.
    - अ) नागरिकांना सेवा देण्यासाठी आपले सरकार पोर्टलचा उपयोग नागरिकांनी करावा म्हणून विभागाकडून कोणतेही प्रयत्न नाहीत.
    - आ) आपले सरकार पोर्टलशी एकत्रीकरण पूर्ण झाले आहे. परंतू सेवा व रक्कम प्रदान करण्यासाठी एकच व्यासपीठ ह्या धोरणाचे पालन केले जात नाही.
    - इ) ऑनलाईन प्रणालीचा वापर न केल्यामुळे प्राप्त अर्ज व त्या अर्जावर केलेल्या कार्यवाहीवर सद्य:स्थितीची पडताळणी करणे शक्य नाही.
- महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ची अंमलबजावणी अधिक प्रभावीपणे करण्यासाठी शासनामार्फत खालील उपाय योजना करण्यात आलेल्या आहेत :-
    १. सदर अधिनियमामधील कलम १३ मधील तरतूदीनुसार दिनांक ३० जुलै, २०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये "महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग" गठीत करण्यात आलेला आहे. सदर आयोगामध्ये एक राज्य मुख्य सेवा हक्क आयुक्त, मुंबई आणि प्रत्येक महसुली विभागासाठी (कोकण/नाशिक/पुणे/नागपूर/अमरावती/औरंगाबाद) एक (एकूण सहा) राज्य सेवा हक्क आयुक्त यांचा समावेश आहे.
    २. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ ची अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेली नियमावली दिनांक १६ नोव्हेंबर, २०१६ रोजीच्या अधिसूचनेन्वये "महाराष्ट्र सेवा हक्क नियम, २०१६" प्रसिद्ध करण्यात आले आहेत.
    ३. विविध सेंवाचे वितरण करण्याबाबत राज्य शासनाच्या विविध विभागांवर निगराणी, संनियंत्रण, नियमन व सुधारणा करण्यासाठी स्थापना करण्यात आलेल्या महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगावर मुख्य आयुक्त व सर्व विभागीय राज्य सेवा हक्क आयुक्तांच्या नेमणूका करण्यात आल्या आहेत. तसेच राज्य सेवा हक्क आयोगाची सर्व कार्यालये कार्यान्वित करण्यात आली असून सदर कार्यालयांमध्ये अधिकारी/कर्मचारी शासनामार्फत उपलब्ध करून देण्यात येत आहेत.
    ४. महाराष्ट्र राज्य सेवा हक्क आयोगासाठी नव्याने लेखाशिर्ष निर्माण करण्यात आले असून सदर लेखाशिर्षांतर्गत दरवर्षी पुरेसा निधी अर्थसंकल्पित करण्यात येत आहे.
    ५. पदनिर्देशित अधिकारी व अपिलीय अधिकाऱ्यांना यशवंतराव चव्हाण विकास प्रशिक्षण प्रबोधिनी (यशदा) पुणे व महाराष्ट्र माहिती व तंत्रज्ञान महामंडळाद्वारे अधिनियमाचे प्रशिक्षण देण्यात येत आहे.
    ६. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम,२०१५ ची प्रभावी अंमलबजावणी करण्यास्तव महाराष्ट्र राज्य लोकसेवा हक्क आयोग शासनास सातत्याने शिफारशी करत असतो व त्याबाबत शासनाकडून कार्यवाही करण्यात येते. उदा. शासन परिपत्रक दिनांक १२.०३.२०१८ अन्वये जिल्हाधिका-यांना सेवा अधिनियमाच्या अंमलबजावणीसाठी व आपले सरकार सेवा केंद्रांच्या माध्यमातून सर्व अधिसूचित सेवा उपलब्ध करुन देण्यासाठी नियंत्रक अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.



****************************

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग/ ऊर्जा-७

लक्षवेधी सूचना

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

सर्वश्री. बबनराव पाचपुते, राम सातपुते, ॲड राहूल कुल, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"राज्यातील पाच जिल्ह्याची क्लस्टर जिल्हे म्हणून घोषणा केलेली असून त्या पाच जिल्ह्यांमध्ये अहमदनगर जिल्ह्याचाही समावेश केलेला असणे, महाराष्ट्र सरकारने सोलरच्यासंदर्भात महत्वाचा निर्णय घेऊन सोलर प्रोजेक्ट राबविण्याचा निर्णय घेतलेला असणे, गावात असलेल्या ग्रामपंचायतीच्या जमिनी किंवा शासकीय जमीन १ के. व्ही. साठी ५ एकर जमीन असेल तर ती जमीन सरकारकडे सरकार नावे जमा केलेली असणे, यासंदर्भात अहमदनगर जिल्ह्यातील पारनेर तालुक्यातील राळेगण सिद्धी येथे ३ केव्हीचा प्रोजेक्ट कार्यान्वित करण्यात आलेला असणे, त्यानंतर तत्कालीन मुख्यमंत्री महोदयांनी सौर ऊर्जा प्रकल्प संपूर्ण महाराष्ट्रामध्ये राबविण्याचा निर्णय घेतलेला असणे, त्यासाठी सरकारकडून काही अटी व शर्ती ठेवण्यात आलेल्या असणे, या अटी व शर्तीनुसार जमीन सरकारी किंवा गायरान किंवा शासकीय असणे, ग्रामपंचायतींनी जमिनीचे नाहरकत व हक्कसोड करून एमएसीबीस जमीन हस्तांतरण करणे, याशिवाय फॉरेस्ट खात्याचाही दाखला आवश्यक असणे, ज्या ठिकाणी प्रोजेक्ट तयार होणार आहे त्या ठिकाणापासून सबस्टेशन ५ ते ७ कि.मी. च्या आत असणे, त्या परिसरातील शेतकऱ्यांना शेतीपंपासाठी दिवसा आठ तास वीज देण्यात येईल असे आश्वासित केले असणे, सर्क्युलर सर्वठिकाणी आल्यामुळे विशेषतः श्रीगोंदा तालुक्यामध्ये ताबा घेण्यास सुरुवात केलेली असणे, त्यानुसार श्रीगोंदा विधानसभा मतदारसंघातील मौजे देवदैठण, ता. श्रीगोंदा येथे ८ मेगावॅटचा सौर ऊर्जाचा पहिला प्रोजेक्ट राज्याचे ऊर्जा मंत्री यांचे हस्ते सुरु केला असणे, श्रीगोंदा- नगर विधानसभा मतदार संघातील अशा बऱ्याच गावातील सरपंचांनी पुढाकार घेऊन काम करणे, शेतक-यांना दिवसा लाईट मिळण्याची प्रकरणे तयार करण्यात आलेली असताना दुर्दैवाने पुढील कार्यवाही साठी टीम वर्क होणे गरजेचे असून ते होऊ न शकणे, काम थंडावले म्हणून यासाठी सरकारने स्वतंत्र यंत्रणा राबवून जनतेला प्रोत्साहित करण्याची आवश्यकता असताना प्रत्यक्षात मात्र अधिका-यांची उदासीनता यामध्ये मोठ्या प्रमाणात दिसून येणे, श्रीगोंदा विधानसभा मतदार संघात सन २०१९ ते आजतागायत २७१८ एकर जमिनीचे एकूण ५० प्रस्ताव तयार करून सादर केलेले असणे, त्यानुसार श्रीगोंदा तालुक्यामध्ये साधारणतः ५४३ मेगावॅट एवढी वीज तयार होऊ शकते व नगर तालुक्यामध्ये एकूण ५३२ एकर जमीन उपलब्ध करून त्याचे प्रस्ताव हि सादर केलेले असणे, त्यानुसार नगर तालुक्यामध्ये १०६ मेगावॅट एवढी वीज तयार होऊ शकते याचा फायदा परिसरातील शेतकरी बांधवाना होणे, वेगवेगळ्या एजन्सी नेमून त्या जमिनीवर सोलर प्लांट निर्माण करणे, शेतकऱ्यांना

रोटा H/1013(750-8-23)

दिवसा वीज न मिळाल्यामुळे अनेक शेतकऱ्यांना रात्रीच्या वेळेस सर्पदंश होण्याच्या घटना घडलेल्या असणे, या पेक्षा पुढे जाऊन सौर ऊर्जेची योजना ही खाजगी शेतकऱ्यांने नियम व अटींचे पालन करून दिल्यास प्रति एकर ५० हजार रूपये जमिनीचा मोबदला देण्याचा शासन निर्णय काढण्याची गरज, ही योजना शेतकरी हिताची व नैसर्गिक ऊर्जा स्त्रोत शेतकऱ्यांच्या जीवनात आनंद देणारी ठरेल तसेच यामुळे विजेची टंचाई दूर होण्यास मदत होईल म्हणून सौर ऊर्जेचा प्रकल्प सरकारने प्रोत्साहित करून त्या जिल्ह्यामध्ये प्रकल्प तयार करण्यासाठी समिती तयार करण्याची आवश्यकता, याबाबत शेतकऱ्यांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा. उपमुख्यमंत्री (ऊर्जा) यांचे निवेदन**

वीजभार व्यवस्थापन करण्यासाठी तसेच कृषी पंपासाठी आवश्यक असलेला विद्युत पुरवठा लक्षात घेऊन मा. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या आदेशानुसार संपुर्ण राज्यात कृषी वाहिन्यांवरील कृषी ग्राहकांना दिवसा ८ तास किंवा रात्री ८ तास थ्री फेज वीजपुरवठा चक्राकार पध्दतीने देण्यात येतो.

शेतकऱ्यांना दिवसा वीज पुरवठा व्हावा म्हणून **मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना**-१.० दिनांक १४.०६.२०१७ व दि १७.०३.२०१८ च्या शासन निर्णयान्वये जाहीर करण्यात आली होती. या योजने अंतर्गत महावितरण कंपनीने १९५८ मेगावॅट क्षमतेचे वीज खरेदी करार केलेले आहेत. त्यापैकी ५७७ मेगावॅट क्षमतेचे प्रकल्प कार्यान्वित झालेले असून २३४ कृषी वाहिन्यांवरील ९८,३२४ कृषी ग्राहकांना दिवसा वीज पुरवठा सुरु करण्यात आलेला आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजनेंची अंमलबजावणी अभियान तत्वावर (mission mode) करुन राज्यातील कृषी वीज वाहिन्यांचे जलद गतीने सौर उर्जीकरण करण्यासाठी **मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना** २.० "शेतकऱ्यांच्या शेतीपंपाना दिवसा अखंडीत व शाश्वत वीज पुरवठा करण्याचे अभियान" दिनांक ०८ मे, २०२३ रोजी शासन निर्णयान्चये जाहीर करण्यात आले आहे.

सदर अभियानांतर्गत राज्यात कृषी वीज वाहिनींचे सौर ऊर्जीकरण करून सन २०२५ पर्यंत शेतकऱ्यांना दिवसा अखंडीत व भरवशाचा वीजपुरवठा करता यावा, यासाठी ७००० मेगावॅट सौर ऊर्जा क्षमता निर्माण करणे, हे उद्दिष्ट ठरविण्यात आले आहे.

या योजनेअंतर्गत महावितरण कंपनीच्या ११ के.व्ही./ २२ के.व्ही/३३ के.व्ही सबस्टेशन वर आवश्यकतेनुसार ५ ते १० मेगावॅट क्षमतेचे विकेंद्रीत सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यात येणार आहेत. त्यासाठी विकासकांना २५ पैसे/ १५ पैसे प्रति यूनिट आर्थिक सहाय्य ३ वर्षासाठी देण्यात येणार आहे. तसेच प्रकल्प उभारण्यात आलेल्या ग्रामपंचायतींना रु.१५ लक्ष निधी ३ वर्ष कालावधीत स्थानिक विकासासाठी देण्यात येणार आहे.

या योजनेअंर्तत सौर प्रकल्पासाठी लागणारी खाजगी जमीन भाडेपट्टयाने उपल्बध करून देतांना त्या वर्षीच्या नोंदणी व मुद्रांक विभागाने निर्धारित केलेल्या किमतीचा ६ टक्के दरानुसार परिगणित केलेला दर किंवा प्रतिवर्ष रु. १,२५,०००/- प्रति हेक्टर यापैकी जी रक्कम जास्त असेल त्या दराने वार्षिक भाडेपट्टयाचा दर निश्चित करुन प्रथम वर्षी आलेल्या पायाभूत वार्षिक भाडेपट्टा दरावर (Base Rate) प्रत्येक वर्षी ३% सरळ पध्दतीने भाडेपट्टी दरात वाढ करण्यात येणार आहे.

मुख्यमंत्री सौर कृषी वाहिनी योजना २.० साठी एमएसईबी सोलार ॲग्रो प्रा. लि. या नोडल एजन्सीची स्थापना करण्यात आली असून त्याअंतर्गत आजमितीस ८ एसपीव्ही तयार करण्यात आल्या आहेत. तसेच सौर ऊर्जा प्रकल्प उभारतांना विकासकाला आवश्यक असणारे ना हरकत प्रमाणपत्र तातडीने प्राप्त करुन ते लँड बँक पोर्टलवर अपलोड करण्याच्या सूचना सर्व जिल्हाधिकाऱ्यांना देण्यात आल्या आहेत.

राज्यातील कृषी वीज ग्राहकांना सौर ऊर्जेद्वारे दिवसा वीज पुरवठा करण्यासाठी एकुण १७८६८ मेगावॅटची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत या योजनेअंतर्गत सुमारे २७३० उपकेंद्रांकरिता तांत्रिक दृष्टया योग्य असलेली एकुण ३६१८६ एकर शासकीय जमीन निवडण्यात आली आहे. सौर ऊर्जा प्रकल्पासाठी व्यवहार्य जमीनीच्या उपलब्धतेनुसार एकूण २४०० मेगावॅट क्षमतेच्या प्रकल्पांसाठी नाशिक/सोलापूर/धुळे, नंदुरबार, नाशिक/अहमदनगर/नागपूर (नागपूर, वर्धा,भंडारा, गोंदिया) असे एकूण ५ क्लस्टर तयार करण्यात आले आहेत. त्यामध्ये एकूण ११९८६ एकर व्यवहार्य जमिनीचा समावेश असून याअंतर्गत एकूण ४७३ सबस्टेशन समाविष्ट आहेत. महावितरण कंपनीकडून निविदा प्रक्रियेची तयारी पूर्ण झाली आहे. अहमदनगर जिल्हयातील क्लस्टर मध्ये सुमारे ५०६ मे.वॅ. क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे नियोजन असून एकुण ९० उपकेंद्रासाठी ३०९५ एकर जमीन समाविष्ट आहे. त्यामध्ये श्रीगोंदा तालुक्यामधील १० उपकेंद्रांवर ८० मे.वॅ. क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी ५८१ एकर व अहमदनगर तालुक्यामध्ये ८ उपकेंद्रांवर ४० मे.वॅ. क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी १९१ एकर जमीनीचा समावेश आहे.

या योजनेअंतर्गत अहमदनगर जिल्ह्यात २०८ उपकेंद्रावर २३५७ मे.वॅ. क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प स्थापित करण्याचे प्रस्तावित आहे. त्याकरिता सुमारे ११८०० एकर जमीनीची आवश्यकता आहे. तसेच श्रीगोंदा तालुक्यात २२ उपकेंद्रावर ३२० मे.वॅ. क्षमतेचे व अहमदनगर तालुक्यात १५ उपकेंद्रावर ८७ मे.वॅ. क्षमतेचे सौर ऊर्जा प्रकल्प स्थापित करण्याचे प्रस्तावित आहे. भविष्यात जशी-जशी शासकीय /खाजगी जमीन उपलब्ध होईल त्यानुसार सौर ऊर्जा प्रकल्प उभारण्याचे नियोजन आहे.

*******************************************

**गृह विभाग**

**लक्षवेधी सूचना क्र. ४५७**

## सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. सुनिल कांबळे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"पुणे कॅन्टोन्मेंट विधानसभा मतदारसंघातील भवानी पेठ येथील पोलीस लाईन ची उभारणी सन १९२० साली झालेली असून आज त्याठिकाणी असलेल्या पोलीस कर्मचाऱ्यांच्या निवासस्थानांची अत्यंत दूरावस्था झालेली असणे, सदर ठिकाणी पाण्याची लाईन, ड्रेनेज आणि लाईट इत्यादी गोष्टींसाठी पोलिस कर्मचाऱ्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागत असणे, सदर ठिकाणी राहणारे पोलीस कुटुंबीय या सर्व गोष्टीची दुरुस्ती व्हावी म्हणून कित्येक वर्षापासून मागणी करीत असणे, यासाठी भवानी पेठ पोलीस लाईन मधील इमारतीच्या दुरुस्तीसाठी व पाणी ड्रेनेज लाईट इत्यादी विषयांच्या दुरुस्तीसाठी निधी उपलब्ध करून देणे, त्याचप्रमाणे सदर इमारतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करून या इमारती धोकादायक झालेल्या असतील तर नव्याने इमारतीची उभारणी करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.""

## मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

पोलीस आयुक्त, पुणे शहर आस्थापनेवरील भवानीपेठ पोलीस वसाहतीमधील बैठ्याचाळीत १०० (चटई क्षेत्र २२० चौ.फुट) व दोन इमारतीत १०८ ( चटई क्षेत्र २५३ चौ.फुट ) निवासस्थाने असून ती अनुक्रमे सन १९२१ व १९६३ मध्ये बांधण्यात आलेली आहेत. सदर पोलीस वसाहतींमधील निवासस्थानांच्या दुरुस्तीसाठी सन २०१८ मध्ये प्राप्त झालेल्या सुमारे रुपये ७२ लाख निधीतून सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत आवश्यक ती दुरुस्तीकामे करुन घेण्यात आलेली आहेत. तसेच पोलीस आयुक्त, पुणे शहर या कार्यालयाने सदर वसाहतीमध्ये करावयाच्या ड्रेनेज लाईन, पाणीपुरवठा लाईन, जलरोधिकरण, दरवाजे, खिडक्या छत व रंगकाम इ. दुरुस्तीकामांसाठी रुपये.२,५८,७५,३१९/-(अक्षरी रुपये दोन कोटी अठ्ठावन्न लाख पंच्याहत्तर हजार तीनशे एकोणीस फक्त) इतकी रक्कम उपलब्ध करुन देण्याकरीता पोलीस महासंचालक कार्यालयास प्रस्ताव पाठविला आहे. तसेच सदर वसाहत देखभाल दुरुस्तीसाठी सार्वजनिक बांधकाम विभागाच्या पीआरबी रजिस्टरवर नमूद आहे. त्यामुळे सार्वजनिक बांधकाम विभागाकडून सदर वसाहतीची नियमितपणे पाहणी करण्यात येते. निवास्थाने राहण्यास धोकादायक असल्याबाबतचा अहवाल अद्यापपर्यंत पोलीस आयुक्त, पुणे शहर या कार्यालयास प्राप्त झालेला नाही. आवश्यकतेनुसार सदर पोलीस वसाहतीचे स्ट्रक्चरल ऑडिट करुन घेण्याची तजवीज ठेवली असल्याचे पोलीस आयुक्त, पुणे शहर कार्यालयाने कळविले आहे.

************

RoTA-H-1033-1(750-8-2023)

(८)

लक्षवेधी सूचना

**महाराष्ट्र विधानसभा**

सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री.रोहित पवार, श्री.अनिल देशमुख मा. वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :

" नाशिक जिल्ह्यातील (मौजे चिखलवाडी, तालुका त्र्यंबकेश्वर) सर्वहारा परिवर्तन शिक्षण संस्थेच्या अंतर्गत चालणाऱ्या एका खाजगी वसतिगृहातील आदिवासी विद्यार्थिनींना 'जी ७ नेचर पार्क' नामक हॉटेल मध्ये पर्यटकांच्या मनोरंजनासाठी बळजबरीने नाचविण्यात आल्याचा धक्कादायक प्रकार माहे जून, २०२३ मध्ये उघडकीस येणे, सदरील वसतिगृहातील अल्पवयीन विद्यार्थिनींना पर्यटकांसोबत येथील संस्थाचालक आणि शिक्षकांनी दमदाटी करुन नाचण्यास सांगिल्याची गंभीर बाब समोर आलेली असणे, शाळा सुरू होण्यापूर्वीच पंधरा दिवस अगोदर संगणक प्रशिक्षण देण्याच्या नावाखाली पिडीत विद्यार्थिनींना शाळेने बोलवून घेतले असणे, परंतु संगणक प्रशिक्षण न देता विद्यार्थिनींना हॉटेलमध्ये नाचविण्यात आल्याची पालकांची तक्रार असणे, सदरील घटनेमुळे पिडीत विद्यार्थिंनी घाबरल्या असून पालकही तणावाखाली आले असणे, परिणामी अशा घटनांमुळे आदिवासी समाजात पसरलेले भितीचे वातावरण व नाराजीची भावना, परिणामी आदिवासी विद्यार्थिनींना शिक्षणापासून वंचित होण्याची शक्यता लक्षात घेत शासनाने सदरील प्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता असणे, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन**

नाशिक जिल्ह्यातील सर्वहारा परिवर्तन केंद्र, चिखलवाडी, पो.सामुंडी, ता. त्र्यंबकेश्वर, जि. नाशिक या संस्थेच्या अंतर्गत चालणाऱ्या एका खाजगी वसतिगृहातील सहा आदिवासी मुलींना, 'जी ७ नेचर पार्क' या हॉटेल मध्ये पर्यटकांच्या मनोरंजनासाठी बळजबरीने नृत्य करायला सांगीतले व मुलींनी नकार दिला असता शिक्षकांनी दमदाटी व छडीने मारहाण करुन मुलींना शारिरीक व मानसिक त्रास दिला असल्याचे फिर्यादी यांनी दिनांक १८/०६/२०२३ रोजी दिलेल्या फिर्यादीनुसार वाडीवऱ्हे पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. १६२/२०२३, बालन्याय बालकांची काळजी व संरक्षण अधिनियम २०१५ चे कलम ७५ सह, अनुसूचीत जाती जमाती (अत्याचार प्रतिबंधक) सुधारणा कायदा २०१५ कलम ३ (१) (आर) अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील दोन आरोपींना दिनांक २१/०६/२०२३ रोजी सी.आर.पी.सी. १९७३ चे कलम ४१ (अ) प्रमाणे सुचना पत्र दिले आहे. तसेच फिर्यादी व साक्षीदार तपासले असून सदर गुन्हयाचा पुढील तपास सुरु आहे.

**********

रोटा/एच-१०८५[ ६५०-८-२०२३].

लक्षवेधी सूचना क्रमांक :-८९१

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

सन्माननीय श्री. प्रदीप जैस्वाल, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.८९१ पुढीलप्रमाणे आहे :-

"माहे जून, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा त्यासुमारास मु.पो.बोईसर, जि. पालघर येथील पोलीस ठाण्यातील पोलीस निरीक्षक, सहाय्यक पोलीस निरीक्षक व तलासरी पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हे गेल्या अनेक वर्षांपासून एकाच पोलीस ठाण्यात कार्यरत असल्याची बाब उघडकीस येणे, या विरोधात स्थानिक नागरिकांनी पोलीस प्रशासनाकडे वारंवार तक्रारी करणे, श्री. राजेंद्र पाटील यांनी मा. मुख्यमंत्री तसेच उपमुख्यमंत्री यांना पत्र पाठवून तक्रार करून चौकशीची मागणी केल्याची बाबही उघडकीस येणे, हे तीनही अधिकारी गेली अनेक वर्ष बोईसर, तलासरी या पोलीस ठाण्यात कार्यरत असून दर सहा महिन्यांनी मुदतवाढ घेत असणे, गेली अनेक वर्ष एकाच ठिकाणी कार्यरत असल्याने अनधिकृत व बेकायदेशीर उद्योगधंदे करणे, या तिघांकडून मिळत असलेला विशेष लाभ, या सर्व प्रकरणाची तातडीने चौकशी करण्याकरीता लेखी तक्रारींसोबत पुरावे जोडण्यात येऊनही त्यांच्याविरुद्ध कोणतीच कारवाई पोलीस प्रशासन करीत नसल्याने जनतेच्या मनात पोलिसांच्या अकार्यक्षमतेबद्दल निर्माण झालेला विश्वास, हे तीनही अधिकारी गेल्या अनेक वर्षापासून त्याच जागी कार्यरत आहेत तसेच शासन निर्णयानुसार त्यांची बदली न होण्याची कारणे काय असे प्रश्न जनतेने वारंवार विचारुनही त्यांना उत्तरे न मिळणे, या ठराविक तीन अधिकाऱ्यांना पोलीस प्रशासन देत असलेली स्पेशल वागणूक, यामुळे पोलीस दलात काम करणाऱ्या अन्य कर्मचाऱ्यांच्या मनात व त्यांच्या कुटुंबीयांच्या मनात शासनाच्या ध्येय धोरणाबद्दल शासनच करीत नसल्याने निर्माण झालेला तीव्र असंतोष, चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"

---

## मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

पोलीस निरीक्षक श्री.प्रदीप कसबे, बोईसर पोलीस स्टेशन येथे दि.०१.०९.२०१९ ते १३.११.२०१९, दि. १६.०१.२०२० ते १६.०५.२०२१ व दि. २०.१०.२०२२ ते २९.०६.२०२३ या कालावधीत नेमणूकीस होते. सद्यःस्थितीत श्री.कसबे यांची बदली सिंधुदुर्ग येथे करण्यात आली असून श्री.कसबे यांना दि.३०.०६. २०२३ रोजी कार्यमुक्त करण्यात आले आहे. बोईसर पोलीस स्टेशन मधील अन्य पोलीस उपनिरीक्षक श्री.आशिष पाटील हे दि.२३.०९.२०१९ ते १८.११.२०२० व दि.२१.१०.२०२२ ते ०४.०७.२०२३ या कालावधीत नेमणूकीस

रोटा-स्था- १०६२ (६९५-८-२३) (क्र.मा.प.

होते सद्यस्थितीत त्यांची बदली सिंधुदुर्ग जिल्ह्यात करण्यात आली असून त्यांना दि.०४.०७.२०२३ रोजी कार्यमुक्त करण्यात आले आहे. त्याचबरोबर तलासरी पोलीस स्टेशन येथील पोलीस निरीक्षक श्री. अजय वसावे हे दि. ०६.०३.२०१९ ते २०.०८.२०२१ व दिनांक २२.०८.२०२२ ते २९.०६.२०२३ या कालावधीत नेमणूकीस होते. त्यांची बदली नंदुरबार जिल्ह्यात झालेली असून त्यांना दि. २९.०६.२०२३ रोजी कार्यमुक्त करण्यात आलेले आहे. श्री. राजेंद्र पाटील यांनी केलेल्या तक्रार अर्जाच्या अनूषंगाने चौकशी केली असता त्यामध्ये तथ्य आढळून आलेले नाही.

---------------------------------------------------

## लक्षवेधी सूचना क्र.५५६८६०१/फ
## महाराष्ट्र विधानसभा सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**सर्वश्री.रविंद्र धंगेकर,श्री.संजय जगताप,श्री.संग्राम थोपटे, विधानसभा सदस्य,यांनी विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.**

"महाराष्ट्रातील पोलीस बॉम्ब शोधक व नाशक पथकाचे अधिकारी व कर्मचारी यांच्या जोखीम भत्यामध्ये कपात करण्यात आल्याचे नुकतेच माहे जुलै, २०२३ मध्ये उघडकीस येणे, दिनांक २२ नोव्हेंबर, १९९५ च्या शासन निर्णयानुसार बॉम्ब शोधक व नाशक पथकामधील अधिकारी व कर्मचारी यांना जोखीम भत्ता म्हणून घरभाडे व पुरक भत्ते वगळता स्थुल वेतनाच्या ५० टक्के अधिक व चालक पोलिस अंमलदार यांना ३० टक्के अधिक वेतन सहाव्या वेतन आयोगानुसार देण्यात येणे, त्यानुसार राज्य शासकीय अधिकारी व कर्मचारी यांना दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून सातवा वेतन आयोग लागू झाला तेव्हापासून शासनाकडून सदरच्या जोखीम भत्त्याबाबत कोणताही शासन निर्णय जारी न होणे, त्यामुळे बॉम्ब शोधक व नाशक पथकाचे या जोखीम भत्यापासून वंचित रहाणे, याबाबत शासनाकडे दाद मागण्यात आल्यानंतर शासनाने माहे सप्टेंबर, २०२२ व शासन निर्णय काढून दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून बॉम्ब शोधक पथकातील अधिकारी व अंमलदार यांना ७ व्या वेतन आयोगानुसार मुळ वेतनाच्या २५ टक्के व चालक पोलिस अंमलदार यांना मुळ वेतनाच्या १५ टक्के जोखीम भत्ता देण्याचे आदेश काढणे, परंतु सदर शासन निर्णय वेळेत न निघाल्यामुळे अधिकारी व कर्मचाऱ्यांना जोखीम भत्ता न मिळाल्याने झालेले आर्थिक नुकसान, त्यातच दिनांक १ जानेवारी, २०१६ पासून पुर्वलक्षी जोखीम भत्याचा निर्णय ५० टक्के ऐवजी २५ टक्के असा घेतल्याने अनेक पोलिस अधिकारी व अंमलदार यांना पगारातून दरमहा वसुली करण्यात येत असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी अधिकारी व कर्मचाऱ्यांमध्ये पसरलेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने लक्ष घालून सखोल चौकशी करुन शासन स्तरावर करावयाची कार्यवाही व याबाबत शासनाची प्रतिक्रिया व भूमिका."

---

## मा.उपमुख्यमंत्री महोदयांचे निवेदन

मुंबई शहरात दिनांक १२ मार्च, १९९३ रोजी व त्यानंतर घडलेल्या बॉम्ब स्फोटांच्या पार्श्वभूमीवर गृह विभाग, शासन निर्णय दिनांक २२ नोव्हेंबर, १९९५ अन्वये बृहन्मुंबई पोलीस दलासाठी बॉम्ब शोधक व नाशक पथक निर्माण करण्यात आले आहे. त्यानंतर विविध शासन निर्णयांव्दारे राज्यामध्ये अनेक जिल्हयांत बॉम्ब शोधक व नाशक पथके स्थापन झाली आहेत. या बॉम्ब शोधक व नाशक पथकांमधील अधिकारी व कर्मचारी यांचे काम अत्यंत जोखमीचे असल्याने, दिनांक २२ नाव्हेंबर, १९९५ च्या शासन निर्णयामध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींमधील मुद्दा क्र.८ अ विशेष वेतन मध्ये “ज्या पोलीस अधिकारी व कर्मचा-यांना अत्यंत जोखमीची कामे सोपविली असतील, त्यांना त्यांच्या मूळ विभागातील घरभाडे व पुरकभते वगळता देय असलेल्या स्थूल वेतनाच्या ५० टक्के अधिक विशेष वेतन देण्यात येईल ”, असे

नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे राज्यातील सर्व बॉम्ब शोधक व नाशक पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनाही विशेष वेतन लागू आहे.

गृह विभाग, शासन निर्णय क्र.एसएसए-१०१०/प्र.क्र.३३१/विशा-४, दिनांक ०३ सप्टेंबर, २०११ अन्वये बॉम्ब शोधक व नाशक पथकातील कार्यरत पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीतील बँड पे+ ग्रेड पे यांच्या बेरजेच्या ५०% व सशस्त्र पोलीस शिपाई (मोटार वाहन चालक) यांना सहाव्या वेतन आयोगाच्या वेतनश्रेणीतील बँड पे+ ग्रेड पे यांच्या बेरजेच्या ३०% इतका प्रोत्साहन (जोखीम) भत्ता मंजूर करण्यात आला होता.

वित्त विभाग, शासन अधिसूचना दिनांक ३० जानेवारी, २०१९ अन्वये राज्य शासकीय कर्मचारी यांना दिनांक ०१.०१.२०१६ पासून ७ व्या वेतन आयोगाच्या शिफारशी लागू करण्यात आलेल्या आहेत. ६ व्या वेतन आयोगामध्ये Basic+ Grade Pay बेरजेवर प्रोत्साहन भत्ता देण्यात येत होता. तथापि ७ व्या वेतन आयोगामध्ये Grade Pay ही संकल्पना संपुष्टात आलेली आहे. त्यानुसार, गृह विभाग, शासन निर्णय, क्र.एसएसए-०११९/प्र.क्र.२१/विशा-४, दिनांक ०५ सप्टेंबर, २०२२ निर्गमित करण्यात आला असून राज्यातील सर्व बॉम्ब शोधक व नाशक पथकातील कार्यरत पोलीस अधिकारी/कर्मचारी यांना सातव्या वेतन आयोगानुसार मूळ वेतनाच्या २५% व सशस्त्र पोलीस शिपाई (मोटार वाहन चालक) यांना मूळ वेतनाच्या १५% इतका प्रोत्साहन (जोखीम) भत्ता पूर्वलक्षी प्रभावाने दिनांक ०१.०१.२०१६ पासून लागू करण्यात आला आहे.

दिनांक ०५ सप्टेंबर २०२२ च्या शासन निर्णयान्वये पूर्वलक्षी प्रभावाने जोखीम भत्ता देय आहे. दिनांक ०१/०१/२०१६ पासून माहे एप्रिल २०१९ पर्यंत आकारण्यात आलेला जोखीम भत्ता व सातव्या वेतन आयोगाप्रमाणे देय जोखीम भत्ता यामधील तफावतीप्रमाणे देय थकबाकी किंवा अतिप्रदान करण्यात आलेल्या भत्त्याच्या वसुलीबाबत कार्यवाही करण्यात येत आहे. त्यामुळे बॉम्ब शोधक व नाशक पथकातील कार्यरत पोलीस अधिकारी/कर्मचारी यांचे आर्थिक नुकसान झालेले नाही.

------------XXXXX-------------

गृह विभाग | लक्षवेधी सूचना क्रमांक : ९६१

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री.मानसिंग नाईक, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्रमांक ९६१ पुढीलप्रमाणे आहे :-

"कोल्हापूर जिल्हयातील गडहिंग्लज येथील संतोष शिंदे हा नवउद्योजक, पत्नी व लहान मुलगा यांचे त्यांच्या घरी मृतदेह रक्ताच्या थारोळयात पडलेले सापडणे, विष प्राशन करुन गळे चिरलेले असणे, आत्महत्या करण्यापूर्वी सुसाईड नोट लिहिलेली आढळणे, यामध्ये एक स्थानिक माजी नगरसेविका व एक पोलीस अधिकारी यांना मृत्युस जबाबदार धरलेचा उल्लेख आढळणे, काही दिवसांपूर्वी या उद्योजकांस ब्लॅकमेल करणेसाठी संकेश्वर पोलीस बलात्काराचा गुन्हा दाखल करण्यात येणे, या गुन्हयात त्यांना जामीन मिळणे, मात्र जामीन रद्द व्हावा म्हणून संशयिताने उच्च न्यायालयात अपील दाखल करणे, या उद्योजकांकडे ब्लॅकमेल करुन त्यांस कोटयावधी रुपयांची खंडणीची मागणी करणे, तसेच पुणे येथे दोघांनी या उद्योजकाची ६.५० कोटींची फसवणूस करणे, यामधूनच त्यांस आत्महत्येस प्रवृत्त करण्यात येणे, ही मानहानी झाल्यामुळे व नैराश्येतून या कुटुंबाने आत्महत्या करणे, या संशयितांना अटक करण्यासाठी सर्व गावकऱ्यांनी मृतदेह ताब्यात न घेता आंदोलन करण्यात येणे, या सर्व प्रकरणामध्ये पोलीसांनी बघ्याची भूमिका घेणे, संबंधीत अधिकारी, पोलीस अधिकारी व इतर संशयित यांना त्वरीत अटक करुन चौकशी करुन त्यांच्यावरती कारवाई करण्याची आवश्यकता, त्याच्यावरती गुन्हे दाखल करण्याची होत असलेली मागणी, या सर्व प्रकारामुळे जनतेमध्ये शासनाविरोधी पसरलेला असंतोष, याबाबतीत शासनाने तातडीने करावयाची कारवाई व शासनाची प्रतिक्रीया."

---

## मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

दिनांक २४.०६.२०२३ रोजी सकाळी ०७.३० वा. चे सुमारास गडहिंग्लज तालुक्यातील प्रतिष्ठीत उदयोजक श्री.संतोष वसंत शिंदे रा.गांधीनगर, गडहिग्लज ता. गडहिंग्लज यांनी आपले राहते घरात आपल्या पत्नी मुलासह आत्महत्या केली.

सदर प्रकरणी पोलीस उपनिरीक्षक श्री.विक्रम वडणे यांनी दोन पंचासमक्ष घटनास्थळाचा पंचनामा करुन व आकस्मिक मृत्यु रजिस्टर नंबर ५८, ५९, ६०/२०२३ फौ.दं.प्र.सं.क. १७४ प्रमाणे दाखल केला. सदर ठिकाणी मयत नं.१ व २ यांनी लिहुन ठेवलेल्या सुसाईड नोटवरुन मयताचे नातेवाईक यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन गडहिंग्लज पोलीस ठाणे येथे गु.र.नं. २४१/२०२३ भा.दं.वि.स.कलम ३०६, ३८६, ३८८, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला. सदर गुन्ह्यातील आरोपी नामे १) शुभदा राहुल पाटील, रा.गांधीनगर, गडहिंग्लज, २) राहुलकुमार श्रीधर राऊत, रा.निलजी ता.गडहिंग्लज, ३) विशाल बाणेकर, ४) संकेत पाटे दोघे रा.पुणे, जि.पुणे याचेविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आलेला आहे..

मयत संतोष पाटील व आरोपी माजी नगरसेविका यांची जिममध्ये ओळख झाली होती. आरोपी नं.१ हिचे आरोपी नं.२ याचेबरोबर प्रेमसंबंध जुळलेने घरातील सर्व दागदागीनेसह पळुन गेली. त्यावेळी आरोपी नं.१ हीचे सासरे विश्वनाथ पाटील यांनी दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने गडहिंग्लज पोलीस ठाणे स्थानिक अर्ज क्र.०९/२०२२ ने नोंद आहे. आरोपी नं.२ हा पोलीस दलात अधिकारी असताना त्याच्या या कृत्यामुळे त्यावेळी कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाला होता. त्यानंतर आरोपी क्र.१ व २ यांनी संगणमत करून मयत नामे संतोष शिंदे यांस वांरवार जिवे मारण्याची धमकी देवुन एक कोटी रुपयेची खंडणी मागणी करुन त्यास मानसिक त्रास देवुन आरोपी क्र.१ हीने मयत

नामे संतोष शिंदे याचे विरुध्द संकेश्वर पोलीस ठाणे ता.हुक्केरी जि.बेळगाव राज्य. कर्नाटक येथे गु.र.नं.११३/२०२३ भा.दं.वि.स.क.३७६, ३६३, ३२३, ५०६ अन्वये गुन्हा दाखल केला. वरील प्रमाणे गुन्हा दाखल झाल्यामुळे समाजामध्ये उलट सुलट चर्चा होवू लागल्या. नमुद गुन्हयामध्ये मयत संतोष शिंदे यास अटक झाली व त्याचे अर्जुन रिफायनरी नावाचे खाद्य तेलाचा कारखानाही बंद पडला. मयत संतोष शिंदे हा जामीनावार बाहेर आल्यानंतर पुन्हा कारखाना सुरु करण्यासाठी त्याचेवर दाखल गुन्हयामुळे बँकेने त्यास लोन देण्याचे नाकारले. आरोपी नं.३ व ४ यांनी मयत संतोष शिंदे यांचे कडुन घेतलेले ६.५ कोटी रुपये मयत संतोष शिंदे हा आर्थिक अडचणीमध्ये असताना मयत संतोष शिंदे यांनी त्यांच्याकडे वारंवार मागणी करुन देखील आरोपी क्र.३ व ४ सदर रक्कम देण्यास टाळाटाळ करत होते.

तसेच मयत संतोष शिंदे यांचा मयत मुलगा अर्जुन शिंदे याच्याकडे आरोपि नं.१ ह्या सारख्या रागाने बघून व मारुन टाकण्याचा इशारे करुन त्याला भिती घालत होती व आरोपी नं.२ हा मुद्दामहुन आपली मोटर सायकल मयताचे घरासमोरुन फिरवुन हॉर्न वाजवुन त्रास देत होता. त्यामुळे त्यांच्या रोजच्या त्रासाला कंटाळून मयत संतोष शिंदे यांनी आपल्या कुटुंबासह विषारी औषध प्राशन करुन आपले गळे चिरुन घेवुन आत्महत्या केली आहे व या आत्महत्येस वरील आरोपिंनी प्रवृत्त केले आहे.

नमुद गुन्हा दाखल झाल्यानंतर गुन्हातील निष्पन्न आरोपी क्र. १ व २ यांना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा, कोल्हापूर यांनी अटक केली असून उर्वरित आरोपी क्र. ३ व ४ चा शोध सुरु असुन सदर आरोपी मिळुन येताच गुन्ह्याचे अनुषंगाने तपास करून अटक करण्यात येईल. सदर गुन्हयाचा तपास सुरू आहे.

---

गृह विभाग

लक्षवेधी सूचना क्र. ११९१

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पावसाळी अधिवेशन

**श्री. नानाभाऊ पटोले, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. अस्लम शेख, श्री. सुभाष धोटे, श्री. सुनिल केदार, श्री. विकास ठाकरे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ११९१ पुढीलप्रमाणे आहे :-**

"श्री महाकाली को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी आणि इतर बोगस कंपन्या" अंतर्गत आयआयटी पवई, मुंबई, महाराष्ट्र येथे २००० कोटी आणि त्याहून अधिक रकमेचा एक फार मोठा घोटाळा झालेला असणे सन २०१८-२०१९ दरम्यान शासकीय भारतीय तंत्रज्ञान संस्था बॉम्बे येथील कर्मचारी श्री रितेश पांचाळ हे सेवारत केंद्र सरकारचे IITB कर्मचारी, श्री महाकाली IITB पवई घोटाळ्याचे संचालक, प्रवर्तक, एजंट, सबएजेंट असणे, या कंपन्यांमध्ये संपूर्ण महाराष्ट्र आणि आसपासच्या राज्यांमधील अंदाजे १५००० हून अधिक गुंतवणूकदारांनी खूप मोठी गुंतवणूक केलेली असणे, सदर कंपनी सन २०१८-२०१९ दरम्यान सुरू होऊन आणि २००० कोटींहून अधिक व्यवसाय केल्यानंतर श्री रितेश पांचाळच्या अटकेनंतर दिनांक १० ऑगस्ट, २०२२ रोजी बंद झालेली असणे, या केंद्र सरकारच्या आयआयटीबी कर्मचाऱ्यांनी १५०००-२५००० रुपयांची लूट केली असणे, या गुंतवणूकदारांना त्यांचे पैसे परत मिळवून देण्यासाठी कोणतेही सरकारी अधिकारी मदत करत नसल्यामुळे या गुंतवणूकदारांना खूप कठीण वेळ आलेली असणे, परिणामी गुंतवणुकधारांमध्ये पसरलेली तीव्र असंतोषाची व नाराजीची भावना, याबाबत राज्य शासनाने तातडीने चौकशी करुन सदर गुंतवणूक कंपनीतील संचालक, प्रवर्तक, एजंट, सबएजेंट यांचेवर कठोर स्वरुपाची कारवाई करण्याबाबत याप्रकरणाची एसआयटी मार्फत चौकशी करण्याची आवश्यकता व याबाबत शासनाची प्रतिक्रिया."

---

## मा. उपमुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन.

श्री. रितेश दिलीपकुमार सिकलीगर उर्फ रितेश पांचाळ व इतर यांनी आपापसात संगनमत करून श्री महाकाली ग्रुप ऑफ कंपनीज (SMGC) या वित्तीय संस्थेमार्फत द मॅजिक ३ एक्स क्रिप्टो कंपनी (एसएमपी टोकन) या स्किममध्ये गुंतवणुक केल्यास सुमारे २० महिन्यात गुंतवणूक रकमेच्या तिप्पट स्वरूपात परतावा मिळेल असे प्रलोभन दाखवून फिर्यादी व इतर गुंतवणूकदार यांच्याकडून रुपये ६,०४,७५,०३०/- इतकी रक्कम स्विकारुन फसवणूक केल्याच्या फिर्यादीवरुन श्री. महाकाली ग्रुप ऑफ कंपनीजचे प्रमुख श्री. रितेश पांचाळ व इतर संचालक यांच्याविरुध्द श्रीनगर पोलिस स्टेशन, ठाणे शहर येथे गुन्हा रजि. क्रमांक १९२/२०२२ भा.दं.वि. कलम ४२०, ४०६, ४०९, ३४, सह महाराष्ट्र ठेवीदारांच्या वित्तीय

संस्थामधील हितसंबधाचे संरक्षण अधिनियम १९९९ चे कलम ३ सह माहिती व तंत्रज्ञान कायदा सन २००० चे कलम ६६ ( क ), ७४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर गुन्हयाच्या तपासामध्ये संचालक रितेश पांचाळ हा शासकीय भारतीय तंत्रज्ञान संस्था बॉम्बे (IITB) चा कर्मचारी नसल्याचे निष्पन्न झाले आहे. सदर गुन्हयांमध्ये आरोपी रितेश दिलीपकुमार सिकलीगर उर्फ रितेश पांचाळ व इतर ३ आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांच्याविरुध्द मा. न्यायालयात दिनांक १९/१०/२०२२ रोजी दोषारोपत्र सादर करण्यात आले आहे. सदर प्रकरणाचा सी.आर.पी.सी कलम १७३ (८) नुसार आर्थिक गुन्हे शाखा, ठाणे शहर येथे अधिकचा तपास सुरु आहे. सदर गुन्हयांच्या आतापर्यंतच्या तपासामध्ये फिर्यादी यांच्यासह ५४ गुंतवणुकदार यांची रक्कम रुपये ४,७४,१७,७४५/- ची फसवणूक झाल्याचे निष्पन्न झाले आहे. परंतु गुन्हयातील गुंतवणुकदारांची संख्या व फसवणुकीची रक्कम वाढण्याची शक्यता आहे. तसेच, सदर गुन्हयांमध्ये आजपावेतो आरोपीत तसेच कंपनीच्या नावे असलेल्या ९ बँक खाती व २३ स्थावर मालमत्ता जप्त करण्यासाठी संरक्षित करण्यात आल्या आहेत.

याशिवाय, श्री महाकाली ग्रुप ऑफ कंपनीज (एस.एम.जी.सी.) व आर.जी.एन. कंपनीमध्ये पैसे गुंतवल्यास अधिक नफा मिळेल या प्रलोभनास बळी पडून अन्य एका फिर्यादीने सदर कंपनीत रोख तसेच ऑनलाईन स्वरुपात एकुण रु. ८,५५,०००/- इतकी रक्कम गुंतवली, तथापि त्यांना नफा न मिळाल्याने त्यांची फसवणूक झाल्याबाबत रितेश पांचाळ व त्याचे इतर ११ साथीदार यांच्याविरुद्ध ठाणे आयुक्तालयांतर्गत कोळशेवाडी पोलीस स्टेशन येथे गु.रजि.नं ३०४/२०२३ भा.द.वि. कलम ४२०, ४०६, ३४ प्रमाणे दिनांक १३/०५/२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आलेला असून सदर गुन्ह्याचा तपास सुरु आहे.

तसेच, आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई व पवई पोलीस ठाणे, मुंबई येथे देखील श्री. महाकाली को-ऑपरेटीव्ह क्रेडीट सोसायटी आणि इतर बोगस कंपनी यांच्याविरुद्ध तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. सदर तक्रारीच्या अनुषंगाने आर्थिक गुन्हे शाखा, मुंबई यांच्यावतीने करण्यात आलेल्या चौकशीत सदर गैरव्यवहार प्रकरणी आतापर्यंत प्रत्यक्षात अर्जदारांसह ४९ गुंतवणूकदार समोर आले असून त्यांची गुंतवणूक केलेली रक्कम रुपये ६,८२,२६,०८०/- इतकी असल्याचे निष्पन्न झाले आहे. तसेच पवई येथे सात विविध तक्रार अर्ज प्राप्त असून त्यामध्ये रुपये ८४ लाख इतक्या रक्कमेची फसवणूक झाल्याचे नमूद आहे. परंतू सदर गुंतवणूकदारांनी गुंतवणूकीबाबतचे दस्तावेज सादर केलेले नाहीत, त्यामुळे सदर प्रकरणी गुंतवणूकीबाबतचे दस्तावेज प्राप्त करुन घेणे व जबाब नोंदविणे बाबत चौकशी सुरु आहे.

सदर प्रकरणी दाखल होत असलेल्या तक्रारींच्या अनुषंगाने चौकशी/तपासामध्ये निष्पन्न बाबीनुसार आरोपींवर योग्य ती कारवाई करण्यात येत आहे.

---

H/943-1@

लक्षवेधी सूचना क्र.१३४७ गृह विभाग

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. जयकुमार रावल, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१३४७ पुढीलप्रमाणे आहे :-**

"पळासनेर (ता.शिरपूर, जि.धुळे) येथे दिनांक १२ जुलै, २०२३ रोजी मशिनगन सह २० पिस्तुल आणि २८० जीवंत काडतुसे ठाणे पोलिसांनी पकडल्याची धक्कादायक बाब उघडकिस येणे, याच परीसरात सातत्याने हे धंदे राजरोसपणे सुरू असतांना याकडे धुळे पोलिसांचे सातत्याने दुर्लक्ष होणे, भांग, गांजा, अवैध दारू अशा घटना वारंवार या परीसरात घडत असल्याने पोलिस खात्याची गुप्तचर यंत्रणा पार कोलमडली असणे, एवढा प्रचंड शस्त्रसाठा धुळे जिल्हयात आणला जात असताना मोठा घातपात करण्याचा आरोपींचा कट असल्याचे प्रथमदर्शनी दिसून येणे, धुळे जिल्ह्यातील पोलीस अधिकारी, कर्मचारी, पोलीस नाईक, हवालदार, यांच्या प्रशासकीय आणि विनंती बदल्या माहे जून अखेर व माहे जुलै, २०२३ या महिन्यात पोलीस अधीक्षक यांच्या मार्फत करण्यात येणे, सदर बदल्यामध्ये प्रचंड प्रमाणात अनियमितता असणे, यामध्ये बी ग्रेड पोलीस स्टेशनमध्ये ५० चा स्टाफ असतांना तिथे ८० कर्मचारी करून ५-५ अधिकारी यांची नियमबाह्यपणे नेमणूक करण्यात येणे, अधिकारी व कर्मचारी यांनी विनंतीने मागणी केलेल्या पोलीस स्टेशनच्या मागणीचा कुठलाही विचार न करता मनमानीपणे बदली करण्यात येणे, तसेच काही बदल्या प्रशासकीय बदली प्रक्रियेत न करता नियमबाह्ययपणे करून विनंती बदली मध्ये करण्यात येणे, सर्व बदलीप्रक्रीयेमध्ये प्रचंड प्रमाणात आर्थिक व्यवहार झाल्याचा संशय बळावणे, त्यामूळे धुळे जिल्ह्यातील पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्यात निर्माण झालेला प्रचंड असंतोष, या बदली प्रक्रियेवर तातडीने स्थगिती देऊन या सर्व प्रक्रीयेची उच्चस्तरीय चौकशी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा.उपमुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

अवैध शस्त्र बाळगून जबरीचोरी करणेसंदर्भात ठाणे शहर पोलीस आयुक्तालयातील वागळे इस्टेट पोलीस ठाणे येथे दि. २७ सप्टेंबर, २०२२ रोजी गुरनं. २२५/२०२२ भारतीय हत्यार कायदा कलम ३, ४, २५ सह महाराष्ट्र पोलीस कायदा कलम ३७ (१), १३५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या तपासादरम्यान उमरटी गाव, पो. बलवाडी, ता.वरला, जि. बडवानी, मध्यप्रदेश येथील रहिवाशी गावठी बनावटीचे अग्नीशस्त्रे तयार करुन विक्री करण्याकरिता महामार्ग क्र. ३ वरील पळासनेर गावाजवळील ब्रीजखाली येणार असल्याची माहिती ठाणे शहर येथील गुन्हे शाखेस प्राप्त झाल्यानंतर दि. १० जुलै, २०२३ रोजी गुन्हे शाखा-५ यांनी शिरपूर तालुका पोलीस स्टेशन यांच्या पथकासह संयुक्तपणे सापळा रचून एका आरोपीला अटक करण्यात आली आहे. याप्रकरणी सदर गुन्ह्यातील आरोपीकडून शस्त्रसाठा जप्त करण्यात आला आहे.

अवैध शस्त्र खरेदी विक्री रोखण्यासाठी धुळे जिल्हा पोलीस स्वतः कारवाई करत असून आवश्यकतेनुसार सीमाभागातील पोलीसांशी समन्वय साधून प्रभावीपणे कारवाई करण्यात येते. धुळे जिल्हा पोलीस घटकाकडून अवैध शस्त्र सदराखाली सन २०२२ मध्ये २७ गुन्हे दाखल करण्यात

आले असून त्यामध्ये गावठी कट्टे- ३६, पिस्टल- ०४, एअर गन- ०९, मॅग्झीन- ०२, काडतूस ५७ असा एकूण १०,१४,८००/-किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच सन २०२३ मध्ये (२५ जुलै अखेर) १२ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यामध्ये गावठी कट्टे- १९, मॅग्झीन- ०८, काडतूस- ४० असा एकूण रु. १३,२५,२०० /-किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

धुळे जिल्हा पोलीस घटकाकडून जिल्हयात अंमली पदार्थ सदराखाली सन २०२२ मध्ये ३९ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यामध्ये रु. १,८१,३१,१३३/- रुपये किंमतीचा एकूण ४८०६ किलो १०६ ग्रॅम गांजा जप्त करण्यात आला आहे. तसेच सन २०२३ मध्ये (२५ जुलै २०२३ अखेर) १६ गुन्हे दाखल करण्यात आले असून त्यामध्ये रुपये २८,५३,०७९/- किंमतीचा एकूण ६८१ किलो १२६ ग्रॅम गांजा जप्त करुन प्रभावी कारवाई करण्यात आलेली आहे.

अवैध मद्यविक्री प्रकरणी सन २०२२ मध्ये एकूण १६४२ गुन्हे दाखल असून रू. ४,३५,२८,८९४/- किंमतीचा अवैध मद्यसाठा जप्त करण्यात आला आहे. तसेच सन २०२३ मध्ये (जून, २०२३ अखेर) एकूण ७२८ गुन्हे दाखल असून एकूण १,१४,१५,९९९/- रुपये किंमतीचा अवैध मद्यसाठा जप्त करण्यात आला आहे. सदरहू बाबींचे अवलोकन करता, धुळे पोलीसांकडून अवैध धंद्याबाबत नियमित कारवाई केल्याचे दिसून येते.

महाराष्ट्र पोलीस अधिनियम, १९५१ मधील कलम २२एन (१) व (२) नुसार पोलीस निरीक्षक दर्जापर्यंतच्या पोलीस अधिकारी व कर्मचारी यांच्या जिल्ह्यांतर्गत बदल्या/पदस्थापना करण्याचे अधिकार जिल्हास्तरावरील जिल्हा पोलीस अधीक्षक यांच्या अध्यक्षतेखालील आस्थापना मंडळास आहेत. त्यानुसार पोलीस अधीक्षक, धुळे यांनी दिनांक १५ जून, २०२३ रोजी प्रशासकीय बदल्याचे आदेश निर्गमित केल्यानंतर दि.३० जून, २०२३ रोजी विनंती बदल्याचे आदेश निर्गमित केलेले आहेत. सदरहू विनंती बदल्या करताना ज्या पोलीस अंमलदारांचा ५ वर्षाचा कालावधी पूर्ण झाला नाही, अशा पोलीस अंमलदारांची विनंती व अडचणी जाणून घेऊन मंजूर संख्याबळानुसार पोलीस ठाण्यांमधील गुन्ह्याची आकडेवारी, लोकसंख्या,जातीय दंगली, कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न इ. बाबी विचारात घेऊन विनंती बदल्या करण्यात आल्या आहेत. एकूण ४८८ पोलीस अंमलदाराचे विनंती अर्ज प्राप्त झाले होते. त्यापैकी २०७ पोलीस अंमलदारांना पसंतीच्या ठिकाणी नियुक्ती देण्यात आलेली आहे.

धुळे तालुका पोलीस स्टेशन, साक्री पोलीस स्टेशन व शिरपूर पोलीस स्टेशन या पोलीस ठाण्यात गुन्ह्याचे एकूण प्रमाण, ठाण्यातंर्गत दूरक्षेत्रातील अंतर, संमिश्र लोकवस्त्या, राष्ट्रीय महामार्गावरील अपघात तसेच, अवैध दारू, अंमली पदार्थ व शस्त्राची तस्करी या प्रकारच्या गुन्ह्याचे प्रमाण विचारात घेता, धुळे तालुका, साक्री व शिरपूर पोलीस ठाणे येथे मंजूर पदसंख्येपेक्षा अधिक पोलीस अंमलदार /पोलीस उपनिरीक्षक नियुक्त करण्यात आलेले आहेत.

धुळे जिल्हा पोलीस घटकातील पोलीस अंमलदाराच्या बदल्या या जिल्ह्यातील एकूण कायदा व सुव्यवस्था विचारात घेऊन जिल्हा स्तरावरील आस्थापना मंडळामार्फत पारदर्शकपणे करण्यात आलेल्या आहेत. या बदल्यासंदर्भात कोणतीही लेखी अथवा तोंडी तक्रार प्राप्त झाली नाही.

********

लक्षवेधी सूचना                                                                                    गृह विभाग

महाराष्ट्र विधानसभा

द्वितीय (पावसाळी) अधिवेशन- २०२३

**श्री.सुहास(अण्णा) द्वारकानाथ कांदे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

""नाशिक उपनगरचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्यावर नाशिक येथील गंगापूर पोलीस ठाण्यात एका महिलेची फसवणूक केल्या प्रकरणी कलम ३८४ अंतर्गत गुन्हा दाखल झालेले असणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी सदर महिलेकडून वेगळ्या स्वरुपात पैशाची मागणी करून खंडणीही मागितलेली असणे, न्यायालयाच्या आदेशाने त्यांच्यावर गुन्हा दाखल झालेला असणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी वेगवेगळ्या खोट्या गुन्हयात गुंतवून अनेक वेळा अटक करण्याची धमकी दिलेली असणे, तसेच ब्लॅकमेल करून त्रास देऊन खंडणीची केलेली मागणी, राजकीय कारकिर्द उद्ध्वस्त करण्याचा केलेला प्रयत्न, याप्रकरणी तत्कालिन मुख्यमंत्री, गृह मंत्री, पोलीस आयुक्त, पोलीस महासंचालक यांच्याकडे तक्रारी केलेल्या असणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी खोट्या गुन्ह्यात सदर महिलेस अडकवल्यानंतर त्यांच्याविरुध्द उच्च न्यायालयात गेल्यानंतर मा.उच्च न्यायालयाने सर्व बाबींची सत्यता पडताळणी करून निर्दोष मुक्तता करणे, वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांच्या विरोधात सी.आर.पी.सी. कलम १३५ (३) अंतर्गत न्यायालयात अर्ज दाखल करण्यात आला असून त्यानुसार गंगापूर पोलीस ठाण्यात यांच्याविरोधात कलम दि. डी. व कलम ३८४, ३८५ आणि ३८९ तसेच लाचलुचपत प्रतिबंधक कायद्याच्या कलम ७ आणि १३ नुसार तक्रार दाखल करण्यात आलेली असणे, या प्रकरणाचा तपास सहाय्यक पोलीस आयुक्त करीत असणे, सदर वरिष्ठ पोलीस निरीक्षक हा गुन्हेगारी प्रवृत्तीचा अधिकारी असून त्यांनी लोकांची आर्थिक पिळवणूक केलेली असणे, अनेक लोकांची फसवणूक करून अवैध मार्गाचा अवलंब करीत मोठ्या प्रमाणात बेहिशोबी मालमत्ता जमवलेली असणे, त्यांच्या व त्यांच्या नातेवाईकांच्या नावावर वेगवेगळ्या ठिकाणी बेहिशोबी, बेकायदेशीर मालमत्ता असणे, शासनाने उक्त प्रकरणी पारदर्शक चौकशी होण्यासाठी वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांना तात्काळ अटक करून सेवेतून बडतर्फ करण्याची व लाचलुचपत प्रतिबंधक विभागाकडून सखोल चौकशी करून कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा उपाययोजना"

---

**मा. उप मुख्यमंत्री (गृह) महोदयांचे निवेदन**

सन २०१६ मध्ये नाशिक येथील एका महिलेच्या नावे असलेला भूखंड फसवणूक करून हस्तांतर केल्याबाबत प्राप्त तक्रारीवरून काही इसमाविरूध्द गंगापुर पोलिस स्टेशन येथे गु.र.नं. २१९ / २०१६ भादवि कलम ४२०, ४०६, ४६८, ३४, ४६७, ४७१ अन्वये दिनांक १०/११/२०१६ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्ह्याच्या तपासादरम्यान तत्कालीन तपास अधिकारी पोलीस निरीक्षक श्री. निलेश माईनकर यांनी

स्थानिक लोकप्रतीनिधीना आरोपी केले. तसेच सदर गुन्हयाचे तपासात मदत करण्याचे आमिष दाखवून त्यांच्याकडे खंडणीची मागणी केली होती. त्यानंतर सदर लोकप्रतीनिधी यांनी मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे या गुन्हयातुन दोषमुक्त होण्याकरीता अर्ज नं.१९९/२०२३ दाखल केला होता. मा. उच्च न्यायालयाने त्यांना गुन्हयातुन दोषमुक्त केले. त्यानंतर संबंधीत लोकप्रतीनीधी यांनी पोलीस निरीक्षक श्री. निलेश माईनकर यांचेविरुध्द सीआपीसी कलम १५६ (३) अन्वये गुन्हा दाखल करण्याबाबत मा.जिल्हा व सत्र न्यायालयात अर्ज दाखल केला होता. यावरील मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश, नाशिक यांचे आदेश दि.०२.०५.२०२३ अन्वये पोलीस निरीक्षक श्री. निलेश माईनकर, यांच्याविरुध्द गंगापुर पोलीस स्टेशन, नाशिक शहर येथे गु. र. नं. ११३/२०२३ भादविक ३८४,३८५, ३८९, सह लाचलुचपत प्रतिबंधक अधिनिम कलम ७ व १३ दि.०४/०५/२०२३ रोजी गुन्हा नोंद करण्यात आला आहे. सदर गुन्ह्याचा तपास हे डॉ. सिध्देश्वर धुमाळ, सह पोलीस आयुक्त, सरकारवाडा विभाग, नाशिक शहर हे करत आहेत. श्री. निलेश माईनकर यांचे व त्यांच्या कुटुंबियांच्या नावे असलेल्या स्थावर व जंगम मालमत्तेसंबंधी माहिती घेण्यात येत असून याबाबत अधिकचा तपास सुरु आहे.

--------

**लक्षवेधी सुचना क्र.१४११** **गृह विभाग**

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन**

श्री. किशोर जोरगेवार, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना क्र.१४११** पुढीलप्रमाणे आहे :-

"चंद्रपूर तालुक्यातील (जि.चंद्रपूर) रामनगर पोलीस ठाण्याच्या कामाची व्याप्ती व ठाण्याची हद्द मोठी असल्यामुळे तसेच कमी अधिकारी व अल्प कर्मचा-यांमुळे दिवसेंदिवस वाढती गुन्हेगारी, रामनगर पोलीस ठाण्याचे विभाजन करुन शास्त्रीनगर पोलीस स्टेशनची निर्मिती करण्याचा प्रस्ताव पोलीस अधीक्षक डीजी कार्यालयामार्फत राज्य शासनाकडे गेल्या चाप ते पाच वर्षापूर्वी पाठविण्यात येणे, दिनांक ४ मे, २०२० रोजीच्या वित्त विभागाच्या शासन निर्णयानुसार नवीन पदे निर्माण करणे तसेच दिनांक २५ मे, २०१७ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभाग आकृतीबंध अंतिम मंजूरी करुन घेणार नाही, तोपर्यंत त्या विभागांना नवीन पदभरती करता येणार नाही इत्यादी कारणे देऊन उपरोक्त प्रस्तावास दिनांक ३१ मार्च, २०२२ पर्यंत तात्पुरती स्थगिती देण्यात आल्याचे सहा. पोलीस महानिरीक्षक (नि.व स.), पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य यांनी दिनांक १२ जुलै, २०२१ रोजी लेखी पत्राव्दारे पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांना कळविणे, सदर स्थगिती उठल्यानंतर तातडीने रामनगर पोलीस ठाण्याचे विभाजन करुन शास्त्रीनगर पोलीस ठाण्याची निर्मिती करुन अधिकारी व कर्मचा-यांच्या नियुक्त्या करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा.उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन**

पोलीस अधीक्षक, चंद्रपूर यांच्या अधिपत्याखालील पोलीस ठाणे रामनगरचे विभाजन करुन शास्त्रीनगर पोलीस चौकीचे रुपांतर करुन नवीन शास्त्रीनगर पोलीस स्टेशन मंजूर होणेबाबत व त्यासाठी १४३ पदे निर्माण करण्याबाबतचा प्रस्ताव पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई कार्यालयाकडून प्राप्त झाला आहे. उक्त प्रस्ताव वित्त विभागाच्या मान्यतेसाठी सादर करण्यात आला.

सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने वित्त विभागाने, राज्यात नवीन पोलीस ठाणे निर्मितीबाबत आर्थिक परिस्थिती आणि कायदा व सुव्यवस्था परिस्थिती विचारात घेऊन प्राधान्यक्रम निश्चित करणे आवश्यक असल्याचे अभिप्राय दिले.

वित्त विभागाच्या अभिप्रायाच्या अनुषंगाने पोलीस महासंचालक कार्यालयास राज्यातील नव्याने निर्माण करावयाच्या/प्रस्तावित असलेल्या पोलीस ठाणेंच्या निर्मितीबाबत प्राधान्यक्रम ठरवून, तसा प्रस्ताव सादर करणेबाबत कळविण्यात आले आहे.

तसेच विविध पोलीस ठाणे व त्या अनुषंगाने पदनिर्मितीचे प्रस्ताव गृह विभागाचा आकृतीबंध मंजूर झाला नसल्याने प्रलंबित आहेत. तथापि, आता नागपूर विभागातील पोलीस उप महानिरीक्षक,गडचिरोली व विशेष पोलीस महानिरीक्षक,नागपूर परिक्षेत्र यांचेसह पोलीस अधीक्षक,गडचिरोली,गोंदीया,नागपूर ग्रा., वर्धा, चंद्रपूर व भंडारा या ८ घटक कार्यालयातील पोलीस व प्रशासकीय अधिकारी व कर्मचारी यांच्या पदांचा सुधारित आकृतीबंधचा शासन निर्णय दि.३०/०६/२०२३ रोजी निर्गमित करण्यात आला आहे.

नवीन पोलीस ठाणे निर्मितीच्या प्राधान्यक्रमाचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर रामनगर पोलीस ठाणेचे विभाजन करुन शास्त्रीनगर या नवीन पोलीस ठाणे निर्मितीबाबतची कार्यवाही नियमानुसार करण्यात येईल.

*****

लक्षवेधी सूचना क्र.१४९२

८०

## महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री.विश्वजित कदम, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :

" सांगली जिल्ह्यात खून, दरोडे, मारामारी व खंडणी असे गंभीर व धक्कादायक स्वरुपाचे गुन्हे वाढत असल्याचे माहे जून, २०२३ रोजी वा त्यासुमारास आढळून येणे, रिलायन्स ज्वेलर्सवर भर दिवसा दरोडा टाकून कोट्यावधीची लूट करण्यात येणे, कान्हरवाडीत गुंडाकडून एका तरुणाचा खून करण्यात येणे, ईस्त्राईलला नेतो असे सांगून तेथील लोकांची लाखो रुपयांची फसवणूक करण्यात येणे, तसेच कवळेपिरान येथे दरोडा घालून घरातून १५ तोळे सोने व रोकड असे लाखो रुपायांची चोरी करण्यात येणे, अशा प्रकारे जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्थेचे धिंडवडे निघत असतानाही पोलीसांचा कोणत्याही प्रकारचा धाक नसणे, तसेच पोलीसांकडून या प्रकरणी कोणतीही कार्यवाही न होणे, यामुळे नागरिकामध्ये पसरलेले भितीचे व चिंतेचे वातावरण, सांगली जिल्ह्यात दिवसेंदिवस वाढत असलेली गुन्हेगारी तातडीने रोखण्याबाबत तसेच गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

.........................................................................................

### मा. उप मुख्यमंत्री (गृह) यांचे निवेदन

सांगली जिल्ह्यामध्ये खुन, दरोडा, फसवणुक इत्यादी घटनांबाबत पोलीस घटकामार्फत वेळीच गुन्हा दाखल करुन कारवाई करण्यात येते. त्यानुषंगाने विषयांकीत घटनांबाबत करण्यात आलेली कारवाई पुढीलप्रमाणे आहे :-

१) रिलायन्स ज्वेलर्स, सांगली येथे दिनांक ०४.०६.२०२३ रोजी पोलीस असल्याचे बतावणी करुन एक अनोळखी इसम व त्याचे सात-आठ साथीदार यांनी घातलेल्या दरोड्याबाबत विश्रामबाग पोलीस स्टेशन, सांगली येथे दिनांक ०४.०६.२०२३ रोजी गु.र.नं.४२४/२०२३, भा.दं.वि. कलम ३९५, ३९८, ४२७, १७०, १७१, ३२३, ५०४, ५०६, सह आर्म ॲक्ट कलम ३, २५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात घटनास्थळावरील व इतर ठिकाणच्या सी.सी.टीव्ही. फुटेज व जप्त केलेले इतर साहित्य यावरुन गुन्ह्याची उकल होण्याच्या दृष्टीने पुढील तपास सुरु आहे.

२) कान्हरवाडी, ता.कडेगाव, जि.सांगली येथे नदीच्या पात्रातुन वाळुची खेप भरुन आणल्याच्या कारणावरुन एका तरुणाचा खुन झाल्याबाबत कडेगाव पोलीस स्टेशन, सांगली येथे दिनांक ०४.०६.२०२३ रोजी गु.र.नं.९३/२०२३, भा.दं.वि. कलम ३०२, ३०७, ३२४, १४३, १४७, १४८, १४९, ४२७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात सहा आरोपींना अटक करण्यात आली असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

३) आटपाडी, सांगली येथील घटनेत लोकांना इस्त्रायल येथे कृषी दौऱ्यासाठी घेवुन जातो असे सांगुन प्रत्येकाकडून रुपये १.६० लाख घेवून २९ लोकांची आर्थिक फसवणुक झाल्याबाबत आटपाडी पोलीस स्टेशन, सांगली येथे दिनांक ११.०५.२०२३ रोजी गु.र.नं.१६०/२०२३, भा.दं.वि. कलम ४२०, ४०६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात एक आरोपी निष्पन्न झाला असून गुन्ह्याचा पुढील तपास सुरु आहे.

४) कवठे पिरान, ता.मिरज, जि.सांगली येथील दरोड्याच्या घटनेबाबत सांगली ग्रामीण पोलीस स्टेशन, सांगली येथे दिनांक २६.०५.२०२३ रोजी गु.र.नं.१९४/२०२३, भा.दं.वि. कलम ३९५, ३९७ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात रुपये ८.७१ लाख किंमतीचा माल चोरीला गेल्याची फिर्याद असून त्यापैकी रुपये ३.८८ लाख रुपयांचा मुद्देमाल आरोपींकडून जप्त करण्यात आला आहे. सदर गुन्ह्यात १ आरोपीस अटक करण्यात आली आहे. गुन्ह्यातील इतर आरोपींचा शोध घेण्यात येत असून पुढील तपास सुरु आहे.

सांगली जिल्ह्यात खुन, दरोडा, मारामारी व खंडणी या गुन्ह्यांना प्रतिबंध घालण्यासाठी पोलीस दलाकडुन विविध उपाययोजना करण्यात येतात. यामध्ये गुन्हे नियंत्रण व चोरट्यांना पकडण्यासाठी रात्रगस्त, राष्ट्रीय व इतर मार्गांवर सतत पेट्रोलींग, नाकाबंदी, कोंबिंग, ऑलऑऊट ऑपरेशन इत्यादी. तसेच स्मार्ट बीट प्रणाली अंतर्गत ४० बीट मार्शल यांची नेमणुक करुन दृश्यमान पोलीसींग करण्यावर भर, गुन्हेगारांचा शोध घेण्यासाठी आधुनिक तांत्रिक प्रणालींचा वापर, याशिवाय गुन्ह्यात जामीन मंजूर झालेल्या आरोपींवर प्रतिबंधात्मक कारवाई करण्यात येते, तसेच यावर्षी एम.पी.डी.ए. अंतर्गत १ व मोक्का अंतर्गत ४ कारवाया करण्यात आल्या आहेत. याप्रमाणे गुन्हे घडण्याच्या कारणांचा वेळीच छडा लावून प्राप्त प्राथमिक घटना व तक्रारी मध्ये प्रभावी कारवाई करण्याच्या पोलीस अधीक्षक, सांगली यांचेमार्फत जिल्ह्यातील सर्व पोलीस घटकांना सुचना देण्यात आल्या आहेत.

**********

लक्षवेधी सूचना क्र. १५८५ गृह विभाग

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्रीमती गीता जैन, वि. स. स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"मीरा-भाईंदर (जि. ठाणे) येथील नयानगर पोलीस स्टेशन मध्ये दिनांक १९ जून, २०२३ रोजी एका १३ वर्षीय मुलगी व तिची आई लैंगिक अत्याचार व धर्मांतराची तक्रार देण्यासाठी गेलेली असताना सदरहू पिडीत मुलीला व तिच्या परिवाराला नयानगर पोलिसांकडून देण्यात आलेली अन्यायकारक वागणूक, तक्रार देण्यासाठी गेलेल्या पिडीत मुलीच्या आईची तक्रार घेण्यास त्यावेळी कार्यरत असलेले नयानगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षकांकडून टाळाटाळ करण्यात आलेली असणे, बराच वेळ वादविवाद झाल्यानंतर सुमारे ९ तासाने गुन्हा नोंदविण्यात आलेला असणे ( त्याचा FIR NO ०३२८) मात्र सदरहू गुन्हा नोंदवितांना पिडीत मुलीच्या आईने सांगितल्याप्रमाणे गुन्हा नोंदविलेला नसणे, इतकेच नव्हे तर, पोलीस निरीक्षक यांनी फक्त पिडीत मुलीला त्यांच्या केबिनमध्ये घेऊन गेले असता पिडीत मुलीच्या आईने त्यांच्या कॅबिनमध्ये येण्याची विनंती केलेली असतानाही ती नाकारण्यात आलेली असणे, पोलीस निरीक्षक यांनी घेतलेल्या जबाबात पिडीत मुलीच्या आईला धमकी देऊन जबरदस्तीने सही करण्यास भाग पाडणे, यामुळे नयानगर पोलिसांकडून अधिकाराचा दुरुपयोग तसेच कामात कसूर करून जाणीव पूर्वक POCSO कायद्याचे उल्लंघन करण्यात आलेले असणे, यामुळे सदर प्रकाराबाबत पिडीत मुलगी व तिची आई यांनी नयानगर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांच्या विरोधात पोलीस उपआयुक्त झोन क्र. ०१ यांच्याकडे केलेली तक्रार, त्यानुषंगाने नयानगर पोलिसांनी पुरवणी जबाब नोंदविलेले असणे, मात्र आजमितीस नयानगर पोलिसांकडून संबंधित गुन्हेगाराविरोधात कारवाई झालेली नसणे, दिनांक १७ जुलै, २०२३ रोजी व त्यासुमारास नयानगर पोलीस स्टेशनच्या कार्यक्षेत्रात पुन्हा लैंगिक अत्याचार व धर्मांतराची दुसरी घटना घडल्याचे उघडकीस येणे, या घटनेसंदर्भात तेथील ड्यूटीवर असलेल्या पोलीस अधिकारी यांनी प्रथमता गुन्हा नोंदवण्यास टाळाटाळ करणे व ११ तासानंतर (FIR NO ४००) नोंदविलेला असणे, या प्रकरणातही नयानगर पोलिसांनी पिडीत मुलीने सांगितल्याप्रमाणे जबाब घेण्यास टाळाटाळ केलेली असणे तसेच या नोंदणी केलेल्या गुन्ह्याचा FIR देण्यास ११ तासांहून अधिक विलंब केलेला असणे, सदर दोन्ही घटनेत वरिष्ठ पोलीस निरीक्षक यांनी जाणीवपूर्वक अधिकाराचा दुरुपयोग व कामात कसूर करुन गुन्हा दाबण्याचा प्रकार केलेला असणे, परिणामी या गुन्ह्यामध्ये आरोपींना कोर्टाकडून जामीन मिळवण्यासाठी सर्वतोपरी मदत केल्याचे स्पष्टपणे उघडकीस आलेले असणे, पोलिसांच्या या पक्षपाती व गुन्हेगारांना संरक्षण देण्यासाठी केलेल्या गैर प्रकाराबाबत तेथील जनतेत पसरलेला तीव्र असंतोष, तसेच महिलांच्या सुरक्षेची निर्माण झालेली गंभीर समस्या, याप्रकरणी पिडीत मुलींना न्याय मिळण्याचा दृष्टीने सखोल चौकशी होऊन संबंधित दोषी पोलीस अधिकाऱ्यांविरोधात विनाविलंब कायदेशीर कारवाई करण्याची आवश्यकता, या प्रकरणी शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

रोटा- ५/१५० (८०० - ८ - २३) - १ [कु.मा.प.]

## मा. उपमुख्यमंत्री (गृह) महोदयांचे निवेदन

नयानगर पोलीस ठाणे, मिरा - भाईंदर वसई-विरार पोलीस आयुक्तालय येथे दिनांक १९/०६/२०२३ रोजी रात्री २०.३० वाजता फिर्यादी महिला तिच्या कुटूबांसमवेत येथे फिर्याद देण्यासाठी आली होती. फिर्याद नोंदविताना पिडीत मुलगी पोलीस स्टेशनमध्ये उपस्थित नसल्यामुळे संपूर्ण घटनाक्रम व त्याविषयची कायदेशीर खबर नोंदविता येत नव्हती. त्यावेळी कर्तव्यावरील पोलीस अधिकारी यांनी पिडीत मुलीच्या घरी पोलीस पथक पाठवून जबाब नोंदविण्याची तयारी दर्शविली होती. तथापि, फिर्यादीने त्यास नकार देऊन पिडीत मुलीस त्याच दिवशी २३.३० वाजता पोलीस स्टेशन येथे हजर केले. त्यानंतर सदस्य, महिला दक्षता समिती व महिला कर्मचारी, महाराष्ट्र सुरक्षा बल यांचे समक्ष पिडीत मुलीने सांगितल्याप्रमाणे सविस्तर जबाब नोंदविण्यात आलेला आहे.

या प्रकरणात फिर्यादीने दिलेल्या तक्रारीनुसार दिनांक २०/०६/२०२३ रोजी पहाटे ०४.५२ वाजता विधी संघर्षीत बालकाविरुद्ध नयानगर पोलीस ठाणे येथे गु. र. नं. ३२८/२०२३ प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तसेच बालकास ताब्यात घेऊन मा. बाल न्यायमंडळ, भिवंडी येथे हजर केले असता त्यांचे आदेशानुसार बालकास बाल सुधारगृहात ठेवण्यात आले आहे. सदर गुन्ह्यात पुरवणी जबाबाच्या अनुषंगाने अन्य एका आरोपीविरुध्द तपास सुरु आहे.

सुरुवातीस पिडीत मुलगी उपस्थित नसणे, फिर्यादीने वारंवार जबाबामध्ये बदल करणे तसेच प्रथम खबर नोंदवितांना इतर व्यक्तीचा वांरवांर सल्ला घेणे यामुळे गुन्हा नोंद करतांना उशिर झाल्याचे दिसुन येत आहे. सदर प्रकरणात पोक्सो अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे. पिडीत मुलगी व तिची आई यांची तक्रार पोलीस निरीक्षक ( गुन्हे ) यांनी त्यांचे कक्षामध्ये नोंद केलेली आहे. तसेच पोलीसांनी पिडीत मुलगी व तिच्या परिवाराला कोणत्याही प्रकारची अन्यायकारक वागणूक व तक्रार दाखल करण्यास कोणत्याही प्रकारची टाळटाळ केलेली नाही.

अन्य प्रकरणात तक्रारदार महिला ही दि. १६ जुलै २०२३ रोजी नयानगर पोलीस ठाणेमध्ये पती व सासु मानसिक त्रास देत असल्याची तक्रार घेऊन आली. त्यावेळी कर्तव्यावर असलेले पोलीस अधिकारी यांना प्रथम दर्शनी पती व पत्नी यांच्यामधील वाद असल्याने समुपदेशनासाठी आपणांस भरोसा सेल कडे पाठविण्यात येईल, असे त्यांना सांगितले. तथापि, सदर महिला तक्रार अर्ज न देताच निघून गेली व काही वेळानंतर पोलीस ठाणे येथे येऊन कौटुंबिक तक्रारीऐवजी लग्नापूर्वी शारीरीक संबंध व धर्मांतर करुन लग्न लावल्याबाबतची तक्रार दिली. त्यानुसार, श्री. आमीन आजम शेख यांचेविरुध्द नयानगर पोलीस ठाणे येथे दि. १६ जुलै २०२३ रोजी गु. र. नं. ४००/२०२३ भा. द. वि. कलमान्वये ३७६ (२) (एन), ३६६, ३२३, ५०४, ५०६, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करुन त्यास दि. १७ जुलै २०२३ रोजी अटक करण्यात आली आहे. सदर आरोपीस न्यायालयीन कोठडी मंजूर झाली असून आरोपी न्यायालयीन कोठडीत आहे.

वरील दोन्ही गुन्ह्यांत आरोपींवर गुन्हा नोंद करण्यात आला असून तात्काळ कायदेशीर कार्यवाही करण्यात आली आहे. तसेच, सदर प्रकरणात गुन्हा नोंद करण्यास विलंब होत असल्याचे लक्षात घेऊन फिर्यादीची गैरसोय होऊ नये याची दक्षता घेण्यात आली आहे. याप्रकरणी करण्यात आलेल्या तक्रारीबाबत सहायक पोलीस आयुक्त, नवघर यांच्याकडून चौकशी करण्यात येत आहे. महिला सुरक्षा तसेच त्यांच्या तक्रारीची तात्काळ दखल घेऊन कार्यवाही करण्यात येते.

H/९५०-१९

********************

**लक्षवेधी सूचना क्र. १७१२** **गृह विभाग**

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन**

**श्री. सुरेश (राजूमामा) भोळे, ॲड. माणिकराव कोकाटे वि. स. स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-**

"पोलीस स्टेशन वणी, जि. यवतमाळ येथे दिनांक २३ नोव्हेंबर, २०२१ रोजी अपराध नंबर ८९८/२०२१ एका अल्पवयीन (वय वर्षे १६) मुलीचा गर्भपात करण्यात आल्याबाबतची तक्रार दाखल करण्यात येणे, सदर ठिकाणी कार्यरत असणारे सहाय्यक पोलीस निरीक्षक यांनी सदर तक्रार विहित वेळेत दाखल करून घेतल्यानंतर अल्पवयीन मुलीस मेडिकलसाठी वैद्यकीय अधिकारी, यवतमाळ यांच्याकडे पाठविणे, पो. नि. यांनी सोबत दिलेल्या पत्रावर जाणून बुजून तारीख लिहिलेली नसणे, सदर मुलगी ही अल्पवयीन असून तिचे वय वर्षे १६ इतके असताना देखील सदरची गोष्ट डॉक्टरांना माहित असून डॉक्टरांनी त्या मुलीचा गर्भपात केला असणे, सदर बाब ही डॉक्टरांनी पोलीस स्टेशनच्या निदर्शनास न आणता सदर डॉक्टरांनी गर्भपात केल्यानंतर गर्भ नष्ट करणे, त्यानुषंगाने गुन्ह्याचा पुरावा नष्ट केल्याची गंभीर बाब निदर्शनास येणे, तसेच डॉ. महेंद्र लोढा यांनी तयार केलेले पिडीत मुलीचे मेडिकल पेपर तपासले असता सदर मुलगी दिनांक ३० ऑगस्ट, २०२१ रोजी सकाळी ११.०० वाजता दवाखान्यात दाखल करण्यात येणे व लगेच ११.१० वाजता पिडीताचे व तिच्या पालकाचे संमतीपत्र प्राप्त झाले, तसेच सदर डॉक्टरांनी केवळ १० मिनिटांतच चाचण्या झाल्याचे भासवून सदर सर्व चाचण्या नोंद वहीत नोंदविण्यात आल्या असणे, त्या मुलीच्या सर्व चाचण्या पूर्ण न करणे, सदरहू प्रकारामुळे पोलीस स्टेशनमध्ये डॉक्टरांनी पुरावे नष्ट केल्याचे दिसून येत असताना देखील डॉक्टरांकडून लाच घेऊन संबंधीत पोलीस ठाण्याच्या सहाय्यक पोलीस निरीक्षक यांनी पुरावे नष्ट करण्यास डॉक्टरांना मदत केल्याचे दिसून येत असणे, तसेच सदर केसमध्ये साधारण गुन्हा दाखल झाल्यानंतर ५० दिवसांनी डॉक्टरांना पोलीस स्टेशनमध्ये बोलविले असणे, संपूर्ण पुरावे नष्ट केल्यानंतर डॉक्टरांना मदत करण्याच्या दृष्टीकोनातून जाणून बुजून उशीर केला असणे, तसेच सदर प्रकरणी वणी पोलीस स्टेशन, जि. यवतमाळ येथील पोलीस अधिकारी यांनी आपल्याला आरोपी न करण्यासाठी पैशाची मागणी केल्याबाबत डॉ. महेंद्र लोढा यांनी शांतता समितीच्या बैठकीमध्ये संजय पुज्जलवार, तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी व इतर शांतता समिती सदस्यांसमोर लेखी तक्रार दिली असणे, त्यानुषंगाने संबंधीत अधिकाऱ्यांची कोणतीही चौकशी करण्यात आली नसणे, एवढे होऊनही संबंधीत डॉक्टरांना गुन्ह्यात आरोपी न करण्यासाठी त्यांच्याकडून तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पुज्जलवार व तपासी अधिकारी यांनी ४० ते ५० लक्ष घेऊन सदर प्रकरण मिटविण्यात

आलेले असणे, अल्पवयीन पिडीत मुलीवर अत्याचाराचा गंभीर गुन्हा घडूनही आरोपीला मदत होईल अशाप्रकारे गुन्ह्याचा तपास संबंधीत तपासी अधिकारी व तत्कालीन उपविभागीय पोलीस अधिकारी, वणी, जि. यवतमाळ यांनी केलेला असणे, या प्रकरणी शासनाने सखोल चौकशी करून सदर प्रकरणातील दोषी अधिकारी व डॉ. महेंद्र लोढा यांच्यावर कडक कारवाई करण्याची आवश्यकता व त्यांना शासकीय सेवेतून बडतर्फ करण्याकरीता तातडीने करावयाची कार्यवाही, यावर शासनाची प्रतिक्रिया "

---

**मा. उपमुख्यमंत्री (गृह) महोदयांचे निवेदन**

पोलीस स्टेशन वणी, जि. यवतमाळ येथे दिनांक २३ नोव्हेंबर, २०२१ रोजी एका अल्पवयीन मुलीने तिच्यावर अत्याचार झाल्याबाबत तसेच गर्भपात करण्यात आल्याबाबत दिलेल्या तक्रारीवरुन गु. र. क्र. ८९८/२०२१ कलम ३७६ (३), ३७६ (२) (J) (N) सहकलम ४, ६ पोक्सो प्रमाणे गुन्हा नोंद करण्यात आला आहे. तपासी पोलीस अधिकारी यांनी दि. २४/११/२०२१ रोजीच्या पत्रान्वये पिडित मुलीची वैद्यकीय तपासणी करण्याबाबत वैद्यकीय अधिकारी, शासकीय रुग्णालय, यवतमाळ यांना कळविले. सदर पिडीत मुलगी तिच्या आई वडिलांसोबत डॉ. लोढा यांच्या दवाखान्यात दि. ३०/०८/२०२१ रोजी उपचार करीता गेली होती. त्यावेळी पिडीत मुलीचे वय १८ वर्षे पूर्ण झाले असल्याचे समंती पत्र तिच्या आई-वडीलांनी दिले. त्यानुसार डॉ. महेंद्र लोढा यांनी इमरजन्सीचे क्युरेटाज हे ऑपरेशन व उपचार पिडीत मुलीवर केला. तपास अधिकारी, पोलीस स्टेशन वणी यांनी दि. २२/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये न्यायवैद्यकिय समिती शासकीय रुग्णालय, यवतमाळ यांच्याकडून याप्रकरणी डॉ. लोढा यांनी कर्तव्यात कसूरी केली आहे काय, याची चौकशी करुन अभिप्राय मागविण्यात आले होते. न्यायवैद्यकिय समितीने दि. २६/०४/२०२२ रोजीच्या पत्रान्वये अभिप्राय दिले आहेत. त्यानुसार पिडीत मुलगी ही अत्यंत तातडीची रुग्ण म्हणून दवाखान्यात दाखल झाली होती व तिच्या जीवाला धोका होऊ नये म्हणून पिडीत मुलीवर तातडीने ऑपरेशन व उपचार डॉ. लोढा यांनी केले व त्यांनी पिडीतेवर उपचारादरम्यान कर्तव्यात कसुर केली नसल्याचे अभिप्राय दिले आहेत. तपासी अधिकारी यांनी डॉ. लोढा यांना पुरावे नष्ट करण्यास मदत केली यामध्ये तथ्य नाही. डॉ. महेंद्र लोढा यांनी त्यांना आरोपी न करण्यासाठी पोलीसांनी पैश्याची मागणी केल्याबाबतची कुठलीही लेखी तक्रार केलेली नाही.

या प्रकरणी, तपासी अधिकारी यांनी सदर गुन्ह्यातील आरोपी श्री. पंकज गंगाधर लाकडे याच्याविरुध्द मा. जिल्हा व सत्र न्यायालय, केळापुर जि. यवतमाळ येथे दोषारोपपत्र सादर केले आहे. सदरचे प्रकरण सध्या न्यायप्रविष्ठ आहे.

***********

# लक्षवेधी सूचना क्र. ५१९

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ (३) अन्वये श्री. संजय सावकारे, मा. विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.५१९ पुढील प्रमाणे:-

"जळगाव जिल्ह्यातील भुसावळ तालुका वाघूर या धरणाच्या मोठया सिंचन प्रकल्पाच्या उजव्या तिरावर असणे. वरणगाव, तळवेल परिसर योजना व वाघूर उजव्या कालव्यावर सिंचन होणे तसेच कुऱ्हे पानाचे, वरडसिम, गोजोरा, मांडावा दिगर, भिलमळी, महादेव तांडा, मोंढळा, शिंदी ही गावे शेतीच्या पाण्यापासून वंचित असणे. सन २०१३ -२०१४ पासून सातत्याने वाघूर धरणातील पाण्यासाठी उर्ध्व करण्याची (lift) सतत ग्रामस्थांची मागणी होणे त्यासाठी आंदोलने करण्यात येणे शासनाने कोणतीही दाखल न घेणे व कारवाई न करणे "धरण उशाला पण शेतकरी उपाशी" अशी काही स्थिती ग्रामस्थांची असणे स्थानिक लोकप्रतिनिधी व अधिकाऱ्याची सदर विषयावर बैठक होऊनही प्रश्न सोडविण्यात आलेले अपयश मंत्रालयीन स्तरावर अधिकाऱ्याची बैठक होणे आवश्यक, प्रश्न सोडविण्यात वेळोवेळी आलेले अपयश ग्रामास्थान मध्ये पसरलेली शासनाप्रती असंतोषाची भावना यावर शासनाने करावयाची कारवाई आणि उपाययोजना."

.................................................................................................................

### श्री. देवेंद्र फडणवीस मा. उप मुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन

कुऱ्हे पानाचे, वराडसिम, गोजोरा, मांडवा दिगर, भिलमळी, महादेव तांडा, मोंढळा, शिंदी ही गावे वाघुर धरणापासून उत्तर - पूर्व दिशेला, २-८ किलोमीटर अंतरावर असून, वाघुर धरणाच्या पूर्ण संचय पातळीपासून ५० मीटर उंचीवर स्थित आहेत. या गावांचे एकूण क्षेत्र सुमारे ६२०० हेक्टर असून, यापैकी ११६४.१६ क्षेत्र कुऱ्हे पानाचे ल. पा. तलाव, वरणगाव तळवेल उपसा सिंचन योजना व वाघूर उजवा कालव्यावरून सिंचनासाठी प्रस्तावित आहे. उर्वरित क्षेत्रास सिंचनाची सुविधा उपलब्ध नाही. या भागातील लागवडीलायक सिंचन क्षेत्र ४००० हेक्टर असून, त्यासाठी सुमारे १८.१५ दलघमी पाण्याची आवश्यकता आहे.

वरणगाव तळवेल उपसा सिंचन योजना ता. - भुसावळ या योजनेअंतर्गत, हतनूर मोठ्या धरणाच्या, बुडीत क्षेत्रातून, उपसा योजना राबवून १२४.४१९ दलघमी पाणी उचलून ओझरखेड माती धरणामध्ये साठविण्याचे नियोजित आहे. या धरणातून एकूण १६९४८ हेक्टर क्षेत्रात सिंचनाचा लाभ होणार आहे. यामध्ये भुसावळ तालुक्यातील ३५ गावांमध्ये ११६०६ हेक्टर क्षेत्राचा समावेश आहे. त्यापैकी कु-हे पानाचे या गावातील ५७९.०० हेक्टर व गोजोरे या गावातील ५६४.४९ हेक्टर या क्षेत्राचा समावेश आहे.

वाघुर मोठ्या धरणाची एकूण साठवण क्षमता ३२५.०० दलघमी असून, मंजूर पाणी वापर ३६३.०० दलघमी आहे. या प्रकल्पामुळे जळगाव तालुक्यातील २९ गावांमधील २३४८२ हेक्टर, जामनेर तालुक्यातील ३७ गावांमधील २९६५५ हेक्टर तर भुसावळ तालुक्यातील ९ गावांमधील २४७४ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे. त्यापैकी वराडसीम या गावातील ४०३.६० हेक्टर व गोजोरे या गावातील १८१.५६ हेक्टर या क्षेत्राचा समावेश आहे.

मा. विधानसभा सदस्य यांनी कुऱ्हे पानाचे व मांडवे दिगर या क्षेत्रासाठी वाघुर धरणाच्या जलाशयातुन सिंचन योजनेस मान्यता मिळणेस दि.२१/०४/२०२३ रोजी निवेदन दिले होते. त्याअनुषंगाने या परिसरातील शिवाराची प्राथमिक पहाणी करण्यात आलेली आहे.

वाघुर प्रकल्पास शासन निर्णय दि.११/०९/२०१९ अन्वये सातवी सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त आहे. प्रकल्पाच्या एकूण मंजूर पाणी वापरापैकी सिंचनासाठी २२६.७०७ दलघमी, बिगरसिंचन ७०.५७ दलघमी, बाष्पीभवन ६२.९३ दलघमी असा एकूण ३६०.२१ दलघमी इतका पाणीवापर असून वाघुर जलाशयात फक्त २.७९ द.ल.घ.मी. इतकेच पाणी शिल्लक राहते.

त्यामुळे सद्यस्थितीत अतिरीक्त पाणी उपलब्ध नसल्याने पाणी उपलब्धतेबाबत पर्यायी सविस्तर अभ्यास करुन तसेच योजनेची व्यवहार्यता तपासून पुढील आवश्यक कार्यवाही करण्याचे नियोजित आहे.

******

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.८९५**

**श्री.प्राजक्त तनपूरे,श्री.बाळासाहेब थोरात, वि.स.स.यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.**

"४७०१ लेखाशिर्षांतर्गत मुळा मोठा प्रकल्प (ता.राहुरी, जि.अहमदनगर) अंतर्गत अहमदनगर मनमाड महामार्ग ते मुळा धरण पोहोच रस्ता दुरुस्ती करणे किंमत ४०७.६३ लक्ष तसेच मुळा धरण माथा रस्ता सा.क्र ०/०० ते ३/२५० कि.मी लांबीच्या रुपये १६८.३९ किंमतीच्या कामांच्या शासनाने दिनांक २७ मार्च, २०२३ रोजी बोलविलेल्या निविदा, यासाठी प्रसिध्द करण्यात आलेल्या ई - निविदा सूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे निविदा उघडण्याचा दिलेला दिनांक हा १८ एप्रिल,२०२३ असणे, या कामासाठी ठेकेदारांनी सादर केलेल्या ई-निविदा, परंतू दिनांक १३ जुलै,२०२३ पर्यंत संबंधीत अधिकाऱ्यांनी निविदा न उघडणे, यामुळे रखडलेले रस्ते विकासाची काम हेतुपुरस्सर निविदा उघडण्यास विलंब करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची होत असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

### मा.उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन

जलसंपदा विभागांतर्गतच्या गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ,औरंगाबाद अंतर्गतच्या मुळा मोठा प्रकल्प ता.राहुरी,जि.अहमदनगर अंतर्गत अहमदनगर मनमाड महामार्ग ते मुळा धरण पोहोच रस्ता (८.१० कि.मी) दुरुस्ती (किंमत रू.४७४.१२ लक्ष) व मुळा धरण माथा रस्ता सा.क्र. ०/०० ते ३/२५० कि.मी दुरूस्ती (किंमत रू.१९८.४७ लक्ष) या दोन कामांना शासनाने अनुक्रमे दि.०१/०४/२०२२ व ३०/०३/२०२२ अन्वये विशेष दुरूस्ती अंतर्गत प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे.त्यानुसार मुळा पाटबंधारे विभागाने सदर दोन कामांच्या अनुक्रमे किंमत रु.४०७.६३ लक्ष व रु.१६८.३९ लक्ष किंमतीच्या दोन कामांची निविदा सूचना दि.२७ /०३/२०२३ अन्वये प्रसिध्दीस देण्यात आली असून, त्यानुसार सदरच्या निविदा Mahatenders.gov.in या शासनाच्या पोर्टलवर दि.३१/०३/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आल्या आहेत.

सदर कामांच्या निविदांसाठी निविदा सादर करणेचा कालावधी - दि.३१/०३/२०२३ ते दि.१७/०४/२०२३ असा होता. सदरच्या दोन्ही कामांच्या निविदांसाठी दि.१८/०४/२०२३ रोजी विभागीय स्तरावर तांत्रिक लिफाफा उघडण्यात येऊन त्यांचा प्रथम तांत्रिक मूल्यमापन अहवाल विभागीय कार्यालयाच्या पत्र जा.क्र.मुपावि/लेखा/निविदा/१८०१ व १८०२ दि.२६/०४/२०२३ अन्वये लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,नाशिक कार्यालयास सादर करण्यात आला आहे.

रोटा H/924 (750-8-23)

तथापि, दिनांक २७/०४/२०२३ रोजी निविदाकार मे.मनिषा ईन्फ्राकॉन प्रोजेक्ट प्रा.लि.अहमदनगर यांनी मुळा पाटबंधारे विभाग,अहमदनगर यांच्याकडे मे. अतुल आरएमसी, पुणे आणि दादा प्रभाकर शिंदे, अहमदनगर या निविदाकारांबाबत तक्रार केली. त्यानुसार, मे.अतुल आरएमसी, पुणे आणि दादा प्रभाकर शिंदे, अहमदनगर या ठेकेदारांनी सादर केलेल्या Work Done प्रमाणपत्राची खातरजमा करणेकरिता विभागीय कार्यालयाने पत्र जा.क्र. मुपावि/लेखा/निविदा/२७/२०२३ दि.२८/०४/२०२३ आणि पत्र जा.क्र. मुपावि/लेखा/निविदा/३१/२०२३, दि.०२/०५/२०२३ अन्वये अनुक्रमे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, बारामती विभाग आणि महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सांगली विभाग यांचेकडे पत्रव्यवहार केला आहे. त्यानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, सांगली विभाग यांनी त्यांचे दि.०९/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये अतुल आरएमसी, पुणे यांनी जोडलेला काम पुर्णत्वाचा दाखला त्यांचे कार्यालयाकडून दिला नसलेबाबत मुळा पाटबंधारे विभागास कळविले आहे. तसेच महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, बारामती विभाग यांनी त्यांचे दि.२२/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये दादा प्रभाकर शिंदे, अहमदनगर यांनी जोडलेला काम पुर्णत्वाचा दाखला त्यांचे कार्यालयाकडून दिला नसलेबाबत मुळा पाटबंधारे विभागास कळविले आहे.त्यानुसार मुळा पाटबंधारे विभागाने अतुल आरएमसी, पुणे व दादा प्रभाकर शिंदे, अहमदनगर या दोन अभिकरणांना अपात्र ठरवून दिनांक २३/०५/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सुधारित तांत्रिक मुल्यमापन अहवाल लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक कार्यालयास सादर केला आहे.

तथापि, सदर निविदा कार्यवाही नि:पक्षपणे करण्याच्या दृष्टीने मुख्य अभियंता उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिक यांनी तत्कालीन अधीक्षक अभियंता व कार्यकारी अभियंता यांना दोन्ही कामांच्या निविदा प्रक्रियेत भाग घेतलेल्या इतर सर्व कंत्राटदारांचे Work Done Certificates ची खातरजमा करणेविषयी सुचना दिल्या.त्याअनुषंगाने,मुळा पाटबंधारे विभाग,अहमदनगर यांचेकडून संबंधित विभागांशी दिनांक ०८/०६/२०२३ रोजी पत्रव्यवहार करणेत आला असून, Work Done Certificates बाबत खातरजमा केलेबाबतची पत्रे इतर शासकीय कार्यालयांकडून दि. २६/०६/२०२३ अखेरीस विभागीय कार्यालयास प्राप्त झालेनुसार विभागीय कार्यालयाने दि.२८/०६/२०२३ रोजीच्या दोन स्वतंत्र पत्रान्वये तांत्रिक मुल्यमापन अहवाल लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक कार्यालयास सादर केला आहे. त्याअनुषंगाने लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, नाशिक कार्यालयाने दि.१२/०७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रदेश कार्यालय स्तरावरील निविदेचा तांत्रिक मुल्यमापन अहवाल मुख्य अभियंता उत्तर महाराष्ट्र प्रदेश, नाशिक कार्यालयास सादर केला आहे.

तांत्रिक मुल्यमापन अहवालाची प्रदेश कार्यालयाने तपासणी करून दि.१९/०७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सदर मुल्यमापनात तांत्रिक दुरुस्ती करून तांत्रिक सुधारित मुल्यमापन अहवाल दि. २५/०७/२०२३ पर्यंत फेरसादर करणेबाबत मुळा पाटबंधारे विभाग, अहमदनगर यांना सूचित केले आहे. त्यानुसार सुधारित तांत्रिक मुल्यमापन अहवाल दि.२५/०७/२०२३ रोजी प्रदेश कार्यालयास प्राप्त झाला असून प्रदेश कार्यालयाने अहमदनगर मनमाड महामार्ग ते मुळा धरण पोहोच रस्ता दुरूस्ती कामाच्या निविदेच्या सुधारित तांत्रिक मुल्यमापन अहवालास दिनांक २६/०७/२०२३ अन्वये मंजुरी प्रदान केलेली आहे. तसेच मुळा धरण माथा रस्ता सा.क्र.०/०० ते ३/२५० कि.मी. दुरूस्ती कामाच्या निविदेच्या तांत्रिक मुल्यमापन अहवालास लाभक्षेत्र विकास प्राधिकरण,नाशिक कार्यालयाने दिनांक २५/०७/२०२३ रोजीच्या पत्रान्वये मंजुरी प्रदान केलेली आहे.

सदर दोन्ही कामांच्या पात्र निविदाकारांचा आर्थिक लिफाफा उघडण्याची कार्यवाही शासन निर्णय दि.३०/११/२०१८ मधील मुद्दा क्र. ११.८ च्या निर्देशानुसार करणेबाबत विभागास निर्देशित केले असून त्यानुसार पुढील कार्यवाही मुळा पाटबंधारे विभाग, अहमदनगर यांचे स्तरावर प्रगतिपथावर आहे.

सदर दोन्ही कामांच्या निविदा प्रक्रियेदरम्यान निविदा प्रक्रियेत सहभागी अभिकरणांकडून इतर अभिकरणांच्या कागदपत्रांबाबत प्राप्त तक्रारीमुळे निविदा प्रक्रिया पारदर्शी व निष्पक्ष पध्दतीने होण्याच्या हेतूने कालपव्यय झालेला आहे, ही वस्तुस्थिती असून सदर निविदा प्रक्रियेत हेतुपरस्पर विलंब करण्याचा उद्देश नसल्याने अधिकाऱ्यांना याबाबत जबाबदार ठरविणे उचित होणार नाही.

---------------

लक्षवेधी सूचना क्र. ११४३

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पावसाळी अधिवेशन

### श्री. भिमराव केराम, विधानसभा सदस्य यांनी विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.११४३.

"उनकेश्वर (जि.नांदेड, ता.किनवट) येथील पैनगंगा नदीवर को.प. बंधाऱ्याच्या कामास महामंडळाचे पत्र दिनांक १६ नोव्हेंबर, २००५ अन्वये रुपये २.०६८ कोटी किंमतीस मुळ प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली असणे, प्रकल्पाची मूळ मान्यता को.प. बंधारा म्हणून असणे, शासनाचे पत्र क्र. पी.एल. एन. २००८/ (१९६/२००८) निवसं-१, दिनांक ९ सप्टेंबर, २००८ नुसार को.प. बंधाऱ्याऐवजी उच्च पातळी बंधाऱ्यात रुपांतर करण्यात आले असणे, शासन पत्र दिनांक ३ सप्टेंबर, २०१६ मधील निर्देशानुसार प्रकल्पाचा स्वतंत्र प्रथम सुधारित प्रशासकिय मान्यता प्रस्ताव महामंडळाचे पत्र दिनांक १९ जून, २०१८ अन्वये रा. तां.स. स., नाशिक यांना पाठविण्यात आला असणे, प्रकल्पाचा प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता प्रस्तावास राज्य स्तरीय तांत्रीक सल्लागार समिती नाशिक-१ यांनी दिनांक १३ फेब्रुवारी, २०१९ रोजी झालेल्या १२४ व्या बैठकीत रु.१९५.७६ कोटीस Clearance दिलेले असणे, अ.मु.स. (वित्त विभाग) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक २२ नोव्हेंबर, २०२१ रोजी झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीतील शिफारशीनुसार उनकेश्वर उच्च पातळी बंधारा या योजनेचा प्रथम सुधारीत प्रशासकीय मान्यता प्राप्त प्रस्ताव पुढील निर्णयार्थ मा. मंत्री मंडळास सादर करण्यासाठी नियामक मंडळाच्या ७८ व्या बैठकीत ठेवुन त्यास नियामक मंडळाची मान्यता मिळालेली असणे, त्यानुसार सदर प्रस्तावास मा. मंत्रीमंडळाची मान्यता मिळण्यासाठीचा प्रारूप ठराव दिनांक ९ मार्च, २०२२ रोजी गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ कार्यालयामार्फत शासनास सादर असणे, प्रथम सुधारित मान्यता प्रस्तावाची रु.१९५.७६ कोटी असुन सुप्रमा प्रस्ताव शासन स्तरावर मंजुरीकरीता प्रलंबित असणे, सदर प्रकल्पाचा पाणी वापर ९.६९० दलघमी असून तो लवादाच्या तरतुदीच्या आत असणे तसेच सदर प्रकल्पामुळे १४६० हे. क्षेत्र सिंचनाखाली येणार असणे, बंधाऱ्याची एकूण लांबी २२७ मी. पैकी १७० मी. लांबीचे बांधकाम डाव्या बाजुकडील मार्गदर्शक व गुंतावा भिंतीसह पूर्ण असणे, यांत्रिकी कामामध्ये सांडव्याच्या १८ दरवाज्याची निर्मिती पूर्ण असणे, प्रकल्पाची अद्याप धार दाबण्यात आलेली नसुन भुसंपादनाची कामे प्रलंबित असणे, सदर प्रकल्पाच्या प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता मिळाल्यास आदीवासी, नक्षलग्रस्त, डोंगराळ भागातील १४६० हेक्टर लाभक्षेत्रास फायदा होणार असणे, तसेच या भागातील नदीकाठच्या गावांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न मिटणार असणे, प्रकल्पाच्या प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता देण्यास लागणारा विलंब, परिणामी आदीवासी, नक्षलग्रस्त, डोंगराळ भागातील स्थानिक जनतेत पसरलेला त्रीव असंतोष व नाराजीची भावना, त्यामुळे शासनाने याबाबत करावयाची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया."

---

### मा.उप मुख्यमंत्री ( जलसंपदा) यांचे निवेदन :-

---

उनकेश्वर को.प. बंधारा ता. किनवट जि. नांदेड येथील को.प. बंधाऱ्यास गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचे निर्णय दिनांक १६/११/२००५ अन्वये रु. २.०७ कोटी रक्कमेस मूळ

प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली होती. प्रकल्पाची मूळ मान्यता को.प. बंधारा अशी आहे. शासन मान्यतेनंतर पत्र दिनांक ०९/०९/२००८ नुसार सदर को.प. बंधाऱ्याचे रुपांतर उच्च पातळी बंधाऱ्यात करण्यात आले. गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचे पत्र दिनांक १०/०८/२००९ अन्वये को.प. बंधाऱ्याच्या चालू निविदेअंतर्गतच उच्च पातळी बंधाऱ्याच्या कामास निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या सुधारित अंदाजपत्रकात समावेश करण्याच्या अटीवर मान्यता देण्यात आली होती.

सदर निर्णयाचे शासन पत्र दि. ०३/०९/२०१६ नुसार शासनाने पुनर्विलोकन करून उनकेश्वर उच्च पातळी बंधाऱ्यास स्वतंत्र सुधारित प्रशासकीय मान्यता घेण्याचे निर्देश दिले त्यानुसार या प्रकल्पाचा प्रथम सुधारित प्रशासकीय मान्यता अहवालास राज्य तांत्रिक सल्लागार समिती नाशिक यांची दि. १३/०२/२०१९ च्या पत्रान्वये मंजूरी बाबत निर्णय झाला आहे. त्यानंतर अतिरिक्त मुख्य सचिव (वित्त) यांचे अध्यक्षतेखाली झालेल्या दि. २२/११/२०२१ रोजीच्या उपसमितीच्या बैठकीत प्रकल्पाच्या प्रथम सुप्रमा प्रस्तावास पुढील निर्णयास्तव मा. मंत्रीमंडळास सादर करण्यासाठी नियामक मंडळास शिफारस करण्यात आलेली होती. त्यानुसार दि. २१/०१/२०२२ रोजीच्या नियामक मंडळाच्या बैठकीत प्रथम सुधारित प्रशासकिय मान्यता प्रस्तावासंदर्भात मा. मंत्रीमंडळ समितीकडे शिफारस करण्यात आली होती. सदर सुधारित प्रशासकिय मान्यता अहवाल मा.मंत्रीमंडळास सादर करणेकरीता वित्त व नियोजन विभागामार्फत सादर करतेवेळी वित्त व नियोजन विभागाने उपस्थित केलेल्या शेऱ्यांची पुर्तता महामंडळाने दि. १६/०२/२०२३ चे पत्रान्वये शासनास सादर केली आहे. तथापि सदर प्रकल्पास शासन निर्णय दि. १६/११/२०१६ मधील तरतुदीनुसार सिंचन क्षेत्र व पाणीसाठा वाढ यामुळे व्याप्ती बदल होत असल्याने त्यास महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाची मान्यता आवश्यक असून सदर बाबत महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाने असहमती दर्शविली आहे. सदर सुधारित प्रशासकिय मान्यता अहवालासोबत महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाची मान्यता सादर करणे अत्यावश्यक आहे.

सदर प्रकल्पास आतापर्यंत रु. ५५.२६ कोटी खर्च झालेला आहे. प्रकल्पाचे ६०% काम पूर्ण झालेले आहे. सदर प्रकल्पामुळे या आदिवासी बहूल, नक्षलग्रस्त भागातील १४६० हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ होणार आहे. तसेच या भागातील लोकांना फ्लोराईड मुक्त पिण्याचे पाणी मिळणार असून वन्य प्राण्यांनाही पिण्याचे पाणी मिळणार आहे. तसेच मत्स्य व्यवसायास चालना मिळणार असल्याकारणाने सदर प्रकल्पाचा प्रथम सुधारित मान्यतेसाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाची मान्यता घेणेसाठी पुनश्च महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाच्या मान्यताचा प्रस्ताव सादर करण्याच्या सुचना दि.१९/०७/२०२३ रोजीच्या शासन पत्रान्वये देण्यात आल्या असून महाराष्ट्र जलसंपत्ती नियामक प्राधिकरणाच्या सहमतीनंतरच सुधारित प्रशासकिय मान्यता प्रस्तावाबाबत मंजूरीचा निर्णय घेणे शासन स्तरावर नियोजित आहे.

*****************

लक्षवेधी सूचना क्र. १२८८

## महाराष्ट्र विधानसभा

### सन २०२३ चे पावसाळी अधिवेशन

**मा.श्री. बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर), विधानसभा सदस्य यांनी विधानसभा नियम १०५ नुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१२८८.**

**" परतुर मधील, (ता. मंठा, जि.जालना) बरबडा आकणी या धरणाचे काम अद्यापही अपूर्ण असून मागील ३० वर्षांपासून सदरील मागणी केली जात असणे, याबाबत मा. जलसंपदा मंत्री यांच्याकडे लोकप्रतिनिधींनी वारंवार पत्रव्यवहार करून, निवेदने देऊन देखील अद्यापपर्यंत याबाबत कुठलीही कार्यवाही केलेली नसणे, मागील ३० वर्षापासून सदरील धरणाचे कामकाज पूर्ण करणे बाबत मागणीचा प्रस्ताव मंत्रालय स्तरावर प्रलंबित असणे, शासनाने सदरील प्रस्तावामध्ये नव्याने प्रशासकीय मान्यता व मंजुरी देऊन सदरील धरणाचे कामकाज पूर्ण करणेबाबत तात्काळ करावयाची कार्यवाही व सदरील धरणासाठी आवश्यक असणाऱ्या निधीची प्रशासकीय मान्यता देण्याची गरज, यावर शासनाची प्रतिक्रिया."**

---

## मा.उप मुख्यमंत्री ( जलसंपदा) यांचे निवेदन :-

---

बरबडा बृहत ल. पा. प्रकल्प, गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद अंतर्गत जालना जिल्हातील मंठा तालुक्यातील आहे. हा प्रकल्प गोदावरी खोऱ्यातील दुधना उपखोऱ्यातील बरबडा गावाजवळील स्थानिक नदीवर बांधण्यात येत आहे. सदरील प्रकल्पाची मूळ प्रशासकिय मान्यता सन १९९९-२००० मध्ये रु.१२.०९ कोटी करीता प्राप्त असून प्रथम सुधारित प्रशासकिय मान्यता सन २००३-२००४ चे दरसुची नुसार रु. २९.८७ कोटी करीता प्राप्त आहे.

सदरील प्रकल्पाच्या मंजूर प्रथम सुधारित प्रशासकिय मान्यता किंमतीवर खर्च झाल्याने मुख्य सचिव यांचे अध्यक्षतेखाली दि. ०६/११/२०१८ रोजी संपन्न झालेल्या बैठकीमध्ये झालेला निर्णय “प्रकल्प भूसंपादन व पुनर्वसनाच्या मोठ्या खर्चामुळे बरबडा प्रकल्प कोणत्याही मापदंडात बसत नाही. तसेच या प्रकल्पामुळे निम्न दूधना प्रकल्पाच्या पाणी उपलब्धतेवर विपरित परिणाम होणार आहे. या बाबींचा विचार करता या धरणाची उंची कमी करून गावठाण बाधीत होणार नाही, या दृष्टीने व प्रकल्प आर्थिकदृष्टया व्यवहार्य होण्याच्या दृष्टीने अभ्यास करावा.” या निर्णयास अनुसरुन प्रकल्प पूर्ण करण्याबाबत खालील पर्यायांचा तौलोनिक अभ्यास करण्यात आला.

अ) पर्याय क्र.१ :- धरणाची पूर्ण संचय पातळी ४३८.२० मी. (आखणी गावाच्या पुनर्वसनासह- सिंचन क्षेत्र- १२२५ हे., पाणीसाठा-११.०७ दलघमी, किंमत-रु. ३५५.७६ कोटी) करीता आणि

ब) पर्याय क्र.२ :- धरणाची संचय पातळी ४३४.६७ मी. (आखणी गावाचे पुनर्वसन वगळून, सिंचन क्षेत्र- ५८८ हे., पाणीसाठा-४.२९ दलघमी, किंमत-रु. १७०.५४ कोटी)

उपरोक्त २ पर्यायांचा प्रस्ताव तयार करून राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक यांच्या कडून सदरील प्रकल्पाचा सुधारित प्रशासकिय मान्यता प्रस्ताव शासनास प्राप्त झाला होता.

दि.१५/०७/२०२१ रोजी संपन्न झालेल्या सचिव स्तरावरील उपसमितीच्या बैठकीच्या निर्णयानुसार सदर प्रकल्प तिन्ही मापदंडात बसत नसल्याने शिफारस केलेली नाही. तथापी याबाबत उचित निर्णय घ्यावा अशी शिफारस केली आहे. त्यावर नियामक मंडळाने पर्याय क्र.१ प्रमाणे आखणी गावाच्या पुर्नवसनासह प्रस्ताव मां.मंत्रीमंडळाच्या मान्यतेसाठी सादर करण्याचा ठराव केला.

सदर प्रस्ताव राज्य तांत्रिक सल्लागार समिती, नाशिक कार्यालयाकडून दि.०२/०१/२०२३ रोजी शासनास प्राप्त झाला आहे.

सदरील सुधारित प्रशासकिय मान्यता प्रस्ताव शासन स्तरावर वित्त व नियोजन विभागामार्फत मा. मंत्रीमंडळाच्या मान्यतेस्तव सादरीकरणात असून वित्त व नियोजन विभागाच्या सहमतीनंतर सदर प्रस्ताव मा.मंत्रीमंडळासमोर सादर करणे नियोजित आहे.

सदर प्रकल्पाच्या सुप्रमा प्रस्तावास मा. मंत्रीमंडळाची मान्यता घेऊन प्रकल्प पूर्ण करून ४.२९ दलघमी पाणीसाठा व ५८८ हेक्टर क्षेत्रास सिंचनाचा लाभ देणे नियोजित आहे.

*******************

# लक्षवेधी सूचना क्र. १३४९

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

विधानसभा सदस्य श्री. हिरामण खोसकर यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १३४९ पुढीलप्रमाणे आहे:-

" इगतपुरी त्र्यंबकेश्वर विधानसभा मतदार संघातील उर्ध्व वैतरणा जलविद्युत प्रकल्पाकरिता सुमारे ४६८९ हेक्टर खाजगी जमिन सन १९६८ ते १९७२ या कालावधीत संपादित करणे, त्यापैकी बुडीत क्षेत्रासाठी ३७१३ हेक्टर इतकी जमिन असणे, या जमिनीसोबतच धरणाच्या बांधकामासाठी आवश्यक माती/मुरूम मिळविण्यासाठी जमिन अधिग्रहित करण्यात येणे, सदर जमीन धरणाच्या बुडीत क्षेत्राबाहेर असणे, तथापि बांधकाम करण्यास आवश्यक माती व खदाणीसाठी जमीनी अधिग्रहित करण्यात येणे, या दोन्ही जमिनी अतिरिक्त ठरणे, या दोन्ही जमिनीची विक्री करण्याचे निर्देश देण्यात येणे, त्यानुसार मा.सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली यांनी संपादन प्रयोजनासाठी वापरून अतिरिक्त झालेल्या जमिनीच्या संदर्भात सिव्हिल अपिल क्र.३६२८/१९९७ स्पेशल लिव्हपिटीशन क्र.२६०४/१९९२ मधील दिनांक ५ मे, १९९७ रोजी दिलेल्या आदेशानुसार एकदा संपादन केलेली जमिन मूळ मालकांस परत करण्यासाठी जाहिर लिलावाद्वारे जमिनीची विक्री करण्याचे निर्देश देण्यात येणे, त्यानुसार अतिरिक्त जमिनीचे सन २००८ च्या दरसूचीप्रमाणे मूल्यांकन करून जमिनीची किंमत व सर्व्हे नंबर विभागीय कार्यालयामार्फत प्रस्ताव दि.१.९.२००८ रोजी विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक या कार्यालयाकडे सादर करण्यात आलेले असणे, परंतु अद्यापपावेतो त्याबाबतची कार्यवाही आयुक्त कार्यालयाकडे प्रलंबित असणे, या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी वारंवार संबधित मंत्री व विभागाशी पत्रव्यवहार करून कोणतीच कार्यवाही होत नसल्याने सर्वसामान्य जनतेमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिकिया व भूमिका."

---

## श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उप मुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन

वैतरणा जलविद्युत प्रकल्पासाठी प्रथम प्रस्तावित ६०५.२४ मीटर इतकी पूर्ण संचय पातळी गृहीत धरून ४,६८९ हेक्टर क्षेत्र संपादित करण्यात आले. प्रत्यक्षात धरणाची उंची ५ फूट कमी करून ६०३.५० मीटर इतक्या पूर्ण संचय पातळीनुसार धरणाचे बांधकाम पूर्ण करण्यात आलेले आहे. त्यामुळे बुडीत क्षेत्रासाठी घेण्यात आलेली जमिन अतिरिक्त ठरली. या जमिनी सोबतच धरणाच्या बांधकामासाठी आवश्यक माती / मुरुम मिळविण्यासाठी धरणाच्या बुडित क्षेत्राबाहेरील जमिनी अधिग्रहीत करण्यात आल्या. सद्यस्थितीत या अतिरिक्त जमिनी विनावापर असून त्या मूळ मालकांना परत करण्याची शेतकऱ्यांची मागणी आहे. सदर अतिरिक्त जमिनी स्थानिक शेतकऱ्यांच्या मागणीनुसार मूळ मालकांना परत करण्यासाठीचा प्रस्ताव सन १९८८ मध्ये जलसंपदा विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाने जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे सादर केला. एकूण ६२३.२२ हेक्टर अतिरिक्त जमिनीच्या प्रस्तावांपैकी २७४.६१ हेक्टर एवढे क्षेत्र जिल्हाधिकारी यांनी परत करण्यासाठी घोषित केले होते. परंतू, त्यावेळी संबंधित शेतकऱ्यांनी जमीनीच्या परतीकरिता शासन नियमानुसारची रक्कम न भरल्याने सदर क्षेत्र परत करण्यात आलेले नाही.

मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०५/०५/१९९७ रोजी दिलेल्या आदेशानुसार, महसुल व वन विभाग द्वारा दि. १२.०३.२००४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत :-

"संपादन प्रयोजनासाठी वापरून अतिरिक्त झालेल्या किंवा विनावापर असलेल्या अमिनीची अन्य सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता नसेल तर संबंधित जिल्हाधिकारी यांनी अशा बिनशेतीच्या किंवा बिनशेतीची क्षमता प्राप्त झालेल्या जमिनीची केवळ जाहिर लिलावाद्वारे विक्री करण्यात यावी. तसेच या

लिलावात मूळ भूधारक सुद्धा भाग घेऊ शकतील. या विक्रीतील निधी संविधानातील मार्गदर्शक तत्वात अभिप्रेत असलेल्या अतियोग्य अशा सार्वजनिक उद्दिष्टांसाठी वापरण्यात यावा."

जलसंपदा विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाने दि.०१/०९/२००८ रोजीच्या पत्रान्वये वैतरणा प्रकल्पांतर्गत अतिरिक्त जमिनीचे सन २००८ च्या दरसूचीप्रमाणे मुल्यांकन करुन जमिनीची किंमत व सर्व्हे नं. याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना सादर केला.

सदर अतिरिक्त ठरलेल्या जमिनी परत मिळण्याकरीता स्थानिक शेतकऱ्यांच्या मागणीच्या अनुषंगाने तत्कालीन मा.मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास यांनी वैतरणा जलविद्युत प्रकल्पाबाबत दि.२९/०७/२०२० रोजी बैठक घेतली. त्यावेळी सदर अतिरिक्त ठरलेल्या जमिनी जाहीर लिलावाद्वारेच देणे शक्य आहे, असे स्पष्ट केले. त्या अनुषंगाने वैतरणा जलविद्युत प्रकल्पाकडे संपादित जमिनी पैकी अतिरिक्त असलेल्या ६२३.२२ हे. जमीन जाहीर लिलावाद्वारे विक्री करणे करिताचा प्रस्ताव जलसंपदा विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाने जिल्हाधिकारी, नाशिक यांना सादर करण्यात आला. त्यास अनुसरून उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग, जि.नाशिक यांच्या कडून "सदर अतिरिक्त जमिनीची आवश्यकता नसल्याचे व सदर जमिनीची प्रचलित शासन निर्णयानुसार जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्यास हरकत नसल्याचे" प्रमाणपत्राची मागणी करण्यात आलेली होती.

याबाबत नियामक मंडळाच्या ७९ व्या बैठकीत वैतरणा जलविद्युत प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीपैकी अतिरिक्त असलेल्या ६२३.२२ हेक्टर जमिनीपैकी ०.६० हेक्टर जमीन ही नागोसली ग्रामपंचायत कार्यालय, अंगणवाडी बांधकाम व इतर सुविधांसाठी प्रचलीत रेडी रेकनरनुसार दर आकारून कायमस्वरूपी हस्तांतरित करण्यास व उर्वरित अतिरिक्त ६२२.६२ हेक्टर जमीन महसूल विभागाचे जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे हस्तांतरीत करून जाहीर लिलावद्वारे विक्री करणेकामी "ना-हरकत प्रमाणपत्र" देण्यासाठीचा प्रस्तावावर शासनास शिफारस करण्यासाठी मंजूरी देण्यास नियामक मंडळाची एकमताने मान्यता दिली आहे.

याअनुषंगाने प्राप्त प्रस्तावावर शासन पत्र दि. १८.०८.२०२१ अन्वये, अतिरिक्त ठरलेल्या संपादित जमिनी संपादन संस्थेने जिल्हाधिकारी यांच्याकडे वर्ग करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, असे सुचित केले. तद्नंतर वैतरणा जलविद्युत प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनी परत करण्याच्या विषयाबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे दि.२६/०५/२०२३ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये प्रायोगिक तत्वावर एका गावाचा प्रस्ताव तयार करून तो शासन मान्यतेस पाठविण्याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांनी सूचित केले.

त्याअनुषंगाने सद्यस्थितीत प्रायोगिक तत्वावर मौजे आवळीदुमाला, ता. इगतपुरी, जि. नाशिक या गावातील अतिरिक्त क्षेत्राचा प्रस्ताव उप विभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग, नाशिक यांनी दि. १६.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे सादर केला आहे. सदर प्रस्ताव तपासुन शासनास सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांच्यास्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.

**********************************

H/864-19

लक्षवेधी सूचना क्र. १४५६
महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

विधानसभा सदस्य श्री. आशुतोष काळे यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १४५६ पुढीलप्रमाणे आहे:-

"वैतरणा खोऱ्यातील (सॅडल डॅम) अतिरिक्त १६.५ टी.एम.सी. पाणी वैतरणा धरणातून गोदावरी खोऱ्यामध्ये वळविणे बाबत महाराष्ट्र शासनाचे जलसंपदा विभागाने दिनांक १४/०३/२०१२ मध्ये मान्यता दिलेली असणे, त्यानुसार दिनांक २४ जून, २०२२ रोजी सदर सॅडल डॅमचे कामास कार्यारंभ आदेश देणेत आलेला असून स्थानिक शेतकऱ्यांच्या विरोधामुळे सदरचे काम आजपर्यंत सुरू झालेले नसल्याचे निर्दशनास येणे, स्थानिक शेतकऱ्यांच्या जमिनी वैतरणा धरणासाठी संपादित करणेत आलेल्या असणे, तथापि त्यातील वापरात नसलेल्या जमिनी परत करण्याबाबत मूळ शेतकऱ्यानी मागणी करण्यात येणे, परिणामी या प्रकल्पाबाबत शासनाने ठोस भूमिका न घेतल्यामुळे प्रकल्पास विलंब झालेला असणे, परिणामी, सॅडल डॅमचा कार्यारंभ आदेश दिनांक २४/०६/२०२२ होऊनही काम सुरू न झाल्याने अहमदनगर जिल्ह्यातील शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण व शासनाप्रती चिडीची भावना, त्याप्रकरणी शेतकऱ्यांचे मागणीप्रकरणी यावर शासना मार्फत कार्यवाही होणे आवश्यक असणे, याबाबत काम लवकर सुरू होणेबाबत शासनाने त्वरीत कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची भुमिका."

---

श्री. देवेंद्र फडणवीस, मा. उप मुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन

उर्ध्व वैतरणा जलाशयाच्या सांडव्यावरून पश्चिमेला वाहून जाणारे अतिरिक्त २८.५० दलघमी. (१ TMC) पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्यास काही अटींच्या अधीन राहून शासन पत्र दिनांक १४/०३/२०१२ अन्वये मान्यता दिली आहे. सद्यस्थितीत या योजनेव्दारे उर्ध्व वैतरणा जलाशयाच्या सांडव्यावरून अरबी समुद्राला वाहून जाणारे १ TMC पाणी आणि दमणगंगा-पिंजाळ प्रकल्प पूर्ण झाल्यानंतरचे उर्ध्व वैतरणा जलाशयातून उपलब्ध होणारे १० TMC पाणी असे एकूण ११ TMC पाणी वळविण्यात येणार आहे. तद्नंतर भविष्यात वैतरणा खोऱ्यात अतिरिक्त उपलब्ध असलेले ५.५० TMC (१५५.५० दलघमी) पाण्याच्या योजना पूर्ण करून सदर पाणी वैतरणा जलाशयाव्दारे गोदावरी खोऱ्यात वळविण्याचे नियोजन आहे. सदर कामास नांदूर मधमेश्वर प्रकल्प विभाग, नाशिक या कार्यालयाने दिनांक २४/०६/२०२२ च्या पत्रान्वये कार्यारंभ आदेश दिले आहेत. परंतु प्रत्यक्ष कामाकरीता उर्ध्व वैतरणा धरणाच्या बांधकामावेळी अतिरिक्त संपादित केलेल्या जमिनी परत मिळण्याची मागणी असल्यामुळे तेथील स्थानिक शेतकऱ्यांनी विरोध केला आहे.

वैतरणा जलविद्युत प्रकल्पासाठी प्रथम प्रस्तावित ६०५.२४ मीटर इतकी पूर्ण संचय पातळी गृहीत धरून ४,६८९ हेक्टर क्षेत्र संपादित करण्यात आले. प्रत्यक्षात धरणाची उंची ५ फूट कमी करून ६०३.५० मीटर इतक्या पूर्ण संचय पातळीनुसार धरणाचे बांधकाम पूर्ण करण्यात आलेले आहे. त्यामुळे बुडीत क्षेत्रासाठी घेण्यात आलेली जमिन अतिरिक्त ठरली. या जमिनी सोबतच धरणाच्या बांधकामासाठी आवश्यक माती / मुरुम मिळविण्यासाठी धरणाच्या बुडित क्षेत्राबाहेरील जमिनी अधिग्रहीत करण्यात आल्या. सद्यस्थितीत या अतिरिक्त जमिनी विनावापर असून त्या मूळ मालकांना परत करण्याची शेतकऱ्यांची मागणी आहे. सदर अतिरिक्त जमिनी स्थानिक शेतकऱ्यांच्या मागणीनुसार मूळ मालकांना परत करण्यासाठीचा प्रस्ताव सन १९८८ मध्ये जलसंपदा विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाने जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे सादर केला. एकूण ६२३.२२ हेक्टर अतिरिक्त जमिनीच्या प्रस्तावापैकी २७४.६१ हेक्टर एवढे क्षेत्र जिल्हाधिकारी यांनी परत करण्यासाठी घोषित केले होते. परंतू, त्यावेळी संबंधित शेतकऱ्यांनी जमीनीच्या परतीकरिता शासन नियमानुसारची रक्कम न भरल्याने सदर क्षेत्र परत करण्यात आलेले नाही.

मा.सर्वोच्च न्यायालयाने दि.०५/०५/१९९७ रोजी दिलेल्या आदेशानुसार, महसुल व वन विभाग द्वारा दि. १२.०३.२००४ रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आला आहे. त्यामध्ये खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत :-

"संपादन प्रयोजनासाठी वापरून अतिरिक्त झालेल्या किंवा विनावापर असलेल्या अमिनीची अन्य सार्वजनिक प्रयोजनासाठी आवश्यकता नसेल तर संबंधित जिल्हाधिकारी यांनी अशा बिनशेतीच्या किंवा बिनशेतीची क्षमता प्राप्त झालेल्या जमिनीची केवळ जाहिर लिलावाद्वारे विक्री करण्यात यावी. तसेच या लिलावात मूळ भूधारक सुद्धा भाग घेऊ शकतील. या विक्रीतील निधी संविधानातील मार्गदर्शक तत्वात अभिप्रेत असलेल्या अतियोग्य अशा सार्वजनिक उद्दिष्टांसाठी वापरण्यात यावा."

जलसंपदा विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाने दि.०१/०९/२००८ रोजीच्या पत्रान्वये वैतरणा प्रकल्पांतर्गत अतिरिक्त जमिनीचे सन २००८ च्या दरसूचीप्रमाणे मुल्यांकन करुन जमिनीची किंमत व सर्व्हे नं. याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांना सादर केला.

सदर अतिरिक्त ठरलेल्या जमिनी परत मिळण्याकरीता स्थानिक शेतकऱ्यांच्या मागणीच्या अनुषंगाने तत्कालीन मा.मंत्री, जलसंपदा व लाभक्षेत्र विकास यांनी वैतरणा जलविद्युत प्रकल्पाबाबत दि.२९/०७/२०२० रोजी बैठक घेतली. त्यावेळी सदर अतिरिक्त ठरलेल्या जमिनी जाहीर लिलावाद्वारेच देणे शक्य आहे, असे स्पष्ट केले. त्या अनुषंगाने वैतरणा जलविद्युत प्रकल्पाकडे संपादित जमिनी पैकी अतिरिक्त असलेल्या ६२३.२२ हे. जमीन जाहीर लिलावाद्वारे विक्री करणे करिताचा प्रस्ताव जलसंपदा विभागाच्या क्षेत्रीय कार्यालयाने जिल्हाधिकारी, नाशिक यांना सादर केला. त्यास अनुसरून उपविभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग, जि.नाशिक यांच्या कडून "सदर अतिरिक्त जमिनीची आवश्यकता नसल्याचे व सदर जमिनीची प्रचलित शासन निर्णयानुसार जाहीर लिलावाद्वारे विक्री करण्यास हरकत नसल्याचे" प्रमाणपत्राची मागणी करण्यात आलेली होती.

याबाबत नियामक मंडळाच्या ७९ व्या बैठकीत वैतरणा जलविद्युत प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनीपैंकी अतिरिक्त असलेल्या ६२३.२२ हेक्टर जमिनीपैकी ०.६० हेक्टर जमीन ही नागोसली ग्रामपंचायत कार्यालय, अंगणवाडी बांधकाम व इतर सुविधांसाठी प्रचलीत रेडी रेकनरनुसार दर आकारून कायमस्वरूपी हस्तांतरित करण्यास व उर्वरित अतिरिक्त ६२२.६२ हेक्टर जमीन महसूल विभागाचे जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे हस्तांतरीत करून जाहीर लिलावद्वारे विक्री करणेकामी "ना-हरकत प्रमाणपत्र" देण्यासाठीचा प्रस्तावावर शासनास शिफारस करण्यासाठी मंजूरी देण्यास नियामक मंडळाची एकमताने मान्यता दिली आहे.

याअनुषंगाने प्राप्त प्रस्तावावर शासन पत्र दि. १८.०८.२०२१ अन्वये, अतिरिक्त ठरलेल्या संपादित जमिनी संपादन संस्थेने जिल्हाधिकारी यांच्याकडे वर्ग करण्यासाठी आवश्यक ती कार्यवाही करावी, असे सुचित केले. तद्नंतर वैतरणा जलविद्युत प्रकल्पासाठी संपादित केलेल्या जमिनी परत करण्याच्या विषयाबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे दि.२६/०५/२०२३ रोजी बैठक घेण्यात आली. सदर बैठकीमध्ये प्रायोगिक तत्वावर एका गावाचा प्रस्ताव तयार करून तो शासन मान्यतेस पाठविण्याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांनी सूचित केले.

त्याअनुषंगाने सद्यस्थितीत प्रायोगिक तत्वावर मौजे आवळीदुमाला, ता. इगतपुरी, जि. नाशिक या गावातील अतिरिक्त क्षेत्राचा प्रस्ताव उप विभागीय अधिकारी, इगतपुरी-त्र्यंबकेश्वर उपविभाग, नाशिक यांनी दि. १६.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये जिल्हाधिकारी, नाशिक यांच्याकडे सादर केला आहे. सदर प्रस्ताव तपासुन शासनास सादर करण्याबाबत जिल्हाधिकारी, नाशिक यांच्यास्तरावर कार्यवाही प्रगतीत आहे.

********************

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन**
**लक्षवेधी सूचना क्र.१४७९**

श्री. आशुतोष काळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.१४७९ खालीलप्रमाणे आहे :-

"गोदावरी खोऱ्यात उपलब्ध धरणांचे पाणी प्रकल्प अहवालाप्रमाणे त्या लाभक्षेत्रासाठी वापर करणे बंधनकारक असतानाही वाढते नागरीकरण व वाढते उद्योगधंदे यामुळे सदरचे पाण्याचा वापर बिगर सिंचनासाठी मोठया प्रमाणात होत असणे, गोदावरी कालव्यांचे लाभक्षेत्रासाठी बांधलेल्या दारणा व गंगापूर धरणातील पाणी मोठ्या प्रमाणात बिगर सिंचनसाठी आरक्षित झालेले असणे, उर्ध्व गोदावरी खोऱ्यात शेतीसाठी पाणी उपलब्धता ५० टक्केपेक्षाही कमी झालेली आहे. त्यामुळे शाश्वत शेती व्यवसाय धोक्यात आलेला असणे, दिवसेंदिवस बिगर सिंचनाचा पाणी वापर वाढत राहणार असल्याने उर्ध्व गोदावरी खोऱ्यातील धरणांचे पाणी साठ्यात वाढ करणे आवश्यक होणे, मागील चार वर्षाचा अनुभव पाहता वरील धरणांमधून मोठ्या प्रमाणात पाणी जायकवाडी धरणात वाहून गेले असुन जायकवाडी धरणातून १०० टीएमसी पेक्षा जास्त पाणी समुद्रात वाहून जात असल्याचे निदर्शनास येणे, त्यामुळे सदरचे पाणी जायकवाडीच्या वरिल बाजूस अडवून दुष्काळी परिस्थितीत वापरता आले असते त्यामुळे त्याकरीता पाणी उपलब्ध होईल अशा ठिकाणी धरणे बांधणे आवश्यक असणे, परंतु महाराष्ट्र शासन, पाटबंधारे विभाग यांनी शासन निर्णय दिनांक ६/९/२००४ मध्ये निर्णय घेऊन उर्ध्व गोदावरी खोऱ्यात धरणे बांधणेस स्थगिती दिलेली हे लक्षात घेता, सदरचे पाणी उपलब्ध होण्यासाठी शासनाने त्यावरील सदरची स्थगिती रद्द करणे आवश्यक असणे, परंतु अद्यापही कार्यवाही न झाल्याने तेथील नागरिक व शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेले असंतोषाचे वातावरण, परिणामी सदरची उर्ध्व गोदावरी खोऱ्यात धरणे बांधण्याची स्थगिती रद्द करुन गोदावरी कालव्यांना पाणी उपलब्ध होणेसाठी कायमस्वरुपी उपाययोजना करण्याची आवश्यकता असणे, शासनाने त्यासंदर्भातील केलेली वा करावयाची कार्यवाही व शासनाची भूमिका...."

---

**मा.उपमुख्यमंत्री (जलसंपदा) यांचे निवेदन**

उर्ध्व गोदावरी खोऱ्यात (जायकवाडी प्रकल्पाच्या उर्ध्व भागात) ८ मोठे प्रकल्प तसेच ७ मध्यम प्रकल्प व ७४ लघु प्रकल्प असून ६० को. प. बंधारे आहेत. उर्ध्व गोदावरी खोऱ्यातील प्रकल्पांचा प्रकल्पिय जिवंत साठा २७५०.१८ द.ल.घ.मी. इतका होता व प्रकल्पिय सिंचनक्षेत्र ३५९१३२ हेक्टर इतके होते. आजमितीस उर्ध्व गोदावरी खोऱ्यातील प्रकल्पांचे बिगर सिंचन आरक्षण ७४१.४३ द.ल.घ.मी. इतके आहे. उर्ध्व गोदावरी खोऱ्यातील प्रकल्पाच्या सिंचन क्षेत्रात जिवंत साठ्यातील बिगर सिंचन आरक्षणामुळे एकूण ५६३१३ हेक्टर इतके सिंचनक्षेत्र कमी झाले आहे. म्हणजेच आजमितीस सिंचन क्षेत्र २९६१३९ हेक्टर इतके आहे. बिगर सिंचन आरक्षणामुळे उर्ध्व गोदावरी खोऱ्यातील प्रकल्पाच्या सिंचनक्षेत्रात सुमारे १५.५८ टक्के इतकी कपात झालेली आहे.

गंगापुर व दारणा प्रकल्पाच्या प्रकल्पिय जिवंत साठा ४०६.३२ द.ल.घ.मी. इतका तर प्रकल्पिय सिंचनक्षेत्र ४९७४७ हेक्टर इतके होते. आजमितीस दारणा व गंगापुर प्रकल्पांचे बिगर सिंचन आरक्षण २३८.४२७ द.ल.घ.मी. इतके आहे. सिंचन क्षेत्रात जिवंत साठ्यातील बिगर सिंचन आरक्षणामुळे एकूण २७५९८ हेक्टर इतके सिंचनक्षेत्र कमी झाले आहे म्हणजेच आजमितीस सिंचन क्षेत्र २२१४९ हेक्टर इतके आहे. बिगर सिंचन आरक्षणामुळे दारणा व गंगापुर प्रकल्पाच्या सिंचनक्षेत्रात सुमारे ५५.४७ टक्के इतकी कपात झालेली आहे.

तसेच, एकात्मिक राज्य जल आराखड्या नुसार जायकवाडी धरणापर्यंत उर्ध्व गोदावरी खोऱ्यात संपूर्ण पाणीवापर लवादाने अनुज्ञेय केलेला आहे. त्यानुसार ७५% विश्वासार्हतेने जायकवाडी धरणापर्यंत एकूण येवा ५८३७ द.ल.घ.मी. (२०६.१३ TMC) असून, जायकवाडी धरणाचा एकूण पाणीवापर २६१८.५५ द.ल.घ.मी. (९२.४६ TMC) वजा जाता उर्ध्व भागात ३२१८.४५ द.ल.घ.मी. (११३.६५ TMC) पाणीवापर अनुज्ञेय होतो. तथापि सद्य:स्थितीमध्ये जायकवाडीच्या उर्ध्व भागात एकूण ४०४५.२८ द.ल.घ.मी. (१४२.८६ TMC) पाणी वापराची धरणे बांधण्यात आली आहेत. ही बाब विचारात घेता यामुळे जायकवाडी धरणामध्ये ८२६.८३ द.ल.घ.मी. (२९.१९ TMC) एवढी तुट आहे.

जायकवाडी प्रकल्पाच्या (पैठण धरण) पाणी वापराच्या फेर जल नियोजनाचे ताळेबंदास शासन निर्णय क्र. २०१८/(२३६/२०१८)/जसंअ, दि. १२/०९/२०१८ अन्वये मान्यता प्रदान केलेली आहे.

सन २०१८ च्या फेर जल नियोजनानुसार जायकवाडी प्रकल्पावर घरगुती व औद्योगिक असे एकूण १९४.१०१ द.ल.घ.मी. पाणी आरक्षण अनुज्ञेय आहे. तथापि, सद्यस्थितीत जायकवाडी प्रकल्पावर पिण्याचे पाणी आरक्षण २५२.१६२ द.ल.घ.मी. व औद्योगिक पाणी आरक्षण १०१.८५ द.ल.घ.मी. असे एकूण बिगर सिंचन करिता ३५४.०१२ द.ल.घ.मी. पाणी आरक्षण पाणी मंजूर झालेले आहे.

**१. जायकवाडीची पाणी उपलब्धता व पूर नियंत्रणच्या अनुषंगाने सोडण्यात आलेले विसर्ग:**

सन १९७५-७६ पासुन ते २०२२-२३ पर्यंत १५ ऑक्टोबर च्या उपयुक्त पाणी साठयाचे आधारे जायकवाडी धरण १२ वेळा १००% भरलेले आहे. **मागील चार वर्षाचा अपवाद वगळता एकूण ४४ वर्षांपैकी फक्त आठ वेळा धरण १००% भरलेले आहे.**

मागील चार वर्षात जायकवाडी प्रकल्पाच्या उर्ध्व भागात चांगले पर्जन्यमान झाल्यामुळे जायकवाडी धरण १००% भरलेले असून सरासरी ७६ टीएमसी पाणी द्वारांद्वारे नदीपात्रात सोडण्यात आलेले आहे.

| अ.क्र. | प्रकल्प | वर्ष | सोडण्यात आलेले पाणी (द.ल.घ.मी./टीएमसी) |
|---|---|---|---|
| १ | जायकवाडी धरण | २०१९-२० | १०५८.३२३ / ३७.३८ |
| २ | | २०२०-२१ | १७९८.९०८ / ६३.५४ |
| ३ | | २०२१-२२ | १२६१.५४ / ४४.५६ |
| ४ | | २०२२-२३ | ४६१७.९१६ / १६३.११ |

**२. जायकवाडी धरणात येणाऱ्या पाणी येव्यातील तुट व उर्ध्व गोदावरी खोऱ्यातील समन्यायी पाणीवाटप:**

अ) **सन २०११-१२ पासून जायकवाडी धरणात सातत्याने कमी पाणी साठा होऊन पाणी टंचाई निर्माण झालेली असून सन २०१२, २०१४, २०१५, व २०१८ मध्ये जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम-२००५ मधील कलम ११ (क) नुसार उर्ध्व भागातील धरणातून समन्यायी पद्धतीने जायकवाडी धरणात पाणी सोडलेले आहे.**

आ) जायकवाडी धरण व उर्ध्व गोदावरी उपखोरे या मध्ये पाणी समस्या बाबत महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण अधिनियम -२००५ मधील कलम १२ (६) (क) नुसार उर्ध्व भागातील धरणातून समन्यायी पद्धतीने जायकवाडी धरणात पाणी सोडणे बाबत मा. उच्च न्यायालय खंडपीठ, औरंगाबाद येथे जनहित याचिका क्र. १०० /२०१२ दाखल करण्यात आली होती. पुढे सदरील याचिका मा. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्देशान्वये मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे प्रिन्सिपल बेंच समोर एकत्रित सुनावणी करिता वर्ग करण्यात आली. सदर याचिकेचा क्र. १७३ /२०१३ असा आहे. सदरील जनहित याचिका मध्ये उर्ध्व भागातील व निम्न भागातील मोठ्या प्रमाणात याचिकाकर्ते

दाखल झाले होते. प्रकरणी मा.उच्च न्यायालयाच्या निर्देशान्वये महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांची याचिका क्र. १/२०१४ मध्ये दि. १९/०९/२०१४ रोजी निर्णय दिलेला आहे. सदरील निर्णयास उच्च न्यायालय, मुंबई यांच्या दि. २३/०९/२०१६ रोजीच्या आदेशान्वये दृढीकरण केलेले आहे. सदरची कार्यवाही दरवर्षी दि. १५ ऑक्टोबर ते ३१ ऑक्टोबर या कालावधीत पूर्ण करण्याचे निर्देश आहेत. ज्या वर्षी पावसाळ्यामध्ये जायकवाडी जलाशयामध्ये तुटीचा पाणीसाठा असेल त्या वर्षी समन्यायी पाणी वाटपासाठी महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण, मुंबई यांचे दि. १९/०९/२०१४ च्या निवाड्यातील तक्ता क्रमांक ६ मध्ये दिलेल्या निर्देशांतील स्ट्रॅटेजी सर्व समुहांना लागू होते. उपलब्ध साठ्यानुसार स्ट्रॅटेजी विचारात घेऊन जायकवाडी जलाशयात पाणी सोडण्याचा निर्णय गोदावरी मराठवाडा पाटबंधारे विकास महामंडळ, औरंगाबाद यांचेमार्फत घेण्यात येतो.

इ) जायकवाडी धरणाच्या उर्ध्व बाजूकडील धरणात साठणाऱ्या पाण्याचा योग्य प्रकारे वाटप होण्याच्या दृष्टीने खरीप हंगामातील पाण्याची निकड, बाष्पीभवन, वहनव्यय इत्यादी तसेच शासन निर्णय क्र. संकीर्ण-२०१२/ प्र.क्र.८९१/२०१२/सिंव्य(धोरण), दि. २९/०१/२०१३ अन्वये गठीत केलेल्या समितीच्या दिनांक ०८/०८/२०१३ च्या अहवालानुसार अंमलबजावणी करताना येणाऱ्या अडचणींचा व मधील कालावधीत नदी खोऱ्याच्या जल नियोजनात झालेले बदल विचारात घेऊन मार्गदर्शक तत्त्वे तयार करण्याच्या दृष्टीने शासन स्तरावर शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०२३/ प्र.क्र.१८६/२०२३/सिंव्य(धोरण), दि.२६/०७/२०२३ अन्वये अभ्यास गट गठीत करण्यात आले आहे. सदर समितीकडून अहवाल प्राप्त झाल्यावर अहवालाच्या अनुषंगाने शासन स्तरावर उचित निर्णय घेण्यात येईल.

**३.जायकवाडी उर्ध्व भागात नव्या धरणांना मान्यता न देणेबाबत**

जायकवाडी प्रकल्पाच्या उर्ध्व भागातील धरणातून समन्यायी पद्धतीने पाणी सोडणे बाबत मा. उच्च न्यायालय मुंबई येथे जनहित याचिका क्र. १७३/२०१३ दाखल करण्यात आलेली आहे. सदरील याचिकेमध्ये दि. २३/०९/२०१६ रोजी न्यायालयाने आदेश निर्गमित केलेले आहे. सदरील आदेशाच्या परिच्छेद १९७ (k) मध्ये खालीलप्रमाणे नमूद आहे.

" We direct the state government to ensure that so long as a government decision reflected from the communication date ६th Sep, २००४ is in force, permission are not granted to set up any new irrigation project upstream of Jaykawadi Dam."

महाराष्ट्र शासन, जलसंपदा विभाग, शासन परिपत्रक क्र. संकीर्ण २००६/(२६९/२००६)/जसंअ, दि. २५/०४/२०१९ मध्ये मा. उच्च न्यायालय मुंबई येथे जनहित याचिका क्र. १७३/२०१३, दि. २३/०९/२०१६ रोजी न्यायालयाने आदेशच्या अनुषंगाने जायकवाडी प्रकल्पाच्या वरील बाजूस कोणतेही प्रकल्प हाती न घेणे बाबतच्या आदेशांचे काटेकोरपणे पालन करावे असे निर्देश दिलेले आहे. याच्या विरुद्ध उर्ध्व गोदावरी मध्ये नवीन प्रकल्पाचे नियोजन केल्यास हे मा. उच्च न्यायालयाचे अवमान होईल.

तथापि, राज्य जलपरिषदेच्या दि.३०/०९/२०१७ रोजी झालेल्या चौथ्या बैठकीमध्ये पुढीलप्रमाणे निर्देश देण्यात आलेले आहेत:-

"एकात्मिक जल आराखडा-गोदावरी खोरे च्या खंड-१ मधील परिच्छेद ९.१.२ (पृ.क्र. ३३०) मध्ये विहित केल्याप्रमाणे जलसंधारणाची कामे करण्यात यावी. या व्यतिरिक्त पाझर तलाव/को.प.बंधारे इत्यादी पाणी साठवण करण्याचे बांधकाम कारावयाचे झाल्यास खालचे पाणी अडवले जाणार नाही किंवा जायकवाडी धरणाच्या साठवणीत विपरीत परिणाम होणार नाही याची खात्री करावी, यासाठी एक

उच्चाधिकार समिती (HIGH POWER COMMITTEE) जलसंधारण विभागाने गठित करावी. सदर समितीच्या शिफारशी शिवाय कोणतेही पाणी साठवण करण्याचे बांधकाम करु नये."

उपरोक्त निर्देशाच्या अनुषंगाने सद्य:स्थितीत जायकवाडीच्या उर्ध्व बाजूस जलसंधारण विभागाची उपरोक्त नमुद कामे घेण्यास बंधन नाही.

*****************

# महाराष्ट्र विधानसभा

## सन-२०२३ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

## मा. श्री. समीर कुणावार, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १६६७

"सन १९९६-९७ या कालावधीत वर्धा जिल्ह्यातील समुद्रपूर, सेलू तसेच सिंदी (रेल्वे), कळमना, मारडा, दिग्रज, भोसा, उमराव व इतर गावातील सुमारे एकूण ११८५ शेतकऱ्यांचे तसेच नागपूर जिल्ह्यातील सुमारे १८२६ शेतकऱ्यांचे असे एकूण ३०११ शेतकऱ्यांच्या शेतजमिनी या "निम्म वना प्रकल्पांतर्गत" अधिग्रहीत झालेल्या असणे, शेतजमीन अधिग्रहीत करताना मोहगाव येथील काही शेतकऱ्यांना प्रति एकर ६० ते ६५ लाख रूपये व इतर गावातील शेतकऱ्यांना प्रती एकर फक्त ३० ते ३५ हजार रूपये अशा तफावतीने वितरीत करण्यात येणे व उर्वरित २० टक्के रक्कम व भू-भाडे पट्टी व्याजासह नंतर देण्याचे आश्वासन तत्कालनि नागपूर पाटबंधारे विभाग (दक्षिण), अजनी, नागपूर या विभागातील अधिकाऱ्यांनी दिले असणे, परंतु २७ वर्षे उलटूनही अद्यापि वरील गावातील शेतकऱ्यांना भू-भाडे पट्टी व्याजासह मिळाली नसणे, तसेच सन २०१८ मध्ये शेतकऱ्यांनी भू-भाडे पट्टीची रक्कम मिळण्याबाबत संबंधित विभागाकडे अर्ज करून देखील अद्यापपर्यंत भू-भाडे पट्टीची रक्कम देण्यात आलेली नसणे, परिणामी सर्व शेतकऱ्यांमध्ये तीव्र संतापाची व असंतोषाची भावना निर्माण होणे, भू-भाडे पट्टी व्याजासह आजच्या बाजारमुल्यानुसार मिळण्याकरिता स्थानिक लोकप्रतिनिधींनी, शेतकरी/ शेतकरी संघटनांनी वारंवार संबंधित विभागाकडे निवेदने देवूनही शासनाकडून कोणतीही कार्यवाही न होणे, त्यामुळे निम्म वना प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांच्या अधिग्रहीत झालेल्या जमिनीचे उर्वरित २० टक्के रक्कम व भूभाडेपट्टी आजच्या बाजारमुल्यानुसार देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

### मा.उपमुख्यमंत्री (जलसंपदा व लाक्षेवि) यांचे निवेदन.

निम्न वेणा हा मोठा प्रकल्प नागपूर जिल्ह्यात स्थित असुन, त्याचे लाभक्षेत्र हे नागपूर व वर्धा या जिल्ह्यांमध्ये आहे.

निम्न वेणा प्रकल्पांतर्गत धरण व कालवा या करिता ७२६० हेक्टर खाजगी जमिनीची आवश्यकता असून भूसंपादन कायद्याप्रमाणे ७२५२.९२ हेक्टर व सरळ खरेदीने ७.०८ हेक्टर खाजगी जमीन संपादित करण्यात आलेली आहे. तसेच १३४.०६ हेक्टर वन जमीन पण या सोबत अधिग्रहीत करण्यात आलेली आहे .

निम्न वेणा प्रकल्पाच्या उजव्या कालव्यासाठी मोहगाव तालुका नागपूर, जिल्हा नागपूर मधील १७ शेतकऱ्यांचे १०.७७ हेक्टर करिता भुसंपादन प्रकरण १४/अ-६५/१९९४-९५ नुसार सुरु होते. तथापि, हा निवाडा जिल्हाधिकारी, नागपूर यांचे द्वारा दिनांक १७.०१.२०१५ मध्ये घोषित झाला होता. सदर निवाडा होताना नुकसान भरपाईचे मुल्यांकन भूसंपादन कायदा २०१३ च्या तरतुदीप्रमाणे झालेले आहे. सदर भूसंपादन निवाड्यासाठी भूसंपादनाची मोबदला रक्कम काढण्यासाठी जमिनीचा दर हा रु. २२ ते २३ लक्ष प्रती हेक्टर घेण्यात आलेला दिसून येतो. नवीन भूसंपादन कायद्यातील तरतुदीनुसार १.०५ गुणांक घेऊन मोबदला निश्चित करून देण्यात आला आहे.

निवाड्यातील एका शेतकऱ्याने (श्री. आनंद ठवरे व इतर) रिट पिटीशन क्रमांक १०९२/२०२१ मा. उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर, नागपूर येथे दाखल केली. सदर पिटीशन वर मा.उच्च न्यायालयाने दिनांक १४.६.२०२२ रोजी निकाल देऊन भूसंपादनाच्या नवीन कायद्यांतर्गत गुणांक २.० घेऊन मोबदला देण्यात यावा, असे आदेश पारित केले व त्यानुसार भुसंपादनाचा मोबदला नव्याने सुधारीत करुन देण्यात आला.

सदरचा मोबदला हा फक्त २०१५ साली झालेल्या मौजा मोहगाव येथील शेतकऱ्यांकरिता देण्यात आलेला असून इतर गावांचा मोबदला १९८४ च्या भूसंपादन कायद्याप्रमाणे १९९४ ते २००३ या कालावधीमध्ये झालेले असल्यामुळे शेत जमिनीच्या मोबदल्यात तफावत दिसून येते. याच प्रकल्पाकरिता सन २००३ साली झालेल्या मौजा दिग्रज, ता. सेलू, जि. वर्धा येथील मूळ निवाड्यातील जमिनीसाठीचा दर १.१६ लक्ष प्रति हेक्टर इतका दिसून येतो. त्यामुळे वेळोवेळी अधिग्रहीत झालेल्या शेतजमिनी मधील मोबदला रकमेत फरक दिसून येतो .

भू-भाडे प्रस्ताव भूसंपादन प्रक्रियेच्या वेळीच मंजूर करण्यात आले असून, भू-भाडे देण्यात आले आहे. भू-भाड्यावर व्याज देण्याचे शासनाचे धोरण नाही. निम्न वेणा प्रकल्पांतर्गत ७४ शेतकरी यांनी नागपूर पाटबंधारे विभाग (दक्षिण), नागपूर या विभागाकडे भूभाडे मिळण्याकरिता अर्ज सादर केलेला आहे. त्यापैकी मौजा मारडा, ता.समुद्रपूर, जि.वर्धा येथील १९ शेतकरी यांनी भूसंपादन प्रक्रियेनंतर राजीनामे दिलेले आहेत. त्यामुळे त्यांना भू-भाडे देय नाही. उर्वरीत शेतकऱ्यांच्या भू-भाडे प्रस्तावाबाबत क्षेत्रीय स्तरावरुन तपासणी प्रगतीपथावर आहे. तद्नंतर नियमानुसार पुढील कार्यवाही करणे नियोजीत आहे. निम्न वेणा प्रकल्पांतर्गत शेतकऱ्यांच्या अधिग्रहीत झालेल्या जमिनीची संपूर्ण रक्कम निवाड्याप्रमाणे भूसंपादन अधिकारी, नागपूर व वर्धा यांचेकडे जमा करण्यात आलेली आहे. ज्या शेतकऱ्यांची २० टक्के रक्कम सबंधित जिल्हाधिकारी/भूसंपादन अधिकारी यांचेकडे प्रलंबित असल्यास/उचल न केलेली असल्यास, याबाबत उचल न केलेल्या/शिल्लक रकमेचे वितरण त्वरित करण्याबाबत जिल्हाधिकारी नागपूर/वर्धा यांना कळविण्यात येत आहे.

**************

**महाराष्ट्र विधानसभा** **लक्षवेधी सुचना क्र. ७४३**

## सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री. ॲड. आकाश फुंडकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.

"खामगांव जि.बुलढाणा येथील रेशन कार्ड धारकांचे आधार लिंक करण्याबाबत शासनाने आदेश दिले असणे, परंतु सदरचे आधार लिंक करतांना खामगांव तालुक्यातील जवळपास २५०० आधार कार्ड हे नाशिक येथील रेशन कार्ड धारकांच्या नावाशी लिंक झाले असणे, यामुळे खामगांव तालुक्यातील रेशनकार्ड धारकांना वारंवार रेशन दुकानांच्या चकरा माराव्या लागत असणे, या रेशन धारकांना धान्य मिळत नसल्यामुळे शासनाच्या गरीबांना मोफत धान्य या महत्वपुर्ण योजनेच्या लाभापासून गोरगरीब वंचित राहत असणे, याबाबत खामगांव तहसील कार्यालय व पुरवठा अधिकारी यांच्यामार्फत पाठपुरावा केला जाणे, परंतु नाशिक येथून कोणतीही प्रतिक्रीया मिळत नसल्यामुळे संबंधीतांवर करावयाची कठोर कारवाई, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

### मा. मंत्री, अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे निवेदन

राष्ट्रीय अन्नसुरक्षा योजनेतील अपात्र लाभार्थ्यांचा शोध घेऊन धान्याचा होणारा अपहार/गैरव्यवहार थांबविण्यासाठी तसेच पात्र लाभार्थ्यांना पारदर्शी पध्दतीने धान्याचे वाटप करण्यासाठी केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार राज्यातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेचे संपूर्ण संगणकीकरण करण्यात आले असून लाभार्थ्यांची बायोमेट्रिक ओळख पटवून शिधावस्तूचे वाटप करण्याचा धोरणात्मक निर्णय घेतला आहे.

केंद्र शासनाकडून प्राप्त सुचनांनूसार लाभार्थ्यांचे शिधापत्रिकेसोबत आधार संलग्न करण्याबाबत क्षेत्रीय कार्यालयांना सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार बुलढाणा जिल्हयातील खामगाव येथील सुमारे २,००० शिधापत्रिकाधारकांचे आधार क्रमांक हे नाशिक जिल्हयातील शिधापत्रिकांमध्ये मध्ये संलग्न झाले असल्याचे तहसिल कार्यालय, खामगाव यांचे निदर्शनास आले. त्यानुसार जिल्हा पुरवठा अधिकारी, नाशिक यांना खामगाव तालुक्यातील आधार क्रमांक वगळण्याबाबत आवश्यक पत्रव्यवहार करण्यात आला. सदर प्रकरणी तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना संबंधित कार्यालयांना जिल्हा पुरवठा अधिकारी, नाशिक यांच्याद्वारे देण्यात आल्या. त्यानुसार नाशिक जिल्हयात चुकून संलग्न झालेले एकूण २,००० लाभार्थ्यांपैकी १,८७६ लाभार्थ्यांचे आधार क्रमांक वगळण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. उर्वरीत १२४ लाभार्थ्यांचे शिधापत्रिकेसोबत चुकून संलग्न झालेले आधार क्रमांक वगळण्याची कार्यवाही तातडीने करण्यात येत आहे. नाशिक मधून वगळण्यात आलेले आधार क्रमांक पडताळणी करून खामगाव मधील शिधापत्रिकांसोबत संलग्न करण्यात आले आहेत. त्यामुळे सदर लाभार्थ्यांना अन्नधान्याचा लाभ मिळत असून पात्र लाभार्थी अन्नधान्यापासून वंचित राहणार नाही यांची दक्षता घेण्यात येत आहे.

**************************************************

रोटा-त्व-१०५८(७००+८-२३)

**लक्षवेधी सूचना क्र.१२४**

## सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

श्री.नितीन अर्जुन (ए.टी.) पवार, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना** पुढील प्रमाणे :-

"गडचिरोली जिल्ह्यातील शासकीय धान खरेदी केंद्रातून खरेदी करण्यात आलेले धान मार्केटींग फेडरेशन व आदिवासी विकास महामंडळात स्थानिक राईस मिल्सना भरडाई करण्यास डेपोत येत असणे, संबंधीत राईस मिलर्सनी महामंडळाकडून देण्यात आलेल्या धानाची भरडाई करुन तोच धान (तांदूळ) शासनास जमा करणे अनिवार्य असणे, परंतु गडचिरोली, भंडारा व गोंदिया जिल्ह्यांतील बरेच राईस मिलर्स शासनाकडून खरेदी करुन दिलेला धान तांदूळाची भरडाई करुन व सदर तांदूळ परस्पर बाजारात विकला जाणे, त्याबदल्यात निकृष्ट दर्जाचा व रिसायडींग केलेला तांदूळ जमा करणे व लाखो रुपयांचा फायदा करुन घेणे, तसेच काही राईस मिलर्स कोणताही तांदूळ बेस डेपोत जमा न करता संबंधीत अधिकाऱ्यांशी संगनमत करुन त्यांच्याकडून तांदूळ जमा केल्याच्या बोगस पावत्या घेऊन शासनाचे करोडो रुपयांचे नुकसान करत असणे, हा अंत्यत गंभीर धक्कादायक प्रकार असून सदर प्रकार बऱ्याच वर्षापासून चालु असल्याचे निदर्शनास येणे, तसेच निकृष्ट दर्जाचा तांदूळ हा तेलगंणा व इतर राज्यांतून आयात करुन सदर तांदूळ शासकीय गोदामांमध्ये जमा करुन सर्वसामान्य गोरगरीब लोकांच्या माथी मारला जाणे, सदरचा तांदूळ लॉट पास करण्यासाठी अधिकाऱ्यांकडून प्रती लॉट साधारण ४० ते ५० हजार घेतले जात असल्याची गंभीर तक्रार प्राप्त झालेली असणे, त्यानुषंगाने गडचिरोली जिल्ह्यातील सदर प्रकरणाची विशेष पथकामार्फत सखोल चौकशी करुन सदर बेस कॅम्पमधील तांदूळाचे नमुने तपासून बोगसगिरी करणाऱ्या व्यापाऱ्यांवर व त्यांना साथ देणाऱ्या संबंधीत अधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल करण्याबाबत करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

## मा.मंत्री, अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण यांचे निवेदन

किमान आधारभूत किंमत खरेदी योजना ही केंद्र शासनाची योजना असून शेतकऱ्यांच्या हितासाठी आहे. या योजनेअंतर्गत केंद्र शासन निरनिराळया पिकांच्या किमान आधारभूत किंमती जाहीर करते. आधारभूत किंमतीच्या लाभ शेतकऱ्यांना होण्याच्या दृष्टीने व त्यांना हमी भावापेक्षा कमी किंमतीने धान्य विकावे लागू नये, म्हणून राज्य शासनातर्फे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाकडून केंद्र शासनाने विहीत केलेल्या दर्जाच्या धानाची/भरडधान्याची (ज्वारी, बाजरी, मका व रागी) खरेदी करण्यात येते.

महाराष्ट्र राज्यात केंद्र शासनाची "नोडल एजन्सी" म्हणून भारतीय अन्न महामंडळ काम पाहते, तर भारतीय अन्न महामंडळाच्यावतीने राज्य शासनामार्फत महाराष्ट्र राज्यात किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई (बिगर आदिवासी क्षेत्रात) व महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, नाशिक (आदिवासी क्षेत्रात) या दोन अभिकर्ता संस्थामार्फत करण्यात येते.

किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत गडचिरोली, भंडारा व गोंदिया जिल्ह्यात पणन महासंघ तसेच आदिवासी विकास महामंडळ या दोन्ही संस्थांकडून धान खरेदी करण्यात येते. योजनेंतर्गत चालु पणन हंगाम २०२२-२३ (खरीप व रबी) मध्ये दोन्ही अभिकर्ता संस्थांकडून पुढीलप्रमाणे धान खरेदी झाली आहे.

(क्र.मा.प.

शेठा-एच-१०१७(७५०-८-२३)

| अ. क्र. | जिल्हा | झालेली धान खरेदी (क्विं.) | भरडाई केलेले धान (क्विं.) | जमा केलेला सी.एम.आर. (क्विं.) |
|---|---|---|---|---|
| १ | गडचिरोली | ३०,४३,१५०.२१ | १९,२५,०३३.४४ | ९,३४,३०४.४३ |
| २ | भंडारा | ५३,७५,५३३.६० | ५१,६७,२९७.८८ | ३०,५०,३७३.९० |
| ३ | गोंदिया | ६८,१२,३५७.६९ | ६७,६९,११५.२५ | ३९,९८,७४७.०९ |
| | **एकूण** | **१,५२,३१,०४१.५०** | **१,३८,६१,४४६.५७** | **७९,८३,४२५.४२** |

अशा प्रकारे दोन्ही अभिकर्ता संस्थांकडून गडचिरोली, भंडारा व गोंदिया जिल्ह्यांत खरीप व रबी हंगाम मिळून एकूण १,५२,३१,०४१.५० क्विंटल धान्य खरेदी करण्यात आला आहे.

करारबध्द राईस मिलर्सकडून बॅक गॅरंटी घेऊन गॅरंटीच्या प्रमाणात धानाचे नियतन देण्यात येते. शासन निर्णयातील विनिर्देशानुसार ६७ टक्के उतारानुसार तांदुळ मिलर्सकडून जिल्हा पुरवठा अधिकारी यांचे अधिनस्त गोदामात जमा करणे बंधनकारक आहे. तयार झालेला तांदूळ राईस मिलर्समार्फत जिल्हा पुरवठा अधिकारी यांनी निश्चित केलेल्या बेस डेपोवर नेण्यात येतो. बेस गोदामात सीएमआर/फोर्टीफाईड तांदूळ जमा झाल्यानंतर त्यांची गुणवत्ता तपासणी करण्यात येते. गुणवत्ता तपासणी करतांना प्रत्येक लॉटची गुणनियंत्रकाद्वारे Mixed Indicator Method द्वारे तपासणी केली जाते. सदरची तपासणी करताना ग्रीन रिपोर्ट आल्यानंतरच तांदूळ स्वीकारण्यात येतो. Mixed Indicator Method ही तांदळाचे Age Limit शी संबंधीत तपासणी असल्यामूळे रिसायकलिंगचा तसेच निकृष्ट दर्जाचा तांदूळ जिल्ह्यात स्वीकारण्यात येत नाही. तसेच बेस गोदामात जमा होणाऱ्या तांदळाची भारतीय अन्न महामंडळाचे प्रतिनिधींकडून सुध्दा दरमहा तपासणी करण्यात येते. यामध्ये जे तांदूळ निकषात बसत नाहीत ते स्वीकारले जात नाहीत. यामुळे शासकीय धान्य गोदामांमध्ये FAQ दर्जाचा तांदूळ पाठविण्यात येत असून, त्यांचे वाटप सार्वजनिक वितरण प्रणालीतंर्गत लाभार्थ्यांना करण्यात येते.

कोणताही तांदूळ बेस गोदामात जमा न करता अधिकाऱ्यांशी संगनमत करुन त्यांचेकडून तांदूळ जमा केल्याचा बोगस पावत्या घेऊन शासनाचे करोड रुपायाचे नुकसान करत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. तसेच निकृष्ट दर्जाचा तांदूळ तेलगंणा व इतर राज्यातून आयात करुन सदर तांदूळ शासकीय गोदामात जमा करुन सर्वसामान्य गोरगरीबांच्या माथी मारला जाणे, सदरचा तांदूळ लॉट पास करण्यासाठी अधिका-यांकडून प्रती लॉट साधारण ४०-५० हजार रुपये घेतले जात असल्याची अशी कोणतीही तक्रार भंडारा व गोंदिया जिल्ह्यात प्राप्त झालेली नाही. तथापि, गडचिरोली जिल्ह्यात निकृष्ट दर्जाचा तांदळाचा पुरवठा होत असल्याची तक्रार शासनपत्र दि.२८.०६.२०२३ अन्वये प्राप्त झाली होती. त्यानुषंगाने जिल्हा पुरवठा अधिकारी, गडचिरोली यांच्या दि.२९.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये गडचिरोली जिल्ह्यातील सर्व तहसिलदार यांच्याकडून त्यांच्या अधिनस्त असलेल्या शासकीय गोदामात सीएमआर बेस गोदामातून पाठविण्यात आलेल्या सीएमआर तांदळाची तपासणी करण्यात आली असून शासकीय धान्य गोदामांमध्ये निकृष्ट दर्जाचा तांदूळ आढळून आलेला नाही.

**********

लक्षवेधीसूचना

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन
महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना

**मा. श्री हरिभाऊ बागडे वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना पुढील प्रमाणे आहे:-**

"छत्रपती संभाजी नगर जिल्ह्यातील आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्या. व आदर्श नागरी महिला सहकारी बँकेत सन २०१६ ते २०१९ काळातील गैरव्यवहार उघडकीस येणे, बिनातारण कॅश क्रेडीट कर्ज वाटप केल्याचे विशेष लेखापरिक्षक यांनी फिर्याद करणे, कर्ज देताना तारण घेतलेली मालमत्ता कर्ज रकमेएवढी नसणे, जेवढे कर्ज दिले तेवढ्या रकमेचा ७/१२ वर बोजा नसणे, कर्ज एकाच्या नावे उचलने व दुसरे कर्ज नावावर असल्यामुळे चेक परिवारातील पत्नीच्या नावाने बचत खात्यावर रक्कम उचलणे, बहुतांश प्रकरणांमध्ये एकच प्रॉपर्टी मॉर्गेज केलेली असणे, कर्ज प्रकरणामध्ये साध्या नोटरीद्वारे नोंदणीकृत इक्विटेबल मॉर्गेज करणे, रजिस्टर मॉर्गेज नसणे, या बँकेत व पतसंस्थेत गरीब शेतकरी, छोटे व्यावसायिक, कामगार वर्ग यांच्या ठेवी अडकलेल्या असणे, या बँकेचे ठेवीदार रामेश्वर नारायण इथ्थर या ठेवीदाराने आत्महत्या केलेली असणे, या ठेवीदारांमध्ये प्रचंड अस्वस्थता व असंतोष असणे, या प्रकरणामुळे राज्यातील लोकांचा सहकार क्षेत्रावरील विश्वास कमी होणे, खातेदारांनी ठेवलेल्या ठेवी परत मिळण्यासाठी असलेली मागणी, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा. मंत्री (सहकार) यांचे निवेदन-**

आदर्श महिला नागरी सहकारी बँक लि., औरंगाबाद या बँकेतील एनपीए चे वाढलेले प्रमाण, बँकेतील कमी झालेली तरलता आणि उणे सीआरएआर या कारणांमुळे भारतीय रिझर्व्ह बँकेने या बँकेवर दि.२४/०२/२०२३ रोजी सहा महिन्यासाठी आर्थीक निर्बंध लादले आहेत.

सद्यस्थितीत बँकेचे एकुण ४९,५३४ ठेवीदार असून एकुण ठेवीची रक्कम रु.३१०.४१ कोटी एवढी आहे. बँकेकडील रु.५.०० लाखांपर्यंत ठेव असणाऱ्या ठेवीदारांची संख्या ४८,६६८ एवढी असून ठेव रक्कम रु.२२९.९१ कोटी आहे. डी.आय.सी.जी.सी. कडून ८६७५ ठेवीदारांच्या रु.१७८.६३ कोटी एवढ्या रकमेचे क्लेम मंजूर केले असून सदर रक्कम ठेवीदारांना वितरीत करण्यात आली आहे.

आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित औरंगाबाद या संस्थेचे सन २०१६-२०१९ या कालावधीचे चाचणी लेखापरिक्षण व विनिर्दीष्ट अहवाल (Specific report) आणि विशेष अहवालामध्ये (Special Report) अपहार, गैरव्यवहार, फसवणुक, विनातारण कॅश क्रेडिट कर्जवाटप इ. गंभीर मुद्दे नमुद करण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने प्राधिकृत अधिकारी यांनी पतसंस्थेचे संचालक मंडळ,अधिकारी/कर्मचारी व कर्जदार अशा ५१ जणांवर रु.१०३.१७ कोटी इतक्या रकमेचा अपहार केल्याबाबतचा फौजदारी गुन्हा क्र.४५४ सिडको पोलीस स्टेशन, औरंगाबाद येथे दि.११/०७/२०२३ रोजी दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस यंत्रणेमार्फत सुरू आहे.

आदर्श नागरी सहकारी पतसंस्था मर्यादित औरंगाबाद या संस्थेचे सन २०१८-२०२२ या कालावधीचे चाचणी लेखापरिक्षण व विनिर्दीष्ट अहवाल (Specific report) आणि विशेष

अहवालामध्ये (Special Report) अपहार, गैरव्यवहार, फसवणुक, विनातारण कॅश क्रेडिट कर्जवाटप इ. गंभीर मुद्दे नमुद करण्यात आले आहेत. त्याअनुषंगाने प्राधिकृत अधिकारी यांनी पतसंस्थेचे संचालक मंडळ,अधिकारी/कर्मचारी व कर्जदार अशा ५५ जणांवर रु.९९.०७ कोटी इतक्या रकमेचा अपहार केल्याबाबतचा फौजदारी गुन्हा क्र.४५५ सिडको पोलीस स्टेशन, औरंगाबाद येथे दि.११/०७/२०२३ रोजी दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस यंत्रणेमार्फत सुरू आहे.

सन २०१६-२०१९ व सन २०१८-२०२२ या कालावधीतील विशेष लेखापरिक्षकांनी सादर केलेल्या विशेष अहवालातील मुद्दयांच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ अन्वये संबंधीतांवर रु. १८०.४९ कोटी रकमेची जबाबदारी निश्चित करण्यासाठी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, औरंगाबाद यांनी दि.१०/०७/२०२३ रोजीच्या आदेशान्वये सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता.सिल्लोड यांची प्राधिकृत अधिकारी म्हणून नियुक्ती केली आहे.

आदर्श नागरी सहकारी पतसंस्थेतील ठेवीदार श्री रामेश्वर नारायण इथ्थर यांनी ठेवी मिळत नसल्यामुळे दि. १२.०७.२०२३ रोजी आत्महत्या केली असून त्याबाबत पतसंस्थेच्या अध्यक्षांवर करमाड पोलिस स्टेशन येथे गुन्हा क्र.०२४५ दि. २३.०७.२०२३ रोजी दाखल करण्यात आला आहे.

उपरोक्त अहवालातील नमुद गैरव्यवहाराच्या अनुषंगाने महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ७८-अ(१) अन्वये संस्थेचे संचालक मंडळास बरखास्तीची नोटीस जिल्हा उपनिबंधक, औरंगाबाद यांनी दि.१५.०६.२०२३ रोजी दिली आहे. सदर नोटीशीचे उत्तर प्राप्त झाल्यानंतर अधिनियमातील तरतुदीनुसार पुढील आवश्यक ती कार्यवाही करण्यात येईल.

*************

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन**

**महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.११६४** १८९८

**मा. श्री विनोद अग्रवाल वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना पुढील प्रमाणे आहे:-**

"नागपूर जिल्हयामध्ये न्यू ऑरेंजसिटी अर्बन क्रेडीटको -ऑप. सोसायटी, मर्या. जि. नागपूर रजि. नं. एन.जी.पी./आर.एस.आर./सि.आर./१४८/२००८ या संस्थेचे आनंद प्लाझा, २, ३ रा माळा, राजापेठ, हुडकेश्वर रोड, नागपूर येथे मुख्य कार्यालय असणे, संस्थेमध्ये मुदत ठेवीचे जास्त व्याज दराचे आमिष दाखवुन नागपूर जिल्हयातील नागरिकांकडुन ठेवीच्या रुपाने रक्कम जमा करणे, ठेवीदारांमध्ये सेवानिवृत्त कर्मचा-यांनी आपल्या आयुष्याची पुंजी, मोलमजुरी करण्या-यांनी आपल्या घामाची रक्कम ठेवणारे नागरिक असणे, संस्थेचे अध्यक्षांनी संस्थेतील ठेवीच्या रुपाने जमा झालेली रक्कम त्यांच्या मालकीच्या मे. आनंद डेव्हलपर्स या व्यवसायात वळती करुन संस्थेच्या खात्यामध्ये रक्कम तथा संस्थेच्या नावाने कोणत्याही प्रकारची मालमत्ता ठेवली नसणे, वळती केलल्या रक्कमेमध्ये त्यांनी नागपूर जिल्हयातील जंगल भागातील जमिनी अत्यंत कवडीमोल भावामध्ये विकत घेणे, तथा संस्था डबघाईस आलेली असुन संस्थेकडे मुदत ठेवीची रक्कम देण्यास रक्कम नसल्याचे नावाने ठेवीदारांना मे. आनंद डेव्हलपर्सच्या नावाने विकत घेतलेल्या अत्यंत कवडीमोल भावामध्ये विकत घेतलेल्या जमिनी ठेवीतील रक्कमे ऐवजी जास्त दराने विकण्यात आल्याने अनेक ठेवीदारांना मोठया प्रमाणात नुकसान झालेले असणे, काही ठेवीदारांनी जमिनी घेण्यास नकार दिल्यास त्यांना धमकावुन जमिनी घेण्यास बाध्य करणे, अनेक ठेवीदरांनी याबाबत जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांना केलेल्या तक्रारींवर कार्यवाही करण्यात आलेली नसणे, ठेवीदारांनी हुडकेश्वर पोलीस स्टेशन, हिंगणा पोलीस स्टेशन येथे सुध्दा संस्थेचे अध्यक्षां विरुध्द तक्रारी देवुन अध्यक्ष पदाचे कालावधीमध्ये मे. आनंद डेव्हलपर्सच्या नावाने विकत घेतलेल्या जमिनी तथा मालमत्तेची चौकशी करण्याची मागणी करणे, परंतु पोलीस विभागाने सुध्दा त्यावर कार्यवाही केलेली नसणे, ठेवीदारांमध्ये त्यांच्या ठेवीच्या रुपाने सदर संस्थेकडे असलेल्या आयुष्याची पुजींची रक्कम बुडणार असल्याची भिती तथा असंतोषाचे वातावरण निमार्ण होणे, त्यामुळे ठेवीदारांनी संस्था अध्यक्षांचे स्वमालकीच्या तथा मे. आनंद डेव्हलपर्सच्या नावाने विकत घेतलेल्या मालमत्तेची तथा नागपूर जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था यांनी केलेल्या कार्यवाहीची सी.बी.आई.चौकशी करण्याची मागणी करण्यात येणे, यावर शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही तथा उपाय योजना."

---

**मा. मंत्री (सहकार) यांचे निवेदन-**

न्यू ऑरेंजसिटी अर्बन क्रेडिट को-ऑप. सोसायटी, मर्या. जि. नागपूर, ही पतसंस्था जिल्हास्तरीय संस्था आहे.

सदर संस्थेच्या सभासदांनी/ठेवीदारांनी सदर संस्थेत गुंतविलेली ठेवीची रक्कम परत मिळत नसल्याच्या अनेक तक्रारी केलेल्या आहेत. त्याअनुषंगाने जिल्हा उपनिबंधक नागपुर यांनी सदर संस्थेची महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८९ अंतर्गत वैधानिक चौकशीसाठी सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. पारशिवनी यांची दि.२.१२.२०२२ रोजीच्या आदेशान्वये नियुक्ती केली. मात्र, या कालावधीमध्ये सदर संस्थेचे लेखापरिक्षण सुरू असल्याने चौकशी अधिकाऱ्यास संस्थेची कागदपत्रे तपासण्यासाठी उपलब्ध झाली नाहीत, मात्र सद्यस्थितीत सदर चौकशीची कार्यवाही सुरू आहे.

(क्र.मा.प.

सदर पतसंस्थेस सन २०२१-२२ च्या लेखापरिक्षण अहवालानुसार लेखापरिक्षणाचा वर्ग 'ड' प्राप्त झाला आहे. लेखापरिक्षण अहवालानुसार संस्थेने १३.८२ कोटींच्या ठेवी स्विकारल्या असून त्यापैकी कर्ज वाटप ५.४३ कोटी (३९ टक्के) केलेले आहे. तसेच संस्थेने जमीन खरेदीमध्ये सहकार आयुक्तांची मान्यता न घेता कोटयावधीचे व्यवहार केल्याचे, त्यामध्ये संस्थेने बर्डी येथे १.११ कोटी रकमेचे दुकान खरेदी केल्याचे तसेच इतर जमीन व्यवहार रु. ५.०० कोटीचे केल्याचे नमूद आहे. तसेच जमीन खरेदीची कागपत्रे संस्थेच्या दप्तरी उपलब्ध नसल्याचे लेखापरिक्षण अहवालात स्पष्ट नमूद आहे. त्याअनुषंगाने सदर खरेदीबाबतची कागदपत्रे उपलब्ध करून देणेबाबत जिल्हा उपनिबंधक,नागपूर यांनी दि. २५.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये संस्थेस कळविले आहे.

सदर लेखापरिक्षण अहवालाच्या अनुषंगाने संबंधीत लेखापरिक्षकानी सदर संस्थेचा प्रशासकिय विशेष अहवाल सादर केला त्याअनुसार सदर अहवालामध्ये निबंधकाच्या पूर्व परवानगी शिवाय जमीन खरेदी, संस्थेच्या अध्यक्षांनी स्वत:ची मालमत्ता संस्थेस विकणे, कर्जवाटप करताना कर्जविषयक मर्यादेचे गंभीर उल्लंघन इ.गंभीर मुद्दे नमूद केले आहेत. या विशेष अहवालाच्या आधारे आर्थिक अनियमिततेस जबाबदार असणाऱ्या व्यक्तींविरुध्द गुन्हा दाखल करणेबाबत लेखापरिक्षकांना दि.२३.०३.२०२३, दि.२८.०४.२०२३ व दि.०८.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये निर्देश दिले आहेत.

तथापि, संस्थेच्या अध्यक्षांनी मा. विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे पुनरीक्षण अर्ज क्र. ६६७/२०२३ दाखल केला. त्यानुसार विभागीय सहनिबंधक यांनी त्यांच्या दिनांक ०४/०७/२०२३ आदेशान्वये जिल्हा उपनिबंधक यांचे निर्देश रद्द केले आहेत.

दरम्यान संस्थेमधील गैरव्यवहार व अनियमिततेच्या अनुषंगाने जिल्हा उपनिबंधक सहाकारी संस्था, नागपूर यांनी अधिनियमाच्या कलम १०२ अन्वये दिनांक २१/०२/२०२३ रोजी उपरोक्त संस्थेचा अवसायनाचा अंतरिम आदेश पारीत करुन अवसायक म्हणून श्री संजय हिवसे, सहकार अधिकारी श्रेणी-१ अंतर्गत सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. नागपूर यांची नियुक्ती केली.

जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपुर यांच्या उपरोक्त आदेशाविरुध्द संस्थेचे अध्यक्ष यांनी विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नागपूर यांचेकडे पुनरिक्षण अर्ज क्र.६०६/२०२३ दाखल केला. त्यानुसार विभागीय सहनिबंधकांनी त्यांच्या दिनांक ०५.०७.२०२३ रोजीच्या आदेशान्वये अवसायनास स्थगिती दिली आहे. त्यामुळे अवसायकास पदभार स्विकारता आला नाही. व पर्यायाने ठेवीदारांच्या तक्रारीतील मुद्यांची शहानिशा करता आली नाही.

सन २०२१-२२ लेखापरिक्षण अहवालात आढळून आलेल्या आर्थिक गैरव्यवहाराची चौकशी करण्याकरीता जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था, नागपुर यांनी दिनांक २१/०४/२०२३ चे आदेशान्वये सदर संस्थेची कलम ८८ अंतर्गत चौकशी करण्याकरीता चौकशी अधिकारी म्हणून सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, ता. काटोल यांची नियुक्ती करण्यात आलेली असून सदर चौकशी सुरु आहे.

*************

## महाराष्ट्र विधानसभा

## सन-२०२३ चे (पावसाळी) अधिवेशन

**श्रीमती मनिषा चौधरी, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. २५६ पुढीलप्रमाणे आहे :-**

"गेली अनेक वर्षे किनारपट्टीलगत वास्तव्य करुन असणा-या मच्छिमारांच्या घरालगतची जागेचा वापर उदा. जाळी ठेवणे, मासे सुकविणे, बोटी शाकारणे, बोटी दुरुस्त करणे याकरिता करत असणे, मच्छिमारांच्या वसाहती लगत किंवा गावालगत मोकळी जागा महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ च्या कलम २२ अन्वये तरतुदीनुसार विहित करण्यात हरकत नसावी असा निर्णय शासनाकडून घेण्यात येणे, वहिवाटीच्या जागा/जमिनीचे ७/१२ त्यांचे नावे होण्याची कार्यवाही मुंबई विभागात कोळीवाडा व गावठण यांचे सिमांकन सुरु असणे, परंतु कोकण विभागातील इतर सर्व जिल्हयामध्ये सिमांकन करण्याची कार्यवाही अद्यापी चालु झालेली नसणे, सदर मोकळया जागांचे वाटप अन्य कारणासाठी मोठया प्रमाणावर होत असल्याचे कारण दाखवून सदर जागा मच्छिमारांना वापर करण्यास शासनाकडून होत असलेला विरोध, मच्छिमारांविरोधात शासनाकडून होत असलेली कारवाई, परिणामी मच्छिमार धंद्यावर होत असलेला विपरित परिणाम, मच्छिमारांमध्ये शासनाप्रति निर्माण झालेली तीव्र चीडीची व संतापाची भावना, मच्छिमारांच्या गावालगतच्या, वसाहतीलगतच्या खुल्या जागा मच्छिमारांच्या धंद्याकरिता म्हणजेच मासे सुकविणे, जाळी सुकविणे, जाळी विणणे, बोटी दुरुस्त करणे, बोटी शाकारणे याकरिता कोकणातील सर्व जिल्हयातील मच्छिमारांच्या घरालगतची जागेचे (कोळीवाडा/गावठण) सिमांकनाचे काम पुर्णकरुन तातडीने विहीत करुन देण्याची गरज, यावर शासनाने केलेली वा करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया."

---

## श्री. राधाकृष्ण विखे पाटील, मा. मंत्री (महसूल) यांचे निवेदन

शासन परिपत्रक ४ फेब्रुवारी, १९८३ मधील तरतुदीनुसार मच्छीमारांच्या गावालगतच्या/ वसाहतीलगतच्या खुल्या सरकारी जागा मच्छिमारांच्या धंदयासाठी म्हणजेच जाळी सुकविणे/जाळी विणणे, मासे सुकविणे, बोटी शाकारणे/ दुरुस्त करणे या करिता मच्छिमारांच्या गावालगत/वसाहती लगतच्या सोयीस्कर खुल्या जागा महाराष्ट्र जमीन महसूल संहितेच्या कलम-२२ खालील तरतुदींनुसार अभिहस्तांकित करण्याच्या सूचना शासनाने कोकण विभागातील जिल्हाधिकाऱ्यांना यापूर्वीच दिलेल्या आहेत. सदर सुचनांनुसार कोकणातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या पाच जिल्हयांमध्ये प्राप्त प्रस्तावांच्या अनुषंगाने मच्छीमारांच्या गावालगतच्या/ वसाहतीलगतच्या खुल्या सरकारी जागा मच्छिमारांच्या धंदयासाठी म्हणजेच जाळी सुकविणे/जाळी विणणे, मासे सुकविणे, बोटी शाकारणे/ दुरुस्त करणे या करिता राखीव जागा अशा नोंदी गांव नमूना नं.७/१२ पत्रकामध्ये इतर अधिकारामध्ये घेण्यात आलेल्या आहेत. याव्यतिरिक्त मत्स्यव्यवसाय विकास विभागाकडून प्रस्ताव प्राप्त झाल्यास त्याप्रमाणे कार्यवाही करण्याची दक्षता घेण्यात येत आहे.

राज्यातील सर्व गावांच्या गावातील जमिनीचे GIS आधारित सर्वेक्षण व भूमापन करणेबाबतचा गावठाण जमाबंदी प्रकल्प हा ग्रामविकास विभाग, भूमि अभिलेख विभाग व भारतीय सर्वेक्षण विभाग यांच्या संयुक्त सहभागाने राबविणेबाबत दि.२०.०२.२०१९ रोजीचे शासन निर्णयाने मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार राज्यामध्ये गावठाण असलेल्या गावांमध्ये गावठाणातील मिळकतींची ड्रोनव्दारे सर्व्हेक्षण सुरू करण्यात आलेले आहे. त्यास अनुसरून कोकणातील ठाणे, पालघर, रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या पाच जिल्हयांमध्ये मिळून एकूण ११२३ गावांमध्ये ड्रोन सर्व्हेक्षण काम पूर्ण झाले आहे. यामध्ये सागरी किनाऱ्यालगत असलेल्या गावांमध्ये गावठाणचे हद्दीत असलेल्या कोळीवाडे / मच्छिमार वसाहतींचाही समावेश आहे. सदर ड्रोन सर्व्हेक्षण झालेल्या गावांमधील चौकशीचे काम पूर्ण करुन गावठाणातील मिळकती त्यांचे नावावर करण्याची कार्यवाही सुरू आहे.

कोकण विभागांतर्गत ज्या ठिकाणी महसूल अभिलेखात गावठाण दर्शविण्यात आलेले नव्हते, अशा ठिकाणी गावठाणांचे सर्वेक्षण करण्याच्या सूचना दिनांक १७ फेब्रुवारी २०२२ रोजीच्या शासन पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत. सर्वेक्षणाअंती अशा गावठाणांची निश्चिती झाल्यानंतर त्या ठिकाणी नगर भूमापन योजना लागू करुन अशा गावठाणांमधील मच्छिमार बांधवांच्या घरांची जागा त्यांच्या नावे करण्याची कार्यवाही करता येईल.

मत्स्य विभागाने कळविल्यानुसार मुंबई शहर जिल्हयात १२ व मुंबई उपनगर जिल्हयात २९ असे एकूण ४१ कोळीवाडे आहेत. त्यापैकी ३१ कोळीवाडयांच्या बाहेरील हद्दींचे सर्व्हेक्षण व सिमांकन करण्यात आलेले आहे. मुंबई उपनगर जिल्हयातील २३ कोळीवाडयांचे सिमांकन पूर्ण झाले असून ६ कोळीवाडयांमध्ये जागेवर मूळ आदिवासी लोक राहत असून आदिवासी पाडे व आदिवासी लोकवस्ती असल्याचे दिसून आले असल्याने त्या ठिकाणी सिमांकनास विरोध आहे. तसेच मुंबई शहर जिल्हयामध्ये एकूण १२ कोळीवाडयांपैकी ८ कोळीवाडयांची सिमांकन मोजणी झालेली आहे तर उर्वरित ४ ठिकाणी कोळीवाडयांचे अस्तित्व दिसून आलेले नाही.

मुंबई शहर जिल्हयातील कोळीवाडा सीमांकन हद्दीमध्ये समाविष्ट मिळकतींच्या मिळकपत्रिका मूळ भूमापनावेळी/ तदनंतरचे सर्व्हेक्षण झाले त्या त्या वेळी उघडणेत आल्या असून त्यावर खाजगी व्यक्ती, संस्था, प्राधिकरण यांची नोंद दाखल असल्याचे निदर्शनास येते. मुंबई शहर जिल्हयातील कोळीवाडा सिमांकनामध्ये येत असलेल्या बृहन्मुंबई महानगरपालिका, म्हाडा, मुंबई पोर्ट ट्रस्ट, तटरक्षक दल, झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प इत्यादी प्राधिकरणांच्या मिळकती व खाजगी मालकी असलेल्या मिळकती सिमांकनात येत असल्याने त्यांनी घेतलेल्या आक्षेपांस अनुसरून संबंधितांना त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी संधी देण्याकरीता सुनावणी घेण्याची कार्यवाही जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचेस्तरावर सुरू आहे.

**********

लक्षवेधी सूचना क्र.१४२२

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन

श्री. निलेश लंके वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक: १४२२ पुढीलप्रमाणे आहे:-

"माहे जून, २०२३ च्या शेवटच्या आठवड्यात वा सुमारास मु.पो.शिर्डी, जि. अहमदनगर येथे महा पशुधन एक्सपो २०२३ चे आयोजन करण्यात येणे, या प्रदर्शनामध्ये नगर जिल्हयातील व राज्यातील शेकडो पशुपक्षी ग्राहक व मालक उपस्थित राहण्यासाठी प्रचार व प्रसार केला नसल्याने दोन ते तीन कोटी रूपये खर्च करून या प्रदर्शनास अत्यल्प प्रतिसाद मिळण्याची बाप उघडकीस येणे, या प्रदर्शनात सुमारे पंधराशे ते सतराशे पशु सहभागी होतील अशी यंत्रणा मार्फत मिळालेली माहिती प्रत्यक्षात सातशे ते आठशे पशु सहभागी होणे प्रदर्शन स्थळावर पशु पक्षी खाद्य, निगा राखणे औषधे इत्यादी विविध कंपन्यांनी उभे करण्यात आलेल्या स्टॉलमध्ये घेतलेला सहभाग, प्रदर्शन स्थळावर खाजगी उद्योजकांना वाटप केलेल्या स्टॉल धारकांना लावण्यात आलेल्या भाड्यामध्ये तफावत आढळून येणे या स्टॉल पैकी ४० पेक्षा जास्त स्टॉलचे वाटप ठेकेदारामार्फत केले जाणे व ठेकेदाराने ग्राहकांकडून घेतलेल्या रकमेपैकी प्रत्येक स्टॉल मागे किमान ५००० वाहत्या पेक्षा जास्त रक्कम शासनाला कमी देऊन उर्वरीत रकमेचा केलेला अपहार या महा पशुधन एक्सपो उभारण्यासाठी नगर जि पने काढलेल्या टेंडरमध्ये ठेकेदारांनी टेंडर मधील शर्ती व अटींची पूर्तता न करता त्या ठेकेदाराला संबंधित अधिकाऱ्यांनी घाई घाई ने पूर्ण रक्कम अदा करणे, यामुळे ठेकेदार व संबंधित अधिकारी यांनी आर्थिक लोणी करून शासनाचे किमान ७० ते ७५ लाखाचे नुकसान व आर्थिक व्यवहार केला असल्याने या महा पशुधन एक्सपो मध्ये सहभागी झालेल्या पशु मालक खरेदीदार यांच्या मनात निर्माण झालेला तीव्र असंतोष चीड व संताप, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

श्री. राधाकृष्ण विखे-पाटील, मा.मंत्री (पशुसंवर्धन) यांचे निवेदन

राज्यातील पशुपालकांना/ शेतक-यांना पशुसंवर्धनाविषयी सर्वांगीण माहिती देणे व त्यायोगे पशुसंवर्धनाबाबत आवड निर्माण करून शाश्वत उत्पन्नाचे साधन म्हणून पशुपालनाकडे बघण्याचा दृष्टीकोन वृध्दींगत होण्यासाठी देशभरातील पशुधनाच्या विविध प्रजातींचे महापशुधन एक्सपो, शिर्डी ता. राहता, जि. अहमदनगर येथे दि.२४, २५ व २६ मार्च, २०२३ रोजी आयोजित करण्यात आले होते.

सदर प्रदर्शनाची प्रचार व प्रसिध्दी महाराष्ट्रातील सर्व जिल्हयांमध्ये करण्यात आली होती. या करिता दूरदर्शन, विविध वाहिन्या, आकाशवाणी, वृत्तपत्रे, पोस्टर्स, बॅनर्स, पत्रके इत्यादी माध्यमांचा वापर करण्यात आला, तसेच राज्या बाहेरही पथके पाठवून पशुधन आणण्यात आले होते. इतर राज्यातील सर्व संचालक /डायरेक्टर यांनाही पत्र देवून अवगत करण्यात आले होते. राज्यातील सर्व पशुवैद्यकिय महाविद्यालयांचा सहभाग घेण्यात आला होता. प्रसिध्दी व प्रचार यंत्रणांचा वापर केल्यामुळे राज्यभरातून मोठ्या प्रमाणात पशुपालक, शेतकरी, उद्योजक, महिला बचत गटाचे सदस्य, शालेय/महाविद्यालयीन विद्यार्थी इत्यादींनी भेट दिलेली होती.

प्रदर्शनामध्ये देशभरातील ८ राज्यांमधून विविध जातींच्या गायवर्गीय, म्हैसवर्गीय, शेळ्या वर्गीय, मेंढ्या वर्गीय, घोडे वर्गीय अशा एकूण ७८ जातींचे ७८१ पशुधन व पक्षांनी सहभाग घेतला होता.

पशुपालनात सकस पशुखाद्य, यंत्रसामुग्री, औषधे यांचे महत्त्व विचारात घेऊन प्रदर्शनास अनेक नामांकित कंपन्यांनाही सहभागी करून घेतले होते. प्रदर्शनात राज्यात राबविण्यात येणा-या विविध योजनांची माहिती पशुपालकांना देण्यात आली, पशुपालकांच्या मेळाव्यात पशुसंवर्धन क्षेत्रातील नामांकित तज्ञ व्याख्यात्याचे व्याख्यान व प्रात्यक्षिकाद्वारे मार्गदर्शन करण्यात आले. पशुपालनास प्रोत्साहन देण्याच्या दृष्टीने उत्कृष्ट पशु-पक्षी यांना बक्षिसे देण्यात आली.

प्रदर्शनामध्ये एकूण ३०० स्टॉलची उभारणी करण्यात आलेली होती. त्यामध्ये १०६ स्टॉल शासकिय संस्था व महामंडळे यांना मोफत देण्यात आलेले होते. तसेच बचत गटांना १०० स्टॉल मोफत देण्यात आले तसेच त्यांचे नियोजन जिल्हा परिषदेकडे देण्यात आले होते. ५४ स्टॉल, विविध पशुखाद्य, औषध, दूध उद्योगाशी संबंधित संस्था, खाद्य विक्रेते यांना सशुल्क स्वरूपात देण्यात आले होते. ४० स्टॉल रु.१५०००/- दराने ठेकेदारामार्फत देण्यात आले होते.

पशुप्रदर्शनामध्ये ई-निविदेमधील ज्या बाबी कमी केल्या किंवा अपूर्ण होत्या, त्या बाबींचे मुल्यमापन समितीकडुन मुल्यमापन करुन रक्कम रु.११,२६,०८४/- देयकामधुन कपात करण्यात आलेली आहे व सदर रक्कम दि. ३१/०३/२०२३ रोजी समर्पित करण्यात आलेली आहे. तसेच जिल्हा परिषदे मार्फत काढण्यात आलेल्या निविदांमध्ये संपुर्ण खात्री करुन देयके अदा करण्यात आलेली आहेत.

---------------

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पावसाळी अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. ४०२

**श्री. योगेश सागर, मा. वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे**

---

"सेंट जॉर्ज रुग्णालय हे राज्य सरकारच्या समूह साखळीतील अत्यंत महत्वाचे रुग्णालय म्हणून ओळखेले जात असणे, सदर रुग्णालय हे कोविड पूर्वी व कोविडमध्ये देखील रुग्णसेवेसाठी नावाजले जात असणे, मात्र आता या रुग्णालयातील अडचणीत वाढ होत असून येथील स्त्रीरोग तज्ञ विभाग, बालरोग तज्ञ विभाग, बंद असल्याने इथल्या रुग्णांना नाहक त्रास सहन करावा लागत असणे, येथे शस्त्रक्रिया ही सोप्या व मोजक्याच होत असणे, कर्मचा-यांसह विभागनिहाय डॉक्टरच उपलब्ध नसल्याचे रुग्णांचे हाल होत असणे, येथे उपचारासाठी आलेल्या रुग्णांना जे. जे. रुग्णालयात जाण्यास सांगीतले जात असणे, येथिल प्लास्टिक सर्जरी व लिंग प्रत्यारोपण शस्त्रक्रिया विभागही बंद करण्यात आला असणे, येथे महत्वाचे असे शस्त्रक्रिया विभागच नसल्याने गंभीर अशा आणीबाणीच्या वेळी रुग्णांना इतर रुग्णालयांमध्ये धाव घ्यावी लागत असल्याची तक्रार रुग्ण करीत असल्याचे निदर्शनास येणे, येथे निवासी डॉक्टर, बालरोगतज्ञ, स्त्रीरोगतज्ञ नसल्याने गैरसोय होत असणे, याबाबत शासनाने करावयाची आवश्यक ती उपाययोजना व शासनाच्या प्रतिक्रिया."

---

मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे निवेदन

सर ज. जी. समूह रुग्णालय, मुंबई हे देशातील सर्वात मोठे रुग्णालय असुन या रुग्णालयाच्या अखत्यारीत कामा रुग्णालय, गो.ते. रुग्णालय, सेंट जॉर्जेस रुग्णालये कार्यरत आहेत. सेंट जॉर्ज रुग्णालय हे मुंबईतील राज्य सरकारच्या समूह साखळीतील अत्यंत महत्वाचे रुग्णालय म्हणून ओळखले जात आहे. सेंट जॉर्ज रुग्णालयात औषधशास्त्र विभाग, शल्यचिकित्साशास्त्र विभाग, अस्थिव्यंगोपचार शास्त्र विभाग, कान नाक घसा विभाग सक्रियरित्या कार्यरत आहेत.

तथापि, सेंट जॉर्ज रुग्णालयातील स्त्रीरोग तज्ञ विभाग व बालरोग विभागात आवश्यक डॉक्टर / अध्यापक उपलब्ध न झाल्यामुळे आंतररुग्ण विभाग अंशतः चालु असून बाहयरुग्ण विभाग सरु आहे. बालरोगचिकित्सा विभागात सहाय्यक प्राध्यपकाची दि. १३.०७.२०२३ रोजी नियुक्ती करण्यात आली. तसेच, गट-क तांत्रिक/अतांत्रिक व परीचर्या संवर्गातील सरळसेवेच्या कोट्यातील रिक्तपदे भरण्याची कार्यवाही टि.सी.एस.आय.ओ. एन. या कंपनीमार्फत सुरु असून, सदरील पदे लवकरच भरण्यात येतील.

सदर रुग्णालयातील स्त्रीरोग विभागात व बालरोग विभागात सर ज.जी समूह रुग्णालयामधील डॉक्टराची पदस्थापना करण्यात येत असल्याने स्त्रीरोग प्रसुतीशास्त्र विभागात गेल्या तीन महिन्यांत ४०४ रुग्णांवर व बालरोग विभागात ६०२ रुग्णांवर उपचार केले आहेत. तसेच रुग्णांना गंभीर व आणिबाणीच्या वेळी आवश्यक असेल तेव्हा सर ज.जी. समूह रुग्णालय, मुंबई येथे उपचाराकरिता पाठविण्यांत येते.

सेंट जॉर्जेस रुग्णालयातील मुख्यशस्त्रक्रियागृहाचे श्रेणीवर्धन करण्यात आले असून, मुख्यशस्त्रक्रियागृह रुग्णसेवेसाठी दिनांक १२/०७/२०२३ पासून सुरळीतपणे कार्यान्वित करण्यात आले आहे व जे विभाग मुख्यशस्त्रक्रियागृहाअभावी बंद पडलेले होते ते सर्व विभाग सुरु करण्यांची कार्यवाही संस्थास्तरावर सुरु आहे. तसेच कोविड काळात बंद केलेले रुग्णालयातील प्लास्टीक सर्जरी व लींग प्रत्यारोपन शस्त्रक्रिया विभागही कार्यान्वित करण्याची कार्यवाही संस्थास्तरावर चालू आहे.

**************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पावसाळी अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. ९२५

ॲड. अशोक पवार, मा.वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.

"पुणे जिल्ह्यातील ससून रुग्णालयामध्ये रुग्णांना आयसीयू, एनआयसीयू उपलब्ध नसल्याने रुग्ण नातेवाईकांची हेळसांड होणे, अनेक रुग्णांना ससून रुग्णालयात बेडअभावी उपचार न मिळता दुसऱ्या रुग्णालयात दाखल व्हावे लागणे, याकरीता लहान बाळांना एनआयसीयू उपलब्ध होणेकरीता एनआयसीयू बेड संख्या वाढविणे आवश्यक असणे, अतिआवश्यक सर्जरी वेळेवर होत नसल्याच्या तक्रारी रुग्ण नातेवाईकांकडून होत असल्याने या सर्जरींना प्राधान्य देणे आवश्यक असणे, आयसीयू व्हेन्टीलेटर बेड संख्या वाढविणे आवश्यक असणे, रुग्णांना सीटी स्कॅन, एमआरआय करीता नंबर लावावे लागतात त्यांना तातडीने सेवा उपलब्ध होत नसल्याने आजाराचे निदान लवकर न झाल्याने रुग्णांचा वेळ वाया जाऊन त्यांना मानसिक त्रास होणे, याकरिता सीटी स्कॅन, एमआरआय या मशीनरींची संख्या वाढविण्याची आवश्यकता असणे, तसेच इतर उच्च तपासण्या जदल गतीने होणेकरीता शासनाने याबाबत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे निवेदन

ससून सर्वोपचार रुग्णालय, पुणे येथे एकुण १२९६ रुग्णखाटा मंजूर आहेत.ससून सर्वोपचार रुग्णालयामध्ये औषधवैद्यकशास्त्र विभागांतर्गत एमआयसीयु मध्ये विविध आजारांवर उपचार करण्यात येतात. रुग्णालयातील २६ एमआयुसीयु मध्ये पुणे शहर, लगतचा परिसर व जवळपासच्या इतर जिल्हयातील संदर्भीत अतिगंभीर रुग्ण दाखल होतात. सद्यस्थितीत एमआयसीयु मध्ये बेडसची संख्या व मनुष्यबळ तसेच व्हेंटीलेटर व इतर यंत्रसामुग्री ही वैद्यकीय उपचारांसाठी पुरेशी आहे. रुग्णालयामध्ये दाखल होणाऱ्या अतिगंभीर रुग्णांवर आवश्यकतेनुसार एम.आय.सी.यु. मध्ये उपचार केले जातात. तसेच कोणत्याही रुग्णाला एमआयसीयु बेड उपलब्ध नसल्यामुळे बाहेरील रुग्णालयात उपचारासाठी पाठविण्यात आलेले नाही. ससून रुग्णालयातील एन.आय.सी.यु. हा ५९ बेडसचा अतिदक्षता कक्ष असून नवजात बालकांवर उपचार केले जातात. नवजात बालकांवर उपचार करण्यासाठी सरासरी १५ दिवस ते ३० दिवसांचा कालावधी लागतो . त्यामुळे काही वेळेस ससून रुग्णालयातील एन.आय.सी.यु. मध्ये बेडस उपलब्ध नसल्याने त्यांना इतर रुग्णालयात दाखल करावे लागते. ज्यावेळी एन.आय.सी.यु. मध्ये बेडस उपलब्ध होतात, त्यावेळेस अशा बालकांना पुन्हा ससून रुग्णालयातील एन.आय.सी.यु. मध्ये दाखल करण्यात येते. ससून सर्वोपचार रुग्णालयात बालरुग्णांसाठी पी.आय.सी.यु. हा १२ बेडसचा अतिदक्षता कक्ष आहे. येथील बेडसची संख्या, मनुष्यबळ तसेच यंत्रसामुग्री अतिगंभीर बालकांच्या वैदयकीय उपचारांसाठी पुरेशी आहे.

सर्जरी विभाग व अपघात विभाग (कॅज्युल्टी विभाग) येथे दाखल होणाऱ्या रुग्णांवर त्यांची वैद्यकीय तपासणी झाल्यानंतर आवश्यकतेनुसार व वेळेवर सर्जरी केल्या जातात.

ससून सर्वोपचार रुग्णालयामध्ये २ सी.टी.स्कॅन मशीन व १ एमआरआय मशीन उपलब्ध असून तीनही यंत्र सुस्थित कार्यान्वित आहेत. सदर यंत्राच्या एएमसी /सीएमसी करण्यात आलेल्या आहेत. तसेच या रुग्णालयातील सदर विभागामध्ये सीटी स्कॅन करणे आवश्यक असलेल्या रुग्णांची संख्या ही उपलब्ध यंत्राच्या क्षमतेपेक्षा जास्त असल्याने चाचणीकरीता येणाऱ्या रुग्णांपैकी अत्यवस्थ रुग्णांच्या प्राधान्याने तपासण्या केल्या जातात व इतर रुग्णांना पुढील दिनांक दिला जातो. परंतु कोणताही रुग्ण उपचारापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेण्यात येते.

ससून सर्वोपचार रुग्णालयामध्ये उपचारार्थ दाखल होणा-या रुग्णांच्या अडचणी विचारात घेता, नवीन १२८ स्लाईस सी.टी.स्कॅन मशीन व ३ टेस्ला एम.आर.आय. मशीन खरेदी करण्याकरीता शासन मान्यता देण्यात आली आहे. सदर दोन्ही मशीन खरेदी करण्याकरीता मे. हाफकीन बायोफॉर्म यांचेमार्फत खरेदी प्रक्रिया सुरु आहे. तसेच पीपीपी पध्दतीनुसार ससून सर्वोपचार रुग्णालयासह संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व रुग्णालयांमध्ये अतिरिक्त सी.टी. स्कॅन व एम.आर.आय. बसविण्याकरीताची कार्यवाही आय.एफ.सी. (इंटरनॅशनल फायनान्स कॉर्पोरेशन) यांचेमार्फत सुरु आहे.

****************

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे पावसाळी अधिवेशन
## लक्षवेधी सूचना क्र. ९३८

**श्री. सुभाष धोटे, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. विकास ठाकरे, श्री. सुनिल केदार, श्री. कुणाल पाटील, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. बळवंत वानखडे, श्री. अमीन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, श्री. अस्लम शेख, श्री. झीशान सिद्दिकी, प्रा. वर्षा गायकवाड, श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री. सुरेश वरपुडकर मा. वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.**

---

"चंद्रपूर हा औद्योगिक जिल्हा म्हणून ओळखला जात असून येथील उद्योगांमध्ये काम करणाऱ्या कामगारांची संख्या मोठी असणे, या जिल्ह्यात अपघात असो वा अन्य घटनांमध्ये जखमी झालेले नागरिक व अन्य आजारासाठी चंद्रपूर या जिल्हा स्थानी असलेल्या सामान्य रुग्णालयांत उपचाराठी येत असणे, तसेच लगतच्या गडचिरोली जिल्हा, तेलंगणा व आंध्रप्रदेशातील रुग्णसुध्दा मोठया संख्येने उपचारासाठी येत असणे, मागील काही दिवसांपासून औषधाचा साठा उपलब्ध नसल्यामुळे या रुग्णालयात उपचारासाठी येणाऱ्या रुग्णांना खासगी औषधे खरेदी करावी लागत असलयाची बाब माहे जुलै, २०२३ च्या दरम्यान केलेली असणे, त्यामुळे गरीब रुग्णांना आर्थिक भुर्दंड सहन करावा लागत असणे, चंद्रपूर शासकीय वैद्यकीय महाविद्यालयात रविवारी बाह्यरुग्णांची तपासणी होत नसणे, या रुग्णालयात इसीजी, एक्स-रे, सोनोग्राफी, सीटीस्कॅन, रक्त तपासणी या सेवा प्रमुख असून या सेवा अनेकदा बंद असल्याचे सांगण्यात येणे, शस्त्रक्रिया विभागात शस्त्रक्रिया वेळेवर होत नसणे, अनेकदा सलाईनसुध्दा उपलब्ध नसलयाची बाब निदर्शनास येणे, चंद्रपूर सामान्य रुग्णालयाला वैद्यकीय महाविद्यालयाचा दर्जा देण्याची मागणी होत असणे, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने चौकशी करुन चंद्रपूर सामान्य रुग्णालयाची दुरावस्था सुधारण्यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा. मंत्री (वै.शि.) यांचे निवेदन

चंद्रपूर जिल्हा हा औद्योगीक जिल्हा असून उद्योगामध्ये काम करणाऱ्या कामागाराची संख्या मोठया प्रमाणात आहे हे खरे आहे. तसेच चंद्रपूर जिल्हयाच्या सीमेला लागून गडचिरोली, तेलंगाना व आंध्र प्रदेशातील रुग्णसुध्दा शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, चंद्रपूर येथे योग्य निदान व उपचार होत असल्यामुळे मोठया प्रमाणात येतात. चंद्रपूर येथील सामान्य रुग्णालयास सन २०१५ पासून वैद्यकीय महाविद्यालयाचा दर्जा देण्यात आलेला असून सन २०१९ पासून १०० विद्यार्थी प्रवेश क्षमतेस राष्ट्रीय आयुविज्ञान परिषदेतर्फे मान्यता मिळाली आहे.

संस्थेतील औषधी भांडार विभागामध्ये रुग्णालयातील विविध विभागांची औषधाची मागणी एकत्रित करून सदर मागणी संचालनामार्फत मे. हाफकीन महामंडळ लि. मुंबई यांच्याकडे सादर करण्यात येते. हाफकिन महामंडळामार्फत निविदा प्रक्रिया राबविताना काही वेळेस तांत्रिक अडचणी उदभवतात तसेच औषधी व तत्सम बाबींचा पुरवठा हा टप्पाटप्याने होत असतो. शासन निर्णय दि.२६.१२.२०२२ अन्वये औषधे व सर्जिकल्स बाबीसाठी संस्थास्तरावर खर्च करण्याची मर्यादा १० टक्क्यांवरून ३० टक्के वाढविण्यात आली आहे. त्यामुळे संस्थास्तरावर औषध खरेदीसाठी पुरेसा निधी उपलब्ध होत आहे. तसेच, शासन निर्णय दि.०७.०३.२०२२ अन्वये औषधे व सर्जिकल्स

साहित्याकरिता निधी जिल्हा नियोजन योजनेतून उपलब्ध करून देण्यास मान्यता दिली आहे. त्यामुळे तातडीच्या प्रसंगी औषधे व सर्जिकल्स साहित्य जिल्हा नियोजन समिती, महात्मा फुले जन आरोग्य योजना व स्वीय प्रपंजी खात्यातून खरेदी करुन रुग्ण सेवा सुरळित ठेवण्यात येत आहे.

रुग्णालयातील बाहयरुग्ण विभाग हा २४ तास सुरु असतो. रुग्णालयात रविवारी सुध्दा रुग्ण बाहयरुग्ण विभागामध्ये व अपघात विभागामध्ये वैद्यकीय तज्ञामार्फत तपासणी करुन आवश्यकते नुसार औषधोपचार करण्यात येतो तथा रुग्णनिदान झाल्यानंतर आवश्यकतेनुसार रुग्णांना रुग्णालयात भरती करण्यात येते. तसेच रुग्णालयात इ.सी.जी. एक्स-रे, सोनोग्राफी, सीटी स्कॅन, रक्त तपासणी सेवा या २४ तास सुरू असतात व रुग्णांची आवश्यकतेनुसार तपासणी करण्यात येते. तसेच, रुग्णालयातील शस्त्रक्रिया विभागात शस्त्रक्रिया वेळेवर केल्या जातात व आपतकालीन शस्त्रक्रिया सुध्दा नियमितपणे होतात.

***************************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पावसाळी अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. १४५३

श्री. कैलास घाडगे पाटील, मा.वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.

---

"शासकिय वैदयकिय महाविदयाल, धाराशिव या संस्थेकरिता औदयोगिक प्रशिक्षण संस्था,धाराशिव व जलसंपदा विभाग, धाराशिव या संस्थेची जागा प्राप्त होण्याकरिताचा प्रस्ताव मा.जिल्हाधिकारी, धाराशिव यांनी प्रधान सचिव, वैदयकिय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मुंबई यांच्याकडे सादर करणे, तसेच या संस्थेचा रुग्णालयाचा पदनिर्मिती देखील शासन स्तरावर प्रलंबित असणे, सदर पदनिर्मितीची नस्ती मंजूरीअभावी वित्त विभागाकडे असणे, सांमजस्य करारानुसार जिल्हा रुग्णालयाची देयके माहे जुन,२०२२ पासून शासकिय वैदयकिय महाविदयालयाकडे वर्ग करण्यात येणे, मात्र पदनिर्मिती न झाल्यामुळे लेखाशिर्ष पुर्ण करता येत नसणे आणि या सर्व निधीची मागणीही अदयाप शासन दरबारी प्रलंबित असणे, सध्यस्थितीमध्ये सुरक्षा रक्षक, बायोमेडिकल वेस्ट,रुग्णालयातील पाकगृहातील आहारसंबंधीचे देयके,वीज व पाणी यांची देयके माहे जुन,२०२२ पासून प्रलंबित असून सदर रक्कम अंदाजे रु ५ ते ६ कोटी च्या घरात असणे, रुग्णालयाचे लेखाशिर्ष कार्यान्वित झाल्यास सदरहू वस्तू मिळाल्यास रुग्णसेवेकरिता सोईस्कर होणे, त्याचबरोबर लेखाशिर्ष कार्यान्वित नसल्याने सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव दैनंदिन दुरुस्ती व देखभालासाठी निधी उपलब्ध न होणे, सुरक्षा रक्षकाचा प्रस्तावाच्या अनुषगांने आढळून आलेल्या त्रुटीची पुर्तता करणबाबतची कार्यवाही मेस्को संस्थेकडून मागविली आलेली असून त्याबाबतचा प्रस्ताव अदयाप शासनास सादर न होणे, तसेच रुग्णालयाच्या आवारात पोलीस चौकशी सुरु करण्याबाबतची कार्यवाहीदेखील प्रलंबित असणे, तसेच सीटी स्कॅन व सी ऑर्म मशिन व ब्लड बँक अदयाप बंद असणे ,या सर्व रुग्णालयातील प्रलंबित प्रस्तावाबाबत शासन स्तरावर तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे निवेदन

उस्मानाबाद येथे १०० विद्यार्थी क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नित जिल्हा सामान्य रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन ४३० रुग्णखाटांचे रुग्णालय स्थापन करण्यास शासन निर्णय दिनांक २७.०१.२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली असून, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून १०० विद्यार्थ्यांना एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या प्रथम बॅचमध्ये प्रवेश देण्यात आला आहे.

दि.२७.०१.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव करीता सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील जिल्हा सामान्य रुग्णालय, स्त्री रुग्णालय आणि क्षय रुग्णालय अशी मिळून एकूण ३१६ खाटांचे रुग्णालय स्थावर जंगम मालमत्तेसह वैद्यकीय शिक्षण विभागास ३ वर्षाच्या कालावधीकरिता नि:शुल्क वापरण्यास दिनांक ०५ मे, २०२२ रोजीच्या समाजंस्य कराराद्वारे मान्यता दिली आहे.

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकानुसार वैद्यकीय महाविद्यालयासाठी एकाच ठिकाणी २० एकर जमिनीची आवश्यकता असून, जिल्हाधिकारी, धाराशिव यांनी सर्वे नं. ४२६ मधील २० एकर जमीन दि. १२.०७.२०२१ च्या आदेशान्वये मंजूर केली आहे. सदर जागेचे क्षेत्रफळ डोंगराळ, दरी, उंच सखल असून, रुग्णसेवेच्या दृष्टीने तसेच चिकित्सालयीन इमारती, ग्रंथालये, निवासस्थाने इ. करिता उपयुक्त नसल्याने, प्राचार्य, औदयोगिक प्रशिक्षण संस्था, धाराशिव व कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग, धाराशिव यांच्या मालकीची जमिन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव करिता उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी, धाराशिव यांनी प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव करीता वर्ग-१ ते वर्ग-४ ची एकूण ९८६ पदे निर्माण करण्यास दिनांक ०१.०८.२०23 रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सन २०२३-२४ या वित्तीय वर्षाकरीता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय करीता रु. ७.४६ कोटी एवढा निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला असून, उपलब्ध निधीतून प्रलंबित देयके अदा करण्यात येतील.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव येथे मेस्को संस्थेकडून सुरक्षारक्षक घेण्याच्या प्रस्तावामधील त्रुटीची पूर्तता केल्यावर सुरक्षारक्षक घेण्यात येतील. तसेच, संस्थेतील परिसरात पोलिस चौकी सुरु करण्यासंबंधी पोलिस अधिक्षक, धाराशिव यांना कळविण्यात आले आहे, तसेच सदर पोलिस चौकी करीता संस्थेतील परिसरातील सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असलेले रुम संस्थेला हस्तांतरित करण्यासंबंधीची कार्यवाही संस्थास्तरावर सुरु आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव येथील CT SCAN/C-ARM मशीन/बल्ड बँक कार्यान्वित करण्यासंबंधी AOV कंपनीसोबत संचलनालय स्तरावर करार करण्यात आला असून, सदर कंपनीच्या अभियंता मार्फत उपरोक्त यंत्रसामुग्रीची पाहणी व दुरुस्तीबाबत कार्यवाही चालू आहे.

*************************

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पावसाळी अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र. १४६६

**श्री. राणाजगजीतसिंह पाटील, मा.वि.स.स यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.**

---

"धाराशिव येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय स्थापन करण्याच्या अनुषंगाने दिनांक १६ जून, २०२३ रोजी धाराशिव जिल्ह्याच्या दौऱ्यावर असताना प्रस्तावित जागेची प्रत्यक्ष पाहणी राज्याचे उपमुख्यमंत्री यांनी केलेली असणे, धाराशिव येथे शासकीय वैद्यकीय महाविद्यालय सुरु झालेले असून १०० एम.बि.बी.एस. विद्यार्थी क्षमतेस मान्यता मिळालेली असणे तात्पुरत्या स्वरुपात जिल्हा सामान्य रुग्णालयात हे महाविद्यालय कार्यान्वित झाले असणे, राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकांनुसार आवश्यक त्या पायाभूत सुविधा, इमारत बांधकाम करण्यासाठी एकाच ठिकाणी २५ एकर जमिनीची आवश्यकता असणे, त्यामुळे जिल्हा सार्वजनिक रुग्णालय येथील जागा अपुरी असणे, इमारत बांधकाम करण्यासाठी जागेची नितांत आवश्यकता असणे, औद्योगिक प्रशिक्षण संस्था येथील एकुण जमिनीचा भूखंड, रुणाच्या खाटांची संख्या, प्रशासकीय इमारत, शैक्षणिक विभागाच्या प्रयोगशाळा, विद्यार्थी वसतिगृह, निवासस्थाने इत्यादि सर्व पायाभूत सुविधा तसेच वैद्यकीय शिक्षण संकुल एकाच ठिकाणी उभारण्यासाठी परिपूर्ण असणे, तसेच या जमिनीलगत असलेला जलसंपदा विभागाचा भूखंड आगामी काळात वैद्यकीय शिक्षण संकुलाच्या वाढीव कामाच्या अनुषंगाने अत्यंत उपयुक्त असणे, संचालक, वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभाग, मुंबई यांच्या दिनांक २६ जानेवारी, २०२३ रोजीच्या प्रत्यक्ष पाहणी दौऱ्यादरम्यान सर्व सोई सुविधाच्या बाबतीत विचार करता उपरोक्त दोन्ही विभागाच्या जमिनी अपेक्षित असल्याचे मत असणे, या सर्व बाबींचा विचार करून शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या अधिष्ठाता डॉ. शिल्पा डोमकुंडवार यांनी जिल्हाधिकारी यांच्याकडे सदर जमीन उपलब्ध करून देणेबाबत विनंती केलेली असणे, जिल्हाधिकारी यांच्याकडून याबाबतचा प्रस्ताव शासनाकडे सादर करण्यात केलेला असणे, मेडिकल कॉलेज साठी पदनिर्मिती नसणे, जिल्हा वार्षिक योजनेत लेखाशीर्ष मंजूर असूनही पदनिर्मिती नसल्याने मंजूर निधी खर्च करण्यात अडचणी येत असणे, जिल्हा रुग्णालयाच्या प्रलंबित देयकांसाठी तातडीने निधीची आवश्यकता असणे, उत्तरी राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानांकनाकानुसार तसेच अनावश्यक खर्च होणे, टाळण्यासाठी शिवाय भविष्याच्या दृष्टिकोनातून सर्व जनसामान्यांना, रुग्णांना, विद्यार्थ्यांना देण्यात येणाऱ्या सर्व सोई सुविधांच्या बाबतीत विचार करता धाराशिव येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय तथा वैद्यकीय शिक्षण संकुलासाठी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची ३० एकर व जलसंपदा विभागाची २० एकर जागा उपलब्ध करून देण्याच्या प्रस्ताव शासनाच्या मंजुरीसाठी पाठविण्यात आलेला असणे, औद्योगिक प्रशिक्षण संस्थेसाठी केवळ ५ एकर जागेची असणे, शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालयाकडे अधिकच्या उपलब्ध २० एकर जागेमध्ये औद्योगिक प्रशिक्षण संस्था स्थलांतरित करण्यास वाव असणे, वैद्यकीय महाविद्यालयात पदनिर्मिती करणे व प्रलंबित देयकांचा निधी रु.६ कोटी देणे अत्यावश्यक असणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा.मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे निवेदन

उस्मानाबाद येथे १०० विद्यार्थी क्षमतेचे नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व त्यास संलग्नित जिल्हा सामान्य रुग्णालयाचे श्रेणीवर्धन करुन ४३० रुग्णखाटांचे रुग्णालय स्थापन करण्यास शासन निर्णय दिनांक २७.०१.२०२१ अन्वये मान्यता देण्यात आली असून, शैक्षणिक वर्ष २०२२-२३ पासून १०० विद्यार्थ्यांना एमबीबीएस अभ्यासक्रमाच्या प्रथम बॅचमध्ये प्रवेश देण्यात आला आहे.

दि.२७.०१.२०२१ रोजीच्या शासन निर्णयान्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव करीता सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अखत्यारितील जिल्हा सामान्य रुग्णालय, स्त्री रुग्णालय आणि क्षय रुग्णालय अशी मिळून एकूण ३१६ खाटांचे रुग्णालय स्थावर जंगम मालमत्तेसह वैद्यकीय शिक्षण विभागास ३ वर्षाच्या कालावधीकरिता नि:शुल्क वापरण्यास दिनांक ०५ मे, २०२२ रोजीच्या समाजंस्य कराराद्वारे मान्यता दिली आहे.

राष्ट्रीय आयुर्विज्ञान आयोगाच्या मानकानुसार वैद्यकीय महाविद्यालयासाठी एकाच ठिकाणी २० एकर जमिनीची आवश्यकता असून, जिल्हाधिकारी, धाराशिव यांनी सर्वे नं. ४२६ मधील २० एकर जमीन दि. १२.०७.२०२१ च्या आदेशान्वये मंजूर केली आहे. सदर जागेचे क्षेत्रफळ डोंगराळ, दरी, उंच सखल असून, रुग्णसेवेच्या दृष्टीने तसेच चिकित्सालयीन इमारती, ग्रंथालये, निवासस्थाने इ. करिता उपयुक्त नसल्याने, प्राचार्य, औदयोगिक प्रशिक्षण संस्था, धाराशिव व कार्यकारी अभियंता, जलसंपदा विभाग, धाराशिव यांच्या मालकीची जमिन शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव करिता उपलब्ध करुन देण्याबाबत जिल्हाधिकारी, धाराशिव यांनी प्रस्ताव शासनास सादर केला आहे. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने पुढील कार्यवाही शासनस्तरावर सुरु आहे.

शासन निर्णय दिनांक २७ मे, २०२१ अन्वये शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, धाराशिव करीता वर्ग-१ ते वर्ग-४ ची पदे व विद्यार्थी पदे अशी एकूण ४४८ पदे चार टप्प्यात निर्माण करण्यास मंजूरी प्रदान केली आहे. तसेच, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, धाराशिव करीता वर्ग-१ ते वर्ग-४ ची एकूण ९८६ पदे निर्माण करण्यास दिनांक ०१.०८.२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली आहे. सन २०२३-२४ या वित्तीय वर्षाकरीता शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय करीता रु. ७.४६ कोटी एवढा निधी अर्थसंकल्पीत करण्यात आला असून, उपलब्ध निधीतून प्रलंबित देयके अदा करण्यात येतील.

*************************

वैद्यकीय शिक्षण विभाग

लक्षवेधी सूचना क्र- १८२२

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन**

**मा. श्री. ओमप्रकाश उर्फ बच्चू कडू, वि.स.स. यांनी विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र- १८२२ :-**

"महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद या राज्य शासनाच्या स्वायत्त संस्थेच्या निवडणुकीत मोठा गैरप्रकार झाल्याच्या अनेक तक्रारी करण्यात येणे, या संस्थेच्या निवडणुकीची प्रक्रिया कायद्याने निश्चित असतानाही कक्ष अधिकारी स्तरावरून मतदानाविषयक नियमांमध्ये बदल करण्यात येणे, कायद्यातील बदल मंत्रालयीन अधिकाऱ्यांच्या माध्यमातून करण्यात आल्यामुळे विधिमंडळाच्या अधिकारावर अतिक्रमण होणे तसेच असे बदल अवैध असल्याने अशा बेकायदेशीर नियमानुसार झालेल्या निवडणुकाही अवैध असणे, या निवडणुकीसाठी नियुक्त निवडणूक निर्णय अधिकारी यांनी कोणतीही आचारसंहिता जाहीर न करणे, निवडणुकीच्या वेळापत्रकात परस्पर बदल करणे, लाखो मतदार या गोंधळामुळे मतदानापासून वंचित राहणे, मतपत्रिका खाजगी मेडिकल शॉप मध्ये आढळून असल्याने सिन्नर येथे गुन्हा दाखल होणे, त्याचप्रमाणे या बेकायदेशीर पणे निवडून आलेल्या कौन्सिल मार्फत कोटयवधी रुपयांचा भ्रष्टाचार होणे, यासंदर्भात राज्य शासनाकडे अनेक तक्रारी येऊनही कोणतीही कारवाई न होणे, या प्रकारामुळे राज्यातील औषध व्यवसायिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष, राज्य शासनाने तातडीने ही बेकायदेशीर परिषद बरखास्त करून याप्रकरणी दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, शासनाची प्रतिक्रिया"

---

**मा. मंत्री (वैद्यकीय शिक्षण) यांचे निवेदन**

महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषदेचे गठन केंद्र शासनाच्या औषध व्यवसाय अधिनियम, १९४८ मधील कलम १९ नुसार होते. त्यानुसार महाराष्ट्र औषध व्यवसाय परिषदेत राज्यात नोंदणीकृत औषधव्यवसायींमधून निर्वाचित ०६ सदस्य, शासनाकडून नामनिर्देशित ०५ सदस्य, महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या सदस्यांमधून निर्वाचित ०१ सदस्य व पदसिद्ध ०३ सदस्य अशाप्रकारे १५ सदस्यांचा समावेश होतो.

महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद नियम, १९६९ मधील नियम ४ ते २४ नुसार परिषदेच्या निवडणूका घेण्यात येतात. सदर नियमातील नियम १५ नुसार पोस्टल बॅलेटद्वारे निवडणूका घेण्याची तरतूद आहे. नियम १७ नुसार मतपत्रिका under certificate of posting पद्धतीने मतदारांना पाठविण्याची तरतूद आहे. तथापि Under certificate of posting ची सुविधा पोस्ट खात्याने दिनांक ३१.०१.२०११ पासून बंद केल्यामुळे व सदर सुविधेस पर्यायी व्यवस्था पोस्ट खात्यामार्फत उपलब्ध केली नसल्याने दिनांक २७ मे, २०११ रोजीच्या शासन पत्रान्वये मतदारांना मतपत्रिका साध्या पोस्टाने पाठविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. अशाप्रकारे निवडणूका होऊन शासन अधिसूचना दिनांक २९.११.२०१२ अन्वये परिषद गठीत झालेली होती व तिचा कार्यकाल दिनांक २८.११.२०१७ रोजी पूर्ण झालेला आहे. सन २०२२ मध्ये पार पडलेल्या निवडणूकांच्या अनुषंगाने शासन आदेश दिनांक १०.०२.२०२० आणि दिनांक १२.०४.२०२२ अन्वये अनुक्रमे निवडणूक निर्णय अधिकारी

(Returning officer) व निवडणूक निरीक्षक अधिकारी यांची नियुक्ती करण्यात आली होती. सदर निवडणूक प्रक्रियेस शासनाकडे तक्रारी किंवा आक्षेप प्राप्त नाहीत. निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिनांक १८.०१.२०२२ रोजीच्या अधिसूचनेनुसार तसेच दिनांक १८.०१.२०२२ रोजी वर्तमानपत्रात निवडणूक कार्यक्रम जाहीर करून निवडणूक प्रक्रिया पार पाडली आहे. तसेच महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या संकेतस्थळावर निवडणूक प्रक्रियेस आवश्यक ती प्रसिद्धी दिलेली आहे. निवडणूक प्रक्रियेदरम्यान निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांकडे प्राप्त झालेल्या तक्रारींचे त्याचवेळी निराकरण करून निवडणूक प्रक्रिया पार पाडली असून निर्वाचित उमेद्वारांची यादी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी शासनास दिनांक २७.०६.२०२२ च्या पत्रान्वये सादर केली आहे.

तद्नंतर दिनांक १५.०७.२०२२ व दिनांक २२.०७.२०२२ रोजीच्या पत्रांन्वये परिषदेच्या निवडणूक प्रक्रियेत अनियमितता झाल्यासंदर्भात तक्रारी प्राप्त झालेल्या आहेत. त्याअनुषंगाने निवडणूक निर्णय अधिकारी यांचा खुलासा घेण्यात आला आहे. सदर खुलासा व प्राप्त तक्रारी महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद नियम, १९६९ मधील निवडणूकीसंदर्भातील तरतूदीनुसार तपासुन त्यावर विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेतल्यानंतर दिनांक १४.७.२०२३ रोजीच्या अधिसूचनेअन्वये पाच वर्षाच्या कालावधीसाठी परिषद गठीत करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद नियम, १९६९ मधील तरतूदीमध्ये निवडणूकांकरीता आचारसंहिता जाहीर करण्याची तरतूद नसल्याने निवडणूक निर्णय अधिकारी (Returning officer) यांनी आचारसंहिता जाहीर करण्याची आवश्यकता नाही. परिषदेच्या निवडणूका निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी दिनांक १८.०१.२०२२ रोजीच्या राजपत्रात जाहीर केलेल्या कार्यक्रमानुसार पार पडल्या आहेत त्यामुळे मतदार मतदानापासून वंचित राहण्याचा प्रश्न निर्माण होत नाही. सिन्नर येथे सापडलेल्या मतपत्रिका प्रकरणी निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी गुन्हा नोंदविला आहे. सद्य:स्थितीत निर्वाचित सदस्यांबाबत अथवा अस्तित्वात आलेल्या परिषदेच्या भ्रष्टाचाराबाबत शासनाकडे कोणतीही तक्रार प्राप्त नाही.

परिषदेच्या निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांनी (Returning officer) मतदारांना साध्या पोस्टाने मतपत्रिका पाठविण्याच्या कार्यपद्धतीवर आक्षेप घेऊन मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे रिट याचिका क्र. ७२०३/२०२२ दाखल केली होती. तथापि, परिषदेची निवडणूक प्रक्रियेचा निकाल जाहीर करण्याचा अंतिम टप्पा तसेच औषध व्यवसाय अधिनियम, १९४८ मधील कलम २४ मधील राज्यशासनाचे अधिकार विचारात घेता, सदर प्रकरणी मा. उच्च न्यायालयाने हस्तक्षेप करण्यास नकार दिलेला आहे. तसेच मा. उच्च न्यायालय, मुंबई खंडपीठ, औरंगाबाद येथेही दाखल रिट याचिका क्र. १३९००/२०२२ मध्ये निवडणूक विवाद असल्याकारणाने याप्रकरणी सहा महिन्यात शासनाने निर्णय घेण्याचे निर्देश देऊन याचिका दिनांक २२.११.२०२२ रोजी निकाली काढली आहे. तक्रारदारांनी शासनाकडे दिनांक १५.०७.२०२२ व दिनांक २२.०७.२०२२ अन्वये दाखल केलेल्या तक्रारींची शहानिशा करून औषध व्यवसाय अधिनियम, १९४८ मधील कलम २४ नुसार दि.१४ जुलै, २०२३ च्या अधिसूचनेअन्वये महाराष्ट्र राज्य औषध व्यवसाय परिषद गठित करण्यात आली आहे.

************************************************************

लक्षवेधी सुचना

## महाराष्ट्र विधानसभा सन २०२३ चे व्दित्तीय अधिवेशन

डॉ. विनय विलासराव कोरे (सावकर), श्री. राजु (बाबा) जयवंतराव आवळे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

"२००१ पूर्वी महाराष्ट्रात ८९ शिक्षण शास्त्र (बी.एड.) महाविद्यालयांची स्थापना झालेली असणे, महाराष्ट्र राज्यातील एकूण १० विद्यापीठांमधील ८९ शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना मागील ४७ वर्षापासून अनुदान मंजूर झालेले नसणे, २४ नोव्हेंबर २००१ नंतर शासनाने कायम विनाअनुदानित धोरण स्वीकारलेले असणे, तथापि २००१ पूर्वी स्थापना झालेल्या ८९ शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना शासनामार्फत १००% अनुदान मिळावे या प्रमुख मागणीसाठी विनाअनुदानित शिक्षण शास्त्र महाविद्यालय प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेतर कर्मचारी असोसिएशन मार्फत २१ फेब्रुवारी २०२३ पासून आझाद मैदान मुंबई येथे धरणे आंदोलन करत असणे, या आंदोलनाची दखल शासनाने घेतलेली नसणे, २०१३ पासून शासनाने या महाविद्यालयांना अनुदान देण्यासंदर्भात सकारात्मक विचार करून बैठकांचे आयोजन करणे, महाविद्यालयांची माहिती मागविणे, तपासण्या करणे, इत्यादी प्रक्रिया पूर्ण केलेल्या असणे, तसेच सन २०१४ मध्ये शिक्षण खात्याने सकारात्मक शिफारस सुद्धा केलेली असणे, तसेच २००१ पूर्वीच्या विधी या व्यावसायिक महाविद्यालयांनाही शासनाने अनुदान दिलेले असणे, तथापि शिक्षकांना घडविणाऱ्या शिक्षकांवरच अन्याय होत असणे, त्यामुळे शिक्षण शास्त्र महाविद्यालयातील शिक्षकांना अनुदाना अभावी / पगाराअभावी आर्थिक विवंचनेचा सामना करावा लागत असणे, त्यामुळे २००१ पूर्वीच्या शिक्षण शास्त्र महाविद्यालयांना १०० टक्के अनुदान मंजूर करणे, याबाबत शासनाने प्राधान्याने लक्ष घालण्याची गरज, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाय योजना

## श्री. चंद्रकांत पाटील, मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांचे निवेदन

विनाअनुदानित शिक्षणशास्त्र महाविद्यालय प्राचार्य, प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी असोसिएशन, कल्याण जि.ठाणे या संघटनेने दि. २४ नोव्हेंबर, २००१ पूर्वीच्या शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना अनुदान मंजूर करण्याची विनंती केली होती.

संचालक, उच्च शिक्षण महाराष्ट्र राज्य पुणे यांनी कायम विनाअनुदानित तत्वावरील शिक्षणशास्त्र महाविद्यालयांची तपासणी करुन या महाविद्यालयांना अनुदान मंजूर करण्याचा प्रस्ताव शासनास सादर केला होता. तथापि सदर महाविद्यालयांना देण्यात आलेली मान्यता कायम विनाअनुदानित तत्वावरील असून सन २००१ पासून शासनाने कायम विनाअनुदान धोरणाचा स्विकार केलेला आहे. ही बाब विचारात घेता राज्यातील शिक्षणशास्त्र महाविद्यालयांना अनुदान देय ठरत नाही.

-------------------

रोटा H/1007 (750-8-23)

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन

**लक्षवेधी सुचना क्र.**

मा. श्री. अस्लम शेख, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. बाळासाहेब थोरात, प्रा. वर्षा गायकवाड, श्री अमिन पटेल, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. संग्राम थोपटे, श्री. कुणाल पाटील, श्री. विकास ठाकरे, श्री. बळवंत वानखेडे, श्री. संजय जगताप, श्री.विश्वजित कदम, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम -१०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. --- पुढीलप्रमाणे आहे.

"सर जे.जे.स्कूल ऑफ आर्ट, छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस, मुंबई या शैक्षणिक संस्थेला गेल्या १५० वर्षाची पंरपरा लाभली असणे,मागील अनेक वर्षापासून विविध विभागात कायम स्वरूपी आणि पुर्ण वेळ शिक्षक नसणे, संस्थेत शिल्पकला, मेडिलिंग, इंटेरिअर डेकोरेटर्स, रेखाचित्र, चित्रकला, टेक्सटाइल, डिझाईन, धातुकाम , सिरॅमिक्स असे विविध विभाग असणे मात्र या विभागात पुर्ण वेळ शिक्षक नसणे, संस्थेत मुलभुत व पायाभूत सुविधा मिळत नसणे,त्यामुळे विद्यार्थ्यांना अभ्यास करणे कठीण झाले असणे, राज्याच्या काणा कोपऱ्यातून विद्यार्थी प्रवेश घेत असणे, मेटल वर्क अभ्यासक्रम व स्टुडियोज फाऊंडरी कोर्स बंद असून सदरचे अभ्यासक्रम पुन्हा चालू करण्याची आवश्यकता निर्माण झाली असणे, त्याचप्रमाणे विद्यार्थ्यांचे वसतीगृह तातडीने सुरू करण्याची आवश्यकता असणे, नुतनीकरणाच्या नावाखाली विविध विभाग बंद पाडण्यात आले असणे या मागण्यासंदर्भात विद्यार्थ्यांनी व विद्यार्थी संघटनांनी दिनांक १८ नोव्हेंबर, २०२२ पासून आंदोलन व उपोषण सुरू केले असणे, २५० ते ३०० विद्यार्थ्यांनी कॅम्पस मध्येच उपोषणास बसले असणे तसेच सत्याग्रह करीत असणे त्याचप्रमाणे अनेक विद्यार्थी संपावर गेले असणे, या सर्व बाबीकडे शासनाने केलेले अक्षम्य दुर्लक्ष परिणामी विद्यार्थ्यात निर्माण झालेला तीव्र असंतोष व शासनाप्रती निर्माण झालेली चिडीची भावना, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व तातडीची उपाययोजना व शासनाची प्रतिक्रीया "

---

**श्री. चंद्रकांतदादा पाटील मा.मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण )यांचे निवेदन**

सर ज.जी.कला महाविद्यालय या शैक्षणिक संस्थेची स्थापना सन १८५७ मध्ये झालेली असून सदर संस्थेला सुमारे १६६ वर्षांची परंपरा लाभलेली आहे. सदर शासकीय कला संस्थेमध्ये रेखा व रंगकला, शिल्पकला, इंटेरीअर डेकोरेशन, मातकाम, वस्त्रकाम, धातूकाम हे पदवी व पदव्युत्तर तसेच शिल्पकला, कला शिक्षक प्रशिक्षण, कला शिक्षणशास्त्र हे पदविका अभ्यासक्रम शिकविले जातात.

कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील ४ शासकीय कला महाविद्यालयांसाठी उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.एडीआर-२०१९/प्र.क्र.१४/तांशि-६, दि.०८/०७/२०२० अन्वये अखिल भारतीय तंत्र शिक्षण परीषदेच्या निकषानुसार १५९ अध्यापकीय पदे नव्याने निर्माण करण्यात

आली आहेत. त्यापैकी १५० पदे भरण्याकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडे मागणीपत्र सादर करण्यात आले असून या पदांची जाहीरात लवकरच प्रसिध्द करण्यासाठी पाठपुरावा सुरू आहे. या १५० पदांमध्ये सर ज.जी कला महाविद्यालयातील ४३ इतक्या पदांचा समावेश आहे.

तथापि, विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये म्हणून नियमित अध्यापकांव्यतिरिक्त तासिका तत्त्वावर, हंगामी व कंत्राटी स्वरुपात अध्यापक नियुक्त करुन शैक्षणिक कामकाज सुरळीतपणे सुरु ठेवण्यात आले आहे. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| महाविद्यालय | मंजूर अध्यापकीय पदे | कार्यरत अध्यापक संख्या | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | नियमित | हंगामी | कंत्राटी | तासिका तत्त्वावर | एकूण |
| सर ज. जी. कला महाविद्यालय, मुंबई | ४४ | ८ | ५ | ९ | ११ | ३३ |

तासिका तत्वावर हंगामी व कंत्राटी स्वरूपात नियुक्त करण्यात आलेले अध्यापक हे संस्थेत पूर्णवेळ शैक्षणिक कामकाज करीत आहेत. त्यामुळे पुर्णवेळ अध्यापकांअभावी विद्यार्थ्यांचे कोणतेही शैक्षणिक नुकसान होत नाही.

सर ज.जी.कला महाविद्यालय या शासकीय कला संस्थेतील रे-आर्ट वर्कशॉपचे नुतनीकरण करण्यासाठी रू ५,३६,९८,६४९/- इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे.सदर नुतनीकरणा..मधून विद्यार्थ्यांना सुसज्ज वर्गखोल्या तसेच स्वच्छतागृहे बांधण्यात आलेली आहेत. सन २०२२-२३ मध्ये संगणक, सॉफ्टवेअर खरेदीसाठी रु.१,८१,९७,५००/- इतक्या रकमेस वित्तिय मान्यता देण्यात आलेली असून कला संचालनालयाकडून ६४ संगणक व १२७ सॉफ्टवेअर खरेदी करण्यात आलेले आहेत. सर ज.जी.कला महाविद्यालय व सर ज.जी.उपयोजित कला महाविद्यालय येथील ग्रंथालयामध्ये अभ्यासक्रमांसंदर्भात विविध पुस्तके व शैक्षणिक साहित्य उपलब्ध असून विद्यार्थी त्यांचा उपयोग करीत आहेत. तसेच, फाऊंड्रीचे नुतनीकरण करण्यात आले असून ते नियमितपणे सुरु आहे. सदर संस्थेत शिकविले जाणारे सर्व पदवी, पदविका अभ्यासक्रम सद्यस्थितीत सुरु असून कोणताही अभ्यासक्रम बंद झालेला नाही.सबब, शैक्षणिक वर्ष २०२३-२४ चे वर्ग सुरळीतपणे सुरु असून विद्यार्थ्यांची कोणतीही गैरसोय होत नाही.

कला संचालनालयाच्या अधिपत्याखालील मुंबई येथील सर ज.जी.कला महाविद्यालय व सर ज.जी.उपयोजित कला महाविद्यालय या दोन्ही संस्थेतील विद्यार्थ्यांसाठी कला नगर, वांद्रे येथील वसतिगृह इमारत वास्तव्यास धोकादायक झाल्याने सदर इमारत पाडून त्या ठिकाणी विद्यार्थी व विद्यार्थीनींसाठी अद्ययावत सोयी सुविधांसह सुसज्ज अशी इमारत उभारण्याचे प्रस्तावित आहे. त्यास अनुसरुन सदर जीर्ण झालेल्या इमारतीच्या पाडकामासाठी रू ६२,०५,७२१ इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता देण्यात आलेली आहे. त्यामुळे विद्यार्थी/विद्यार्थीनींची निकड लक्षात घेऊन उच्च शिक्षण संचालनालयाच्या अखत्यारितील तेलंग मुलींचे वसतिगृह,मुंबई येथे

विद्यार्थीनींना व मातोश्री मुलांचे वसतिगृह, मुंबई येथे विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन त्यांची तात्पुरती निवासव्यवस्था करण्यात आलेली आहे. तसेच, २०२३-२४ पासून सदर विद्यार्थी/विद्यार्थीनींच्या प्रवेशित अभ्यासक्रमाचा कालावधी पूर्ण होईपर्यंत संबंधित विद्यार्थ्यांना वसतिगृहात दिलेला प्रवेश पुढे सलग चालू ठेवण्यात आला आहे.

सर ज.जी.कला महाविद्यालय, मुंबई येथील विद्यार्थ्यांनी त्यांच्या विविध समस्यांसंदर्भात माहे नोव्हेंबर,२०२२ मध्ये आंदोलन सुरु केले होते. त्यास अनुसरुन मा.मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण, यांचेकडे तातडीने दि.२४ नोव्हेंबर,२०२२ रोजी बैठक पार पडली. सदर बैठकीमध्ये मा.मंत्री महोदयांनी दिलेल्या निदेशानुसार विद्यार्थ्यांच्या मागण्यांच्या अनुषंगाने आवश्यक त्या पायाभूत सुविधा, शैक्षणिक यंत्रसामग्री व साधनसामग्री उपलब्ध करुन देण्यात आली आहे.

---------------------x--------------------

लक्षवेधी सूचना

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन

डॉ.भारती लव्हेकर, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे. :-

"मुंबईतील सावित्रीबाई फुले वसतिगृहातील एका विद्यार्थीनीच्या प्रकरणाच्या पार्श्वभीवर राज्यातील सर्व वसतिगृहातील मुलीच्या सुरक्षेला प्राधान्य दिले जाईल असे आश्वासन पावसाळी अधिवेशन २०२३ मध्ये दिलेले असणे, त्यानुषंगाने सुरक्षेच्या कारणास्तव सवित्रीबाई फुले वसतिगृह पाडून नवीन १० मजली इमारत बांधण्याचे प्रस्तावित असणे, चर्चगेट येथील एकमेव मुलींचे तेलंग वसतिगृह देखील पूर्ण क्षमतेने भरलेले असणे, त्यामळे सदर वसतिगृहातील सुमारे ४५० पेक्षा अधिक विद्यार्थीनींना वांद्रे पूर्व येथिल शासकीय वसाहतीत सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारित असलेल्या नव्याने बांधण्यात आलेल्या इमारतीत स्थलांतरीत करण्याचे उच्च व तंत्र शिक्षण विभागाचे प्रस्तावित असणे, परंतु सदर इमारतीचे बांधकाम हे बांधून पूर्ण झालेले असले तरी सदर इमारतींना असून भोगवटा प्रमाणपत्र मिळालेले नसणे अद्यापि तेथे वीज,पाणी व इतर मुलभूत सुविधांची वाणवा असणे, त्यामुळे विद्यर्थीची मोठया प्रमाणावर गैरसोय होण्याची शक्यता असणे, तरी याप्रकरणी उक्त वसतिगृहातील विद्यार्थीनींना इतरत्र सोयीच्या ठिकाणी व्यवस्था करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

### श्री.चंद्रकांत पाटील, मा.मंत्री ( उच्च व तंत्र शिक्षण) यांचे निवेदन

सावित्रीदेवी फुले छात्रालय, चर्नी रोड, मुंबई येथे दिनांक ०६.०६.२०२३ रोजी घडलेल्या दुदैवी घटनेच्या पार्श्वभूमीवर राज्यातील सर्व शासकीय वसतिगृहांची सुरक्षा तपासणी करुन अहवाल सादर करण्यासाठी शासन निर्णय, दि.७.६.२०२३ अन्वये संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली. सदर समितीच्या अहवालानुसार सर्व वसतिगृहांच्या सुरक्षेच्या दृष्टीकोनातून वसतिगृहांच्या परिसरात अद्ययावत सी.सी.टी.व्ही. कॅमेरे लावण्याच्या निर्देशासह अन्य करावयाच्या उपाययोजनांबाबत शासन निर्णय, दि.२८.६.२०२३ अन्वये विस्तृत निर्देश देण्यात आलेले आहेत. सावित्रीदेवी फुले छात्रालय, चर्नी रोड, मुंबई या वसतिगृहाची इमारत सी-१ प्रवर्गातील असल्याने इमारत तात्काळ रिक्त करुन पाडणेबाबत मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मुंबई यांच्या दि.०२/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये अभिप्राय देण्यात आले आहेत. यास अनुसरुन सदर दुरुस्तीयोग्य नसलेली वसतिगृह इमारत पाडून त्या ठिकाणी नवीन इमारत बांधणेबाबत कार्यवाही सुरु आहे. सावित्रीदेवी फुले महिला छात्रालयातील विद्यार्थीनींच्या सुरक्षेच्या दृष्टीने तेथे राहत असलेल्या १४३ विद्यार्थीनींना तेलंग मुलींचे वसतिगृह, चर्चगेट, मुंबई येथे स्थलांतरीत करण्यात आले आहे. तेलंग मुलींच्या वसतिगृहांची एकूण प्रवेश क्षमता २५० विद्यार्थीनींची असून सद्य:स्थितीत तेलंग वसतिगृहातील एकूण ८७ विद्यार्थीनी व सावित्रीदेवी फुले महिला छात्रालयातील स्थलांतरीत १४३ विद्यार्थीनी अशा एकूण २३० विद्यार्थीनी तेलंग वसतिगृहात वास्तव्य करीत आहेत.

सावित्रीदेवी फुले छात्रालय, चर्नी रोड, मुंबई येथील इमारत राहण्यास योग्य नसल्यामुळे संभाव्य जिवितहानी टाळण्यासाठी वसतिगृहातील विद्यार्थीनींच्या निवासासाठी पर्यायी सुयोग्य व्यवस्था उपलब्ध होण्याच्या दृष्टीने वांद्रे (पूर्व ), मुंबई येथील शासकीय कर्मचारी निवासासाठी बांधण्यात येणाऱ्या इमारतीपैकी पुर्णत्वास आलेल्या एका इमारतीची ताबा सावित्रीदेवी फुले महिला छात्रालय, मुंबई या वसतिगृहाच्या नवीन

इमारतीचे बांधकाम पूर्ण होईपर्यंतच्या कालावधीसाठी तात्पूरत्या स्वरुपात उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडे देण्याबाबत निर्णय घेण्यात आला आहे. सदर बाब विचारात घेवून वांद्रे (पूर्व) मुंबई येथील पुर्णत्वास आलेल्या इमारतीपैकी सावित्रीदेवी फुले महिला छात्रालय, मुंबई करीता उपलब्ध होणाऱ्या इमारतीस पर्यावरण विभागाची मान्यता प्राप्त करणे व या इमारतीचा भोगवटा प्रमाणपत्र प्राप्त करणे याबाबतची कार्यवाही तात्काळ पूर्ण करण्याबाबत संबंधितांना निर्देश देण्यात आले आहेत. सदर वसतिगृहासाठी उपलब्ध होणाऱ्या इमारतीमधील सदनिका हया स्नानगृह, शौचालय, पंखे, लाईट, नळ इत्यादी सुविधांसह सुसज्ज असून वास्तव्यास येणाऱ्या विद्यार्थीनीकरीता आवश्यक फर्निचर,सुरक्षा भिंत व अन्य आवश्यक सुविधा उपलब्ध करुन देणेबाबतची कार्यवाही सुरु आहे.

——++++——

# महाराष्ट्र विधानसभा

## लक्षवेधी सूचना क्रमांक ११८७

## सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**मा. श्री.रोहित पवार , विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

" सन २०१८-१९ सन २०१९-२० वर्षात अहमदनगर जिल्ह्याचा टंचाई आराखडा शासनास सादर करण्यात आला होता त्या अनुषंगाने अहमदनगर जिल्ह्याकरिता अनुदान मंजूर करण्यात येणे,अनुदान वितरणासाठी शासनाच्या पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग महाराष्ट्र शासन विभागामार्फत दिनाक १६ ऑगस्ट २०१८ रोजी शासन निर्णय क्रमांक टंचाई २०१८/प्र.क्र. ७३/पापु-१४ तसेच शासन निर्णय क्रमांक टंचाई २०१८/ प्र.क्र. १६७/पापु-१४ नुसार अनुदान वितरण करणे व भाड्याने घेण्यात येणाऱ्या खाजगी टँकर्स च्या दराबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आलेल्या असताना मार्गदर्शक सूचनाचा अवलंब न करताच देयके अदा झाल्याची बाब उघडकीस येणे दिनांक ८/६/२०२० रोजी मा. विभागीय आयुक्त, नाशिक विभाग, नाशिक यांचे कडे एका सामाजिक संस्थेमार्फत तक्रार अर्ज सादर करण्यात आला होता, तसेच माननीय उच्च मुंबई न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठात १७ ऑफ २०२० अन्वये एक जनहित याचिका देखील दाखल करण्यात आली होती त्या अनुषंगाने माननीय मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दाखल याचिकेवर सुनावणी घेऊन दोषारोप निश्चिती करून संबंधितांवर गुन्हा दाखल करणे बाबत आदेश दिले असणे मा. विभागीय आयुक्त नाशिक विभाग नाशिक यांनी दाखल झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा परिषद नाशिक अंतर्गत त्रिस्तरीय चौकशी समिती नेमून सदरील त्रिस्तरीय समितीने अहमदनगर जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात क्षेत्रीय पाहणी केली असून पाहणे अहवालात पारनेर तालुक्यासह जिल्ह्यातील सर्वच तालुक्यात टंचाईवरील अनुदान वितरणे बाबत निष्कर्ष काढलेले असून अहवाला ते नमूद करण्यात आलेले आहेत पाहणी अहवालात क्र.६कर्जत तालुक्यातील पाहणी करून कर्जत तालुक्या बाबत निष्कर्ष नमूद करताना यात मागील पाच वर्षांचे अनुदान वितरणाची चौकशी केली असता कर्जत तालुक्यात टँकरवर जीपीएस प्रणालीचा वापर करण्यात आलेला असला तरी जीपीएस प्रणाली अहवालात उद्भवापासून टँकर निघाल्याची वेळ टँकर गावात पोहोचल्याची वेळ टँकर रिकामी झाल्याची वेळ व तेथून पुन्हा उद्भावाकडे निघाल्याची वेळ त्या खेपेचे फेरीचे अंतर याबाबत माहिती नमूद

टेप-एच-१०२८(७५०-८-२३)

नाही तसेच बहुतांश टँकरचे लॉग बुक मध्ये निघण्याची व परतण्याचे वेळ नमूद नाही तसेच स्पीडोमीटर बंद असणे असा निष्कर्ष नमूद केलेला आहे तसेच चौकशी अहवालात क्र ११ ला जामखेड तालुक्याबाबत देखील कर्जत तालक्याप्रमाणेच निष्कर्ष नोंदविला असणे यातून शासनाचे सन २०१५-१६ ते सन २०१९-२० या कालावधीत सुमारे १०० कोटी पेक्षा जास्त रकमेचा अपहार झाल्याची बाब निदर्शनास येणे झालेला गैरव्यवहार तसेच शासकीय निधीतील अपहाराबाबत करावयाची कारवाई".

## मा.मंत्री (पा.पु.व स्व.) यांचे निवेदन

दरवर्षी निर्गमित करण्यात येणा-या शासन परिपत्रकानुसार संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडा जिल्हा प्रशासन स्तरावर तयार करून शासनास सादर करण्यात येतो. त्यानुसार अहमदनगर जिल्हयासाठी टंचाई कालावधी सन २०१८-२०१९ या वर्षाकीरता रू.६७३३.७३ लक्ष रुपयाच्या एकूण प्रस्तावित १३९० व सन २०१९-२०२० या वर्षाकरीता रू.५०६१.२९ इतक्या रक्कमेचा १२८३ प्रस्तावित उपाययोजना संभाव्य पाणी टंचाई कृती आराखडयात समावेश करण्यात आल्या होत्या. त्यापैकी सन २०१८-२०१९ या वर्षात आवश्यकतेनुसार १४० व सन २०१९-२०२० या वर्षात ११९ उपायोजना पुर्ण करण्यात आल्या आहेत.

वरीलप्रमाणे पुर्ण करण्यात आलेल्या उपाययोजनेकरीता शासनाने टंचाई-२०१८/प्र.क्र.७३,दिनांक १६.०८.२०१८ शासन निर्णयानुसार अहमदनगर जिल्हयासाठी निधी वितरीत करण्यात आलेला नाही. तसेच टंचाई-२०१८/प्र.क्र.१६७/पापु-१४, दिनांक १९.१२.२०१८ नुसार खाजगी टँकराचे दर निश्चित करण्यात आले असून त्यानुसार निधी वितरीत करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

पारनेर तालुकयातील पाणी टंचाई अनुदान निधी सन २०१९ मध्ये अपहार केल्याने संबंधित जबाबदार अधिकारी, कर्मचारी व टँकर पुरवठा धारक यांचेवर फौजदारी गुन्हा दाखल करून अपहारित रक्कम वसूल करणेसंदर्भात लोकजागृती शोध प्रतिष्ठान निघोज,ता पारनेर जि अहमदनगर या सामाजिक संस्थेने ०८/०६/२०२० रोजी विभागीय आयुक्त, नाशिक यांचेकडे तक्रार अर्ज दाखल करण्यात आला होता. तदनंतर दिनांक २३.११.२०२० रोजी मा.उच्च न्यायालय मुंबई,खंडपीठ, औरंगाबाद येथे फौजदारी जनहित याचिका क्रमांक १७ ऑफ २०२० दाखल करण्यात आली होती.

लक्षवेधी सूचना क्रमांक १६०१

## सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

ॲड माणिकराव कोकाटे, मा. विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्रमांक १६०१ खालीलप्रमाणे आहे.

""जि.नाशिक, सिन्नर विधानसभा क्षेत्रात जलजीवन मिशन योजनेअंतर्गत पाणीपुरवठा योजनेमध्ये कोटयावधी रुपयांचा भ्रष्टाचार झाल्याचा गंभीर प्रकार नुकताच निदर्शनास येणे, सदरहू बाब समितीचे गटविकास अधिकारी व पाणीपुरवठा विभागाचे अधिकारी यांनी आयोजित केलेल्या बैठकीत उघडकीस येणे, सदरहू योजनेचे विकासकाम जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी व पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी यांनी ठेकेदारांबरोबर आर्थिक संगनमत करुन व मनमानी करुन मर्जीतील ठेकेदाराला निविदा प्रक्रियेत जाणीवपूर्वक १० ते १५ कामे मंजुर करण्यात येणे, सदरहू विकासकामाच्या अंदाजपत्रकावर ज्या अधिकाऱ्यांनी सह्या केलेल्या असणे, त्यांची बदली झाल्यामुळे आजमितीस जे अधिकारी काम करीत आहे ते अधिकारी याकडे हेतूपूर्वक दुर्लक्ष करुन सदर प्रकरण चौकशी न करता दडपून टाकण्यात येणे, सदरहू प्रस्तावित केलेल्या अनेक पाणीपुरवठा योजनांच्या अंदाजपत्रकात खूप मोठया प्रमाणात दोष आढळून येणे, या योजनांची अंदाजपत्रके कुठल्याही तांत्रिक अधिकाऱ्यांनी तयार केलेली नसणे, यामध्ये प्रामुख्याने पूर्वीच्या बंद पडलेल्या पाणी पुरवठा योजनांचे कोरडे असलेले स्त्रोतच भुजल सर्वेक्षण विभागाचे दाखले न घेताच नवीन योजनांसाठीच पुन्हा निश्चित केल्याचा घोटाळा उघडकीस येणे, यासंदर्भात लोकप्रतिनिधींनी सदरहू घोटाळा प्रकरणी सिन्नर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आशिमा मित्तल यांना लेखी तक्रार निवेदन देण्यात येऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे, यामुळे सदरहू जलजीवन मिशन योजने अंतर्गत केंद्र व राज्य सरकारतर्फे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कोटयावधी रुपये निधी वाया जाऊन झालेला अपव्यय, यामुळे जिल्हयातील व तालुक्यातील जनतेस पाणीपुरवठा योजनेपासून वंचित रहावे लागणे, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, या सर्व प्रकारांस सर्वस्वी जिल्हा परिषदेचे पाणी पुरवठा विभागाचे अधिकारी जबाबदार असून या सर्व दोषी अधिकाऱ्यांना तात्काळ निलंबित करुन त्यांची खातेनिहाय चौकशी करण्याची नाशिक जिल्हयातील सर्व लोकप्रतिनिधींनी केलेली मागणी, तसेच ज्या-ज्या ठेकेदारांना याची कामे दिली आहेत त्यांनी भरलेल्या निविदांची चौकशी करण्याची होत असलेली मागणी, परिणामी येथील जनतेत निर्माण झालेले तीव्र असंतोषाचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.""

## मा. मंत्री, (पाणी पुरवठा व स्वच्छता) यांचे निवेदन

सिन्नर तालुक्यात जल जीवन मिशन कार्यक्रम अंतर्गत जिल्हा परिषदेच्या एकुण ८० योजना व त्या अंतर्गत ८३ गावांचा समावेश असुन, त्यांची अंदाजपत्रकीय किंमत रु. ११५.२४ कोटी इतकी आहे. याबाबत मा. विधानसभा सदस्य यांनी पंचायत समिती स्तरावर घेतलेल्या आढावा बैठकीत काही योजनांचे उद्भव बदलणेबाबत चर्चा झाली. त्याबाबत संबंधित उप अभियंता यांना आवश्यक ते तांत्रिक बदल करण्याबाबत व त्या अनुषंगाने योजना सुधारित करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनांची ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असुन, त्या अंतर्गत निविदेतील अटी व शर्तीनुसारच पात्र मक्तेदारांना कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत.

जल जीवन मिशन योजनेअंतर्गत योजनांची वेगवेगळ्या टप्प्यावर त्रयस्थ तांत्रिक परिक्षण करणेकरीता टाटा कंसलटंसी इंजिनियर्स लि.पुणे यांची नियुक्ती केलेली आहे. त्यांचेमार्फत तांत्रिक

तपासणी करुन त्यांचा अहवाल प्राप्त करुन घेण्यात येतो. तसेच योजनेसंदर्भात विशिष्ट तक्रार प्राप्त झाल्यानंतर तक्रारीच्या अनुषंगाने जिल्हा परिषदमार्फत चौकशी समिती नेमुन चौकशी करण्यात येते.

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत योजनांची अंदाजपत्रके तांत्रिक अधिकाऱ्यांनीच तयार केलेली असुन, त्यांच्या स्वाक्षरीनिशिच अंदाजपत्रके सादर केलेली आहेत. अस्तित्वातील व नवीन जल स्त्रोताकरीता भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणा (GSDA) विभागाचे दाखले घेऊनच अंदाजपत्रके तयार करण्यात आलेली आहेत.

याबाबत मा. विधानसभा सदस्य यांनी दिनांक २५.०५.२०२३ रोजी दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने संबंधित उप अभियंता यांना आवश्यक ते तांत्रिक बदल करण्याचे व त्या अनुषंगाने योजना सुधारित करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. त्या अनुषंगाने उप अभियंता, सिन्नर यांनी आजपावेतो एकुण पुढील ८ अंदाजपत्रकात सुधारीत व तांत्रिक बदल केले आहेत. (१) कहांडळवाडी (२) मेंढी (३) शहापुर (४) घोरवड (५) पांचाळे (६) सरदवाडी (७) सोनांबे (८) सुरेगांव.

जल जीवन मिशन कार्यक्रमांतर्गत नळ पाणी पुरवठा योजनांची कामे गुणवत्तापुर्वक पुर्ण होतील, याबाबतीत दक्षता घेण्याचे मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नाशिक यांनी सर्व संबंधित यंत्रणांना निर्देश दिलेले आहेत. त्याचप्रमाणे जल जीवन मिशन अंतर्गत योजनांचे वेगवेगळ्या टप्प्यावर त्रयस्थ तांत्रिक परिक्षण करणेकरीता टाटा कंसलटींग इंजिनियर्स लि. पुणे यांची राज्य पाणी व स्वच्छता मिशन यांनी नियुक्ती केलेली आहे. त्यांचेमार्फत तांत्रिक तपासणी झाल्यानंतरच व त्यांचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच देयकांची अदायगी करण्यात येते. त्याचप्रमाणे नाशिक जिल्हा परिषदेने जल जीवन मिशन वर्क क्वालिटी सिस्टीम विकसित केलेली असुन, त्याअंतर्गत योजनांच्या कामांचे उपांगनिहाय व्हीडीओ, छायाचित्रे अनुषंगीक सर्व अहवाल इ. नोंदी झाल्यानंतरच देयकांची अदायगी करण्यात येते.

जल जीवन मिशन अंतर्गत नळ पाणी पुरवठा योजनांची ई-निविदा प्रक्रिया राबविण्यात आली असुन, त्याअंतर्गत निविदेतील अटी व शर्तीनुसारच पात्र मक्तेदारांनाच कार्यारंभ आदेश देण्यात आलेले आहेत.

***********

# महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र. ५८७**

श्री. विनोद निकोले, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. बाळासाहेब थोरात, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ५८७ :-

"राज्यात अकोला जिल्ह्यातील प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पी.एम. किसान) योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना सन्मान निधी योजनेचा लाभ घेण्याकरिता ई-केवायसी व आधार सीडिंग अपूर्ण असल्याकारणाने जिल्ह्यातील तब्बल ३७ हजार ५८० लाभार्थीची ई-केवायसी, तर १७,५२० लाभार्थी वंचित असल्याची बाब माहे जुलै २०२३ च्या दुसऱ्या आठवड्यात निदर्शनास आलेली असणे, या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना चार महिन्यांनी प्रत्येकी दोन हजार रुपयांप्रमाणे वार्षिक सहा हजार रुपये व राज्य शासनाकडून वार्षिक ६००० रुपये असे केंद्र व राज्य शासनाचे मिळून वार्षिक १२००० रुपये मिळणार असणे, प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा चौदावा हप्ता लाभार्थी शेतकऱ्यांना मिळणार नसल्याची शक्यता निर्माण होणे, त्यासाठी राज्यातील सर्व शेतकऱ्यांचे ई-केवायसी व आधार सीडिंग पूर्ण करण्यासाठी शासनाची ऑनलाईन सुविधा सुरु आहे त्यात अनेक वेळा व्यत्यय येत असल्याने पालघर, ठाणे, नाशिक, रायगड, पुणे, नंदूरबार, गडचिरोली, सोलापूर, कोल्हापूर, सांगली सातारा, यवतमाळ, वर्धा, भंडारा, नागपूर, चंद्रपूर यासह सर्वच जिल्ह्यामधील लाखो शेतकरी प्रधानमंत्री किसान सन्मान योजनेचा चौदावा हप्ता मिळणार नसल्याने वंचित राहणार असणे, त्यामुळे शेतकरी मोठ्या आर्थिक समस्येत येत असणे, त्यासाठी शासनाने मागील ०४ वर्षात ज्या शेतकऱ्यांना प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पी.एम.किसान) योजनेचा लाभ दिला आहे अश्या सर्वच शेतकऱ्यांना प्रधानमंत्री किसान सन्मान निधी (पी.एम. किसान) योजनेचा लाभ देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत असतानाही प्रशासन ऑनलाईन ई- केवायसी व आधार सीडिंग च्या नावाखाली वंचित ठेवत असणे, त्याचबरोबर ऑनलाईन केवायसी करीत असतानाच ऑफलाईन अर्ज ही गृहीत धरण्याची आवश्यकता असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना...."

---

## मा. मंत्री (कृषि) यांचे निवेदन

शेतक-यांना निश्चित उत्पन्न मिळण्याकरीता केंद्र शासनाने प्रधान मंत्री किसान सन्मान निधी (PM KISAN) योजना दि.०१ फेब्रुवारी, २०१९ पासून सुरु केली आहे. या योजने अंतर्गत पात्र शेतकरी कुटुंबीयास (पती, पत्नी व त्यांची १८ वर्षाखालील अपत्ये) रु. २०००/- प्रती हप्ता या प्रमाणे तीन समान हप्त्यात रू. ६०००/- प्रती वर्षी लाभ देण्यात येतो. दिनांक ०१ फेब्रुवारी, २०१९ रोजी लागवडीयोग्य क्षेत्र असलेले सर्व शेतकरी कुटुंब (अपात्रतेचे निकष वगळता) योजनेच्या लाभासाठी नोंदणी करून लाभ घेऊ शकतात. केंद्र शासनाच्या दि.२१/०६/२०१९ रोजीच्या मार्गदर्शक सूचनाप्रमाणे पी.एम.किसान योजनेच्या लाभासाठी अपात्रतेचे निकष निश्चित केलेले असुन सदर मार्गदर्शक सुचनांनुसार योजनेची अंमलबजावणी देशातील सर्व राज्यांमध्ये केली जाते. ज्यांच्या नावे भुमि अभिलेखामध्ये वहितीलायक क्षेत्र आहे अशी सर्व शेतकरी कुटुंबे या योजनेचा लाभ घेण्यास पात्र आहेत.

पी.एम.किसान योजने अंतर्गत दि.०३ ऑगस्ट, २०२३ अखेर नोंदणीकृत लाभार्थी संख्या ११७.६१ लाख असुन तेराव्या हप्त्या अखेर ११०.५३ लाख शेतकरी कुटुंबाच्या खात्यावर थेट लाभ हस्तांतरणाद्वारे रु.२३७३१.८१ कोटी अदा करण्यात आले आहेत. पी.एम. किसान योजनेसाठी नोंदणी केलेल्या लाभार्थी पैकी पात्र लाभार्थी अंतीम करण्यासाठी व योजनेचा लाभ लाभार्थीच्या खात्यात थेट जमा करण्यासाठी केंद्र शासनाने लाभार्थीच्या भुमि अभिलेख नोंदी अद्यावत करणे, लाभार्थींची बँक खाती आधार संलग्न करणे, लाभार्थींचे ई-केवायसी प्रमाणिकरण करणे या बाबी बंधनकारक केलेल्या असुन त्यांची सहज व सुलभरित्या पुर्तता होण्यासाठी केंद्र शासनाने लाभार्थीच्या मोबाईलद्वारे, पी. एम. किसान पोर्टलवर, सामाईक सुविधा केंद्राद्वारे, नव्याने विकसित केलेल्या PM KISAN GoI App द्वारे ई-केवायसी प्रमाणिकरण करण्याची सुविधा उपलब्ध केलेली आहे. लाभार्थींची बँक खाती आधार संलग्न करण्यासाठी पोस्टामध्ये विनाशुल्क खाते उघडण्याची सुविधा आहे. राज्यात ई-केवायसी

प्रमाणिकरण, बँक खाती आधार संलग्न करणे व प्रलंबित लाभार्थींची कार्यपूर्तता करणेसाठी कृषि विभागामार्फत गावपातळीवर कॅम्प आयोजित करण्यात आले आहेत. सदर कॅम्प मध्ये प्रलंबित लाभार्थींची कार्यपूर्तता करण्यात येत असून दि.०१ मे २०२३ पासून राज्यातील ५.१८ लाख लाभार्थींचे ई-केवायसी प्रमाणिकरण व ५.२० लाख लाभार्थींची बँक खाती आधार संलग्न करण्यात आली आहेत.

पी.एम.किसान योजनेअंतर्गत नोंदणीकृत लाभार्थी संख्या ११७.६१ लाख असून त्यापैकी केंद्र शासनाच्या निकषानुसार व पोर्टलवरील उपलब्ध आकडेवारीनुसार पात्र लाभार्थी ९७.९९ लाख आहेत. केंद्र शासनाने १४ व्या हप्त्याच्या लाभासाठी पात्र लाभार्थींच्या बंधनकारक बाबींची पूर्तता केलेले राज्यात एकूण ७७.५५ लाख लाभार्थी १४ व्या हप्त्याच्या लाभासाठी पात्र ठरणार होते. तथापि केंद्र शासनाने बंधनकारक केलेली ई-केवायसी प्रमाणिकरणाची बाब आता शिथिल केली असल्याने आज रोजी राज्यातील भूमि अभिलेख नोंदी प्रमाणे माहिती अद्ययावत व बँक खाती आधार संलग्न या बंधनकारक बाबींची पूर्तता एकूण ८५.६६ लाख लाभार्थी पात्र ठरत असून दि.२७ जुलै, २०२३ रोजी केंद्र शासनामार्फत सदर पात्र लाभार्थ्यांच्या बँक खात्यात रु.१८६६ कोटी वितरीत करण्यात आलेले आहेत. पी.एम. किसान योजनेच्या दिनांक २७ फेब्रुवारी २०२३ रोजी वितरीत केलेल्या तेराव्या हप्त्याच्यावेळी राज्यातील एकूण ८१.१३ लाख लाभार्थींना लाभ अदा झालेला आहे. आता चौदावा हप्ता दिनांक २७ जुलै २०२३ रोजी वितरित झाला असून १३ व्या हप्त्याच्या तुलनेत एकूण ४.५३ लाख जास्तीच्या लाभार्थींना लाभ अदा झाला आहे.

पी.एम.किसान योजनेअंतर्गत अकोला जिल्ह्यातील नोंदणीकृत लाभार्थी संख्या २.३५ लाख असून त्यापैकी केंद्र शासनाच्या निकषानुसार व पोर्टलवरील उपलब्ध आकडेवारीनुसार पात्र लाभार्थी २.१० लाख आहेत. केंद्र शासनाने १४ व्या हप्त्याच्या लाभाच्या पात्रतेसाठी बंधनकारक केलेल्या बाबींच्या अनुषंगाने अकोला जिल्ह्यातील भूमि अभिलेख नोंदीप्रमाणे पोर्टलवर माहिती अद्ययावत करण्यात आलेले २.१० लाख, ई-केवायसी प्रमाणिकरण केलेले १.७९ लाख व बँक खाती आधार संलग्न केलेले १.९१ लाख लाभार्थी असून अनुक्रमे फक्त १४० लाभार्थी, ०.३४ लाख व ०.१८ लाख लाभार्थी प्रलंबित आहेत.

तसेच राज्यात सद्यस्थितीत भूमि अभिलेख नोंदीप्रमाणे पोर्टलवर माहिती अद्ययावत करण्यात आलेले ९५.७५ लाख, ई-केवायसी प्रमाणिकरण केलेले ८५.९४ लाख व बँक खाती आधार संलग्न केलेले ८८.८८ लाख लाभार्थी असून अनुक्रमे २.२४ लाख, १३.४३ लाख व ८.६० लाख लाभार्थी प्रलंबित आहेत. सदर पात्र लाभार्थ्यांना पी.एम.किसान योजनेचा लाभ प्रदान करण्यासाठी प्रलंबित बाबींची पूर्तता करण्याची कार्यवाही सुरु आहे.

मा. उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी सन २०२३-२४ च्या अर्थसंकल्पीय भाषणामध्ये अन्नदाता बळीराजाच्या उत्पन्नवाढीसाठी प्रधानमंत्री कृषी सन्मान निधी योजनेत राज्य शासनाच्या अनुदानाची भर घालणारी 'नमो शेतकरी महासन्मान निधी' ही योजना जाहीर केलेली आहे. त्यास अनुसरुन राज्यात नमो शेतकरी महासन्मान निधी योजना राबविण्यास शासन निर्णय क्र.किसयो-२०२३/प्र.क्र.४२/११-अे दिनांक १५ जुन, २०२३ अन्वये मान्यता देण्यात आलेली आहे. या योजनेत केंद्र सरकारच्या प्रति वर्ष, प्रति शेतकरी दिल्या जाणा-या ६ हजार रुपयांच्या लाभात राज्य सरकार कडून आणखी ६ हजार रुपयांची भर पडणार आहे. यामुळे राज्यातील पात्र शेतकऱ्यांना १२ हजार रुपये प्रतिवर्षी मिळणार आहेत. सदर नवीन योजनेकरीता पुरवणी मागणीद्वारे उपलब्ध करुन देण्याबाबत प्रस्तावित केले असता सदर योजनेकरीता रु.४०००.०० कोटी इतका निधी मंजूर करण्यात आला आहे.

********

ध/१३२-१०

## लक्षवेधी सूचना

**मा. श्री. रणधीर सावरकर, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे:-**

" कृषि विभागाकडुन राबविण्यात येत असलेली नानाजी देशमुख कृषि संजिवनी योजना अधिक प्रभावी व सक्षम करण्याची आवश्यकता असणे, विदर्भ व मराठवाड्यातील वाढते तापमान, लहरी व अपुरे पर्जन्यमान हवामान प्रतिकूलता व पर्यावरणीय असंतुलनामुळे मुख्यत्वे कृषी क्षेत्रात होत असलेली पीछेहाट, विदर्भ-मराठवाडा प्रदेशातील दुष्काळ बाधित गावांसाठी तसेच विदर्भ पूर्णा नदीच्या खो-यातील खारपाण पट्ट्यातील सुमारे ९०० गावातील जागतिक बँकेच्या अर्थसाह्याने शासन राबवीत असलेला नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प प्रभावीपणे राबविण्याची निर्माण झाल्याची संभाव्य स्थिती, विदर्भाच्या विकासाच्या आड येऊ पाहणाऱ्या तापमान बदलाची स्थिती उद्भवणे, बदलते हवानाम व वाढते तापमान याचा सर्वाधिक फटका विदर्भाच्या विकासाला बसण्याची शक्यता असा जागतिक बँकेच्या दक्षिण आशियाई देशांच्या सादर अहवालातील नोंदविण्यात आलेले निष्कर्ष, त्यामुळे विदर्भाचा विकास दर घसरून विदर्भ प्रदेशातील लोकांना गरिबी व कष्टमय जीवन या बाबत सदर अहवालातून दिलेला इशारा पुढे येणे, संभाव्य पर्यावरणीय परिणामांना सामोरे जाण्यासाठी हवामान बदलाशी जुळवून घेणे, हवामान अनुकूल कृषी पध्दतील प्रोत्साहन देऊन शेतकऱ्यांचे कृषी उत्पादन व आर्थिक सुरक्षा वाढविणे, हवामान अनुकूल कृषी तंत्रज्ञान विकसित करून त्याचा प्रचार प्रसार करणे, प्रामुख्याने पश्चिम विदर्भातील सर्वात कमी व घटत असलेले दरडोई उत्पन्न, रोजगाराच्या संधी निर्माण करण्याची गरज, मृद व जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणात करणे, जमिनीत कर्बाचे प्रमाण वाढविणे, उशिरा सुरु होत असलेला मान्सून, असंतुलीक्त व कमी पर्जन्य, असंतुलित पर्यावरण या बाबी केन्द्रस्थ ठेऊन प्रकल्प नियोजन, आखणी व अंमलबजवणी परिस्थिती करिता नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प सैध्यान्तिक, संशोधनात्मक व नाविन्यपूर्ण पद्धतीने राबविण्यासाठी प्रकल्पाची व्याप्ती व कार्यविस्तार करण्याची निर्माण झालेली सद्यस्थिती या वर शासनाची भूमिका व करावयाची कार्यवाही."

---

## मा.मंत्री (कृषि) श्री. धनंजय मुंडे यांचे निवेदन

जागतिक बँक अर्थसहाय्यित सहकार्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प मे,२०१८ पासून मराठवाडा, विदर्भ व उत्तर महाराष्ट्रातील १६ जिल्ह्यातील ५२२०' गावांमध्ये राबविण्यात येत आहे. प्रकल्पांतर्गत जिल्ह्यांमधील अल्प व अत्यल्पभूधारक शेतकऱ्यांना हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास व शेती किफायतशीर करण्यासाठी सक्षम करणे, हा प्रकल्पाचा उद्देश आहे.

प्रकल्पाच्या प्रस्तुत टप्प्यासाठी Vulnerability Assessment of Indian Agriculture to Climate Change या CRIDA संस्थेकडील २०१३ च्या अहवालाचा संदर्भ घेण्यात आलेला असून त्यानुसार गावनिवडीचे निकष ठरविण्यात आलेले आहेत.

हवामान प्रतिकूलता व पर्यावरणीय असंतुलनामुळे मुख्यत्वे शेतीवर दूरगामी परिणाम दिसून येतात. यामध्ये वाढत्या तापमानाचा पिक उत्पादकतेवर, विशेषतः कोरडवाहू पिकावर विपरित परिणाम होत असल्याचे दिसून आले आहे. अनियमित पावसामुळे पिकांच्या पाणी उपलब्धतेवर प्रतिकूल परिणाम दिसून येतो. कमी कालावधीमध्ये पडणा-या अति पावसामुळे जमिनीची प्रचंड धूप होत असल्याचे दिसते. जमिनीतील कर्बामध्ये घट झाल्यामुळे वाढते तापमान व धूप यामुळे जमिनीतील सेंद्रिय कर्बामध्ये घट होणे, परिणामी उत्पादकता घटणे दिसून आले आहे. वाढत्या तापमानामुळे जमिनीतील ओलाव्यामध्ये घट होणे व याचा अन्नधान्य, कडधान्य, कापूस, भाजीपाला व फळपिकावर प्रतिकूल परिणाम दिसून येतो. पिकावरील किड व रोगांच्या संख्येमध्ये व प्रादुर्भावात वाढ झालेली आढळून येते.

प्रकल्पामार्फत सर्व गावांमध्ये तसेच खारपाण पट्ट्यातील गावात सन २०१८ ते २०२२ या कालावधीत कापूस, सोयाबीन+तूर व हरभरा या प्रमुख पिकांच्या शेतीशाळा घेतल्या असून त्यामध्ये खारपाण पट्ट्यातील गावांमधील ६१२९ शेतीशाळा समाविष्ट आहेत. शेतीशाळांमध्ये कृषि विद्यापीठाने शिफारस केलेले संवर्धीत शेती तंत्रज्ञान, रुंद वाफा व सरी तंत्रज्ञान, उताराला आडवी पेरणी, पट्टा पद्धतीने पेरणी, आंतरपीक पद्धत, भु-सुधारकांचा वापर, एकात्मिक कीड व्यवस्थापन - लिंबोळी अर्क तयार करणे, कामगंध सापळ्याचा वापर असे हवामान अनुकूल तंत्रज्ञान विषयक वर्ग घेण्यात आले आहेत.

प्रकल्पांतर्गत उपाययोजनांमध्ये शेतीशाळा तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यामुळे झालेल्या फलनिष्पत्तीचा अभ्यास केला असता सोयाबीन व हरभरा पिकांच्या बीबीएफ तंत्राने पेरणी क्षेत्रामध्ये वाढ होत आहे आणि त्यामुळे अतिवृष्टीमध्ये तसेच पावसातील खंडामध्ये पिके अधिक काळ तग धरून राहतात असे आढळून आले आहे. मातीची धूप कमी करण्यासाठी ढाळीची बांधबंदिस्ती, शुन्य मशागत तंत्रज्ञान इत्यादीचा अवलंब वाढलेला आहे. संरक्षित पाण्याची सुविधा निर्माण करण्याकडे आणि उपलब्ध पाणी सूक्ष्म सिंचन पद्धतीने वापरण्याकडे शेतकऱ्यांचा कल वाढलेला आहे.

अतिशय कोरड्या वातावरणामुळे शेतीतील उत्पन्न घटते. पाण्याच्या टंचाईमुळे शेतीमाल प्रक्रिया उद्योजकांच्या उत्पादनावर परिणाम होतो. पिकाचे नुकसान झाल्याने शेतीसाठी घेतलेल्या कर्जाची परतफेड होत नाही. ही समस्या वाढती असल्याचा इशारा देखील South Asia Climate Roadmap या जागतिक बँकेच्या अहवालात देण्यात आलेला आहे. त्यानुसार कृषि उत्पादकतेमध्ये शाश्वत वाढ करणे, शेतीमधील हवामान अनुकूलता वाढविणे, शेतीमधील हरीतगृह वायू उत्सर्जन कमी करणे याबाबत प्रकल्पाच्या प्रस्तूत व पुढील टप्प्यात कार्यवाही करण्यात येत आहे.

हवामान बदलांमुळे निर्माण होणारे तापमान वाढ, पावसातील लहरीपणा, जमिनीची अवनतता इ. दुष्परिणामांचा शेतीवर होणारा प्रभाव कमी करण्यासाठी शेती शाळांच्या माध्यमातून जाणीव जागृती व क्षमता बांधणीचे उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. प्रकल्प घटकांच्या माध्यमातून शेतक-यांकडील पाणी साठवणूक क्षमता वाढविणे, उपलब्ध पाण्याचा कार्यक्षम वापर, जमिनीची सुपिकता वाढविण्यासाठी उपाय करणे, हवामानातील बदलानुसार पीक-रचनेत बदल करणे, रासायनिक खते व किडनाशकांचा वापर कमी करण्यासाठी एकात्मिक अन्नद्रव्य व किडव्यवस्थापनाचा अवलंब वाढविणे, तसेच उत्पादीत शेतीमालावर मुल्यवर्धनाच्या उपायांना आर्थिक सहकार्य करणे, इ. उपक्रम राबविण्यात आले असून त्यामुळे ४,३२,०२७ शेतकरी व ३,८८१ शेतकरी गट/ कंपन्यांना हवामान बदलांना जुळवून घेण्यास मदत होत आहे.

प्रकल्प जिल्ह्यांतील गावांमध्ये महाबीज, शेतकरी गट/शेतकरी उत्पादक कंपन्या आणि राष्ट्रीय बीज निगम यांच्या मार्फत बीजोत्पादन कार्यक्रम राबविला जातो. सन २०२२-२३ मध्ये खरीप हंगामात ११३५४ बीजोत्पादक शेतकऱ्यांनी २०,००० हे. वर कार्यक्रम राबवला. तसेच रब्बी हंगामात ४,२६८ शेतकऱ्यांनी ७,२६९ हे. वर कार्यक्रम राबविला आहे.

प्रकल्पाच्या माध्यमातून एकूण २७,३२१ हेक्टर क्षेत्रावर फळबाग लागवड झाली आहे. तसेच वानिकी अंतर्गत ५०० पेक्षा जास्त शेतकऱ्यांनी वृक्ष व बांबू लागवड केली. प्रकल्पाअंतर्गत ४७० विहिरींचे पुनर्भरण, ८७ रिचार्ज शाफ्ट आणि २७ रिचार्ज शाफ्ट विथ ट्रेंच अशी कामे झालेली आहेत. ओघळीवरचे उपचार, क्षेत्र उपचार तसेच मृद संधारणाची अन्य कामे तसेच शेततळे यामुळे ४५,५५२ TCM पाणी साठा उपलब्ध झाला आहे. प्रकल्पाअंतर्गत लाभ दिलेल्या ४४२९ शेडनेट व हरितगृह यामुळे शेतमजुरांना व विशेषतः महिलांना रोजगार मिळाला. शेतकऱ्यांनी लाभ घेतलेल्या ३,९६,२६७ ठिबक व तुषार सिंचन संच मुळे पाण्याची बचत होत असून सुमारे ३.५ लाख हेक्टर क्षेत्र सूक्ष्म सिंचनाखाली आले. शेतकरी गट/ कंपन्या यांचे कृषि व्यवसाय तसेच भाडे तत्वावर अवजार बँकांना अर्थसहाय्य देण्यात आले आहे.

प्रशिक्षण, कार्यशाळा, वेबिनार, चर्चासत्र व अभ्यास दौरे या माध्यमातून १३,५१,७६९ शेतकऱ्यांचे तसेच ३,७६,९५२ महिला शेतकऱ्यांचे कौशल्य वृद्धी व क्षमता बांधणी करण्यात आली.

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाच्या यशस्वितेमुळे राज्याच्या इतर जिल्ह्यांमधील गावांची या प्रकल्पामध्ये समावेश करण्याची वाढत चाललेली मागणी विचारात घेऊन प्रकल्पामध्ये सद्य:स्थितीत समाविष्ट असलेल्या १६ जिल्ह्यांसह विदर्भातील उर्वरित नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली अशा एकूण २१ जिल्ह्यांमध्ये अंदाजित रु.६००० कोटी (रू. सहा हजार कोटी) किंमतीच्या जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाचा टप्पा-२ राबविण्यास शासन निर्णय दि. ३० जून, २०२३ अन्वये मान्यता दिलेली आहे. प्रकल्पाच्या दुस-या टप्प्यात शेतीतील उत्पादकता आणि शाश्वतता वाढवण्यासाठी शेतकऱ्यांमध्ये आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढविणे, पाण्याचा कार्यक्षम वापर वाढविण्यासाठी उपाययोजना करणे व त्यायोगे शेतीमधील कर्ब उत्सर्जन कमी करणे, शेतीमध्ये कर्बग्रहण वाढवून शेतकऱ्यांना कार्बन क्रेडिट सुविधा उपलब्ध करण्यात सहाय्य करणे, संवर्धित व पुनरुज्जीवित शेती पद्धतीचा वापर करून पिकांची उत्पादकता वाढविणे याबाबीवर भर देण्यात येणार आहे.

प्रस्तूत १६ जिल्ह्यांतील प्रकल्प अंमलबजावणीमध्ये आलेले अनुभव लक्षात घेऊन तसेच विदर्भाच्या उर्वरीत पिकपद्धतीच्या गरजा लक्षात घेऊन प्रकल्पाच्या दुस-या टप्प्यामध्ये ICAR अंतर्गत राष्ट्रीय भात संशोधन केंद्र, कटक; राष्ट्रीय मृदा सर्वेक्षण आणि भुमी उपयोजन संस्था, नागपूर; अर्धशुष्क उष्ण कटिबंध भागासाठी आंतरराष्ट्रीय पीक संशोधन संस्था, हैद्राबाद (ICRISAT); भारतीय मौसम विज्ञान विभाग, पुणे; भारतीय उष्णदेशीय मौसम विज्ञान संस्थान, पुणे(IITM); भारतीय कृषि संख्यिकी अनुसंधान संस्थान, नवी दिल्ली; गोखले राज्यशास्त्र व अर्थशास्त्र संशोधन संस्था, पुणे आणि कृषि विद्यापिठे येथे केलेल्या नावीन्यपूर्ण संशोधनाचा प्रकल्प क्षेत्रातील शेतक-यांना लाभ मिळवून देण्यासाठी विशेष प्रयत्न करण्यात येत आहेत. प्रकल्पाचा दुसरा टप्पा अधिक परिणामकारकरित्या राबविण्यासाठी प्रकल्प क्षेत्रामधील शेतकऱ्यांच्या गरजा पूर्ण करण्याकरिता अत्याधुनिक डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर तसेच आंतरराष्ट्रीय आणि राष्ट्रीय स्तरावरील संशोधन संस्थांचे तांत्रिक सहकार्य घेण्यात येत आहे.

----------

**लक्षवेधी सूचना क्र.९४१**

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन**

**श्री. सुभाष धोटे, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. विजय वडेट्टीवार, श्री.विकास ठाकरे, श्री.सुनिल केदार, ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. बळवंत वानखडे, श्री. अमिन पटेल, श्री.अस्लम शेख, वि.स.स.. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.९४१ पुढीलप्रमाणे आहे. :-**

"राज्यातील ता. चिमूर, जि. चंद्रपूर कृषी कार्यालयामार्फत सरकारच्या योजनेतील शेततळे व जलसंधारणाची कामे लाभार्थी शेतकऱ्यांच्या शेतात करण्यात येत असणे, यात अनेक बोगस आकडे दाखवून शेतकऱ्यांची 'फसवणूक केल्याचे आढळून आले असणे, दोन वर्षांपूर्वी चिमूर तालुक्यातील दोन नुकसानग्रस्त गावांमध्ये आयुक्त, जिल्हाधिकारी व स्थानिक आमदार यांनी भेट दिली, शेतकऱ्यांच्या नुकसानीचे पंचनामे केले मात्र अजुनपर्यंत कुठलीही भरपाई शेतकऱ्यांना मिळालेली नसणे, तालुक्यात एकूण ३३ हजार ३१७ शेतकरी असून यापैकी १३०२२ शेतकऱ्यांनी ॲग्रो कंपनीकडून विमा काढला असणे, सदरहू यादीत ३४७ शेतकऱ्यांची नांवे आली मात्र प्रत्यक्ष २७० शेतकऱ्यांनाच लाभ मिळाला असणे, शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात तालुका कृषी विभाग अपयशी ठरत आहे मात्र सरकारने धान उत्पादक शेतकऱ्यांना पीक विम्यातून वगळल्याची माहिती समोर आली असणे, प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेतील लाभार्थ्यांची रक्कम सहा महिन्यांपासून मिळाली नसणे, मनरेगामार्फत शेतीची कामे ठप्प आहेत, मालेवाडा बीज गुणक केंद्र बिनकामाचे झाले असणे, बीज कंपन्या शेतकऱ्यांची लूट करीत आहेत, याकडे अधिकाऱ्यांचे दुर्लक्ष होत आहे, यावर्षी पाऊस उशिरा सुरू झाल्याने दुबार पेरणीचे संकट शेतकऱ्यांवर आले असणे, यावर कृषी विभागाने वेळीच उपाययोजना न केल्याने शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनामार्फत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया.'

---

**श्री.धनंजय मुंडे, मा.मंत्री (कृषी) यांचे निवेदन**

चंद्रपूर जिल्हयातील चिमूर तालुक्यात तालुका कृषि अधिकारी कार्यालयामार्फत सन २०२२-२३ या वर्षासाठी मुख्यमंत्री शाश्वत कृषि सिंचन योजनेंतर्गत वैयक्तिक शेततळे या बाबीसाठी ११ लाभार्थींची सोडतीव्दारे निवड केली होती. त्यापैकी ३ लाभार्थ्यांना पूर्वसंमती देण्यात आली. उर्वरीत ८ लाभार्थ्यांनी कागदपत्रे अपलोड न केल्यामुळे त्यांचे अर्ज रद्द केले. ३ पैकी २ लाभार्थ्यांनी शेततळयाची कामे पूर्ण केली असून त्यांना रु. १,४५,०७३/- अदा केले. एका लाभार्थ्याने काम सुरु केले नाही. सन २०२३-२४ या वर्षात ५७ लाभार्थ्यांची निवड केली असून १६ शेतकऱ्यांना पूर्वसंमती दिली व उर्वरीत शेतकऱ्यांनी कागदपत्रे अपलोड न केल्याने त्यांना पूर्वसंमती दिली नाही. गतिमान पाणलोट विकास कार्यक्रमांतर्गत सन २०२३-२४ मध्ये कोटेगाव पाणलोट क्षेत्रात मजगी पुनर्जीवन या बाबीची ५३ शेतकऱ्यांच्या शेतावर (५०.४३ हे.) कामे केली असून रु.५,४६,६०४/- खर्च केला आहे.

चिमूर तालुक्यात जुलै, २०२२ मध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे ३०३८९ हे. क्षेत्र बाधित झाले होते. बाधित शेतकऱ्यांची संख्या ४४६१८ होती. अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीच्या पाहणीसाठी मा. उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य व जिल्हाधिकारी, चंद्रपूर तसेच स्थानिक आमदार आले होते. पाहाणी

करुन बाधित झालेल्या क्षेत्राचे पंचनामे केले गेले. पिकांच्या नुकसानीपोटी रु. ४१.६८ कोटी नुकसान भरपाईपोटी प्राप्त झाले. २५८ बाधित गावांतील ४४६१८ शेतक-यांना ३९.४३ कोटी संबंधित शेतक-यांच्या बँक खात्यावर जमा केले असून उर्वरीत शेतकऱ्यांना अनुदान वाटपाची कार्यवाही सुरु आहे.

चिमूर तालुक्यात प्रधानमंत्री पिक विमा योजनेंतर्गत खरीप हंगाम सन २०२२-२३ या वर्षात भात ११३१५, कापूस ९३२,सोयाबीन ७०४, तूर ७१ याप्रमाणे १३०२२ शेतकऱ्यांनी विमा योजनेत सहभाग घेतला. सर्वेक्षणाअंती स्थानीक नैसर्गिक आपत्ती व काढणीपश्चात नुकसान या बाबींतर्गत २९१ शेतकऱ्यांना रु. २३,१८,८३१ /- नुकसान भरपाईची रक्कम अदा केली असून १७ शेतकऱ्यांचे अर्ज व ओळखपत्र जुळत नसल्याने ते प्राप्त करुन घेवून नुकसान भरपाईकरीता विमा कंपनीस कळविले आहे.

भात पिकाच्या २७ पूर्वसूचना प्राप्त झाल्या होत्या, मात्र भात पिक हे जलग्रहण धारण करणारे पिक असल्याने प्रधानमंत्री पिक विमा योजनेच्या केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार भात पिकांचे सर्वेक्षण केले नव्हते.

सन २०२२-२३ मध्ये चिमूर तालुक्यात प्रधानमंत्री कृषि सिंचन योजना प्रति थेंब अधिक पिक योजनेंतर्गत ५५३ शेतकऱ्यांची निवड झाली. यापैकी कागदपत्राची पुर्तता केलेल्या १७६ शेतक-यांना पूर्वसंमती दिली. त्यापैकी संच बसवून देयके सादर केलेले १६८ शेतकरी अनुदानास पात्र ठरले असून यापैकी ९६ शेतकऱ्यांना रु. १४.३१ लाख अनुदान अदा केले. उर्वरित शेतकऱ्यांना अनुदान देण्याची कार्यवाही सुरु आहे.

चिमूर तालुक्यात मनरेगा अंतर्गत सन २०२२-२३ या वर्षात १२७ शेतकऱ्यांच्या शेतावर ११६.८२ हे. क्षेत्रावर फळबाग लागवड केली. यावर एकूण रु.२२.११ लक्ष खर्च केले आहेत. सन २०२३-२४ मध्ये गांडूळखत युनिट ६, नाडेप यूनिट २९२, फळबाग लागवड ३८५ हे. व मजगी पुनर्जिवन १७ गट व मजगी ८ गट या कामांना मान्यता दिली. मनरेगा अंतर्गत सन २०२२-२३ मध्ये २३ विहिरींची कामे आणि सन २०२३-२४ मध्ये ६ विहिरींची कामे पूर्ण झाली असून ६९ विहिरींची कामे प्रगतीपथावर आहेत. सन २०२२-२३ मध्ये ११३४ व सन २०२३-२४ मध्ये ६७५ कामे मनरेगा अंतर्गत हाती घेतली आहेत. मनरेगा अंतर्गत सन २०२३-२४ मध्ये आजतागायत ९३२० कुटुंबांना रोजगार उपलब्ध करुन देण्यात आला.

मालेवाडा बीज गुणन केंद्र सुस्थितीत असून तेथे सन २०२३-२४ या वर्षात खरीप हंगामात भात ८.६०हे., सोयाबीन १.२० हे. व तूर १.०० हे. क्षेत्रावर पेरणी केली आहे. भात पीक नर्सरी अवस्थेत आहे.

चंद्रपूर जिल्हयात गुणवत्तापूर्ण बियाणे उपलब्ध होण्यासाठी १६ भरारी पथकांची व १५ तक्रार निवारण कक्षांची स्थापना केली आहे. ४४ गुण नियंत्रण निरीक्षक कार्यरत आहेत. २४ विक्री बंद आदेश देऊन २६.५० लक्ष किंमतीच्या बियाण्याला विक्री बंद आदेश बजाविले आहेत. २ बियाणे परवाने निलंबीत केले आहेत.

चिमूर तालुक्यात सरासरी ३२६.४ मिमी. पावसाच्या तुलनेत ९९ टक्के पर्जन्यमान झाले आहे. खरीपाचे सरासरी क्षेत्र ५३९४६.४२ हे. असून ३४६३४ हे. क्षेत्रावर पेरणी झाली. उर्वरीत बहुतांश क्षेत्र भात पिकाचे असून भात पिकाचे सरासरी क्षेत्र २१८८० हे. असून भात पिकाच्या रोवणीची कामे सुरु आहेत. समाधानकारक पाऊसामुळे सोयाबीन, कापूस व तूर पिकांची उगवण चांगली झाली असून दुबार पेरणीची परिस्थिती नाही. कापूस, सोयाबीन व तूर पिके वाढीच्या अवस्थेत आहेत.

------------

H-1077-1-A.

## लक्षवेधी सूचना

मा. डॉ. राहूल पाटील, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सुचना पुढीलप्रमाणे आहे:-

"परभणी जिल्ह्यातील नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प (पोकरा) योजने अंतर्गत जी गावे पहिल्या टप्यात निवडली असून तीची मुदत मार्च, २०१९ ते मार्च २०२४ पर्यंत असणे, तथापि मार्च, २०२३ मध्येच पोर्टल बंद करण्यात येणे, आगोदरच कोरोणा मध्ये २ वर्ष या योजनेचा कोणत्याही शेतकऱ्यांना व शेतकरी गटांना, कंपणीला लाभ घेता आला नसणे, नेमकेच शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ घेता येऊ लागला असता या योजनेची पोर्टल मार्च, २०२३ पासुन बंद करण्यात येणे, भरपुर शेतकरी, शेतकरी गट, शेतकरी कंपन्यांनी ठिबक, स्प्रिंक्लर, फळबाग लागवड, बीजोत्पादन प्रक्रिया युनिट व इतर योजनासाठी अर्ज करुण ठेवलेले असणे, प्रत्येकी शेतकरी गट, कंपणी यांना एका प्रस्तावासाठी कमीत कमी ४० हजार ते ५० हजार पर्यंत खर्च शेतकरी करुण बसलेला असणे, परंतु त्यांना पूर्व संमती देण्यात येत नसणे, असेच हाल मराठवाड्यातील इतर जिल्ह्यात आणि विदर्भातील सर्व शेतकऱ्यांचे असल्याचे उघडकीस येणे, परिणामी शेतकऱ्यांत वाढता तीव्र असतोष, शासनाने याप्रकरणी चौकशी करून तातडीने पोर्टल सुरु करून मराठवाड्यातील व विदर्भातील शेतकऱ्यांना न्याय देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

---

## श्री. धनंजय मुंडे मा. मंत्री, कृषि यांचे निवेदन

जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प सन २०१८ पासून राबविण्यात येत आहे. प्रकल्पाचा कालावधी सहा वर्षे (माहे मे, २०१८ ते जून २०२४ अखेर) असून मराठवाडा, विदर्भातील व उत्तर महाराष्ट्रातील १६ जिल्ह्यातील ५२२० गावांमध्ये प्रकल्पाची अंमलबजावणी सुरु आहे. यामध्ये परभणी जिल्ह्यातील २७५ गावांचा समावेश आहे.

नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाची मुळ किंमत रु.४००० कोटी असून त्यामध्ये जागतिक बँकेचा हिस्सा ७० टक्के (रु.२८०० कोटी) व राज्य शासनाचा हिस्सा ३० टक्के (रु.१२०० कोटी) असून जागतिक बँकेचा निधी प्रतिपुर्तीच्या स्वरुपात प्राप्त होतो. प्रकल्पातील घटकांवर आतापर्यंत एकूण रु. ३८२४ कोटी खर्च झाला आहे. प्रकल्पातून आतापर्यंत शेतकऱ्यांच्या एकूण ६,०७,६६६ वैयक्तिक लाभाच्या बाबींना व शेतकरी गट/ कंपन्यांच्या एकूण ३,८८१ बाबींना लाभ दिलेला आहे. तसेच मृद व जलसंधारणाची एकूण २५१८ कामे ३६,९३१.७४ हे. क्षेत्रावर पूर्ण झालेली आहेत.

परभणी जिल्ह्यात प्रकल्प घटकांवर एकूण रु.११५ कोटी खर्च झाला आहे. शेतकऱ्यांच्या ३३,९१७ वैयक्तिक लाभाच्या बाबींना व शेतकरी गट/ कंपन्यांच्या ७७ बाबींना लाभ दिलेला आहे. तसेच मृद व जलसंधारणाची १२७५ हेक्टरवर १३३ कामे पूर्ण झालेली आहेत.

कोव्हीड-१९ काळातील बाह्य सहाय्यित प्रकल्पांतर्गत करावयाच्या कामांकरिता आर्थिक निर्बंध लागू करण्यात आले नव्हते. यामुळे करोना कालावधीत नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पातील वैयक्तिक लाभ, शेतकरी गट/कंपनी यांचे प्रस्ताव व मृद व जलसंधारण कामे यावर सन २०२१ अखेर रु.६११ कोटी व सन २०२२ अखेर रु. १२७० कोटी खर्च झालेला आहे. या कालावधीत परभणी जिल्ह्यासाठी झालेला खर्च पुढीलप्रमाणे आहे.-

| अ. क्र. | प्रकल्पांतर्गत घटक | सन-२०२१ मध्ये प्राप्त अर्ज / प्रस्ताव | झालेला खर्च (रु.कोटी) | सन-२०२२ रोजी प्राप्त अर्ज/प्रस्ताव | झालेला खर्च (रु.कोटी) |
|---|---|---|---|---|---|
| १ | वैयक्तिक लाभ | ७०८४ | रु. २६ कोटी | १०७७४ | रु. ३४ कोटी |
| २ | शेतकरी गट/कंपनी | ४ प्रस्ताव | रु.०.३२ कोटी | २५ प्रस्ताव | रु. २.५० कोटी |
| ३ | मृद व जलसंधारण कामे | | रु.०.३४ कोटी | | रु. ०.३८ कोटी |

प्रकल्प गरजेनुसार लाभ (saturation mode)' या तत्त्वावर सुरु असल्यामुळे शासनाने विधायक भुमिका घेऊन जास्तीत जास्त लाभार्थ्यांना प्रकल्पाचा लाभ देण्याचा प्रयत्न केला आहे. प्रकल्पावर निर्माण झालेले अतिरिक्त दायित्व अदा करण्यासाठी, जागतिक बँकेने मंजूर केलेल्या रुपये ४००० कोटी प्रकल्प खर्चाव्यतिरिक्त रु.१४६९ कोटी अतिरिक्त निधी उपलब्ध करून देऊन शेतकऱ्यांनी पूर्ण केलेल्या तसेच चालू असलेल्या कामांसाठी अनुदान देण्याचा निर्णय घेतला आहे. यामुळे प्रकल्पाची सुधारित किमत रु.५४६९ कोटी इतकी झाली आहे. यानुसार शासनाने निर्माण झालेल्या निश्चित दायित्वासाठी निधीची पुरेशी तरतूद केली असल्याने अतिरिक्त दायित्व निर्माण होणार नाही याची दक्षता घेण्यात येत आहे. प्रकल्प अंतिम वर्षात असून प्रकल्पाचा उर्वरित कालावधी, प्राप्त अर्ज व त्याकरिता लागणारा निधी विचारात घेता, वैयक्तिक लाभाकरिता अर्ज करण्याची प्रक्रिया तसेच शेतकरी उत्पादक कंपनी/ गट यांचे कृषि व्यवसाय विषयक व्यावसायिक प्रस्ताव स्विकारणे दि. २६ एप्रिल, २०२३ पासून तर, मृद व जलसंधारणाची कामे पूर्ण होण्यास लागणारा कालावधी विचारात घेता, याकामांसाठीचे अर्ज स्विकारणे दि. २ मे, २०२३ पासून संस्थगित केले आहे.

प्रकल्पाकडे ठिबक, तुषार, फळबाग लागवड, बीजोत्पादन प्रक्रिया व इतर वैयक्तिक लाभाच्या बाबींकरिता प्रलंबित असलेल्या अर्जदार शेतकऱ्यांना कृषि विभागाच्या अन्य प्रचलित योजनांमधून लाभ देण्याची मुभा देण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्यात येत आहे. तसेच शेतकरी उत्पादक कंपन्या/ शेतकरी गटांना प्रकल्पा व्यतिरिक्त कृषि विभागाच्या प्रचलित योजनांची माहिती करून देऊन सदर प्रचलित योजनांतर्गत कृषि अवजारे योजनांचा लाभ घेण्यास प्रवृत्त करण्याबाबतच्या सूचना क्षेत्रीय स्तरावर देण्यात आलेल्या आहेत.

प्रकल्पाच्या यशस्वीतेमुळे राज्याच्या इतर जिल्ह्यांमधील गावांचा या प्रकल्पामध्ये समावेश करण्याची मागणी शासनाकडे होत असल्याची बाब लक्षात घेऊन शासनाने जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पाचा टप्पा- २ राबविण्यास शासन निर्णय दि. ३० जून, २०२३ अन्वये मान्यता दिलेली आहे. तसेच यामध्ये प्रकल्पाची व्याप्ती वाढवून प्रकल्पात सद्यस्थितीत समाविष्ट असलेल्या १६ जिल्ह्यांसह नागपूर, भंडारा, गोंदिया, चंद्रपूर व गडचिरोली या २१ जिल्ह्यांचा समावेश करण्यात येत आहे.

------

औषधनिर्माणशास्त्र, एचएमसीटी आणि सरफेस कोटींग टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमांची दिनांक ३१.७.२०२३ रोजी तसेच थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका या अभ्यासक्रमांची दिनांक २७.७.२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आली आहे. सर्व पदविका अभ्यासक्रमांच्या प्रवेशासाठीचा पुढील टप्पा विकल्प अर्ज भरुन घेणे सुरु झालेला आहे. त्यामुळे पदविका अभ्यासक्रमांच्या केंद्रीभुत प्रवेशासाठी अर्ज भरण्यापासून विद्यार्थी वंचित राहीलेले नाहीत. सदर प्रवेश प्रक्रियेसाठी अर्ज सादर करतांना उमेदवारांना आवश्यक प्रमाणपत्रे- जात/जमात प्रमाणपत्र, नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्र, आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकाचे प्रमाणपत्र, उत्पन्नाचा दाखला ही प्रमाणपत्रे मिळण्यास विलंब होत असल्यामुळे अर्ज नोंदणी करण्यास दोनदा मुदतवाढ देण्यात आलेली आहे. तसेच शासनाच्या परवानगीने संचालनालयाच्या दि.०७.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये, उमेदवारांना संबंधित प्रमाणपत्राऐवजी संबंधित प्राधिकरणाकडे केलेल्या अर्जाची पावती अपलोड/सादर करण्यास परवानगी देण्यात आली आहे. तसेच ज्या उमेदवारांनी संबंधित प्रमाणपत्राऐवजी संबंधित प्राधिकरणाकडे केलेल्या अर्जाची पावती अपलोड / सादर केलेली आहेत, अशा उमेदवारांना सदर प्रमाणपत्रे सादर करण्यास केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेतील द्वितीय फेरीच्या प्रवेश निश्चितीच्या अंतिम दिनांकापर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. संचालनालयामार्फत घोषित करण्यात आलेल्या वेळापत्रकानुसार, इयत्ता १०वी नंतरच्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमासाठी दिनांक १७.८.२०२३ पर्यंत, इयत्ता १२वी (विज्ञान) नंतरच्या प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र, एचएमसीटी आणि सरफेस कोटींग टेक्नॉलॉजी अभ्यासक्रमांसाठी दिनांक २३.८.२०२३ पर्यंत तसेच थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका या अभ्यासक्रमासाठी दिनांक २१.८.२०२३ पर्यंत या मुदतीत उमेदवार सदर प्रमाणपत्र सादर करु शकतात. त्यामुळे उमेदवारांना केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेकरीता सदर प्रमाणपत्रे सादर करण्यासाठी अजुनही १५ दिवसांपेक्षा जास्त दिवसांचा कालावधी शिल्लक आहे.

वैद्यकीय शिक्षणाच्या प्रवेशाच्या अनुषंगाने आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रम प्रवेशासाठी नीट-युजी ही पात्रता परीक्षा राष्ट्रीय पातळीवर घेण्यात येते. तसेच राज्य कोटा प्रवेशासाठी नॅशनल मेडीकल कमिशन, नवी दिल्ली यांच्या मेडीकल कॉन्सिलिंग कमिटी यांचेकडून वेळापत्रक जाहीर करण्यात येते. शैक्षणिक वर्ष २०२३-२४ मधील वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या राज्य कोटा प्रवेशासाठी मेडीकल कॉन्सिलींग कमिटी, नवी दिल्ली यांचेकडून वेळापत्रक जाहीर करण्यात आले असून यानुसार राज्य कोटा प्रवेशाची प्रथम प्रवेश फेरी दिनांक २५/०७/२०२३ ते दि.०४/०८/२०२३ या दरम्यान राबविणे आवश्यक आहे.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रमाच्या राज्य कोट्याच्या प्रवेश नियमावलीस शासनाने दिनांक २१/०७/२०२३ रोजी मान्यता दिलेली असून, त्यानुसार वैद्यकीय अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत वेळापत्रक प्रसिद्ध करण्यात आले होते. सदर वेळापत्रकाप्रमाणे आरोग्य विज्ञान पदवी अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी नोंदणीचा दिनांक २९/०७/२०२३ पर्यंत निश्चित करण्यात आला होता. तथापि, राज्यातील उमेदवारांना नोंदणी प्रक्रियेदरम्यान आलेल्या तांत्रिक अडचणी, नैसर्गिक आपत्तीमुळे उद्भवलेल्या अडचणी व उमेदवारांचे शैक्षणिक हित विचारात घेऊन राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षामार्फत सदर नोंदणी प्रक्रियेस दिनांक ३१/०७/२०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली आहे. याबाबतचे सुधारीत वेळापत्रक दिनांक २७/०७/२०२३ रोजी प्रसिध्द करण्यात आले आहे."

*****

ध/१७३- १७

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

लक्षवेधी सूचना क्र.१८११

श्री. नामदेव ससाणे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १८११:-

"यवतमाळ जिल्हयातील उमरखेड- महागांव तालुक्यात दि.२२.७.२०२३ रोजी प्रचंड प्रमाणात अतिवृष्टी झाली असल्याने इंटरनेट सेवा देणारे टॉवर व केबल सुध्दा वाहून जाणे, त्यामुळे इंटरनेट सेवा सुध्दा पूर्णतः बंद आहे. त्यामुळे शेतक-यांना ऑनलाईन पीकविमा भरण्यास अत्यंत कठीण होणे, त्यामुळे कृपया पीक विमा भरण्याची तारीख ही ३१ जुलै, २०२३ असून त्यामध्ये वाढ करुन १५ ऑगस्ट करण्यात यावी. व त्यासोबत विद्यार्थ्यांनासुध्दा त्यांचे शैक्षणिक फॉर्म हे ऑनलाइन पध्दतीने भरायचे असून ते सुध्दा भरता येत नसल्याने त्यांना सुध्दा १५ दिवसाचां कालावधी हा वाढवून देण्याची होत असलेली मागणी, त्यामध्ये खास करुन जे विद्यार्थी अभियांत्रिकी व वैद्यकिय शिक्षण करण्याकरिता ऑनलाईन पध्दतीने फॉर्म भरतात त्यांना पण तात्काळ मुदतवाढ द्यावी, जेणेकरुन त्यांचे शैक्षणिक नुकसान न होणे, याकरिता शासनाने महागांव व उमरखेड तालुक्यातील अतिवृष्टीग्रस्त नागरिकांना पिक विमा भरण्याकरिता व विद्यार्थ्यांना प्रवेशाकरिता ऑनलाईन फॉर्म भरण्यास मुदतवाढ देण्याबाबत तातडीने निर्णय घेण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिकिया व भूमिका."

---

मा. मंत्री (कृषि) यांचे निवेदन

"प्रधानमंत्री पीक विमा योजना ही केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनांनुसार राज्यात खरीप हंगाम २०१६ पासून राबविण्यात येत आहे. सदर योजना अधिसूचित क्षेत्रातील अधिसूचित पिकांसाठी कर्जदार व बिगर कर्जदार शेतकऱ्यांना ऐच्छिक आहे. वातावरण बदलाच्या पार्श्वभूमीवर नैसर्गिक आपत्तीमुळे शेतीचे होणाऱ्या नुकसानीपासून शेतकऱ्यांचे आर्थिक संरक्षण करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाने खरीप २०२३ पासून शेतकऱ्यांसाठी एक रुपयात पीक विमा योजना अंमलबजावणी सुरू केली आहे. राज्यात दि.०१ जुलै, २०२३ पासून पीक विमा नोंदणी सुरू असून या योजनेत भाग घेण्याचा अंतिम दिनांक ३१ जुलै, २०२३ होता. तथापि, शेतक-यांना या योजनेत सहभागी होण्यासाठी येणा-या तांत्रिक अडचणी विचारात घेवून योजनेत सहभागासाठी मुदतवाढ देण्याबाबत केंद्र शासनास विनंती करण्यात आली. त्यास अनुसरुन केंद्र शासनाने दिलेल्या मान्यतेनुसार विशेष बाब म्हणून प्रधानमंत्री पीक विमा योजनेत खरीप हंगाम २०२३ करीता राज्यात शेतकरी सहभागासाठी दि.३१ जुलै, २०२३ च्या शासन पुरकपत्रान्वये दि.०३ ऑगस्ट, २०२३ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

शैक्षणिक वर्ष २०२३-२४ करीता तंत्रशिक्षण संचालनालयामार्फत इयत्ता १०वी नंतरच्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका, इयत्ता १२वी (विज्ञान) नंतरच्या प्रथम वर्ष औषधनिर्माणशास्त्र, एचएमसीटी आणि सरफेस कोटींग टेक्नॉलॉजी तसेच थेट द्वितीय वर्ष अभियांत्रिकी पदविका या अभ्यासक्रमांची केंद्रीभूत प्रवेश प्रक्रिया ऑनलाईन पध्दतीने सुरु करण्यात आलेली आहे. सर्व पदविका प्रवेशासाठी इच्छुक विद्यार्थ्यांची नोंदणी प्रक्रिया पुर्ण झालेली असून त्यांची अंतिम गुणवत्ता यादी, इयत्ता १० वी नंतरच्या प्रथम वर्ष अभियांत्रिकी पदविका अभ्यासक्रमाची दिनांक २१.७.२०२३ रोजी, इयत्ता १२ वी (विज्ञान) नंतरच्या प्रथम वर्ष

लेख म/933 (750-8-23)-1   ८ पृ.मा.प.

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री. सुभाष धोटे, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. सुनिल केदार, श्री.विजय वडेट्टीवार, श्री.अस्लम शेख, श्री.अमिन पटेल, श्री.विकास ठाकरे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.७१२ पुढीलप्रमाणे आहे:-**

"राज्यातील सिमेंट उद्योग व सिमेंट उद्योगावर आधारित उद्योग हे वेगवेगळे असणे, सिमेंट बनविणारे उद्योग हे केंद्र सरकारच्या अधिपत्याखालील असणे, सिमेंट पासून उत्पादन बनविणारे उद्योग हे मध्यम व लघु उद्योगाशी निगडित असणे, त्यामुळे सिमेंट बनविण्याचा उद्योग आणि सिमेंटपासून उत्पादन बनविण्याचा उद्योग यांना एकच किमान वेतन लागू करणे, हा सिमेंट उद्योगातील कामगारांवर अन्याय असणे, शासनाने जारी केलेले किमान वेतन दर आजमितीला #९,०००/- इतका आहे तर सिमेंट उद्योगातील कार्यरत संघटना या दिवसाला #५५०/- किंवा त्यापेक्षा जास्त मिळावेत यासाठी शासनास सिमेंट उद्योग व सिमेंट उद्योगावर आधारित उद्योग यांचे वेगवेगळे किमान वेतन दर ठरविण्यात येणे, किमान वेतन दर हे निश्चित करणे किंवा लागू करणे याकरिता महाराष्ट्र राज्य किमान वेतन सल्लागार मंडळ महाराष्ट्र राज्याकरिता असणे, सदरहू सल्लागार मंडळ हे प्रत्येक अनुसूचित उद्योगाची पाहाणी करुन भेट देऊन किमान वेतन दर निश्चित करण्याबाबत शासनाला प्रस्तावित करणे, सदर सल्लागार मंडळाची मुदत नुकतीच संपलेली असून ते सल्लागार मंडळ प्राथम्याने पुन्हा गठीत करण्याची आवश्यकता असणे, वेतन दर निश्चित करण्याबाबत याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष तसेच टाळाटाळमुळे सिमेंट उद्योगातील कामगारांमध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

## मा.मंत्री (कामगार) यांचे निवेदन

"किमान वेतन अधिनियम, १९४८ या अधिनियमांतर्गत महाराष्ट्र राज्यात एकूण ६७ अनुसूचित उद्योगांकरिता किमान वेतन दर निश्चित करण्यात आलेले आहेत. या अनुसूचित उद्योगांतील निश्चित केलेल्या किमान वेतन मूळ दराचे प्रत्येक ५ वर्षानंतर पुनर्निर्धारण करण्यात येते. या अनुसूचित उद्योगातील कामगारांकरिता वर्षातून दोन वेळा जानेवारी ते जून आणि जुलै ते डिसेंबर या कालावधीकरिता विशेष भत्ता जाहीर केला जातो. अनुसूचित उद्योगांकरिता निश्चित करण्यात आलेले मूळ वेतन आणि विशेष भत्ता मिळून किमान वेतन दर ठरविले जातात.

"सिमेंटच्या व सिमेंटवरील आधारित उद्योगातील कामधंदा" या अनुसूचित रोजगाराकरिता दिनांक २९.०४.१९९४ रोजीच्या अधिसूचनेन्वये प्रथमत: किमान वेतन दर निश्चित करण्यात आलेले आहेत. तद्नंतर या उद्योगाच्या किमान वेतन दराचे दिनांक २५.०४.२००७ रोजीच्या शासन अधिसूचनेन्वये पुनर्निर्धारण करण्यात आलेले आहे.

सद्यस्थितीत "सिमेंटच्या व सिमेंटवरील आधारित उद्योगातील कामधंदा" या अनुसूचित उद्योगास लागू असलेले किमान वेतन दर खालीलप्रमाणे आहेत:-

"सिमेंटच्या व सिमेंटवरील आधारित उद्योगातील कामधंदा"

| अ.क्र. | कामगार वर्गवारी | किमान मूळ वेतन दर (दरमहा रुपये) | | |
|---|---|---|---|---|
| | | परिमंडळ-१ एकूण वेतन (मूळ वेतन+ महागाई भत्ता) | परिमंडळ-२ एकूण वेतन (मूळ वेतन+ महागाई भत्ता) | परिमंडळ-३ एकूण वेतन (मूळ वेतन+ महागाई भत्ता) |
| १. | २. | ३. | | |
| १. | कुशल | ९९४६ (३७१०+६२३६) | ९६४६ (३४१०+६२३६) | ९३४६ (३११०+६२३६) |
| २. | अर्धकुशल | ९८४६ (३६१०+६२३६) | ९५४६ (३३१०+६२३६) | ९२४६ (३०१०+६२३६) |
| ३. | अकुशल | ९७४६ (३५१०+६२३६) | ९४४६ (३२१०+६२३६) | ९१४६ (२९१०+६२३६) |

सिमेंट व सिमेंटवर आधारित उद्योगातील कामगारांच्या किमान वेतनासंदर्भात दुरुस्ती करणेबाबत मराठा सिमेंट कामगार संघटना यांनी शासनास दिलेल्या निवेदनाच्या अनुषंगाने शासन स्तरावर बैठका आयोजित करण्यात आल्या होत्या. किमान वेतन अधिनियमातील कलम ९ अंतर्गत समिती/उपसमिती गठित करण्याच्या तरतूदीस अनुसरुन सिमेंट व सिमेंटवर आधारित उद्योगाकरिता स्वतंत्रपणे किमान वेतन दर निश्चितीबाबत अभ्यास करुन शिफारस करण्यासाठी समिती गठित करण्याचे निर्देश दिलेले असून समिती गठीत करण्याची कार्यवाही सुरु आहे.

---

विभागीय आयुक्त नाशिक यांनी त्यांचेकडे दाखल केलेल्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने सदर प्रकरणी दिनांक २७/११/२०२० अन्वये त्रीस्तरीय चौकशी समितीची नेमणूक करण्यात आली होती. त्यानुसार सदर समितीने जिल्हयातील सर्वच तालुक्यात क्षेत्रीय पाहणी करून अहवाल सादर केला आहे. कंत्राटदाराने बसविलेल्या जीपीएस प्रणालीमध्ये अहवालात टँकर निघाल्याची व पोहोच झालेल्या वेळा न येता खेपेचा दिनांक व एकूण कालावधी नमुद करण्यात आले आहे. सदर समीतीच्या चौकशीमध्ये दखलपात्र गुन्हयाचा प्रकार निष्पन्न झाल्याने संबंधित कंत्राटदार मेसर्स साई सहारा इन्फ्राण्ड फॅसिलीटी पारनेर यांचेवर दिनांक २/३/२०२२ रोजी गुन्हा दाखल करणेत आलेला आहे.

अहमदनगर जिल्हा परिषदेस सन २०१५-२०१६ ते २०१९-२०२० या आर्थिक वर्षात एकूण रक्कम रू.१,३२,८८,५२,१९३/- (रुपये एकशे बत्तीस कोटी अठयांशी लाख बावन हजार एकशे त्रयान्नव) प्राप्त झाले होते. त्यापैकी रू.१,२४,०४,४४,८७३/- (एकशे चौवीस कोटी चार लाख चौरेचाळीस हजार आठशे त्रयाहत्तर) इतका खर्च झालेला आहे. व उर्वरित निधी शासनास समर्पित करण्यात आलेला आहे.१०० कोटीचा अपहार व गैरव्यवहार आहे अशी वस्तुस्थिती नाही.

तथापि पंचायत समिती जामखेड येथील सन २०१८-२०१९ मध्ये स्थानिक निधी लेखा परीक्षण अहवालात मंजूर क्षमतेपेक्षा जादा क्षमतेच्या खाजगी टँकरने पाणी पुरवठा केल्याने अति प्रदानाचा आक्षेप घेणेत आलेला होता. त्यानुसार संबंधित मोटर वाहतूक सहकारी संस्था कडून झालेले अतिप्रदान रक्कम रुपये ३१५१८३/- त्याचप्रमाणे पंचायत समिती कर्जत मध्ये पाणी पुरवठा करण्यात येणा-या संबंधित मोटर वाहतूक संस्था जामखेड या संस्थेच्या सन २०१८-२०१९ मधील रुपये २६६८३/- व सन २०१९-२०२० मधील रक्कम रुपये ४१८९/- इतके अति प्रदान वसूल करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी विभागीय आयुक्त, नाशिक यांचा अहवाल शासनास प्राप्त झालेला असून शासन परिपत्रक क्र.टंचाई-१००५/प्र.क्र.३०५/पापु-१४ व टंचाई/२०१९/प्र.क्र.०३/पापु-१४,दिनांक ०८.०३.२०१९ मधील तरतुदीची अंमलबजावणी न करता आर्थिक अनियमितता झालेली असल्याचे स्पष्ट होत असल्याने संबंधित अधिकारी/कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करून आवश्यक कार्यवाही करणेबाबत विभागीय आयुक्त, यांना सुचना देण्यात आलेल्या आहेत.

-----

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री.सुभाष धोटे, श्री.नानाभाऊ पटोले, श्री.सुनिल केदार, श्री.विजय वडेट्टीवार, श्री.अस्लम शेख, श्री.अमिन पटेल, श्री.विकास ठाकरे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र.७१४ पुढीलप्रमाणे आहे:-**

"राज्यातील लाखोंच्या संख्येने असलेल्या इमारत व बांधकाम क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांसाठी शासनामार्फत चांगल्या योजना राबविण्यात येणे, सदर योजनांचा लाभ तळागाळातील सर्व कामगारांना मिळावा यासाठी संबंधित खात्याच्या अधिकारी वर्गाकरिता चार चाकी वाहने उपलब्ध करून देण्यात येणे, शासनाच्या ग्रामपंचायत ते मंत्रालयापर्यंत कोणतीही वस्तु किंवा विशिष्ट वार्षिक खर्चाच्या अधिक असल्यास ती घेतांना खुली निविदा, टेंडर पद्धतीचा अवलंब करून घेणे बंधनकारक असणे, सहाय्यक कामगार आयुक्त कार्यालय, चंद्रपूर व कामगार अधिकारी, गडचिरोली या कार्यालयाअंतर्गत असलेल्या इमारत व बांधकाम कामगार अधिकारी, गडचिरोली या कार्यालयाअंतर्गत असलेल्या इमारत व बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळात वाहन भाड्याने घेतांना कोणत्याही कायदेशीर प्रक्रिया न राबविता आपल्या जवळच्या लोकांशी संगनमत करून त्यांच्याकडून दरपत्रक घेऊन, त्यांचेशी करारनामा करून वाहने भाडयाने घेतल्याचा प्रकार उघडकीस येणे, संबंधित अधिकारी यांच्यासोबत भ्रमणध्वनिवर झालेला चर्चेचा पुरावा (क्लिप) मा. प्रधान सचिव (कामगार विभाग) व मा. कामगार आयुक्त यांना दिनांक ९ डिसेंबर, २०२२ रोजी सादर केला असणे, यापूर्वी मंडळाच्या कामासाठी ह्याचप्रकारे वाहने भाडेतत्वावर व्यवहार झाल्याची व त्या मोबदल्यात लाखों रूपये खर्च केल्याची माहिती संबंधित कार्यालयाकडून मिळाली असणे, याप्रकरणी संबंधित वाहनधारक व चालक-मालक संघटना वाहने पुरविण्यास सक्षम असताना विना टेंडर बाहेरच्या जिल्हयातील पासिंग असलेली वाहने घेण्यामागे अधिकारी वर्गाचे काहीतरी स्वारस्य असणे, संबंधित भ्रष्ट अधिकाऱ्यांची चौकशी करणे, त्यांचेवर निलंबनाची कारवाई करण्याबाबत होत असलेले दुर्लक्ष, टाळाटाळ यामुळे कामगारांमध्ये शासनाप्रती पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत शासनामार्फत तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना"

---

## मा.मंत्री (कामगार) यांचे निवेदन

महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध शैक्षणिक सहाय्य योजना, आर्थिक सहाय्य योजना, सामाजिक सुरक्षा व अन्य योजना, आरोग्य विषयक योजना इ.लाभाचे वाटप करणे तसेच बांधकाम कामगारांची नोंदणी व नुतनीकरण करणे हे कामकाज कामगार आयुक्त कार्यालयांतर्गत विभाग व जिल्हा स्तरावरील क्षेत्रिय अधिकारी/कर्मचारी यांच्यामार्फत केले जाते.

मंडळाचे कामकाज हे जिल्हयाच्या शहरी भागापासून ग्रामीण भागांपर्यंत पसरलेले असून यामध्ये अधिकारी व कर्मचारी यांना तालुका व गाव पातळीवर जावून काम करावे लागते. विभाग व जिल्हा कार्यालयांना मंडळाची वाहने नसल्याने व मंडळाचे कामकाज करताना अडचणी निर्माण होत असल्याने मंडळाच्या दि.०४.०९.२०१९ रोजीच्या बैठकीतील ठराव क्र. ५२(०९)/२०१९, अन्वये कामगार आयुक्त कार्यालयाअंतर्गत ज्या विभाग/ जिल्हा कार्यालयातील अधिकाऱ्यांची पदे भरलेली आहेत त्या अधिकाऱ्यांना मंडळाच्या कामकाजासाठी बोलेरो/ स्कॉर्पियो अथवा तत्सम प्रकारचे वाहन मासिक भाडेतत्त्वावर उपलब्ध करून देण्यास मान्यता प्रदान केलेली आहे. तसेच जिल्हा कार्यालय प्रमुखांनी संबंधित जिल्हयाचे जिल्हाधिकारी कार्यालय किंवा प्रादेशिक परिवहन अधिकारी (RTO) यांनी निश्चित केलेल्या दराने अथवा संबंधित विभागाच्या अपर कामगार आयुक्त / कामगार उपायुक्त यांच्या मान्यतेने मासिक भाडयाचे दर व धाव निश्चित करून प्रथम १ वर्षाच्या कालावधीकरीता जिल्हा स्तरावरून करारनामा करण्यास मंडळाच्या बैठकीत मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

त्यानुसार महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या दिनांक २७.०९.२०१९ रोजीच्या पत्रान्वये वाहने भाडेतत्त्वावर घेण्याची कार्यपध्दती व वापराबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

मंडळाच्या दि.१७.०६.२०२१ रोजी पार पडलेल्या ५८ व्या बैठकीतील ठराव क्र.५८(१२) २०२१ अन्वये मंडळाच्या कामकाजाकरीता विभागीय व जिल्हा कार्यालयांनी घेतलेल्या भाडयाच्या वाहनांना पुढील एक वर्षाकरीता मुदतवाढ मंजुर करण्यात आली आहे.

सहाय्यक कामगार आयुक्त, चंद्रपुर कार्यालयाने वाहन भाडेतत्वावर घेण्यासाठी मागविलेल्या दरपत्रकानुसार एकूण ०३ पुरवठादारांकडून सीलबंद दरपत्रके प्राप्त झाली. सदर निविदाकारांचे दरांची तुलना करुन न्यूनतम दरधारक मे.विक्की ट्रॅव्हल्स, नागपुर या पुरवठादाराचे बोलेरो हे वाहन (MH४९ AT ६४७९ ) प्रति दिन २१००/- रुपये प्रमाणे भाडेतत्वावर घेण्यासाठी मे. विक्की ट्रॅव्हल्स, नागपूर यांच्यासोबत दि. ०२.०३.२०२० रोजी १ वर्षाकरीता (दि.०२.०३.२०२० ते दि.०१.०३.२०२१ अखेर) करारनामा करून पुरवठा आदेश दिला आहे. सदर कालावधीत पेट्रोल/डिझेलचे दर वाढले असले तरी मे. विक्की ट्रॅकल्स, नागपूर हे पूर्वीच्या दरात काम करण्यास तयार झाल्याने सदर पुरवठाधारकास दि.०१.०३.२०२१ ते दि.२८.०२.२०२२ व दि.०१.०३.२०२२ ते २८.०२.२०२३ या कालावधीकरीता मागील मंजूर दराने मुदतवाढ दिली आहे.

सरकारी कामगार अधिकारी, गडचिरोली कार्यालयाने भाडे तत्वावरील वाहनासाठी मागविलेल्या दरपत्रकानुसार एकूण ३ पुरवठादारांकडून सीलबंद दरपत्रके प्राप्त झाली. सदर दरपत्रक धारकांच्या दरांची तुलना करून न्यूनतम दरधारक मे. एस एन टुर्स अँड ट्रॅव्हल्स, चंद्रपुर या पुरवठादाराचे मारुती ईटिंगा हे वाहन (MH४९ AT ६८४९) प्रति दिन २१००/- रुपये प्रमाणे भाडे तत्वावर घेण्यासाठी मे. एस एन टुर्स अँड ट्रॅकल्स, चंद्रपुर यांच्यासोबत दि.०६.१०.२०२० रोजी ११ महीने करीता (दि.०१.१०.२०२० ते ३१.०८.२०२१ अखेर) करारनामा करून पुरवठा आदेश दिला

आहे. सदर कालावधीत पेट्रोल/डिझेलचे दर वाढले असले तरी मे. एस एन टुर्स अँड ट्रॅव्हल्स, चंद्रपुर हे पुर्वीच्या दरात काम करण्यास तयार झाल्याने सदर पुरवठाधारकास दि. ०१.०९.२०२१ ते ३१.०७.२०२२ या ११ महीन्याच्या कालावधीकरीता तसेच दि.०१.०८.२०२२ ते दि.३०.०६.२०२३ या पुढील ११ महिन्याच्या कालावधीकरीता मागील मंजूर दराने मुदतवाढ दिली आहे.

सहाय्यक कामगार आयुक्त, चंद्रपूर व सरकारी कामगार अधिकारी, गडचिरोली या कार्यालयांनी भाडे तत्वावर घेतलेल्या वाहनांचे प्रतिदिन दर हे अनुक्रमे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, चंद्रपूर (अवातानुकूलित वाहन रु.३०००/- प्रति दिन) व उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, गडचिरोली (अवातानुकूलित वाहन रु.२७५०/- प्रति दिन) यांनी निश्चित केलेल्या दरापेक्षा तसेच अवर सचिव, सामान्य प्रशासन विभाग (अवातानुकूलित वाहन रु.३५००/- प्रति दिन) यांनी निश्चित केलेल्या दरापेक्षा कमी असल्याचे दिसून येते.

---

## सन २०२३ चे दुसरे अधिवेशन

## महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र १४६७

श्री. प्रकाश आबिटकर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१४६७ पुढीलप्रमाणे आहे.:-

"राज्यातील हॉटेलमध्ये ग्रामीण भागातील युवक कोणतेही उपजीविकेचे साधन नसल्यामुळे मुंबई पुणे नागपूर नाशिक औरंगाबाद यासह सर्वच मोठ्या शहरात सहज जिल्ह्याच्या ठिकाणी काम करण्यासाठी येत असणे, ग्रामीण भागातील शेकडो कामगार लहान मोठ्या हॉटेलमध्ये अल्पशा वेतनावर काम करत असणे, देशाच्या विकासामध्ये सर्वाधिक वेगाने विकसित होणारे क्षेत्र म्हणजे सेवा क्षेत्र असून या क्षेत्राचा जीडीपी मध्ये मोठा वाटा असून, याच सेवा क्षेत्रामध्ये काम करणाऱ्या सर्व कामगारांना कोणत्याही प्रकारची सेवा ही संबंधित हॉटेल मालकांकडून मिळत नसणे, परिणामी एखादा कामगार आजारी असेल किंवा त्याच्या कुटुंबियांमध्ये एखादा कठीण प्रसंग उभारल्यास त्या कामगाराला एक तर कामावरून कमी केले जाण्याची शक्यता असणे, तसेच त्याला इतर कोणतीही मदत संबंधित हॉटेल प्रशासनाकडून करण्यात येत नसणे, आपल्या कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी ग्रामीण भागातून शेकडो किलोमीटर अंतरावर मोठ्या मोठ्या शहरांमध्ये तुटपुंज पगारावर काम करण्यासाठी कर्मचाऱ्यांना फार मोठ्या आर्थिक संकटाला सामोरे जावे लागत असणे, सर्वच हॉटेलमध्ये काम करणाऱ्या कामगारांची संख्या ही मोठी असल्यामुळे कल्याणकारी मंडळ स्थापन करणे आवश्यक असणे, राज्य शासनाच्या वतीने महाराष्ट्र इमारत व इतर बांधकाम कामगार कल्याणकारी मंडळाच्या माध्यमातून बांधकाम कामगारांना सेवा सुविधा उपलब्ध करून दिल्या जातात या सेवांमध्ये प्रामुख्याने सामाजिक सुरक्षा शैक्षणिक सुरक्षा आरोग्य विषयक आर्थिक या स्वरूपात सेवा उपलब्ध करून दिल्या जात असणे, त्याच धर्तीवर राज्यातील हॉटेलमध्ये काम करणाऱ्या कामगारांसाठी कल्याणकारी मंडळ स्थापन करण्याची मागणी दि.६/६/२०२३ रोजी मा. मुख्यमंत्री यांना मा. वि.स.स. यांनी लेखी पत्राद्वारे केलेली असणे, पत्राच्या अनुषंगाने अद्यापही कुठलीही कारवाई न होणे, इतर क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांप्रमाणे हॉटेल क्षेत्रात काम करणाऱ्या कामगारांसाठी कल्याणकारी मंडळ स्थापन करण्या बाबत शासनामार्फत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया व भुमिका".

## मा.मंत्री (कामगार) यांचे निवेदन

केंद्र सरकारने असंघटित कामगारांसाठी सामाजिक सुरक्षितता पुरविण्याच्या उद्देशाने दिनांक ३१.१२.२००८ रोजी असंघटित कामगार सामाजिक सुरक्षा अधिनियम २००८ पारित केला आहे. लेबर ब्युरो, चंदीगड यांनी सन २०१४ मध्ये जाहिर केलेल्या चौथ्या वार्षिक रोजगार-बेरोजगारी सर्वेक्षणानुसार महाराष्ट्र राज्यात ३,६५,२५,१४९ असंघटीत कामगार आहेत.

केंद्र सरकारने असंघटीत कामगारांचा राष्ट्रीय डेटाबेस (NDUW-National Database of Unorganised Workers) तयार करण्याचा निर्णय घेतलेला असून असंघटित कामगारांची नोंदणी करण्याकरीता दिनांक २६.०८.२०२१ रोजी ई-श्रम पोर्टल सुरू करण्यात आले असून, दि.२३.०७.२०२३ अखेर राज्यात ई-श्रम पोर्टल वर सुमारे १३६.९० लाख असंघटीत कामगारांनी नोंदणी केलेली आहे. लहान उपहारगृहे/खाद्यगृहे, छोटे हॉटेल व्यावसायिक, चहा टपरी इत्यादी

सारख्या ठिकाणी काम करणाऱ्या असंघटित कामगारांनाही ई-श्रम पोर्टलवर नोंदणी करता येणार आहे.

निवासी हॉटेल, उपहारगृह किंवा खाद्यगृह यामधील कामधंदा किंवा अशा प्रक्रियेतील अनुषंगिक असणारे काम किंवा अशा कोणत्याही उद्योगातील कामधंदा या अनुसूचित रोजगारात काम करणाऱ्या कामगारांना विविध कामगार कायद्यांचे संरक्षण प्राप्त असून त्यांचा संघटित क्षेत्रामध्ये समावेश होत असल्याने, महाराष्ट्र शासनाने किमान वेतन अधिनियम, १९४८ अंतर्गत "कोणतेही निवासी हॉटेल, उपहारगृह किंवा खाद्यगृह यामधील कामधंदा किंवा अशा प्रक्रियेतील अनुषंगिक असणारे काम किंवा अशा कोणत्याही उद्योगातील कामधंदा (महाराष्ट्र दुकाने व आस्थापना (नोकरीचे व सेवाशर्तीचे विनियमन ) अधिनियम, २०१७ मध्ये दिलेल्या व्याख्येनुसार)" या अनुसूचित रोजगारात काम करणाऱ्या कामगारांकरिता दि. ५.७.२०१३ रोजीच्या अधिसूचनेन्वये निवासी उपाहारगृह किंवा खाद्यगृह येथील कामधंद्यासंदर्भात तेथील कार्यरत कामगारांसाठी मूळ किमान वेतन दर जाहिर केलेले आहेत.

राज्यातील विविध उद्योग क्षेत्रनिहाय असंघटित कामगारांची संख्या तसेच ते सामाजिक सुरक्षेपासून वंचित रहात असल्याची बाब विचारात घेवून असंघटित क्षेत्रातील कामगारांना सामाजिक सुरक्षा व विविध कल्याणकारी योजनांचे लाभ देण्यासाठी लवचिक कार्यपध्दती अवलंबण्याच्या दृष्टीने दि.६.७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयानुसार सर्वसमावेशक असे "महाराष्ट्र राज्य असंघटित कामगार कल्याण महामंडळ" व त्याचे अंतर्गत परिशिष्ट-१ मधील उद्योग/व्यवसाय क्षेत्रनिहाय ३९ आभासी (Virtual) मंडळे स्थापन करण्यास मान्यता देण्यात आली आहे. दि.६.७.२०२३ रोजीच्या शासन निर्णयातील परिशिष्ट-१ मधील अनुक्रमांक ११ मध्ये आदरातिथ्य सेवासंबधित उद्योगामध्ये असंघटित हॉटेल कामगारांचा समावेश करण्यात आलेला आहे.

---

लक्षवेधी सूचना क्रमांक १५५४

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

**श्री.सुनिल शेळके, विधानसभा सदस्य** यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना क्र.१५५४** पुढीलप्रमाणे आहे:-

"मावळ तालुक्यातील ऑटोमोबाइल क्षेत्रातील आंतरराष्ट्रीय दर्जाची जनरल मोटर्स इंडिया प्रा. लि. हि कंपनी माहे मार्च, २०२३ वा त्यासुमारास ह्युंदाई मोटर्स इंडिया कंपनीने खरेदी केली असल्याची बाब निदर्शनास येणे, याआधीही जनरल मोटर्स मोटर्स इंडिया प्रा. लि. कंपनीने कामगारांना विश्वासात न घेता कंपनी नियमांचा भंग करून सदर प्रकल्प चीनच्या ग्रेट वॉल मोटर्सला विक्री करण्याचे प्रयत्न केलेला असणे, परंतु भारत सरकारच्या एफडीआय धोरणामुळे ग्रेट वॉल मोटर्स या कंपनीने सदर करार रद्द केल्याचे निदर्शनास येणे, सद्य:स्थितीत जनरल मोटर्स प्रकल्पामध्ये बहुतांश कामगार हे स्थानिक व औद्योगिक क्षेत्रात भूसंपादन झालेले प्रकल्पबाधित शेतकरी कुटुंबातील असून बरेचसे कामगार महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून आपल्या उदरनिर्वाहासाठी कुटुंबासह तळेगाव येथे स्थलांतरित झालेले असणे, ह्युंदाई मोटर्स इंडिया या कंपनीमध्ये जनरल मोटर्स प्रकल्पातील पूर्वीच्या सर्व कामगारांना मागील सेवा काल अखंड ठेवून कायमस्वरूपी कामगार म्हणून कामावर ठेवून निवृत्तीचे वय वर्ष ५८ पर्यंत निरंतर सेवेची हमी द्यावी आणि सर्व सेवाशर्ती पूर्ववत ठेवाव्यात अशी प्रमुख मागणी जनरल मोटर्सच्या कामगार संघटनेच्या वतीने कंपनी व्यवस्थापन तसेच शासनास केल्याचे निदर्शनास येणे, परंतु सदर मागणीकडे कंपनी व शासनाचे होणारे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी कामगार वर्गामध्ये निर्माण होणारी तीव्र नाराजी व संतापाची भावना, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा.मंत्री (कामगार) यांचे निवेदन

मे.जनरल मोटर्स इंडिया प्रा.लि. या कंपनीची स्थापना १९९४ मध्ये भारतात करण्यात आली आहे व सदर आस्थापनेचे तळेगांव इंडस्ट्रियल एरिया, फेज-२, मावळ, जि.पुणे येथील युनिट २००८ मध्ये सुरू करण्यात आले आहे. सदर कंपनीचा व्यवसाय ऑटोमोटिव्ह वाहने, वाहनाचे सुटे भाग, पॉवर ट्रेन/इंजिन आणि संबंधित उत्पादने निर्मिती करणे हा आहे. विभागास प्राप्त माहितीनुसार सदर कंपनीच्या तळेगांव येथील आस्थापनेत/कारखान्यात दि.१५/०२/२०२१ रोजी १५७८ कायम कामगार, २३६ व्यवस्थापकीय कर्मचारी व ६५० कंत्राटी काम करीत होते. त्यापैकी

(क्र.मा.प.

झेटा - एच - ७९५ (७०० - ४ - २३)

१५७८ कायम कामगारांपैकी ४९६ कामगारांनी स्वेच्छानिवृत्ती घेतलेली आहे. सदर आस्थापनेत जनरल मोटर्स एम्प्लॉईज युनियन ही संघटना कामगारांचे प्रतिनिधीत्व करते.

मे.जनरल मोटर्स इंडिया प्रा.लि. यांनी त्यांचे तळेगांव, पुणे येथील युनिट बंद करण्यासाठी शासनाची परवानगी मिळण्याकरिता औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ च्या कलम २५ (ओ) (१) अन्वये शासनाकडे अर्ज सादर केला होता. सदर अर्जामध्ये त्यांनी कंपनी बंद करण्याबाबत नमूद केलेल्या कारणामध्ये प्रामुख्याने मागील १० वर्षापासून वाहनांच्या मागणीमध्ये घट होणे, स्टीलच्या किंमतीमध्ये वाढ होणे, वाढती स्पर्धा व त्यामुळे झालेली खर्चातील वाढ, इत्यादी कारणामुळे दि.२४/१२/२०२० नंतर निर्यातीकरिता मागणी नसल्याने आस्थापना बंद करण्याचा निर्णय घेतल्याचे नमूद केलेले आहे. सदर अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन मा.मंत्री (कामगार) यांच्याकडे सुनावणी होवून मा.मंत्री (कामगार) यांच्या दि.१८/०१/२०२१ रोजीच्या आदेशान्वये मे.जनरल मोटर्स इंडिया प्रा.लि. यांची तळेगांव, एमआयडीसी येथील युनिट बंद करण्याची विनंती अमान्य करण्यात आली. त्यावर मे.जनरल मोटर्स इंडिया प्रा.लि. यांनी औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ च्या कलम २५ (ओ) (५) अन्वये पुनर्विलोकन अर्ज सादर केला होता. सदर पुनर्विलोकन अर्जाच्या अनुषंगाने तत्कालीन मा.मंत्री (कामगार) यांनी व्यवस्थापन व प्रतिवादी जनरल मोटर्स एम्प्लॉईज युनियन यांचे म्हणणे ऐकून दि.१९/०३/२०२१ रोजीच्या आदेशान्वये सदर प्रकरण अभिनिर्णयार्थ मा.औद्योगिक न्यायालय, पुणे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आले. आता, याप्रकरणी मा.औद्योगिक न्यायालय, पुणे यांनी दि.३०/०६/२०२३ रोजी आवार्ड घोषित केला असून औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ च्या कलम २५-ओ अन्वये कंपनी व्यवस्थापनास कंपनी बंद करण्यास परवानगी दिलेली आहे.

अर्जदार कंपनीने या प्रकरणी मा.औद्योगिक न्यायालयाकडून पुनर्विलोकन अर्जावर निर्णय घेण्यास अवाजवी विलंब झाल्याचे नमूद करत औद्योगिक विवाद अधिनियम, १९४७ च्या कलम २५-ओ (१) अंतर्गत नवीन अर्ज दि.२७/०६/२०२३ रोजी दाखल केलेला होता. सदर अर्जाच्या अनुषंगाने दि.०५/०७/२०२३ रोजी सुनावणी होवून दि.०५/०७/२०२३ रोजीच्या आदेशान्वये मे.जनरल मोटर्स इंडिया प्रा.लि. यांची तळेगांव, एमआयडीसी येथील युनिट बंद करण्याची विनंती मान्य करण्यात आली आहे. सदर आदेशामध्ये कंपनी व्यवस्थापनाने उर्वरित कामगारांना पुर्वीच्या कामगारांप्रमाणे ११० दिवसाचे VSP पॅकेज देवून सदर रक्कम ६० दिवसांमध्ये कामगारांना देण्यात यावी, असे निर्देश दिलेले आहेत.

*********

**लक्षवेधी सूचना क्र. ५८४**

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२२ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन**

**महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०५ अनुसार लक्षवेधी सूचना क्र. ५८४**

**श्री.बळवंत वानखडे, मा.विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना क्र. ५८४ पुढीलप्रमाणे आहे :-**

**““राज्यातील शेतकऱ्यांच्या दृष्टीने शेतीशिवारातील पाणंद रस्ते अतिशय महत्त्वाचे असणे, विदर्भात विशेषता अमरावती विभागातील खारपान पट्ट्यात मोठ्या प्रमाणात पाणंद रस्त्याचा अनुशेष निर्माण होणे, एकीकडे राज्यात विदर्भातील शेतकऱ्यांच्या आर्थिक उन्नतीसाठी समृद्धी महामार्ग सुरू झालेला असणे परंतु शेतकऱ्यांना आपल्या शेतीच्या कामासाठी अतिशय महत्त्वाच्या असणाऱ्या पाणंद रस्त्याबाबत शासनाचे उदासीन धोरण असणे, वारंवार शेतीच्या पाणंद रस्त्याबाबत शासनाचे धोरण बदलत असणे, यावर वेगवेगळया योजना निर्माण होत असणे, परंतु प्रत्यक्षात या योजनांची स्थानिक पातळीवर अंमलबजावणीचे प्रमाण अतिशय कमी असणे, त्यामुळे मोठ्या प्रमाणात पाणंद रस्ते अपूर्ण स्वरूपात असणे, सद्यस्थितीत सुरू असलेली मातोश्री ग्राम समृद्धी शेत/पाणंद रस्ते योजना अतिशय किचकट व कुचकामी असणे, शेत/ पाणंद रस्ते सोप्या व सुलभ मार्गाने करण्याबाबत शेतकऱ्यांची मागणी असणे, परंतु याबाबत शासनामार्फत अद्यापही कोणतीही कारवाई करण्यात आलेली नसणे, यामुळे शेतकऱ्यांमध्ये शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपयोग उपाययोजना.””**

**मा.मंत्री (रोहयो) यांचे निवेदन**

शेत/पाणंद रस्त्यांचा रस्ते विकास आराखड्यामध्ये समावेश नसल्याने सदर रस्त्यांच्या कामांकरीता विविध योजनांच्या माध्यमातुन निधी उपलब्ध होण्यास तांत्रिक अडचणी येतात. तसेंच, राज्यातील शेत/पाणंद रस्त्यांची एकुण संख्या व एकत्रित लांबी मोठ्या प्रमाणात आहे. सदर शेत/पाणंद रस्त्यांच्या कामांसाठी लागणाऱ्या निधीची तरतुद केवळ राज्याच्या अर्थसंकल्पातुन पुर्ण करणे शक्य नाही. याबाबी विचारात घेऊन शेत/पाणंद रस्त्यांच्या कामांकरीता केंद्रशासनाच्या मनरेगा योजनेतुन अधिक निधी मिळविण्याच्या हेतुने शेत/पाणंद रस्त्याची कामे मनरेगा आणि राज्य रोहयो यांचे अभिसरणाव्दारे करण्याबाबत मंत्रिमंडळाच्या मान्यतेने दिनांक ११ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या शासननिर्णयान्वये “मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजना” सुरु करण्यात आली आहे. मनरेगा योजनेंतर्गत शेत/पाणंद रस्त्यांच्या कामावरील अकुशल आणि कुशल खर्चाचे अनुक्रमे ६०:४० असे प्रमाण राखता यावे याकरीता राज्य रोजगार हमी योजनेमधुन पुरक कुशल निधी राज्य शासनस्तरावरुन उपलब्ध करुन देण्यात येतो. मनरेगा योजनेंतर्गत अनुज्ञेय असणारी विविध कामांमधील अकुशल व कुशल घटकातील खर्चाचे अनुक्रमे ६०:४०असे प्रमाण राखुन म्हणजेच संयोजनातुन सुद्धा शेत/पाणंद रस्त्यांची कामे पुर्ण करता येतात. केंद्र व राज्य शासनाच्या विविध योजनांचे मनरेगा योजनेशी अभिसरण करुन देखील शेत/पाणंद रस्त्यांची कामे सदर योजनेंतर्गत पुर्ण करता येतात.

शासनस्तरावरुन आजपावेतो राज्यात सुमारे ३० हजार पेक्षा अधिक कि.मी. लांबीच्या शेत/पाणंद रस्त्याच्या आराखड्यास मान्यता देण्यात आली असुन त्यामध्ये अमरावती विभागातील सुमारे ३ हजार कि.मी पेक्षा अधिक कि.मी.लांबींच्या रस्त्यांसह विदर्भातील सुमारे ५ हजार कि.मी. पेक्षा अधिक लांबीच्या रस्त्यांचा समावेश करण्यात आला आहे.

सन २०२१-२२ या दरसुचीनुसार मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजनेंतर्गत प्रति कि.मी सुमारे २४ लाख रुपये अंदाजपत्रकीय रक्कम विहीत करण्यात आली होती. दिनांक ११ नोव्हेंबर, २०२१ रोजीच्या शासन निर्णयातील नमुना अंदाजपत्रकानुसार १ कि. मी. खडीकरणासह पक्क्या रस्त्याचे अंदाजपत्रक रु. २३.८४ लक्ष असे विहीत करण्यात आले आहे. यामध्ये मनरेगा योजनेतील अकुशल घटकासाठी रु. ९,०२,८७९/- त्यानुसार अनुज्ञेय प्रमाणात मनरेगा योजनेतील कुशल घटकासाठी रु. ६०१९१९/- व राज्य रोहयोंतर्गत पुरक कुशल घटकासाठी रु. ८,८०,०५८/- असे एकुण रु. २३,८४,८५६/- इतक्या रकमेचे अंदाजपत्रक विहीत करण्यात आले आहे. सदर अंदाजपत्रकामध्ये रॉयल्टी व वस्तु व सेवाकर (GST) संदर्भातील रकमांचा देखील समावेश आहे. स्थानिक भौगोलीक परिस्थिती आणि जिल्हादरसुची बदलल्याने अंदाजपत्रकांची रक्कम कमी-जास्त होऊ शकते, असे दिनांक ११ नोव्हेंबर,२०२१ रोजीच्या शासननिर्णयात नमूद करण्यात आले आहे. तथापि, खडीकरणाकरीता आवश्यक खडी व मुरुमचा जवळपासच्या क्षेत्रात अभाव व त्यामुळे खडी व मुरुम वाहतुकीचे वाढणारे अंतर (Lead) व वाहतुकीचा खर्च, तसेच, शेत/पाणंद रस्त्यांवर करावयाचे आवश्यक पुलवजाकाम (Cross Drainage Work) इत्यादी कारणांमुळे देखील प्रत्यक्ष बांधकाम करतांना शेत/पाणंद रस्त्यांच्या स्थळनिहाय अंदाजपत्रक तयार केल्यास अंदाजपत्रकांच्या रकमेत मोठ्या प्रमाणात वाढ दिसुन येत आहे. विशेषत: प्रती कि.मी. शेत/पाणंद रस्त्यांच्या अंदाजपत्रकीय रकमेत जिल्हानिहाय मोठा फरक दिसुन येतो. तसेच, शेत/पाणंद रस्त्यांची प्रत्यक्ष कामे करतांना देखील अडचणी येत असुन कामांची गुणवत्ताही कायम राखणे आवश्यक आहे. मात्र पुरक कुशल निधीचा अवाजवी भार राज्यावर येऊ नये, याबाबत दक्षता घेण्यासाठी ज्या शेत/पाणंद रस्त्यांची अंदाजपत्रकीय रक्कम प्रती कि.मी. रु.२४ लाखांपेक्षा अधिक होत असल्यास अशी अंदाजपत्रके तांत्रिक मान्यतेसह शासनस्तरावर सादर करण्याचे कळविण्यात आले होते. त्यानुषंगाने छाननी समिती देखील गठीत करण्यात आली होती. सदर समितीने उक्त अंदाजपत्रकीय रकमेत १० टक्के वाढ करण्याची शासनास शिफारस केली होती व सदर शिफारस शासनाने मान्य केली आहे. त्यानुषंगाने शेत/पाणंद रस्त्यांच्या अंदाजपत्रकीय किंमतीत वाढ करुन कामे करण्याबाबत क्षेत्रीय कार्यालयांना कळविण्यात आले आहे.

मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजनेंतर्गत मनरेगा योजनेशी अभिसरण करुन कामे पुर्ण करण्यात येतात. सदर योजनेतील शेत/पाणंद रस्त्याचे काम करतांना मजुरीच्या स्वरुपातील (अकुशल) कामाचे प्रमाण अधिक ठेऊन काम केल्यास अकुशल खर्चाच्या दोन तृतीयांश प्रमाणात मनरेगांतर्गत केंद्र शासनामार्फत साहित्यावरील (कुशल) खर्च उपलब्ध होतो. तसेच, अकुशल खर्चाच्या प्रमाणात राज्य रोहयोंतर्गत पुरक कुशल निधी उपलब्ध करुन देण्यात येतो. तथापि, शेत/पाणंद रस्त्यांची अंदाजपत्रके तयार करतांना आणि त्याप्रमाणे कामे करतांना मजुरीवर अल्प प्रमाणात खर्च होत असल्याचे दिसुन आले होते. त्यामुळे प्रति कि.मी. किमान साडेचार लाख रुपये इतका मजुरीवर खर्च करण्याबाबत शासनस्तरावरुन कळविण्यात आले होते. तथापि, बहुतांश ठिकाणी अशी कार्यवाही करण्यात येत नसल्याचे निदर्शनास आल्याने ज्या प्रमाणात अकुशल खर्च होईल त्याप्रमाणातच पुरक कुशल अनुदान देय होईल असे शासनस्तरावरुन कळविण्यात आले आहे.

मागेल त्याला कामासह मत्ता निर्मिती या उद्देशाने मातोश्री ग्रामसमृध्दी शेत/पाणंद रस्ते योजनेंतर्गत मनरेगा योजनेशी अभिसरण करुन राबविण्यात येत आहे. तथापि, सदर कामांकरीता मनरेगा योजनेंतर्गत मजुरांनी कामांची मागणी करुन कामावर उपस्थित होणे आवश्यक आहे. तथापि, शेत/पाणंद रस्त्याच्या कामांकरीता पुरेशा प्रमाणात मजुर उपलब्ध न होणे, मजुरांची उपस्थिती एनएमएमएस (National Mobile Monitoring System) या ॲप्लीकेशनद्वारे ऑनलाईन नोंदविणे केंद्रशासनाने बंधनकारक केले असुन काही ठिकाणी कामाच्या जागेवर नेटवर्क नसणे, परिणामी मजुर उपस्थिती नोंदण्यास अडचणी येणे, शेत/पाणंद रस्त्यांच्या जागेवर अतिक्रमण असणे व सदर अतिक्रमण काढण्याची

कार्यवाही करण्यास अतिक्रमणधारकांकडुन अडथळे निर्माण करणे, ग्रामरोजगारसेवक, गट विकास अधिकारी यांचे वारंवार होणाऱ्या संपाच्या परिणामी शेत/पाणंद रस्त्यांच्या कामांच्या प्रशासकीय कामकाजात दिरंगाई होणे अशा विविध कारणामुळे शेत/पाणंद रस्त्यांची कामे पुर्ण होण्यास काहीशी दिरंगाई होत आहे.

वरील सर्व पार्श्वभुमीवर मातोश्री ग्रामसमृध्दी पाणंद शेतरस्ते योजनेत सुधारणा करुन नवीन योजना सुरु करण्यात येईल असे मा. उपमुख्यमंत्री तथा तत्कालिन वित्तमंत्री यांनी सन २०२३-२४ या वर्षाच्या अर्थसंकल्पीय भाषणातील घोषणा करण्यात आली असुन त्यासंदर्भातील प्रस्तावावर विभागात कार्यवाही सुरु आहे.

************

<u>लक्षवेधी सूचना क्र.१२४८</u>

**महाराष्ट्र विधानसभा**
**सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन**
**महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये लक्षवेधी सूचना**

---

**श्री. सुभाष धोटे, श्री. नानाभाऊ पटोले, श्री. बाळासाहेब थोरात, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. विकास ठाकरे, श्री. सुनिल केदार, श्री. कुणाल पाटील, अॅड. यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री. बळवंत वानखडे, श्री. अमिन पटेल, श्रीमती सुलभा खोडके, श्री. अस्लम शेख, श्री. झीशान सिद्दिकी, प्रा. वर्षा गायकवाड, श्रीमती प्रतिभा धानोरकर व श्री. सुरेश वरपुडकर, मा.विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.१२४८ पुढीलप्रमाणे आहे :-**

**"“राज्यातील जिल्हा-गडचिरोली स्थित भामरागड, अहेरी व मुलचेरा या दुर्गम तालुक्यात महात्मा गांधी ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या कामांचे प्रस्ताव तसेच निधी मागणी नसतांनाही कंत्राटदार व यंत्रणेतील लॉबीसाठी थेट मंत्रालयातून कोट्यावधींचा निधी आल्याची धक्कादायक बाब अलिकडेच उघडकीस येणे, भामरागड तालुक्यात जिल्हा स्तरीय यंत्रणेकडून केवळ २० लाखांच्या कामांना मंजुरी होती पण ५ कोटी ६१ लाखांची कामे करणे, मुलचेरा येथे २ कोटी ४० लाखांचा निधी मंजूर होणे, तिथे ३ कोटी ४० लाखांची कामे झालेली असणे, अहेरीतही असाच प्रकार घडल्याचे उघडकीस येणे, मग्रारोहयोची कामे जिल्हाधिकारी, जिल्हा परिषद सीईओ यांच्या परवानगीने मंजूर होणे अपेक्षित असताना मात्र दुर्गम भागात यंत्रणेतील कांही स्थानिक अधिकाऱ्यांशी हातमिळवणी करीत मंत्रालयातून कोट्यवधी रुपयांचा निधी मंजूर करवून थातुरमातुर कामे करण्यासाठी शहा नावाच्या व्यक्तीने फिल्डिंग लावल्याची माहिती समोर येणे, या प्रकरणात २३ अधिकारी, कर्मचाऱ्यांवर ठपका असतांना दिनांक २७ एप्रिल रोजी जिल्हापरिषद सीईओ यांनी केवळ तीन ग्रामसेवकांचे निलंबन, चार ग्रामसेवकांसह शाखा अभियंता सुलतान आजम यांच्याविरुध्द विभागीय अभियंता चौकशीचा प्रस्ताव तर भामरागडमध्ये गटविकास अधिकारी यांच्यावर शिस्तभंग कारवाई प्रस्तावित केली असणे, ज्यांच्या स्वाक्षरीने कोट्यवधी रुपयांची बिले मंजूर झाली, ज्यांनी कामांना मंजूरी दिली त्यांच्या विभागीय चौकशीचा प्रस्ताव तर नाहीच परंतु दुय्यम कर्मचाऱ्यांचे निलंबन करण्यात येणे, कोट्यवधी रुपयांचा निधी जिरवून धूळफेक करणाऱ्या तसेच अधिकारी दोषी आढळलेल्या प्रकरणात कंत्राटदारांवर अद्याप फौजदारी गुन्हा दाखल करण्यात न येणे आणि अदा केलेली देयके वसुलीसाठी साधी नोटीस बजावण्यात आली, सदर प्रकरणी शासनाचे होत असलेले दुर्लक्ष व टाळाटाळ ; त्यामुळे या भागातील सर्वसामान्य जनतेत शासनाप्रति पसरलेला तीव्र असंतोष व संतापाची भावना : याबाबत शासनामार्फत तातडीने कार्यवाही करण्याची आवश्यकता व शासनाची प्रतिक्रिया.”"**

**मा. मंत्री (रोजगार हमी) यांचे निवेदन**

मनरेगा योजनेंतर्गतील कामांवरील अकुशल (मजुरी) आणि कुशल (साहित्य) घटकांवरील खर्चाचे अनुक्रमे ६०:४० असे प्रमाण जिल्हास्तरावर राखण्याबाबत केंद्र शासनाचे निदेश आहेत. तरीही मागेल त्याला

काम याच उद्देशाने मजुरीप्रधान कामांचीच अंमलबजावणी प्रामुख्याने करण्यात येते. त्यामुळे मनरेगांतर्गत जिल्हास्तरीय अकुशल घटकाच्या प्रमाणात उपलब्ध होऊ शकणारा कुशल घटकांतर्गत कुशल प्रधान कामांवर खर्च करणे अनुज्ञेय असतांनाही कुशल घटकांतर्गतच्या कामांकरीता पुर्ण क्षमतेने क्षेत्रीय यंत्रणेव्दारा कार्यवाही होत नाही आणि आर्थिक वर्षाअखेर जिल्हास्तरावर झालेल्या अकुशल खर्चाच्या प्रमाणात अनुज्ञेय अतिरिक्त कुशल घटकांतर्गत उपलब्ध होऊ शकणारा निधी विनाखर्च वाया जातो. तथापि, मनरेगांतर्गत अनुज्ञेय साहित्यावरील खर्च अधिक असणारे विविध कामे घेण्याबाबत शासनस्तरावर संबधित ग्रामपंचायत/लोकप्रतिनिधी यांच्यामार्फत मागणी असते. वास्तविक पाहता, जिल्हास्तरावर कुशल खर्चप्रधान काम करण्यास वाव असल्यास अशी कामे क्षेत्रीयस्तरावर घेता येतात. तथापि, क्षेत्रीय पातळीवर अशी कार्यवाही होत नसल्याने राज्यात अकुशल खर्चाच्या प्रमाणात उपलब्ध अतिरिक्त कुशल घटकांतर्गतील खर्चाचे शासनस्तरावरुन नियोजन करण्यात येते. तथापि, याबाबत सर्व वैधानिक बाबींची पुर्तता करणे आवश्यकच आहे. तसेच, संबधित ग्रामपंचायतीस ग्रामसभेच्या मान्यतेने मनरेगांतर्गत कामे घेण्याचा वैधानिक अधिकार असल्याने अतिरिक्त कुशल घटकातुन शासनस्तरावरुन सुचविण्यात आलेल्या कामांव्यतिरिक्तही ग्रामपंचायत कुशलप्रधान कामे घेऊ शकते.

सन २०२२-२३ या आर्थिक वर्षात गडचिरोली जिल्ह्यामध्ये उपलब्ध अतिरिक्त कुशल घटकांतर्गत अहेरी तालूक्याकरीता प्रथमत: रु.४१० लक्ष व तद्नंतर रु.१४० लक्ष असे एकुण रु.५५० लक्ष, भामरागड तालुक्याकरीता रु.२० लक्ष, मुलचेरा तालुक्याकरीता रु.२४० लक्षची कामे सुचविण्यात आली होती.

शासन पत्र दि. १५/०२/२०२२ मधील नमुद कार्यपध्दतीनुसार कामे पुर्ण करण्याची कार्यवाही करण्यात आली आहे. सदर कामे पुर्ण झाल्यानंतर गट विकास अधिकारी, पंचायत समिती, भामरागड,; गट विकास अधिकारी, पंचायत समिती, मुलचेरा आणि गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अहेरी यांचे मार्फत निधीची मागणी करण्यात आली होती. सदर निधी मागणी प्रस्तावानुसार जिल्हास्तरावरुन आयुक्त (नरेगा), नागपुर यांचे कार्यालयाकडे निधीची मागणी करण्यात आली होती. त्याअनुषंगाने शासनस्तरावरुन आयुक्त (नरेगा), कार्यालय, नागपुर यांचे कार्यालयामार्फत निधी वितरीत करण्यात आला होता.

भामरागड, मुलचेरा व अहेरी (जि. गडचिरोली) या तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत झालेल्या कामांबाबत निवासी उपजिल्हाधिकारी, गडचिरोली यांचे दिनांक ८/१२/२०२२ रोजीच्या पत्रान्वये तक्रार प्राप्त झाली होती. त्यानुषंगाने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, गडचिरोली यांचे दि.२२/१२/२०२२ रोजीच्या आदेशान्वये सहा सदस्यीय चौकशी समिती नेमण्यात

आली होती. या समितीने सादर केलेल्या अहवालानुसार भामरागड, मुलचेरा व अहेरी या तालुक्यातील महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत झालेल्या कामांमध्ये वेगवेगळ्या अनियमितता आढळुन आल्या आहेत. सदर समितीद्वारा करण्यात आलेल्या चौकशीच्या कार्यवाहीत कामांच्या मोजमाप पुस्तिकेमध्ये अवास्तव नोंदी करणे, त्रुटीपूर्ण अंदाजपत्रक तयार करणे, मोजमाप पुस्तिकेतील नोंदीतील मोजमाप आणि देयकांतील मोजमाप यामध्ये तफावत असणे आणि काम अपूर्ण असतानाही निधी आहरीत करणे अशाप्रकारच्या अनियमितता आढळुन आल्या आहेत.

चौकशी समितीच्या अहवालामध्ये सदर अनियमिततेसाठी या तीन तालुक्यातील काही अधिकारी, कर्मचारी जबाबदार असल्याचे निदर्शनास आले आहे. त्यानुषंगाने भामरागड पंचायत समितीचे गट विकास अधिकारी यांचे विभागीय चौकशी संदर्भातील जोडपत्र-१ ते ४ सह प्रस्ताव जिल्हाधिकारी गडचिरोली यांच्यामार्फत विभागीय आयुक्त, नागपूर विभाग, नागपूर यांच्याकडे सादर करण्यात आला आहे. तसेच, पंचायत समिती, भामरागडा ०१ शाखा अभियंता, ०४ ग्रामसेवक यांच्या विभागीय चौकशीचा प्रस्ताव सादर करण्यात आला असून ०२ ग्रामसेवकांना निलंबीत करण्यात आले आहे. तसेच, संबंधित विस्तार अधिकारी आणि सहायक लेखाधिकारी यांच्या दोन वार्षिक वेतनवाढ तात्पुरत्या रोखण्यात आल्या असून ०१ कंत्राटी तांत्रिक सहायकाची सेवा समाप्त करण्याबाबत प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झाला आहे.

अहेरी पंचायत समिती अंतर्गत गटविकास अधिकारी, विस्तार अधिकारी, ०२ सहायक लेखाधिकारी आणि ०२ कनिष्ठ अभियंता यांची दोन वार्षिक वेतनवाढ तात्पुरती रोखण्यात आली असून ०१ ग्रामसेवकास निलंबीत करण्यात आले आहे. ०१ कंत्राटी तांत्रिक सहायकास २५ हजार रुपयाच्या दंडाची शिक्षा करण्यात आली आहे. तसेच, मुलचेरा पंचायत समिती अंतर्गत चौकशी समितीन तपासणी केलेल्या कामांतील सात कामांमध्ये मोजमाप पुस्तिकेतील मोजमापाचे परिमाण आणि सदर कामांच्या देयकांमध्ये दर्शविण्यात आलेल्या लोखंडाच्या परिमाणात फरक आढळून आला आहे. त्यानुषंगाने सदर कामांची कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद यांच्यामार्फत फेरचौकशी करण्यात आली असून सदर फेरचौकशी अहवाल १७ जुलै, २०२३ रोजी सादर करण्यात आला आहे. सदर चौकशी अहवालानुसार पुढील कार्यवाहीची प्रक्रीया सुरू करण्यात आली आहे. अशाप्रकारे सदर चौकशी अहवालानुसार अनियमिततेसाठी जबाबदार असलेल्या एकुण २६ अधिकारी /कर्मचारी (भामरागड तालुक्यातील ११, अहेरी तालुक्यातील ०८ व मुलचेरा तालुक्यातील ०७) यांना कारणे दाखवा नोटीस बजावून चौकशीची कार्यवाही करण्यात आली आहे.

उक्त तीन तालुक्यांमध्ये झालेल्या मग्रारोहयोंतर्गतील कामांच्या चौकशीमध्ये जिल्हा परिषद स्तरावरुन नियुक्त करण्यात आलेल्या चौकशी समितीस आढळुन आलेल्या अनियमितते संदर्भात दखल घेऊन सबंधितांविरुध्द आवश्यक प्रशासकीय कारवाई करण्यात आली आहे.

********

लक्षवेधी सूचना क्र.१८१०

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन**

**महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.-१८१०**

---

**श्री. नामदेव ससाणे, मा.विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क्र.१८१० पुढीलप्रमाणे आहे :-**

**"ढाणकी (ता.उमरखेड, जि. यवतमाळ) ग्रामपंचायतीस दि. २.३.२०१९ रोजी वा त्यासुमारास नगरपंचायतीचा दर्जा मिळाला असूनही अकुशल कामाचे देयके मिळाले नसल्याने लाभाधारक शेतक-यांनी गटविकास अधिकारी यांना निवेदन देउनही कोणतीच कार्यवाही न होणे, या गावातील खचलेल्या बुजलेल्या विहिरीच्या कामाचे कुशल देयके अदा करण्याकरिता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद यवतमाळ यांनी पत्र क्रमांक / यजिप/मग्नारोहयो/काव्य/१२/२०२३ दि.५.१.२०२३ अन्वये मा.आयुक्त, नरेगा नागपूर यांना निधी उपलब्ध करण्याची विनंती करूनही अद्यापही निधी उपलब्ध न होणे, परिणामी लाभार्थी शेतकरी आर्थिक संकटात सापडणे, त्यामुळे शासनाच्या उदासिनतेबाबत निर्माण झालेले चिंतेचे व संतापाचे वातावरण, याबाबत शासनाने तातडीने सदरील निधी देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली व करावयाची कार्यवाही, याबाबत शासनाची प्रतिकिया व भूमिका."**

**मा. मंत्री (रोजगार हमी) यांचे निवेदन**

********

आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना – महाराष्ट्र, नागपूर यांच्या दिनांक १९ सप्टेंबर, २०२२ रोजीच्या सहपत्रान्वये यवतमाळ जिल्ह्यातील उमरखेड तालुक्यातील ढाणकी ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये रुपांतर झाल्याने मग्रारोहयोअंतर्गत खचलेल्या बुजलेल्या विहिरीच्या कामाचे रु.३,८३,४४८/- इतक्या रकमेची निधीची मागणी करण्यात आली होती. तसेच शासनाच्या दिनांक ०२ नोव्हेंबर, २०२२ रोजीच्या पत्रान्वये कामनिहाय अतिरिक्त माहितीबाबतचे कागदपत्र सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

आयुक्त, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना – महाराष्ट्र, नागपूर यांच्या दिनांक ०७ जून, २०२३ रोजीच्या पत्रान्वये अतिरिक्त कागदपत्रे सादर करण्यात आली आहेत. प्रस्तूत प्रकरणी नमूद करण्यात येते की, दिनांक ०३ मार्च, २०१४ च्या शासन निर्णयान्वये "क" वर्ग नगरपरिषद / नगरपंचायत क्षेत्रात राज्य रोहयोची राज्यात अंमलबजावणी करणेबाबतच्या तरतूदी विहीत केलेल्या आहेत.

शासन पत्र दिनांक २१ मे, २०१५ नुसार ग्रामपंचायतीचे नगरपंचायतीमध्ये समावेश / रुपांतर या कारणांने मनरेगाअंतर्गत अपूर्ण राहीलेले कामे पूर्ण करण्याकरिता राज्य रोहयोतून निधी उपलब्ध करुन दिला जाईल असे नमूद केले आहे.

तसेच राज्यातील ज्या महानगरपालिकेची हद्द वाढल्याने महानगरपालिकेत समाविष्ट झालेल्या ग्रामपंचायतीमधील अपूर्ण असलेली कामे मनरेगाच्या निकषाप्रमाणे पूर्ण करावी तसेच अशा गावातील कामांना मग्रारोहयो अंतर्गत नव्याने प्रशासकीय मान्यता देण्यात येवू नये, अशा सूचना आयुक्त, नरेगा आयुक्तालय, नागपूर यांनी दिनांक ०३ जून, २०१९ रोजीच्या पत्रान्वये देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार शासनाच्या दिनांक ०८ ऑगस्ट, २०१९ रोजीच्या शासन परिपत्रकान्वये ग्रामपंचायतीमधील अपूर्ण कामे पूर्ण करण्यासाठी शासनामार्फत आयुक्त, नरेगा आयुक्तालय, नागपूर यांनी मागणी केल्यानुसार निधी उपलब्ध करुन देण्यात येईल. तसेच आयुक्त, नरेगा आयुक्तालय, नागपूर यांनी सदर निधी संबंधित जिल्ह्यातील अपूर्ण कामे पुर्ण करण्याकरिता तात्काळ मंजूर करण्याची कार्यवाही करावी, असे नमूद केले आहे.

शासन निर्णय दिनांक २३ मे, २०१४ अन्वये राज्यामध्ये सन २०१२-१३ या वर्षामध्ये अतिवृष्टीमुळे खचलेल्या व बुजलेल्या विहिरींच्या दुरुस्तीची कामे महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत घेण्यास मान्यता देण्यात आली होती. त्यानुसार सदर कामे दिनांक ३१ डिसेंबर, २०१४ पर्यंत पूर्ण करणे बंधनकारक करण्यात आले होते.

खचलेल्या विहिरींमध्ये पाणी असल्यामुळे विहिरींच्या दुरुस्तीची कामे पूर्ण होऊ शकत नसल्याने या कामांना दिनांक ३१ मे, २०१५ पर्यंत मुदतवाढ देण्याची मागणी झाल्यामुळे, दिनांक ०५ जानेवारी, २०१५ च्या शासन परिपत्रकान्वये खचलेल्या विहिरींच्या दुरुस्तींची अपूर्ण कामे पुर्ण करण्यासाठी दिनांक ३१ मे, २०१५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली होती.

दिनांक २० जुलै, २०१५ च्या शासन निर्णयान्वये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत अतिवृष्टीमुळे खचलेल्या व बुजलेल्या विहिरींच्या दुरुस्तीची कामे घेण्याचे अनुज्ञेय केलेले आहे.

दिनांक २३ मे, २०१४ रोजीचा शासन निर्णय अधिक्रमीत करण्यात आला असून यापूर्वी सुरु असलेली विहिरींच्या दुरुस्तींची अपूर्ण कामे पुर्ण करणे आवश्यक आहे. सबब, ही अपूर्ण कामे प्राधान्याने पूर्ण करण्याबाबत तसेच भविष्यात घेण्यात येणाऱ्या विहिरींच्या दुरुस्तीची कामे दिनांक २० जुलै, २०१५ रोजीच्या शासन निर्णयानुसार घेण्यात यावी, असे निदेश शासनाच्या दिनांक ३१ ऑगस्ट, २०१५ रोजीच्या परिपत्रकाद्वारे देण्यात आले आहेत.

त्यानुषंगाने सन २०१५-१६ मध्ये मग्रारोहयोअंतर्गत ढाणकी ग्रामपंचायतीतील एकूण ५ लाभार्थ्यांच्या कामांना तांत्रिक व प्रशासकीय मान्यता प्राप्त झाली होती. सदर ग्रामपंचायत दिनांक ०२ मार्च, २०१९ पासून नगरपंचायत हद्दीत समाविष्ट झाली आहे. तसेच त्यांच्या कामाचे वर्क कोड व मस्टर जनरेट झालेले आहेत. त्यानुषंगाने जिल्हाधिकारी, यवतमाळ यांच्याकडून वस्तुनिष्ठ अहवाल प्राप्त करुन प्रकरणातील देयकांच्या अदायगीबाबत राज्य रोहयोतून कार्यवाही करण्यात येईल.

******

**लक्षवेधी सूचना क्र.१८६४**

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे व्दितीय (पावसाळी) अधिवेशन

## महाराष्ट्र विधानसभा नियम — १०५ लक्षवेधी सूचना

अॅड. माणिकराव कोकाटे यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सुचना क्रमांक १८६४ पुढीलप्रमाणे आहे.

**संभाजी नगर जिल्हयात सिल्लोड, फुलंब्री तालुक्यात २००९ ते २०१६ या कालावधीत विविध गावांमध्ये कुशल रोजगार हमी योजने अंतर्गत १० कोटी ७ लाख रुपयांची प्रत्यक्षात कामे न करता बनावट देयके करुन शासकीय कोषागरातून १० कोटी ७ लाख रुपये निधी अपहार करुन आर्थिक घोटाळा केल्याचा नुकताच उघडकीस धक्कादायक प्रकार, कोषागरातून बनावट देयकानुसार काढलेल्या १० कोटी ७ लाख रुपयांची कागदपत्रे चौकशीत आढळून आली नसल्याची धक्कादायक बाब उघड होणे, सदरहू योजनेच्या विकासकामात सार्वजनिक बांधकाम विभागाचे सिल्लोड उपविभागाचे शाखा अभियंता के.एस. गाडेकर, उपविभागीय अभियंता एम. एम. कोल्हे, शाखा अभियंता एम.एम. जायभाये, आर. जी. दिवेकर, ए.एफ. राजपुत (सेवानिवृत्त) आणि नागदिवे या अधिकारी कर्मचाऱ्यांचा सदरहू आर्थिक घोटाळयात समावेश असणे, रोजगार हमी योजनेचे नायब तहसिलदार श्री. राजेंद्र विठ्ठलराव शिंदे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार सदरहू प्रकरणाची सखोल चौकशी करण्यात येऊन, चौकशीअंती जे दोषी आढळतील त्यांच्यावर कारवाई करण्याचे जिल्हयाच्या पालकमंत्र्यांनी जिल्हाधिकारी आस्तिकुमार पांडे यांना आदेश देण्यात येऊनही अद्याप यावर शासनाकडून कोणतीच कार्यवाही करण्यात न येणे. यास्तव सार्वजनिक बांधकाम विभागाचे सिल्लोड उपविभागाचे शाखा अभियंता के. एस. गाडेकर, उपविभागीय अभियंता एम.एम. कोल्हे, शाखा अभियंता एम.एम. जायभाये, आर. जी. दिवेकर, ए.एफ. राजपुत आणि नागदिवे यांना तात्काळ निलंबित करुन त्यांची लाचलूचपत प्रतिबंधक खात्यामार्फत चौकशी करण्याची होत असलेली मागणी, याकडे झालेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया"''''**

## मा.मंत्री (रोहयो) यांचे निवेदन

सदर प्रकरणी श्री.ज्ञानेश्वर दगडू बोरसे यांचे दिनांक ०६ मार्च, २०१३ रोजीच्या तक्रार अर्जाच्या अनुषंगाने जिल्हा दक्षता पथक, जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांना चौकशी करुन चौकशी अहवाल सादर करण्याबाबत कळविण्यात आले होते.

त्या अनुषंगाने, दक्षता पथकाने तक्रारी संबंधीत चौकशी करण्यासाठी अभिलेखे उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद व उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उप

विभाग फुलंब्री/सिल्लोड यांना लेखी पत्र देऊन, समक्ष तसेच दुरध्वनीव्दारे संपर्क साधून तपासणीसाठी अभिलेखे उपलब्ध करुन देण्याबाबत कळवूनही त्यांनी अद्यापपर्यंत संबंधीत अभिलेखे उपलब्ध करुन न दिल्यामुळे मा.उपआयुक्त (रोहयो) यांच्या दालनात दिनांक २२ फेब्रुवारी, २०१६ रोजी सुनावणी ठेवण्यात आली. सदर सुनावणीत संबंधीतांना नोटीस देऊन सविस्तर अहवाल व अभिलेख्यांसह हजर राहण्याबाबत कळविण्यात आले होते. सदर सुनावणीत काही संबंधीत उपस्थित होते तथापि त्यांनी तपासणी कामी अभिलेख उपलब्ध करुन दिलेले नाही.

अभिलेखे उपलब्ध करुन न दिल्यामुळे तसेच उपलब्ध करुन दिलेले अभिलेख अपूर्ण असल्यामुळे दक्षता समितीने दिनांक ०८ जुन, २०१६ रोजी खालीलप्रमाणे अहवाल उपजिल्हाधिकारी (रोहयो) औरंगाबाद यांना सादर केला आहे.

उपविभागीय कार्यालय, उपविभाग फुलंब्री येथील ४२ कामावर रु.५५०.४६ लक्ष इतका खर्च करण्यात आला असून सिल्लोड उपविभाग अंतर्गत एकूण ३१ कामावर रु.४५६.५४ लक्ष असे एकूण रु.१००७.०० लक्ष खर्च करण्यात आलेला आहे. तथापि, झालेल्या खर्चाचे अभिलेख किमान २० वर्षे जतन करणे आवश्यक असताना रेकॉर्ड अभावी, सदरील कुशल कामावरील खर्च व अकुशल खर्चाचा तपशील मागून देखील ते संबंधीत कार्यालयाकडून प्राप्त झालेले नाही. संबंधीत कार्यालयांतर्गत झालेल्या कामाचे पूर्ण अभिलेखे, प्राप्त झालेली नाहीत व चौकशीचे कामे सहकार्य केलेले नाही. ही बाब यथा योग्य पुढील कार्यवाहीसाठी आपल्या निदर्शनास आणून देण्यात येत आहे.

१) लाखो रुपये खर्चाचे मा.पु.सारखे, महत्वाचे रेकार्ड जतन केलेले दिसून येत नाही

२) अभिलेखे सादर करणेसाठी अक्षम्य दिरंगाई केली. तथापि रेकॉर्ड अप्राप्त

३) संबंधीत सार्वजनिक बांधकाम विभागाचे, वरिष्ठ कार्यालयाने देखील अंमलबजावणी केलेली नाही व वेळेचा अपव्यय केलेला प्रकर्षाने जानवतो.

४) रोहयो चे प्रचलित नियमाप्रमाणे, संबंधीतावर कार्यवाही करणे योग्य वाटते

जिल्हाधिकारी औरंगाबाद यांच्या दिनांक १६ मार्च, २०२३ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने, श्री.राजेंद्र विठठलराव शिंदे, नायब तहसिलदार (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, औरंगाबाद यांनी संबंधीत अधिकारी/कर्मचारी यांच्या विरुध्द शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी पोलीस ठाणे सिटीचौक, औरंगाबाद शहर येथे गुन्हा दाखल करण्यासाठी अर्ज सादर केला. त्यान्वये दिनांक १३ एप्रिल, २०२३ रोजी कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता अंतर्गत प्रथम खबर अहवाल (FIR) नोंदविण्यात आलेला आहे.

लक्षवेधी सूचना क्रमांक-२२५

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्रीमती प्रतिभा धानोरकर, श्री.नानाभाऊ पटोले, श्री.विजय वडेट्टीवार, श्री.सुनिल केदार, डॉ.नितिन राऊत, ॲड॰ यशोमती ठाकूर (सोनावणे), श्री.अस्लम शेख, श्री.अमिन पटेल, प्रा.वर्षा गायकवाड, श्री.सुभाष धोटे, श्री.कुणाल पाटील, श्री.विकास ठाकरे, श्री.संजय जगताप, श्री.बाळासाहेब थोरात, श्री.संग्राम थोपटे, वि.स.स.** यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली **लक्षवेधी सूचना क्रमांक २२५** पुढीलप्रमाणे आहे. :-

" चंद्रपूर जिल्ह्यालगत असलेल्या गडचिरोली जिल्ह्यातील एटापल्ली तालुक्यात सुरजागढ येथे २ ते ३ वर्षापासून लॉयड मेटल्स ॲण्ड एनर्जी कंपनीने विनापरवाना खोदकाम केले असणे, सदर खोदकामासाठी शासनाची परवानगी नसणे, शासनाला महसूल प्राप्त होत नसणे, प्रदूषण विभागाची देखील फसवणूक करणे, सदर कंपनी विरोधात शेतकऱ्यांची तक्रार असणे, या कंपनीमुळे रस्त्यांची दुर्दशा होत असणे, पर्यावरण विभागाची देखील उत्खननासाठी परवानगी नसणे, यामुळे स्थानिक नागरिकांत रोष निर्माण होत असणे, यावर सरकारची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

---

## श्री.एकनाथ शिंदे, मा.मुख्यमंत्री (खनिकर्म) यांचे निवेदन

मिनरल कन्सेशन रुल, १९६० मधील नियम २२ (१) नुसार, मौजा सुरजागड, ता.एटापल्ली, जि.गडचिरोली येथील लोह खनिजाचा खाणपट्टा मिळावा यासाठी मे.लॉयडस् मेटल्स आणि इंजिनिअरिंग या कंपनीने दिनांक ३०/०६/१९९३ अन्वये अर्ज सादर केलेला होता. प्रस्तुत अर्जाच्या आधारे राज्य शासनाने एमएमडीआर कायद्यातील कलम ५(१) नुसार दिनांक १०/११/१९९४ रोजीच्या पत्राद्वारे केंद्र शासनाच्या मान्यतेसाठी प्रस्ताव सादर केलेला होता. त्यानुसार दिनांक ३०/१२/१९९४ रोजीच्या पत्राद्वारे एमएमडीआर कायद्यातील कलम ५(१) अन्वये केंद्र शासनाने स्व-वापरासंदर्भात कोणतीही अट नमूद न करता, पूर्व मान्यता प्रदान केली होती. याआधारे राज्य शासनाने दिनांक ११/०१/१९९५ चे पत्राद्वारे कंपनीला हेतूपत्र दिले होते.

त्यानंतर, राज्य शासनाने मौजा सुरजागड, ता.एटापल्ली, जि.गडचिरोली येथील ३४८.०९ हे.आर. इतके आयर्न ओर या खनिजासाठीच्या क्षेत्रासाठी सदरहू कंपनीस दिनांक ११/०९/२००३ रोजी सुधारित हेतूपत्र दिले. तद्नंतर, या खाणपट्टयाच्या खाणकाम योजनेस भारतीय खाण ब्युरोने उत्खननाकरिता वार्षिक ३ दशलक्ष टनाच्या मर्यादेत दिनांक ०३/०३/२००४ अन्वये मंजुरी प्रदान केलेली होती. तसेच केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाने, दिनांक २९/०५/२००६ रोजीच्या पत्राद्वारे प्रदान केलेल्या पर्यावरण अनुमतीस अनुलक्षून राज्य शासनाच्या दिनांक १३/०४/२००७ रोजीच्या आदेशाद्वारे मे.लॉयड मेटल्स आणि इंजिनिअरिंग लि. या कंपनीस मार्यनिंग लिज देण्यात आलेले आहे.

तद्नंतर, खाणपट्टाधारकाने, पूर्वीची मंजूर ३ दशलक्ष टन खनिज उत्खनन क्षमता वाढवून ती, १० दक्षलक्ष टन करण्यासंदर्भात, पर्यावरण व वन मंत्रालय, भारत सरकार यांचेकडे केलेल्या विनंतीस अनुलक्षून, केंद्र शासनाच्या पर्यावरण व वन मंत्रालयाने, दिनांक २४/०२/२०२३ च्या पत्रान्वये सदरची मर्यादा वाढविण्यास मंजुरी दिलेली असून, त्यानंतर, याअधारे महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळाद्वारे दिनांक ३१/०३/२०२४ पर्यंत Consent to Operate देण्यात आलेले आहे.

कंपनीकडून खाणक्षेत्रात मंजूर खाणकाम योजनेनुसार उत्खनन करण्यात येत असून, या उत्खनन होत असलेल्या खनिजावर ILMS प्रणालीद्वारे नियंत्रण ठेवण्यात येत आहे. त्यामुळे या खाणक्षेत्रात होत असलेले खनिजाचे उत्खनन हे करारनाम्यातील अटी व शर्तीचे व खाणकाम योजनेत विहित केलेल्या मर्यादेचे उल्लघंन करुन होत असल्याची बाब निदर्शनास आलेली नाही. या खाणीतून सन २००८-०९ ते आजअखेर उत्खनन करण्यात आलेल्या खनिजापोटी शासनाला रु.६३६.९३ कोटी इतका महसूल प्राप्त झालेला आहे. त्यामुळे या प्रकरणात शासनाच्या कोणत्याही महसूलाची हानी झालेली नाही.

या खाणपट्टयातून निघणाऱ्या खनिजाची वाहने ज्या रस्त्यावरुन जातात, त्या रस्त्यावरील वाहतूक सुरुळीत करण्याकरिता कंपनीकडून वाहतूक कर्मचारी तैनात करण्यात आले आहेत. तसेच शेतकऱ्यांच्या पिकाच्या [कृ.मा.प.

नुकसानीबाबत ग्रामपंचायत मल्लमपाड, हेडरी, बांडे या गावातील एकूण ५७ शेतकऱ्यांना रु.६,४३,१००/- शासकीय मानकानुसार नुकसान भरपाई कंपनीतर्फे देण्यात आलेली आहे.

गडचिरोली-भंडारा जिल्ह्यातून जाणाऱ्या साकोली-वडसा-आरमोरी-गडचिरोली-चामोर्शी-आष्टी-आलापल्ली-सिरोंचा या राज्य महामार्गाची दर्जोन्नती करण्यात आलेला असून, या रस्त्याला भारत सरकारने राष्ट्रीय महामार्गाचा दर्जा दिलेला आहे. त्यानुसार राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडून या रस्त्यापैकी साकोली ते भंडारा जिल्हा हद्दीपर्यंतचे उन्नतीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. तसेच गडचिरोली ते आष्टी या रस्त्याच्या लांबीतील उन्नतीकरणाचे बरेचसे काम पूर्ण झाले असून, आष्टी ते सिरोंचा मधील रस्त्यापैकी आष्टी ते लगाम आणि आलापल्ली ते सिरोंचा या रस्त्यांची कामे सुरु झालेली आहेत.

आष्टी ते आलापल्ली या ४५ कि.मी. लांबीपैकी आष्टी ते लगाम या चपराळा अभयारण्यातून जाणाऱ्या १७ कि.मी. लांबीच्या रस्त्याचे नुतणीकरण कामाची निविदा प्रक्रिया पूर्ण करुन, दिनांक २०/०१/२०२३ रोजी रस्ते वाहतूक व राजमार्ग मंत्रालय, भारत सरकार यांचेकडून कार्यारंभ आदेश देऊन कामास सुरुवात झालेली आहे. या रस्त्यावरील चौदमपल्ली नाल्यावरील पुलाचे काम वगळता उर्वरित काम ऑक्टोबर २०२३ पर्यंत पूर्ण होणार आहे. उर्वरित २८ कि.मी. रस्त्याचे काम सन २०२२-२३ च्या आराखड्याअंतर्गत मंजूर असून, या कामाची निविदा प्रक्रिया प्रगतीपथावर असून, वन विभागाची परवानगी प्राप्त होताच सदर निविदा प्रक्रिया पूर्ण करुन, कामास तात्काळ सुरुवात करण्यात येणार आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती पहाता, विषयाधीन खाणपट्टाधारकाने विहित मार्गाने सर्व आवश्यक परवानग्या प्राप्त करुन, घेतल्यानंतरच खाणीतून लोह खनिजाचे उत्खनन केलेले आहे आणि यातून शासनाचा महसूल बुडालेला नाही, ही वस्तुस्थिती आहे.

गडचिरोली जिल्ह्यात रोजगाराच्या संधी निर्माण व्हाव्यात, उद्योगधंदे यावेत, विकास कामे व्हावीत यासाठी केंद्र तसेच राज्य शासनाच्या माध्यमातून या जिल्ह्यामध्ये मोठ्या प्रमाणात कामे सुरु आहेत. अशा परिस्थितीत वरील कामे थांबविण्यासाठी स्थानिक नागरिकांकडून जिल्हा प्रशासनाकडे केल्या जाणाऱ्या तक्रारीनुसार सदरची कामे थांबवणे हे जनतेच्या हिताचे ठरणार नाही.

**********************

सार्वजनिक आरोग्य विभाग

लक्षवेधी सूचना क्र. २८७

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे पावसाळी अधिवेशन

मा.श्रीमती श्वेता महाले, विधानसभा सदस्य यांनी

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-

---

" स्त्रीयांमध्ये आढळुन येणाऱ्या कर्करोगांमध्ये गर्भाशयमुखाचा कर्करोग क्रमांक २ वर असणे, दरवर्षी भारतात जवळपास १ लाख २५ हजार नवीन केसेसची नोंद होणे व त्यापैकी जवळपास ७० हजार स्त्रियांचे मृत्यू होणे, म्हणजे कोरोनाच्या बरोबरीने महिलांचा दरवर्षी मृत्यू होत असणे, या कॅन्सरचे मुख्य कारण HPV[Human Papilloma Virus] हा विषाणू असणे, त्यापैकी ८०% सर्व्हायकल कॅन्सर हे HPV १६/१८ याने होणे, या कॅन्सर वर लस उपलब्ध असून जगात मागील १४ वर्षांपासून आतापर्यंत ३५० दशलक्ष व भारतात जवळपास ५ कोटी स्त्रियांनी लस घेतलेली असणे, ही लस पूर्णत: सुरक्षित असणे, ही लस १००% प्रतिबंधक तरी HPV १६/१८ द्वारे होणाऱ्या गर्भाशयमुखाच्या कर्करोगापासून सर्वोत्तम संरक्षक लस असणे, खुल्या बाजारात या लसीची किंमत ३ हजारांपेक्षा जास्त असल्याने सर्वसामान्य महिलांना परवडत नसणे, त्यामुळे ही लस शासकीय स्तरावर मोफत उपलब्ध करुन दिल्यास मोठ्या प्रमाणात या कार्करोगाने महिलांचा होणारा मृत्यू दर रोखल्या जाणे, त्यामुळे गर्भाशयमुखाचा कर्करोग Cervical Cancer वर आळा घालण्यासाठी ही लस मोफत उपलब्ध करुन देण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा. मंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे निवेदन

स्त्रियांमध्ये आढळून येणाऱ्या कर्करोगांमध्ये गर्भाशयमुखाच्या कर्करोगाचे प्रमाण हे दोन क्रमांकावर आहे. ग्लोबोकॉन (GLOBACON (Global Cancer Indience, Mortality Prevalence) सर्व्हेच्या २०२० च्या अहवालानुसार नव्याने दिसून येणाऱ्या गर्भाशयमुखाचा कर्करोग हा वयाच्या मुख्यत: ३० वर्षानंतर आढळून येतो. शरीरामध्ये कर्करोग निर्माण होण्याची प्रक्रिया ही दीर्घकालीन असते.

गर्भाशयमुखाच्या कर्करोगाचे प्रमाण कमी करण्यासाठी जीवनशैलीमध्ये बदल करण्यासाठी जनजागृती, चाळणी-तपासणी (स्क्रिनिंग), लवकर निदान व उपचार करणे आवश्यक आहे. या आजाराकरीता प्रतिबंधात्मक उपाय म्हणून HPV लसीकरण हा एक उपाय आहे. किशोरवयीन मुलींना वयाच्या ९ ते १४ व्या वर्षी ही लस देण्यात येते.

दरवर्षी ४ फेब्रुवारी हा दिवस जागतिक कर्करोग दिन म्हणून साजरा केला जातो. या दिनानिमित्त सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत विविध माध्यमातून आरोग्य शिबिरे प्रभात फेरी, शाळा-महाविद्यालय येथे व्याख्यान सत्रे, प्रश्नमंजुषा, पोस्टर्स व रांगोळी स्पर्धेद्वारे जनजागृती करण्यात येते.

याअंतर्गत ३० वर्षावरील सर्व स्त्रियांची गर्भाशयमुख तपासणी व्हीजुअल इन्सपेक्शन विथ ॲसिटीक ॲसिड (VIA) या चाचणीद्वारे केली जात आहे. या चाचणीमुळे गर्भाशयमुख कर्करोगाचे प्राथमिक टप्प्यात निदान होऊ शकते व परिणामी लवकर उपचार दिल्यास रुग्ण पूर्णत: बरा होऊ शकतो.

कर्करोगाच्या निदानाकरीता बायोप्सी, सायटॉलॉजी या चाचण्या Hindustan Life Care Ltd. (HLL) या बाह्यस्त्रोत यंत्रणेमार्फत करण्यात येतात. टाटा मेमोरियल हॉस्पिटल येथून प्रशिक्षित वैद्यकीय अधिकारी व टाटा कॅन्सर वॉरियर्स च्या मदतीने जिल्हा रुग्णालयात किमोथेरपी उपचार तसेच महात्मा ज्योतीबा फुले जीवनदायी आरोग्य योजनेंतर्गत खाजगी रुग्णालयात कर्करोगाचे निदान झालेल्या रुग्णांवर उपचार केले जातात.

गुंतागुंतीचे उपचार आवश्यक असणाऱ्या रुग्णांना पुढील उपचाराकरीता टाटा मेमोरिअल रुग्णालय, मुंबई, राष्ट्रसंत तुकडोजी कर्करोग रुग्णालय व संशोधन केंद्र, नागपूर, विवेकानंद कर्करोग रुग्णालय व संशोधन केंद्र, लातूर, राज्य कर्करोग संस्था, औरंगाबाद, संदर्भसेवा रुग्णालय, अमरावती आणि संदर्भसेवा रुग्णालय, नाशिक या संस्थेमध्ये संदर्भित केले जाते.

HPV(Human Papilloma Virus) प्रतिबंधक लस ही स्त्रियांच्या गर्भाशयाच्या मुखाचा कर्करोगाच्या प्रतिबंधासाठी देण्यात येते. महाराष्ट्र राज्यात सन २०२३-२४ या वर्षात केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सुचनेनुसार देण्याचे प्रस्तावित आहे. ही लस राज्यातील ९ वर्षे ते १४ वर्षे या वयोगटातील अंदाजे ५५,८७,७७० मुलींना केंद्र शासनाकडून प्राप्त झाल्यानंतर दिली जाईल. सदर लसीचे दोन डोस सहा महिन्याच्या अंतराने दिले जातील. राज्यातील ९ वर्षे ते १४ वर्षे वयोगटातील मुलींना मोहिमेच्या स्वरुपात लस देऊन लसीकरण पूर्ण झाल्यानंतर नियमित लसीकरण कार्यक्रमात या लसीचा समावेश करण्यात येणार आहे.

*******************************************************************

लवेसु२०२३/प्र.क्र.१२२/आरोग्य-३
लक्षवेधी सूचना क्र. ६८१

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्रीमती सीमा महेश हिरे, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ६८१ पुढीलप्रमाणे आहे :-

"नाशिक जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयात रुग्णांसाठी देण्यात येणाऱ्या सकस आहार पुरवठा करण्यासाठी नेमलेल्या ठेकेदार संस्थेने संगनमताने बनावट देयकाच्या आधारे शासनाची कोट्यावधी रुपयांची फसवणूक केली असल्याची बाब माहिती अधिकारात दिलेल्या माहितीतून समोर येणे, यासंदर्भात उपसंचालक कार्यालयाकडे चौकशी अहवाल प्राप्त होऊन अद्याप त्यावर कोणतीच कारवाई केलेली नसणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

प्रा. डॉ. तानाजी सावंत, मंत्री, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण, यांचे निवेदन.

सहसंचालक खरेदी कक्ष, आरोग्य सेवा, आयुक्तालय, मुंबई यांचे दि. ०३.०२.२०२२ व मा. आयुक्त, आरोग्य सेवा तथा अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांचे दि. १६.०३.२०२२ च्या पत्रान्वये श्री. प्रविण सपकाळे व विजय निकम प्रदेशाध्यक्ष आरपीआय यांचे तक्रारीच्या अनुषंगाने उपसंचालक, आरोग्य सेवा नाशिक मंडळ, नाशिक यांचे स्तरावरुन दि. २३.०३.२०२२ रोजी चौकशी समिती गठीत करुन केलेल्या सखोल चौकशीचा अहवाल दि.०२.०६.२०२२ रोजी सादर केलेला आहे.

सदर चौकशी अहवालामध्ये जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक यांनी आहार सेवेची एकुण ९ देयके (माहे १९.०८.२०१९ ते २९.०३.२०२२) या कालावधीत कोषागारातुन आहरीत केलेले आहे. त्या देयकांची एकुण रक्कम रु. १,२०,८६,९७२/- एवढी असुन त्या (९) देयकांच्या स्थळ प्रतीवर आहरण व संवितरण अधिकारी यांच्या स्वाक्षऱ्या दिसुन येत नाहीत तसेच देयके पेड ॲण्ड कॅन्सल केलेले नाहीत, तसेच कार्यालयीन आदेशावर जावक क्रमांक, दिनांक नमुद नाही. नियंत्रण अधिकारी (जिल्हा शल्य चिकित्सक) यांची स्वाक्षरी नसल्याचे चौकशी समितीस निदर्शनास आलेले होते. त्याअनुषंगाने उपसंचालक आरोग्य सेवा नाशिक मंडळ, नाशिक यांनी दि. २०.०६.२०२२ रोजीच्या पत्रामध्ये १ ते ७ मुद्दे नमुद करुन अनुपालन अहवाल सादर करण्यास जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक यांना कळविण्यात आले होते, तसेच स्मरणपत्र दि. १०.०७.२०२३ आणि दि. १४.०७.२०२३ रोजी देण्यात आलेले आहे.

त्याअन्वये जिल्हा शल्य चिकित्सक, नाशिक यांचे कार्यालयाकडून चौकशी अहवालात निदर्शनास आलेल्या ९ देयकांमध्ये ज्या त्रृटी आढळुन आल्या होत्या. त्यांच्या स्थळ प्रतींवर त्रृटींची पुर्तता करण्यात आली असल्याने दि. १८.०७.२०२३ च्या पत्रान्वये आहार पुरवठा सेवेत शासनाची फसवणूक झाली नाही असे उपसंचालक, आरोग्य सेवा, नाशिक यांनी कळविले आहे. तथापि, सदरबाबत सहाय्यक संचालक (वित्त व लेखा) पुणे यांच्या मार्फत सखोल चौकशी करुन आहार पुरवठा सेवेत शासनाची फसवणूक झाली आहे किंवा कसे? याबाबत तपासणी करण्यात येईल.

****************

क्रमांक- लवेसु२०२३/प्र.क्र.१२५/आरोग्य-३
लक्षवेधी सूचना क्र. ७१३

महाराष्ट्र विधानसभा
सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्रीमती श्वेता विद्याधर महाले, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ७१३ पुढीलप्रमाणे आहे :-

"उदयनगर (ता. चिखली जि. बुलडाणा) हे खामगाव-जालना महामार्गावरील खूप मोठे गाव असून सदर गावाला ६० खडे लागून असल्याने तेथे येणाऱ्या जाणाऱ्यांची नेहमीच वर्दळ असणे, उदयनगर ही तालुक्यातील सर्वात मोठी बाजारपेठ असणे, तेथे प्राथमिक आरोग्य केंद्राशिवाय कोणतीही आरोग्य सुविधा उपलब्ध नसणे, तसेच धोडप (ता. चिखली, जि.बुलडाणा) याठिकाणी सुद्धा प्राथमिक आरोग्य केंद्राची श्रेणीवाढ करून ग्रामीण रुग्णालय व्हावे अशी मागणी व प्रस्ताव सुद्धा सादर करण्यात आलेला असणे, उदयनगर आणि धोडप ग्रामपंचायत यांनी त्यांच्या शिवारातील ई-क्लास जमीन सुद्धा देण्याचा ठराव करून देऊन जागा सुद्धा उपलब्ध करून दिलेली असणे, तसेच चिखली विधानसभा मतदार संघातील बुलडाणा तालुक्यातील रायपूर प्राथमिक आरोग्य केंद्र असून रायपूर गावाला लागून अनेक खेडे असून जवळच जग प्रसिद्ध सैलाणी बाबा हे तीर्थ क्षेत्र असणे, सैलानी या ठिकाणी मनोरुग्ण बरा होतो अशी धारणा असल्याने त्या ठिकाणी अनेक मनोरुग्ण येणे, तसेच दरदिवशी हजारों भाविक येत असणे, प्रा. आ. रायपूर येथील आरोग्य सुविधा नसल्याने भाविकांची हेळसांड होत असणे, हा नागरिकांच्या जीवन मरणाचा प्रश्न असल्याने उदयनगर, धोडप (ता.चिखली, जि.बुलढाणा) आणि रायपूर (ता.जि.बुलढाणा) प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन करून ग्रामीण रुग्णालयात दर्जावाढ करण्यात यावी अशी होणारी मागणी, याकडे शासनाने होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे जनतेमध्ये पसरणारा तीव्र असंतोष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**प्रा. डॉ. तानाजी सावंत, मंत्री, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण, यांचे निवेदन.**

बुलढाणा जिल्हयात ५२ प्राथमिक आरोग्य केंद्रे व २८० उपकेंद्रे कार्यरत आहेत. त्यापैकी चिखली तालुक्यात ६ प्राथमिक आरोग्य केद्रे व २९ उपकेंद्रे कार्यरत आहेत. उदयनगंर ता. चिखली जि. बुलढाणा येथे प्राथमिक आरोग्य केंद्र कार्यरत असुन त्यामार्फत तेथील जनतेला आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात. सदर प्राथमिक आरोग्य केंद्रामार्फत संदर्भिय सेवा देण्यासाठी रुग्णवाहिका उपलब्ध आहे. तसेच धोडप हे गाव प्राथमिक आरोग्य केंद्र उदयनगर व उपकेंद्र डोंगर शेवली अंतर्गत येत असुन तेथील नागरिकांना त्यामार्फत आरोग्य सुविधा पुरविण्यात येतात. धोडप ता.चिखली जि.

बुलढाणा येथे ग्रामीण रुग्णालय निर्माण करण्याच्या अनुषंगाने परिपुर्ण प्रस्ताव सादर करण्याबाबत उपसंचालक अकोला मंडळ तसेच जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, बुलढाणा यांना कळविण्यात आले आहे. तथापि सदरचा प्रस्ताव आयुक्तालयास अप्राप्त आहे. तसेच उदयनगर आणि धोडप ग्रामपंचायत यांनी त्यांच्या शिवारातील ई क्लास जमीन देण्याच्या ठरावाच्या अनुषंगाने जागा उपलब्ध करुन दिली असल्यास सदर ठिकाणी ग्रामीण रुग्णालय स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव सादर करण्याबाबत उपसंचालक अकोला मंडळ तसेच जिल्हा शल्य चिकित्सक, जिल्हा रुग्णालय, बुलढाणा यांना कळविण्यात येत आहे.

तसेच मौजे सैलानीबाबा तीर्थक्षेत्र असलेले गाव प्राथमिक आरोग्य केंद्र रायपूर व उपकेंद्र पिंपळगाव सराई उपकेंद्रातंर्गत येते. सदर ठिकाणी दरवर्षी मार्च मध्ये यात्रा भरते त्या कालावधीमध्ये जिल्हा परिषद बुलढाणा व जिल्हा शल्य चिकित्सक, सामान्य रुग्णालय, बुलढाणा यांच्यामार्फत २४ तास शिबिरे आयोजित करुन त्यामार्फत अत्यावश्यक सेवेसह उपचारात्मक व प्रतिबंधात्मक आरोग्य सेवा पुरविण्यात येते. तसेच इतर वेळेस तेथे येणा-या भाविकांस व गावातील नागरिकांना प्राथमिक आरोग्य केंद्र रायपूर व उपकेंद्र पिंपळगाव यामार्फत आवश्यक त्या आरोग्य सेवा पुरविण्यात येतात. वेळोवेळी आवश्यक त्या संदर्भिय सेवा देण्यात येतात.

बुलढाणा जिल्हयातील प्राथमिक आरोग्य केंद्र, रायपुर येथे जिल्हा रुग्णालय, बुलढाणा अंतर्गत मानसोपचार तज्ञ व पथक यांची महिन्याच्या प्रत्येक बुधवारी बाह्य संपर्क भेटी आयोजित करण्यात आलेली असुन आजुबाजुच्या गावातील मानसिक समस्या असणाऱ्या रुग्णांना देखिल प्राथमिक आरोग्य केंद्र रायपुर येथे मोफत उपचार व समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देण्यात आलेली आहे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र, रायपुर व नजिकच्या प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकिय अधिकारी / कर्मचारी तसेच आशा कार्यकर्ता यांचे यापुर्वी मानसिक आजाराबाबतचे प्रशिक्षण वेळोवेळी घेण्यात आलेले असुन सर्व सैलानी व नजिकच्या परिसरातील प्राथमिक आरोग्य केंद्रातील वैद्यकिय अधिकारी, कर्मचारी व आशा कार्यकर्ता यांना प्रशिक्षित करण्यात आलेले असुन मध्यम व तीव्र मानसिक आजार असणाऱ्या रुग्णांना जिल्हा रुग्णालय, बुलढाणा येथे संदर्भीत करणेकरीता सुचित करण्यात आलेले आहे. तसेच सैलानी परिसरात मानसिक आरोग्याबाबत यापुर्वी भव्य आरोग्य शिबिराचे आयोजन देखिल जिल्हा रुग्णालय, बुलढाणा मार्फत करुन आजुबाजुच्या परिसरात रिक्षा लावुन मानसिक आरोग्य बाबत जनजागृती करण्यात आलेली आहे. तसेच महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य विभागाने मानसिक आजार असणाऱ्या रुग्णांना व ताणतणाव असणाऱ्या जनसामान्य नागरिकांना १४४१६ या टोल फ्री क्रमांकावर तज्ञांचे मोफत समुपदेशन उपलब्ध असल्याबाबत देखिल जनजागृती करण्यात आलेली आहे.

चिखली मतदारसंघातील बुलढाणा तालुक्यातील प्राथमिक आरोग्य केंद्र, रायपूर येथे वैद्यकिय अधिकारी यांची मंजुर २ पैकी २ पदे भरलेली असुन, वैद्यकिय अधिकारी व उपलब्ध कर्मचा-

यामार्फत प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये गरोदर माता व बालकाचे नियमित लसीकरण, कुटुंब कल्याण सेवा, प्रसुती सेवासुविधा व इतर माता बालसंगोपन सेवा इत्यादीसह आवश्यक आरोग्य सेवा नियमितपणे पुरविण्यात येतात. सदर प्राथमिक आरोग्य केंद्रास संदर्भिय सेवा देण्यासाठी रुग्णवाहिका उपलब्ध आहे. तसेच प्राथमिक आरोग्य केंद्र रायपूर अंतर्गत ६ उपकेंद्रे कार्यरत आहेत व त्यामार्फतही आरोग्य सेवा पुरविण्यात येतात. मौजे रायपूर येथील प्राथमिक आरोग्य केंद्राचे श्रेणीवर्धन ग्रामीण रुग्णालयामध्ये दर्जावाढ करण्याबाबत जिल्हा परिषद स्तरावरील माहिती जिल्हा आरोग्य अधिकारी, बुलढाणा कार्यालयामार्फत जिल्हा शल्यचिकित्सक, बुलढाणा या कार्यालयास पाठविण्यात आली आहे.

प्राथमिक आरोग्य केंद्र रायपूर ता. बुलढाणा येथील कामकाज खालीलप्रमाणे आहे.

| बाब | सन २०२०-२१ | सन २०२१-२२ | सन २०२२-२३ |
|---|---|---|---|
| आंतरुग्ण | २९४ | २०४ | ५०५ |
| बाहयरुग्ण | १२२६४ | १३१७३ | १९४६७ |
| प्रसुती | ९९ | १२६ | ७५ |
| लसीकरण | ७३१ | ६८० | ६८७ |

****************

सार्वजनिक आरोग्य विभाग लक्षवेधी सूचना क्र. ८८८

सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन

महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये मांडलेली लक्षवेधी सूचना

श्रीमती गीता जैन, विधानसभा सदस्या

"ठाणे जिल्हयातील मिरा-भाईंदर शहराची लोकसंख्या १८ लाखांपेक्षा जास्त असणे, शहरात मोठया प्रमाणावर मध्यम वर्गीय तसेच कमी उत्पन्न असलेले नागरीक वास्तव्यास असणे, शहरातील नागरीकांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी भाईंदर पश्चिम येथे राज्य शासनाच्या अखत्यारित येणारे भारतरत्न पंडीत भीमसेन जोशी हे २०० खाटांचे रुग्णालय उभारण्यात येणे, अपु-या वैद्यकीय सुविधा, वैद्यकीय अधिकारी तसेच कर्मचारी यामुळे सदरचे रुग्णालय बंद पडण्याच्या मार्गावर असणे, अपु-या सोयी-सुविधांमुळे शहरातील नागरीकांना भारतरत्न पंडीत भीमसेन जोशी रुग्णालयाचा योग्य तो फायदा न होणे, त्यामुळे सदर रुग्णालय खाजगी संस्थेला महात्मा ज्योतिबा फुले आरोग्यदायी योजनेअंतर्गत पी.पी.पी. तत्वावर चालविण्यास देण्याची मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींकडून करण्यात येणे, या पी.पी.पी. प्रकल्पामध्ये सर्व रुग्णांना उत्तम दर्जाचे उपचार मिळावे यासाठी आवश्यक मनुष्यबळ, औषधे, शस्त्रक्रिया, चाचण्या, अन्न, वीज खर्च, पाणी खर्च, रुग्णालय सेवा चालविण्यासाठी लागणारा खर्च आदि, सदर संस्थेने करणे, यासाठी राज्य शासनाला कोणताही अतिरिक्त खर्च करावा न लागणे, याबाबत मा.आरोग्यमंत्री यांच्यासोबत स्थानिक लोकप्रतिनिधींची माहे जानेवारी, २०२३ दरम्यान बैठक घेण्यात येणे, या संदर्भात स्थानिक लोकप्रतिनिधींनी शासनाकडे वारंवार पाठपुरावा करुनसुध्दा शासनाचे होत असलेले दुर्लक्ष त्यामुळे तेथील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष यावर शासनाची करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

मा.मंत्री सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण यांचे निवेदन

नगर विकास विभाग शासन निर्णय क्र.मिभाम-१११६/प्र.क्र.६८/नवि, मंत्रालय मुंबई, दि.३० नोव्हेंबर, २०१६ अन्वये महानगरपालीका मिरा-भाईंदर यांच्या ताब्यात असलेले पं.भीमसेन जोशी सामान्य रुग्णालय हे सार्वजनिक आरोग्य विभागाकडे हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार शासन साआविक्र.पदनि-२०१८/प्र.क्र.६/आरोग्य-३अ, दि. २६ फेब्रूवारी, २०१८ अन्वये सदर रुग्णालयासाठी पदनिर्मीती करण्यात आलेली आहे.

मिरा-भाईंदर महानगरपालीका, यांचेकडील रुग्णालयाची जागा व मुख्य इमारत सार्वजनिक आरोग्य विभागाकडे हस्तांतरीत झाल्यानंतर सदर इमारतीची नोंद सार्वजनिक बांधकाम विभाग, ठाणे यांचेकडील पी.आर.बी. रजिस्टरमध्ये घेण्यात आलेली असून सद्यस्थितीत सदर इमारतीची देखभाल सा. बां. विभाग, ठाणे यांचे मार्फत करण्यात येत आहे.

पं. भीमसेन जोशी सामान्य रुग्णालय, मिरा-भाईंदर रुग्णालयात एकुण ३६५ पदे मंजूर असून त्यापैकी १३७ नियमीत व २२८ कंत्राटी पदे मंजूर आहेत. नियमीत पदांपैकी वर्ग-१, गट-अ संवर्गाची एकुण १८ पदे मंजूर असून त्यापैकी ९ पदे भरलेली असून ९ पदे रिक्त आहेत. तसेच वैद्यकीय अधिकारी, गट-अ वर्ग-२ संवर्गाची

एकुण २८ पदे मंजूर असून त्यापैकी २८ पदे भरलेली आहेत. सा.रा.से. गट-ब २ पदे मंजूर असून त्यापैकी १ भरलेले व १ रिक्त आहे. तसेच गट-क संवर्गाची एकुण ८७ पदे मंजूर असून त्यापैकी ७३ पदे भरलेली असून १४ पदे रिक्त आहेत. तसेच गट-ड २ पदे मंजूर असून दोन्ही पदे रिक्त आहेत. कंत्राटी कर्मचा-यांची २२८ पदे मंजूर असून त्यापैकी १६३ पदे भरलेली असून ६५ पदे रिक्त आहेत.

पं. भीमसेन जोशी सामान्य रुग्णालय, मिरा-भाईंदर या रुग्णालयात सोनोग्राफी, डायलेसीस, महात्मा ज्योतीबा फुले जन आरोग्य योजना, जननी सुरक्षा योजना व आहार सुविधा इत्यादी सर्वप्रकारच्या आरोग्य सुविधा देण्यात येत आहेत. या रुग्णालयात सर्व प्रकारच्या शस्त्रक्रिया करण्यात येतात. कुटुंबनियोजन शस्त्रक्रिया देखील करण्यात येत आहेत. या रुग्णालयात अपघात ग्रस्त रुग्णांवर देखील उपचार करण्यात येतात. तसेच आंतररुग्ण, बाहयरुग्ण, आय.सी.यू. विभाग, शस्त्रक्रियागृहे, लसीकरण केंद्र, इ.सी.जी., क्ष-किरणसेवा, प्रयोगशाळा चाचण्या, दिव्यांग प्रमाणपत्रे सेवा, प्रसूतीसेवा, गरोदरमाता तपासणी, एन.सी.डी.सेवा, भौतिकोपचार सेवा व इतर सर्व प्रकारच्या आरोग्य सेवा-सुविधा रुग्णांना पुरविण्यात येत आहेत.

पं.भीमसेन जोशी सामान्य रुग्णालय, मिरा-भाईंदर हे रुग्णालय पी.पी.पी. तत्वावर चालवण्याचा आणि देखभाल करण्याबाबत मा. आमदार गीता जैन, मिरा भाईंदर यांनी मा. आरोग्य मंत्री महोदयांकडे विनंती करण्यात आलेली होती. श्रमजीवी संघटना महाराष्ट्र राज्य व आमदार ओमप्रकाश उर्फ बच्चु कडू बा.कडू यांनी मा. मुख्यमंत्री व आरोग्य मंत्री महोदयांना दिलेल्या पत्रानसुार पं. भीमसेन जोशी सामान्य रुग्णालय, मिरा-भाईंदर रुग्णालय पी.पी.पी. तत्वार देऊ नये अशी विनंती केलेली आहे. सद्यस्थितीत सदर रुग्णालय PPP तत्वावर चालविण्यास देण्याबाबत सार्वजनिक आरोग्य विभागाचे धोरण नाही.

*********************************************

# महाराष्ट्र विधानसभा

## लक्षवेधी सूचना क्रमांक ९६६

## सन २०२३ चे (दुसरे) पावसाळी अधिवेशन

ॲड. यशोमती ठाकूर (सोनावणे) विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. ९६६ पुढीलप्रमाणे आहे :-

"अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालय ( डफरीन) येथील एसएनसीयु विभागात मागील ११ महिन्यात किमान २०७ नवजात शिशुंचा मृत्यु झाला असल्याचे माहे जुलै, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आले असणे, मागील सहा महिन्यापासून एसएनसीयु विभागात व्हॅंटिलेटर नसल्यानेही गंभीर बालकांवर उपचार करतांना अनेक समस्यांचा सामना करावा लागत असणे, जिल्हा रुग्णालयातील एसएनसीयु विभागामध्ये गंभीर तसेच कमी वजनाचे व कमी दिवसाच्या नवजातांना उपचारार्थ दाखल करण्यात येत असणे या सर्व बालकांवर या रुग्णालयात मोफत उपचार केले जात असणे, गंभीर बालकांना वाचविण्यासाठी सुपर स्पेशालिटीमध्ये रेफर करण्यात येणे, परंतू तेथेही सहाच बेड असल्याने नागपूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, सावंगी येथे रुग्णालयात गंभीर बालकांना पाठविण्यात येते परंतू या प्रवासा दरम्यान नवजात शिशुंची तब्येत अधिकच खाल़ावते बहुतांशी शिशुची या दरम्यान मृत्यु होत असणे यामुळे बालकांच्या पालकांमध्ये निर्माण झालेली चिड लक्षात घेता शासनाने त्वरीत याबाबत करावयाची आवश्यक कार्यवाही तसेच याबाबत शासनाची प्रतिक्रिया".

---

**प्रा.डॉ. तानाजी सावंत, मा. मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटूंब कल्याण) यांचे निवेदन.**

अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालय येथील विशेष नवजात काळजी कक्ष (Special Newborn Care Unit) मध्ये एकूण २७ खाटा उपलब्ध आहेत. या कक्षामध्ये अतिगंभीर, कमी वजनाच्या, अपुऱ्या दिवसात जन्मलेल्या नवजात शिशुवर उपचार केले जातात. या कक्षामध्ये radiant warmer, phototherapy तसेच २ व्हेंन्टीलेटर, ८ सीपॅप (Non Invasive ventilation) कार्यरत असुन गंभीर आजाराच्या नवजात बालकांवर उपचाराकरिता व्हेंन्टीलेटर व सीपॅप आवश्यकतेनुसार वापरण्यांत आलेले आहे व येत आहेत. या विभागात मागील ११ महिन्याच्या (माहे ऑगस्ट २०२२ ते जुन २०२३) कालावधीत एकुण १७८८ अतिगंभीर आजारी नवजात शिशुंना दाखल करण्यात आले. त्यापैकी एकुण २२४ नवजात शिशुंना संदर्भित करण्यात आले व १६८ नवजात शिशुंचा मृत्यु या विभागामध्ये झालेला आहे. एकुण दाखल बालकांपैकी १६८ नवजात शिशुंचा मृत्यु Pneumonia, Respiratory Distress, Birth Asphyxia, Sepsis, Extremely Low Birth Weight (ELBW), Extremely Preterm, Congenital Malformations या वैदयकिय कारणामुळे या विभागामध्ये झालेले आहेत.

तसेच मागील सहा महिन्यात (माहे जानेवारी २०२३ ते जुन २०२३) एकुण ७८ नवजात शिशुंना व्हेंन्टीलेटर व सीपॅप मार्फत उपचार करण्यात आलेले आहेत. गंभीर आजारी नवजात शिशुवर उपचार करण्यासाठी व्हेंन्टीलेटर व सीपॅपची कमतरता जाणवत नाही. तसेच या विभागात मागील ११ महिन्याच्या (माहे ऑगस्ट २०२२ ते जुन २०२३) कालावधीत २२४ नवजात शिशुंना उपचाराला प्रतिसाद न मिळाल्यामुळे तसेच Surgical deformities आजारांच्या उपचाराकरिता आवश्यकतेनुसार Higher Centre ला संदर्भित करण्यात आले. Tertiary Care साठी काही नवजात शिशुंना शासकिय वैद्यकिय महाविद्यालय, नागपुर व शस्त्रक्रियाची गरज असलेल्या नवजात शिशुंना सुपरस्पेशालिटी हॉस्पिटल अमरावती येथे संदर्भित करण्यात येते. सदर संदर्भीत करण्यात आलेंल्या बालकांना १०८ अॅब्युलन्स च्या मोफत सुविधेमार्फत डॉक्टरांच्या देखरेखी खाली Higher Centre ला संदर्भित करण्यात आले.

विभागीय संदर्भ रुग्णालय अमरावती (सुपर स्पेशालिस्ट हॉस्पिटल), येथे अर्भक शस्त्रक्रिया विभागामध्ये नवजात शिशु यांच्या शस्त्रक्रिया संबंधिचे उपचार होतात. या ईलाजासाठी सुपरस्पेशालिटी मध्ये ६ बेड एनआयसीयु व ३० बेडचे बालरुग्ण कक्ष उपलब्ध आहे. सुपरस्पेशालिटी रुग्णालय हे संदर्भ सेवा रुग्णालय असल्याने या रुग्णालयात अमरावती विभागातील ५ ही जिल्हयातील रुग्ण व शिशु संदर्भीत केले जातात. जिल्हा स्त्री रुग्णालय, अमरावती येथुन ज्या नवजात शिशुंना शस्त्रक्रिया संबंधीच्या इलाजाची गरज असते, तेच नवजात शिशु सुपरस्पेशालिटी रुग्णालय अमरावती येथे संदर्भीत होतात. यात बहुतांश वेळा जन्मतः व्यंग (Congenital Malformation) असलेले नवजात शिशुं असतात, ज्यांची सुपरस्पेशालिटी रुग्णालय अमरावती येथे शस्त्रक्रिया संबंधीचा इलाज केला जातो. सुपरस्पेशालिटी रुग्णालय अमरावती येथे माहे ऑगस्ट २०२२ ते जुन २०२३ या कालावधीत १६८ नवजात शिशुंवर शस्त्रक्रिया व उपचार करण्यात आले. यापैकी ३० बालके ही SNCU जिल्हा स्त्री रुग्णालय, अमरावती येथील होती.

अमरावती जिल्हा स्त्री रुग्णालय येथील विशेष नवजात काळजी कक्ष मध्ये सर्व आवश्यक उपकरणे तसेच प्रशिक्षित मनुष्यबळ उपलब्ध असून सर्व गंभीर आजारी नवजात शिशुवर २४ तास उपचाराची सुविधा देण्यात येते.

*********************

क्रमांक.लवेसु-२०२३/प्र.क्र.१२७/आरोग्य-३
लक्षवेधी सूचना क्र. १२४६

महाराष्ट्र विधानसभा

सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. सुभाष रामचंद्रराव धोटे, विधान सभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधान सभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र. १२४६ पुढीलप्रमाणे आहे :-

"चंद्रपूर जिल्ह्यातील ग्रामीण रुग्णालय गोंड़पिपरी (जिल्हा चंद्रपूर) या ३० खाटांचे रुग्णालय इमारतीचे बांधकाम सन १९८२ साली करण्यात आले असने. सदरहू रुग्णालयाची जुनी इमारत पूर्णतः जीर्ण झालेली असणे. रूग्णालय इमारतीचे (Structural Audit Report) संरचनात्मक लेखापरीक्षण करून अहवाल मागविले असता लेखा परीक्षण अहवालानुसार बांधकाम स्थिरता प्रमाणपत्राची तपासणी केली असता सदर इमारत वापरण्यायोग्य नसल्याचे कळविण्यात आले असणे. सदरहू पडीत संपुर्ण जीर्ण स्थितीत असलेल्या इमारतीमुळे भविष्यात कधीही धोका निर्माण होऊन जीवित हानी होण्याची शक्यता असणे. तरीही अशा पूर्णपणे जीर्ण झालेल्या इमारतीमध्ये ग्रामीण भागातील जनतेला आरोग्य विषयक सेवा पुरवून आरोग्य विभाग ग्रामीण भागातील नागरिकांच्या जिविताशी एक प्रकारचा खेळ करीत असल्याचे निदर्शनास येणे. जुनी जीर्ण झालेली इमारत निरलेखित करून नवीन इमारत बांधकामासाठी शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय चंद्रपूर यांनी दिलेल्या Structural Audit अहवालानुसार या इमारतीचे नव्याने बांधकाम करणे आवश्यक असताना मात्र शासनाचे याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष होत असल्याचे निदर्शनास येणे. यामुळे नागरिकांच्या जिवितास झालेला धोका याकडे होत असलेले शासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी ग्रामीण व शहरी भागातील सर्वसामान्य गोर गरीब जनतेत शासना प्रती पसरलेला असंतोष, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

**प्रा. डॉ. तानाजी सावंत, मंत्री, सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण, यांचे निवेदन.**

जिल्हा रुग्णालय चंद्रपूर यांचे अधिनस्त चंद्रपूर जिल्हयात ४ उपजिल्हा रुग्णालय व १० ग्रामीण रुग्णालये कार्यान्वित आहेत. जिल्हा रुग्णालय चंद्रपूर हे शासकीय वैद्यकिय महाविद्यालयास हस्तांतरित झालेले असल्याने सद्यस्थितीत सदर जिल्हा रुग्णालय हे वैद्यकिय महाविद्यालयाचे अधिपत्याखाली व नियंत्रणात आहे.

चंद्रपूर जिल्हयात गोंडिपपरी येथे ३० खाटांचे ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित आहे. माहे जानेवारी / फेब्रुवारी-२०२१ दरम्यान राज्यस्तरावरुन सर्व जिल्हयामधील रुग्णालयीन इमारतीचा आढावा घेण्यात आला होता. त्यामध्ये रुग्णालयीन इमारत धोकादायक असल्यास आणि बांधकामाचे अनुषंगाने निर्लेखनाचे मर्यादेत असल्यास त्वरीत बांधकाम विभागामार्फत वापरण्यायोग्य आहे किंवा नाही याबाबत तपासणी करुन तदनंतर बांधकाम विभागाच्या सुचनेप्रमाणे कार्यवाही करण्याबाबत आयुक्तालयामार्फत कळविण्यात आले होते.

त्यानुषंगाने जिल्हा शल्य चिकित्सक, चंद्रपूर यांनी त्यांच्या अधिनस्त जिल्हयातील सर्व उपजिल्हा व ग्रामीण रुग्णालयाचे संरचनात्मक लेखापरिक्षण (Structural Audit) करण्याबाबत दि.२०/०१/२०२१ अन्वये सार्वजनिक बांधकाम विभागास कळविले होते. ग्रामीण रुग्णालय गोंडपिपरी येथील इमारतीचे संरचनात्मक लेखापरिक्षण करण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतील प्राप्त निधी सार्वजनिक बांधकाम विभागास उपलब्ध करुन देण्यात आला. तदनंतर सार्वजनिक बांधकाम विभागाकडून शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, चंद्रपूर यांचेमार्फत ग्रामीण रुग्णालय गोंडपिपरी येथील रुग्णालय इमारतीचे संरचनात्मक लेखापरिक्षण करण्यात आले व त्याबाबतचा संरचनात्मक लेखापरिक्षण अहवाल उपविभागीय अभियंता, सा.बां.उपविभाग, गोंडपिपरी यांचेकडून त्यांचे पत्र दि.०२/०६/२०२३ अन्वये जिल्हा शल्य चिकित्सक, चंद्रपूर यांचेकडे प्राप्त झालेला आहे.

सदरहु संरचनात्मक लेखापरिक्षण अहवालानुसार ग्रामीण रुग्णालय गोंडपिपरी येथील इमारतीचे नुतनीकरण करणे आर्थिकदृष्टया न परवडणारे असल्याचे तसेच सदर इमारत सार्वजनिक वापरास योग्य नसल्याचे नमूद केलेले आहे. तसेच ग्रामीण रुग्णालय गोंडपिपरी येथील इमारतीचे लेखापरिक्षण अहवालासंदर्भात कार्यकारी अभियंता, सा.बां.विभाग क्र. २, चंद्रपूर यांनी त्यांचे पत्र दि.२०/०६/२०२३ नुसार पत्रात नमूद केले आहे आहे की, रुग्णालयाचे नविन इमारतीचे बांधकामाकरिता जागा उपलब्ध आहे किंवा कसे ते स्पष्ट नमूद करावे. जेणेकरुन इमारतीचे नकाशे अंतीम करुन अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही अंतीम करुन अंदाजपत्रके तयार करण्याची कार्यवाही केली जाईल.

सद्यस्थितीत गोंडपिपरी येथे अस्तीत्वात असलेले ग्रामीण रुग्णालयाची इमारत ०.३७ आर परिसरात आहे. नवीन मुख्य इमारत बांधण्याचे दृष्टिने ०.३७ आर. जागा अपुरी आहे. नविन इमारतीचे बांधकामाकरिता रुग्णालयाचे बाजूची शासकीय जागा जिल्हा शल्य चिकित्सक यांचे नावे होणे गरजेचे आहे. सदरील जागा जिल्हा शल्य चिकित्सक यांचे नावे झाल्यानंतर सा. बां. विभागाकडून नविन मुख्य इमारतीचे अंदाजपत्रके व आराखडे प्राप्त करुन घेण्याची कार्यवाही करण्यात येईल.

ग्रामीण रुग्णालय गोंडपिपरी येथील सद्यस्थितीत सुरु असलेली आरोग्य सेवा इतर ठिकाणी स्थलांतरित करण्याचे दृष्टिने सुध्दा नियोजन करण्यात येत आहे. गोंडपिपरी येथे विनावापर शासकीय इमारत किंवा भाडेतत्वावर खाजगी इमारत उपलब्ध होण्याच्या दृष्टिने व त्याकरिता जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत निधीसाठी सुध्दा जिल्हाधिकारी चंद्रपूर यांचेसमवेत जिल्हा शल्य चिकित्सक, चंद्रपूर यांचेद्वारे चर्चा करण्यात आलेली आहे. त्याबाबत अद्याप पर्याय उपलब्ध झालेला नाही. सद्यस्थितीत ग्रामीण रुग्णालयाच्या परिसरामध्ये नविन बांधकाम करण्यात आलेल्या LDR Room मध्ये ओपीडी सुरु करण्याबाबत तसेच आंतररुग्ण व्यवस्था गोंडपिपरी पासून अंदाजे १२-१३ कि.मी.अंतरावरील प्रा.आ.केंद्र ढावा तसेच भंगाराम तळोधी येथे किंवा २० कि.मी.अंतरावरील नवनिर्मित ग्रामीण रुग्णालय पोभुर्णा येथील प्रशस्त रुग्णालयात करण्याबाबत नियोजन सुरु आहे.

ग्रामीण रुग्णालय गोंडपिपरी येथे सन २०२२-२३ या कालावधीतील रुग्णालयीन कामाचा अहवाल खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | रुग्णालयाचे नाव | ओपीडी | आयपीडी | मोठया शस्त्रक्रिया | लहान शस्त्रक्रिया | प्रयोगशाळा चाचण्या | क्ष-किरण | प्रसुती |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | ग्रा.रु. गोंडपिपरी | २४५४५ | ३२३४ | २०५ | १५५ | २१२३३ | २१८९ | १८६ |

*****************

## सन २०२३ चे दुसरे (पावसाळी) अधिवेशन

श्री. बबनराव दत्तात्रय यादव (लोणीकर), विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम - १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढील प्रमाणे आहे:-

"जालना जिल्ह्यात सीएसआर फंडातून तत्कालीन जिल्हाधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक व जिल्हा आरोग्य अधिकारी यांनी व्हेंटिलेटर, पलंग, गाद्या, चादरी, उशा, इंजेक्शन्स, औषधी, ऑक्सिजन सिलेंडर, पीपीई किट, सिटीस्कंग मशीन, जिल्हा सामान्य रुग्णालयाचे नूतनीकरण, कोविड हॉस्पिटल रूपांतरण, डॉक्टरांचे निवासस्थान नूतनीकरण, यासह ईतर त्याकाळात झालेली कामे कुठलीही निविदा न मागविता बेकायदेशीररीत्या खरेदी करणेत आल्याचे निदर्शनास येणे, जिल्हा प्रशासनाच्या परस्पर मोठ्या प्रमाणात बोगस खरेदी करण्यात येणे, उद्योजकाकडून गोळा करण्यात आलेल्या पैश्यांची कुठेही नोंद न होता बेकायदेशिर काही कोटीच्या घरात खरेदी करून साहित्य कोवीड हॉस्पीटलला आणून टाकण्यात येणे, या सीएसआर फंडातून प्राप्त साहित्याबाबत जिल्हाधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सक यांना विचारणा केली असता याबाबत आपणही अनभिज्ञ असल्याचे त्यांच्याकडून सांगण्यात येणे, हि अतिशय गंभीर बाब असून मोठ्या प्रमाणात खरेदी करण्यात निकृष्ट दर्जाच्या साहित्याची गुणवत्ता खराब असल्याने आजही सदर साहित्य पडुन असणे, नियमानुसार सीएसआर फंडाचा निधी धनादेश, डिमान्ड ड्राफ्ट, आरटीजीएस द्वारे जिल्हाधिकारी यांचेकडे प्राप्त होणे क्रमप्राप्त असताना तसे न होता जिल्हा प्रशासनाच्या परस्पर साहित्य खरेदी करून जिल्हा सामान्य रुग्णालयात आणून टाकण्यात आले असणे, निकृष्ट दर्जाचे सॅनिटायझर जिल्ह्यातीलच तत्कालीन मंत्र्याच्या कारखाण्यातून नियमबाह्य खरेदी करून मोठा अपहार करण्यात येणे, बाजारभावापेक्षा अधिकच्या दराने व्हेंटिकलेटर्स खरेदी करण्यात आल्याने याबाबत लोकप्रतिनिधी यांनी अनेक वेळा निवेदना व पत्रव्यवहार करून सदरील गैरव्यवहाराची चौकशी करण्याची मागणी केली असणे, तत्कालीन जिल्हाधिकारी, जिल्हा शल्य चिकित्सक, व जिल्हा आरोग्य अधिकारी यांच्यासह या गैरव्यवहार व भ्रष्टाचाराशी संबंधित अधिका-यांची चौकशी करून निलंबनाही कारवाई करण्याची आवश्यकता, या गंभीर बाबीवर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया.." .

---

### प्रा.डॉ. तानाजी सावंत, मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण) यांचे निवेदन

सन २०२० मध्ये कोविड-१९ या जागतीक महामारीच्या काळात जालना जिल्हामध्ये रुग्णसेवा देणेसाठी जिल्हा शल्य चिकित्सक, जालना (प्रशासकीय अधिकारी यांच्या खात्यावर) कोणताही निधी सीएसआर अंतर्गत प्राप्त झालेला नसल्यामुळे सीएसआर फंडातून व्हेंटीलेटर, पलंग, गाद्या, चादरी, ऊशा, इंजेक्शन, सिलेंडर, पीपीई किट व सीटी स्कॅन मशिन या साहित्याची खरेदी करण्यात आलेली नाही.

परंतु अतिरिक्त अभियान संचालक, राष्ट्रीय नागरी आरोग्य अभियान, मुंबई यांचे दिनांक २९.०७.२०२१ च्या पत्रानुसार आयुक्त आरोग्य सेवा व अभियान संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान मुंबई यांच्या कडे वर्ग करण्यात आलेला सीएसआर निधी जिल्हयाच्या एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी बँक खात्यात खालील बाबीसाठी एकूण निधी रु.१,२९,५०,०००/- जमा करण्यात आलेला होता.

1) RTPCR Platform-6650000/-

2) Dialysis Machine with RO Plant For Covid Patient-

A) For DH Jalna-3150000/-

B) For SDH Ghansawangi-3150000/-

सदरील सीएसआर अंतर्गत जिल्हयाच्या एकात्मिक आरोग्य व कुटुंब कल्याण सोसायटी बँक खात्यात जमा करण्यात आलेल्या निधीमधुन कोव्हिड -१९ च्या उपाययोजनांसाठी RTPCR Platform तयार करण्यासाठी Covid -१९ RT-PCR Laboratory येथे चाचण्यांचे प्रमाण वाढविण्यासाठी आवश्यक उपकरणे व साहित्य सामुग्रीची एकूण रक्कम रु.३,९०,३०००/- ची खरेदी करण्यात आलेली आहे, व Dialysis Machine with RO Plant For Covid Patient ची खरेदी करण्यात आलेली नाही. जिल्हा सामान्य रुग्णालयाचे नुतनीकरण, कोवीड हॉस्पीटल रुपातंरण डॉक्टरांचे निवासस्थान नुतनीकरण इत्यादी दुरुस्ती व नुतनीकरणाची कामे महाराष्ट्र शासन सार्वजनिक आरोग्य विभाग यांचे दि. १० डिसेंबर २०२१ अन्वये प्रशासकीय मान्यता रक्कम रु.२२.१४ कोटी मिळाल्यानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग जालना यांच्या मार्फत करण्यात आलेली आहेत.

सन २०१९-२० मध्ये जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती जालना यांचे प्रशासकीय मान्यता निधी वितरण आदेश दि.२३.०३.२०२० अन्वये जिल्हातील कोवीड-१९ या विषाणुमुळे पसरणा-या संसर्गजन्य रोगाचा प्रादुर्भाव प्रतिबंध करणेसाठी अनुज्ञेय कामे/ उपाययोजना करणे, ४५१५ -इतर ग्रामविकास कार्यक्रम यावरील भांडवली खर्च, ८००- इतर खर्च, (४८) जिल्हा योजना जालना (४८) (०१) इतर जिल्हा योजना (४५१५०६३८) (कार्यक्रम), २१- पुरवठा व सामुग्री या लेखाशिर्षातर्गत रक्कम रु. १० कोटी ६० लक्ष इतका निधी मार्च, २०२० अखेर प्राप्त झाला होता त्यानिधीतुन जिल्हा रुग्णालयाचे परिसरातील बी.एससी महाविद्यालय व वसतीगृह इमारतीचे कोवीड-१९ रुग्णालयात रूपांतर करणेसाठी निधी सार्वजनिक बांधकाम विभाग क्रं.१ जालना व सार्वजनिक बांधकाम विभाग, विद्युत औरंगाबाद यांना वितरीत करण्यात आला होता व त्या निधीतुन कोवीड- १९ रुग्णालयाचे रुपातंरण करून घेण्यात आलेले आहे.

जिल्हातील विविध सामाजिक संस्था, उद्योजक यांच्याकडुन औषधी/ साहित्य व सामुग्रीचा पुरवठा करण्यात आलेला आहे कोविड-१९ च्या जागतिक महामारीच्या काळात रुग्णसंख्या वाढल्यामुळे रुग्णावर तातडीने औषधोपचार करून रुग्णांचे जिव वाचविणे तसेच त्यांना तातडीने उपचार करणे गरजेचे असल्याने सदरील साहित्याचा वापर ( DCH/DCHC & ICU ) करण्यात आलेला आहे त्यामुळे

जिल्हातील तसेच जिल्हाबाहेरील आलेल्या रुग्णांना औषधोपचार मिळाल्यामुळे त्यांना जिवदान मिळाले आहे.

जिल्हातील विविध सामाजिक संस्था, उद्योजक यांच्याकडुन औषधी/ साहित्य व सामुग्रीचा पुरवठा करण्यात आलेला आहे. तसेच सीएसआर अंतर्गत आयुक्त, आरोग्य सेवा तथा संचालक राष्ट्रीय आरोग्य अभियान, मुंबई यांच्या कडुन वर्ग करण्यात आलेला सीएसआर निधी RT-PCR Platform करण्यासाठी, कोविड-१९ RT- PCR Laboratory येथे चाचण्याचे प्रमाण वाढविण्यासाठी आवश्यक उपकरणे व साहित्य सामुग्रीची खरेदी करण्यास आलेल्या साहित्याची प्रत्यक्ष पाहणी जिल्हाधिकारी व जिल्हा शल्य चिकित्सक यांनी केलेली आहे.

सॅनिटायझरची खरेदी ही शासनाच्या विहीत केलेल्या खरेदीपध्दतीनुसार खरेदी करण्यात आलेली आहे.जिल्हा रुग्णालय, जालना यांचेकडून कोणत्याही प्रकारच्या व्हेंटीलेटरची खरेदी कोवीड-१९ महामारीच्या काळात करण्यात आलेली नाही. परंतु कोवीड-१९ काळात सीएसआर अंतर्गत विविध सामाजिक संस्था व उद्योजक तसेच (PM Care Fund) प्राप्त व्हेंटीलेटरचा वापर जिल्हा कोवीड- १९ रुग्णालय व अंतर्गत अधिनस्त संस्थामध्ये रुग्णांचे जीव वाचविणेसाठी करण्यात आलेला आहे.

---------------

# महाराष्ट्र विधानसभा
# सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन

**लक्षवेधी सूचना क्र.४२३**

**ॲड आशिष शेलार, वि.स.स. यांनी म.वि.स. नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना.**

" पालघर तालुक्यातील अतिदुर्गम आदिवासी परिसरात येणाऱ्या कोसबाड वरठापाड्यातील शाळकरी मुले व तेथील ग्रामस्थांना पावसाळ्यात नाला ओलांडताना जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत असणे, पूल मंजूर असूनही 20 वर्षांपासून तो लालफितीत अडकला असल्याने तेथील आदिवासी शाळकरी विद्यार्थी, गर्भवती माता व तेथील ग्रामस्थांचे प्रचंड हाल होत असणे, सरपंच, आमदार तसेच प्रशासन कोणीही दखल घेत नसल्यामुळे येथे एखादी दुर्दैवी घटना घडल्यावरच डोळे उघडतील का, असा सवाल स्थानिक नागरिक करीत असणे, मनोर-विक्रमगड रस्त्यालगत कोसबाड ग्रामपंचायतीच्या हद्दीतील आदिवासी वस्ती असलेल्या वरठापाड्यातील मुलांना शाळेसाठी कोसबाड काचपाडा येथे तीन किलोमीटर पायपीट करावी लागणे, मात्र, पावसाळ्यात चार महिने नदीचे रूप धारण केलेल्या नाल्यामध्ये असलेल्या बंधाऱ्याच्या कठड्यावरून पाण्यातून जीव मुठीत घेऊन शाळेत जावे लागणे, गर्भवती महिला किंवा आजारी व्यक्तीला झोळी करून उपचारासाठी न्यावे लागणे, पावसात अनेकदा दुसऱ्या गावाशी संपर्कही तुटणे, तेथील महिला-पुरुषांनाही जीवनावश्यक वस्तू आणण्यासाठी न दवाखान्यात वा इतर कामासाठी त्याच नाल्यातून असा जीवघेणा प्रवास करावा लागणे, शासनाने न लवकरात लवकर पुलांचे काम सुरू त करावे व आदिवासींचे हाल थांबवावे, अशी मागणी ग्रामस्थ करीत असणे, यावर शासनाने तात्काळ निर्णय घेऊन करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

## मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन

पालघर तालुक्यातील कोसबाड हे गांव माळशेत - कोसबाड ग्रामीण मार्ग क्र. ११४ लगत आहे. सदर रस्त्यावर सा.क्र. कि.मी. ३/६०० लगत वाहणाऱ्या नाल्याच्या बाजूला वरठेपाडा हे गाव वसलेले आहे. वरठेपाडा येथील ग्रामस्थ या पाडयालगत वाहणारा नाला पार करुन ग्रा.मा.क्र.११४ कडे जातात. सदर वरठेपाडापासून ग्रा.मा.क्र.११४ कडे जाणारा रस्ता हा योजनाबाहय रस्ता आहे.

ग्रा.पं.कोसबाड यांचे अहवालानुसार वरठेपाडयामध्ये १८ कुटुंब रहात असून त्यांची लोकसंख्या १०३ आहे. आजमितीस वरठेपाडयातून १४ मुले जिल्हा परिषद शाळा कोसबाड येथे जातात व ४ मुले मनोर येथे शाळेत जातात.

पावसाळ्यादरम्यान सदर नाल्यामधून वाहणाऱ्या पाण्यामुळे, वरठेपाडा येथे राहणाऱ्या ग्रामस्थांना पर्यायी मार्गाने ग्रा.मा.क्र.११४ कडे जावे लागते. वरठेपाडा ते ग्रा.मा.क्रमांक ११४ या योजनाबाहय रस्त्यावर येणाऱ्या नाल्यावर साकव बांधणेकरीता रु.२७.०४ लक्ष एवढा खर्च अपेक्षित आहे.

सार्वजनिक बांधकाम विभागाने दिनांक २ ऑगस्ट, २०२२ च्या पत्रान्वये निर्गमित सूचनेच्या अनुषंगाने योजनाबाहय रस्त्यावरील साकवांची दुरुस्ती/ बांधकामे ही कामे सार्वजनिक बांधकाम विभागामार्फत कार्यान्वित करण्यात येणार आहेत. वरठेपाडा व ग्रा.मा.क्र. ११४ दरम्यान साकव बांधकाम करणे हे काम जिल्हा नियोजन समितीमार्फत मान्यता व निधी उपलब्धतेनुसार हाती घेण्याचे नियोजन आहे.

***************************

शेटा - ५च-१२२(६००-८-२०२३)

लक्षवेधी सूचना क्र. ११२२

## महाराष्ट्र विधानसभा
## सन २०२३ चे पावसाळी अधिवेशन

**श्री. सुनिल भुसारा, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सुचना क्र. ११२२ पुढीलप्रमाणे आहे-**

"विक्रमगड मतदार संघातील टेंभा खर्डी, जव्हार, जामसर, बोपनदी, रुईघर रस्त्यांची मंजूरी देण्यात येणे, स्विकृत निविदा यामधील फरक रु. ६१.५० कोटी होणे, सार्वजनिक बांधकाम विभागाने १८२.५० कोटी रक्कमेची निविदा स्विकारुन मे. जिजाऊ कन्स्ट्रक्शन, ठाणे यांना देण्यात येणे, सदर रस्त्यांची प्रशासकीय मान्यता रक्कमेपैकी माहे जुलै, २०२१ अखेरपर्यंत केवळ १४.२३ कोटी रुपये म्हणजेच प्रशासकीय मान्यतेपेक्षा वाढीव खर्च न होणे, असे असतांनाही ठेकेदाराला दिनांक ३० मार्च, २०२२ पर्यंत १९२.४९ कोटी रुपयांचे देयक अदा करण्यात येणे, मुळ निविदेपेक्षा जादा रक्कम प्रशासनाकडून देण्यात येणे, शासकीय तिजोरीचा अपव्यव होत असल्याचे प्रथमदर्शनी निर्देशनास येऊन या प्रकरणी मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार झाल्याची शक्यता, या प्रकरणी शासनाने चौकशी करुन सदरच्या कामाची सुधारित प्रशासकीय मान्यता रद्द करण्याची केलेली मागणी, यासंदर्भात शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

### मा. मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन.

पालघर जिल्ह्यातील टेंभा खर्डी जव्हार जामसर बोपदरी रुईघर(पॅकेज क्र. MU-३) हे काम हायब्रीड ॲन्युईटीयोजनेतंर्गत मंजुर असून या कामास पीएलएन-२०१६-सीआर (२४९२)/नि-३ मंत्रालय मुंबई-३२ दि. ०१.१२.२०१६ अन्वये रु. १४६.१६ कोटी इतक्या रकमेस प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. सदर प्रशासकीय मान्यतेमध्ये रक्कम रु.११९.३५ कोटी ची स्थापत्य विषयी रक्कम समाविष्ट आहे. या व्यतिरीक्त सदर प्रशासकीय मान्यतेमध्ये संभाव्य भाववाढ, संकिर्ण बाबी, बांधकाम कालावधीमधील रकमेववर व्याज, सविस्तर प्रकल्प अहवालाकरीता सल्लागाराची नेमणूक, भूसंपादन, सेवावाहिनी स्थलांतर, रस्त्यालगत सुविधा या करीता तरतूद आहे.

विभागामार्फत प्रकल्पाची चालू दरसूचीप्रमाणे येणारी अद्यावत रक्कम रु.१८०.८४ कोटी असून स्विकृत निविदा रक्कम रु.१८२.५० कोटी इतकी आहे. सदर कामाकरीता दि.२०.०४.२०१८ च्या शासन पत्रान्वये मे. जिजाऊ कन्स्ट्रक्शन यांना Lettter Of Award देण्यात आले. सदर प्रकल्पाकरीता निविदा प्रक्रिया पूर्ण करुन दि.२३.१०.२०१८ रोजी कार्यारंभ आदेश देण्यात आले आहेत. करारनाम्याच्या तरतूदीनुसार सदर कामाचा बांधकाम कालावधी २ वर्ष असून देखभाल व दुरुस्ती कालावधी काम पूर्ण केल्यानंतर पुढील १० वर्ष इतका आहे.

सदरचे काम दि.३०.०८.२०२० रोजी पूर्ण करण्यात आले असून सन २०१७-१८ ते सन २०२२-२३ या कालावधीत सदर कामावर रु.२०७.९६ कोटी इतका खर्च करण्यात आला आहे. सदर प्रकल्पातील कामाच्या व्याप्तीतील बदल, जादा दराची स्विकृत निविदा, भाववाढ, सेवा व वस्तू कर, सल्लागार फी या कारणांस्तव सदर कामास व्यय अग्रक्रम समितीच्या मान्यतेने दि.२१.०२.२०२३ च्या शासन निर्णयान्वये रक्कम रु.२३५.३९ कोटी ची सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

सदरचे काम करारनाम्यातील तरतूदींप्रमाणे व विहित मानकांप्रमाणे कार्यान्वित करुन पूर्ण करण्यात आले आहे.

RGTA-H-1125-1(700-8-2023) **********************

१५३८

**महाराष्ट्र विधानसभा**

**सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन**

**श्री.शांताराम मोरे, वि.स.स.,यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१५३८ पुढीलप्रमाणे आहे :-**

""भिवंडी तालुक्यातील रामा ०३ मुंबई-नाशिक महामार्गावर असलेल्या अर्जुनली टोल प्लाझाअंतर्गत येत असलेल्या तळवली पोलीस चौकी जवळ अंडरबायपास ब्रिज मंजुर असुन त्यांचे कामकाज पुर्णपणे ठप्प असणे, तसेच सदर महामार्गावर खडवली फाटक येथे अंडरबायपास ब्रिज मंजुर असुनही कामास सुरू केले नसणे, टोल व्यवस्थापनाच्या हलगर्जीपणामुळे दिनांक ४ जुलै, २०२३ रोजी कंटेनरच्या धडकेत १ मृत्यु व २ गंभीर जखमी होणे, तदनंतर दिनांक १८ जुलै, २०२३ रोजी कंटेनरच्या धडकेचे जीप मधील निष्पाप ०६ मृत्यु व ३ गंभीर जखमी होणे, अशा वारंवार दुर्दैवी घटना घडून निष्पाप व्यक्ती दगावणे, शासन व टोल व्यवस्थापन कंपनी यांच्यात झालेल्या B.O.T. करारनाम्यानुसार अत्यावश्यक (वैदयकीय पथक, ॲम्बुलन्स व्यवस्था, क्रेन,टोचन वाहन, व अग्नीरोधक यंत्रणा व वाहनांची व्यवस्था) सोई सुविधा उपलब्ध नसणे, त्यामुळे स्थानिकांमध्ये संबंधित टोल व्यवस्थापना विरोधात असंतोषाची व चिडेची भावना निर्माण होणे, वेळेवर कार्यवाही न केल्यास जनभावनांचा उद्रेक होण्याची निर्माण झालेली शक्यता आणि शासनाने यावर त्वरीत करावयाची कारवाई व उपाययोजना."

**मा.मंत्री, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) यांचे निवेदन**

मुंबई-नाशिक राष्ट्रीय महामार्ग (रा.म.०३) हा केंद्र शासनाच्या भारतीय राष्ट्रीय राजमार्ग यांचे अखत्यारीत आहे. या महामार्गावरील वडपे ते गोंदे हया सुमारे ९७ कि.मी.लांबीचे काम बी.ओ.टी. तत्वावर सवलतदारास २० वर्षाच्या कालावधीच्या करारावर (एप्रिल २०२६ पर्यंत) देण्यात आलेले आहे. या लांबीतील भिवंडी तालुक्यातील तळवली येथील उड्डाणपूल बांधण्याच्या कामास मंजूरी प्राप्त असून निविदा प्रक्रिया आरंभ होऊन लवकरच प्रत्यक्ष कामाला सुरवात करण्याचे नियोजन आहे. खडवली येथे बोगदयाचे प्रत्यक्ष काम सुरु करण्यात येऊन ब-याच अंशी दुतर्फा सेवा रस्ते करण्यात आले होते. परंतू भूसंपादनातील अडचणीमुळे कामास विलंब झाला. तद्नंतर भूसंपादनातील अडचणींचे पुर्णत: निराकरण करण्यात येऊन देखिल कंत्राटदाराने कामास विलंब केल्यामुळे कामाचा करार रद्द करण्यात आला.

मा.मुख्यमंत्री महोदय यांनी दि.२८.०७.२०२३ रोजी बोलविलेल्या बैठकीमध्ये व दि.३०.०७.२०२३ रोजी केलेल्या प्रत्यक्ष पाहणी दरम्यान भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरणास दिलेल्या निर्देशानुसार खडवली येथील सेवा रस्ते व भुयारी मार्गाचे (व्हीयूपी) काम तात्काळ सुरु करण्यात आले आहे.

दिनांक ४ जुलै, २०२३ रोजी कुठलाही अपघात झालेला नसून दि.०८ जुलै २०२३ रोजी कंटेनरच्या वाहनचालकाचे नियंत्रण सुटल्यामुळे अपघात होऊन १ जण मृत्यूमुखी पडला. दि.१८ जुलै, २०२३ रोजी झालेल्या अपघातामध्ये ६ लोक मृत्यूमुखी पडले. प्राप्त सी.सी.टी.व्ही.फुटेज वरुन सदर अपघात वाहनचालकाच्या निष्काळजीपणामुळे झाल्याचे दिसून येते. सदरहू स्थळावर कोडल मानकानुसार सर्व सुरक्षिततेच्या खबरदारी घेण्यात आलेल्या आहेत. सदर प्रकल्प हा बी.ओ.टी. तत्वावर सवलतदाराकडे असल्याने आपत्ती व्यवस्थापन हा सवलतदाराच्या जबाबदारीचा भाग आहे. यामध्ये भरारी वाहन, रुग्णवाहिका, आग्निशामक बंब व क्रेन यांचा समावेश असून त्याचे दोन्ही संच टोलनाक्यांवर उपलब्ध असतात.वाहनधारकांसाठी भारतीय राष्ट्रीय राजमार्ग प्राधिकरण यांची १०३३ ही हेल्पलाईन उपलब्ध आहे. अपघातप्रवण स्थळांवर रस्ते सुरक्षा व्यवस्था अजून वाढविण्यात आली असून पोलीस यंत्रणेच्या मदतीने बेकायदेशीर मिडीयन ओपनींग व अतिक्रमणे काढण्यात येत आहेत.

***************

रोता - रन्ध - १०४१ (७५०-८-२३)

# महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे पावसाळी अधिवेशन

**डॉ.राहूल पाटील, सन्माननीय विधानसभा सदस्य** यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये दिलेली **लक्षवेधी सूचना** पुढीलप्रमाणे आहे :-

"परभणी कार्यक्षेत्रात मोठ्या प्रमाणात कापसाची लागवड होत असून परभणी बाजारपेठ कापूस खरेदसाठी प्रसिध्द असणे, सन २०२१-२२ व सन २०२२-२३ कापूस हंगामात भाव कमी झाल्यामुळे शेतकऱ्यांचे खुप मोठ्या प्रमाणात नुकसान झालेले असणे, सन २०२३-२४ चा कापूस हंगाम मध्ये होणारी कापूस लागवड लक्षात घेता शासनाने ठरवून दिलेला बाजार भाव व कापूस उत्पादनाचा विचार करता कापूस उत्पादक शेतकऱ्यांची खाजगी व्यापाऱ्यांकडून मोठ्या प्रमाणात आर्थिक पिळवणूक होणे, गत ७ वर्षे परभणी येथील C.C.I केंद्र बंद असल्यामुळे परभणी बाजारपेठेत कापसाची आवक कमी होणे, C.C.I. केंद्राकडून खुल्या बाजार पेठेतून कापूस खरेदी होणार असल्यामुळे शेतकऱ्यांना चांगला भाव मिळून आर्थीक लाभ होणार असणे, त्यामुळे शेतकऱ्यांच्या आर्थिक हिताचा विचार करता परभणी बाजार समिती संचालक मंडळ यांनी दिनांक २ जून, २०२३ रोजी कृषि उत्पन्न बाजार क्षेत्रातील भारतीय कापुस निगम लिमीटेड C.C.I यांचे कापूस खरेदी केंद्र सुरू करण्याचा ठराव मंजूर करण्यात येणे, सदरील योजनेअंतर्गत लवकरात लवकर कापूस खरेदी केंद्र सुरू करण्यात यावे अशी मागणी स्थानिक लोकप्रतिनिधींनी भारतीय कापुस निगम लिमीटेड, भारत सरकार उपक्रम, छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) यांच्याकडे माहे जून, २०२३ अखेर लेखी निवेदनाद्वारे करण्यात येणे, तथापि अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आलेली नसणे, शासनाने सदर प्रकरणी चौकशी करून परभणी कार्यक्षेत्र अंतर्गत कापूस खरेदी केंद्र सुरू करण्याच्या अनुषंगाने कार्यवाही करण्याची आवश्यक, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## मा.मंत्री (पणन) यांचे निवेदन

भारतीय कपास निगम लि. /The Cotton Corporation of India Limited (CCI) हे केंद्र शासनाच्या वस्त्रोद्योग मंत्रालयाच्या अखत्यारीतील महामंडळ असून त्यावर राज्य शासनाचे कोणत्याही प्रकारचे नियंत्रण नसते. तसेच कापूस या पिकास केंद्र शासनाकडून दरवर्षी किमान हमी दर जाहिर करण्यात येतो.

किमान हमी दराने कापूस खरेदीसाठी केंद्र शासनाचे मुख्य अभिकर्ता भारतीय कपास निगम (सीसीआय) हे असून राज्यात उपअभिकर्ता म्हणून महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन

महासंघाची केंद्र शासनाकडून नियुक्ती करण्यात येते. खुल्या बाजारपेठेत कापसाचे दर किमान हमी दरापेक्षा कमी झाल्यास कापूस उत्पादक शेतकऱ्यांचे नुकसान टाळण्यासाठी राज्यात सीसीआय व महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाद्वारे किमान हमी दराने कापूस खरेदी करण्यात येते.

हंगाम २०२१-२२ व २०२२-२३ या दोन हंगामात महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघाची सीसीआयचे उपअभिकर्ता म्हणून नेमणूक झालेली नाही.

केंद्र शासनाने हंगाम २०२१-२२ करीता लांब धाग्याच्या कापसासाठी रु.६,०२५/- प्रति क्विंटल किमान हमी दर जाहीर केला होता. तर हंगाम २०२२-२३ करीता लांब धाग्याच्या कापसासाठी रु.६,३८०/- प्रति क्विंटल व मध्यम धाग्याच्या कापसासाठी रु.६०८०/- प्रति क्विंटल इतका किमान हमी दर जाहिर केलेला आहे. हंगाम २०२१-२२ मध्ये खुल्या बाजारातील कापसाचा सरासरी दर सुमारे रु.८,०००/- प्रति क्विंटल होता. तर हंगाम २०२२-२३ मध्ये खुल्या बाजारातील कापसाचा सरासरी दर सुमारे रु.७२००/- आहे. त्यामुळे वरील दोन्ही हंगामात सीसीआय व कापूस पणन महासंघामार्फत हमी दराने कापूस खरेदी करण्यात आली नाही.

सध्या खुल्या बाजारातील कापसाचे दर किमान हमी दरापेक्षा जास्त असल्याने केंद्र शासनाचे भारतीय कपास निगम मर्या. (सीसीआय) व महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघामार्फत किमान आधारभूत दराने अद्याप कापूस खरेदी करण्यात आलेली नाही.

परभणी जिल्ह्यातील सन २०२१-२२ मध्ये सेलू, मानवत, जिंतूर, ताडकळस या ४ ठिकाणी सीसीआयची कापूस खरेदी केंद्रे उभारण्यात आली होती.

परभणी कृषी उत्पन्न बाजार समितीच्या दिनांक ०२.०६.२०२३ रोजीच्या संचालक मंडळाच्या सभेत, सन २०२३-२४ या हंगामासाठी परभणी बाजारपेठेत भारतीय कपास निगम लि मार्फत कापूस खरेदी केंद्र सुरु करण्याचा ठराव मंजूर करण्यात आला. सदर ठरावाबाबत परभणी कृषि उत्पन्न बाजार समितीने भारतीय कपास निगम लि. यांना दिनांक ०७.०६.२०२३ च्या पत्रान्वये कळविले आहे.

आगामी कापूस हंगाम २०२३-२४ मध्ये खुल्या बाजारपेठेत कापसाचे दर सदर हंगामाकरीता घोषित केलेल्या किमान हमी दरापेक्षा कमी झाल्यास, राज्य शासनाच्या अखत्यारीतील महाराष्ट्र राज्य सहकारी कापूस उत्पादक पणन महासंघामार्फत किमान हमी दराने कापूस खरेदी करण्याकरीता कराव्या लागणाऱ्या पूर्वतयारीच्या अनुषंगाने आवश्यक ती कार्यवाही करण्यात येत आहे.

********

लक्षवेधी सूचना क्रमांक-

**सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन**

***महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये डॉ. राहूल पाटील, विधानसभा सदस्य यांनी उपस्थित केलेली लक्षवेधी सूचना खालीलप्रमाणें आहे:-***

"परभणी जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी खरिप हंगाम २०२२ मध्ये पि कवलेला कांदा मार्च, २०२३ पर्यंत परभणी येथे असलेल्या खाजगी भाजीपाला विक्री मार्केटला विक्री करणे, कांदा अनुदान प्रस्ताव मार्केट कमिटी परभणी यांनी आजरोजी पर्यंत घेतलेला नसणे, परभणीत जे भाजीपाला खरेदी मार्केट आहे त्याला पणन चे लायसन नसणे, यामुळे शासनाच्या जी. आर. प्रमाणे खाजगी मार्केटच्या पावत्या जमत नसल्याचे कारण देत मार्केट कमिटी सचिवांनी परभणी जिल्ह्यातील शेतकरी बांधवांचे कांदा अनुदानाचे प्रस्ताव आजपर्यंत घेतलेले नसणे, परभणी जिल्ह्यातील दुसरे मार्केट नसणे, नाफेड कांदा खरेदी केंद्र नसणे, तर कांदा उत्पादक शेतकऱ्यांनी कांदा विकावे तरी कुठे असा प्रश्न जिल्ह्यातील कांदा उत्पादक शेतकऱ्यांना पडलेला असणे, जो मार्केट परभणीत आहे तिथे सर्वांनी कांदा विक्री केलेला असणे, सन २०१६-१७ साली ही हेच मार्केट मनपाच्या जुन्या मोंढ्यात परभणी येथे असताना अशा परीस्थितीत त्याच्या पावत्या चालल्या गेल्या, आता हेच मार्केट पार्थी रोड येथे जाऊन बसल्याने त्याच्या पावत्या न चालणे, त्यामुळे शेतकरी संभ्रमात असणे, विशेषत: परभणी येथे भाजीपाला खरेदी विक्रीचे हे एकमेव मार्केट असणे, त्यामुळे परभणी जिल्ह्यातील सर्व शेतकऱ्यांची अडचन लक्षात घेता झालेलें नुकसान भरुन काढण्यासाठी शासनाने जी मदत जाहिर केलेली आहे ती कांदा उत्पादकांना देण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने केलेली कार्यवाही वा शासनाची प्रतिक्रिया."

---

**श्री. अब्दुल सत्तार, मा. मंत्री (पणन) यांचे निवेदन**

चालू वर्षी राज्यात फेब्रुवारी २०२३ च्या सुरुवातीस कांद्याच्या बाजारभावात मोठ्या प्रमाणात झालेली घसरण विचारात घेऊन शेतकऱ्यांना आर्थिक मदत देण्याच्या दृष्टीने, राज्यातील कृषी उत्पन्न बाजार समित्यामध्ये, खाजगी बाजार समित्यामध्ये, थेट पणन अनुज्ञप्तीधारकांकडे अथवा नाफेडकडे दिनांक १ फेब्रुवारी २०२३ ते दिनांक ३१ मार्च २०२३ या कालावधीत लेट खरीप हंगामातील लाल कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना रुपये ३५० प्रति क्विंटल व जास्तीत जास्त २०० क्विंटल प्रति शेतकरी याप्रमाणे अनुदान शासन निर्णय, दिनांक २७/३/२०२३ मध्ये नमूद केलेल्या अटीस अधीन मंजूर करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे. तसेच या संदर्भात शासनपत्र दि. २०/०४/२०२३ व दि.२९/०५/२०२३ अन्वये अनुदानाच्या निकषांबाबत अतिरीक्त सुचना देण्यात आल्या आहेत.

२. परभणी जिल्ह्यातील सर्व बाजार समित्यांमध्ये पणन संचालक महाराष्ट्र राज्य, पुणे यांच्या दिनांक ०८ जुलै, २०१६ रोजीच्या परिपत्रकानूसार बाजार आवारा बाहेरील भाजीपाला व फळफळावळ नियमन मुक्त

करण्यात आलेले असल्यामुळे बाजार समितीच्या मार्केट यार्डाबाहेरील भाजीपाला व फळ विक्री करणाऱ्या व्यापाऱ्यांनी बाजार समितीचा परवाना हस्तगत केलेला नाही.

३. सन २०१६-१७ मध्ये माहे जुलै २०१६ व ऑगस्ट २०१६ या महिन्यामध्ये कांदा विक्री केलेल्या शेतकऱ्यांना प्रति क्विंटल रुपये १००/- जास्तीत जास्त २०० क्विंटल प्रमाणे कांदा अनुदान दिनांक १५ एप्रिल २०१७ चे शासन निर्णयान्वये जाहिर केलेले होते. त्यावेळी परभणी येथील भाजी मार्केट हे मोंढ्यात असल्याने कृषी उत्पन्न बाजार समितीकडे भाजी मार्केट मध्ये खरेदी विक्रीसाठी येणाऱ्या भाजीपाल्याच्या आवकेची माहिति पणन संचालनालयास सादर केलेली होती. त्यानूसार शासन निर्णय दिनांक २४/०१/२०२० अन्वये परभणी जिल्ह्यातील ६८९ शेतकऱ्यांना रु.८५०७८२१/- एवढे अनुदान मंजूर करण्यात आले होते.

४. परभणी जिल्हयामध्ये खाजगी बाजाराची संख्या ०४ असून थेट पणन अनुज्ञप्तीधारकांची संख्या २२ आहे. परंतु परभणी जिल्हयातील शेतकऱ्यांनी खाजगी बाजार व थेट पणन परवानाधारक यांचेकडे कांदा विक्री न करता खाजगी व्यापा-यांना कांदा विक्री केला असल्याने दिनांक २७ मार्च २०२३ च्या शासन निर्णयानुसार सदरचे शेतकरी अनुदान मिळण्यास पात्र होत नाहीत.

****************

H/870-1 a

लक्षवेधी सूचना क्र.३००

सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्री.रविंद्र वायकर, मा. वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्रमांक ३०० पुढीलप्रमाणे आहे :-**

"पूनम नगर, जोगेश्वरी (पूर्व) येथील म्हाडाच्या जागेत पंतप्रधान घरकुल प्रकल्पांतर्गत (पीएमजीपी) उभारण्यात आलेल्या १७ इमारती अत्यंत धोकादायक अवस्थेत असणे, सदरहू इमारतींच्या पुनर्विकासाचे काम मे.श्रीपती रियल व्हेंचर्स एल.एल.पी. या विकासकास जवळपास १२ वर्षांपूर्वी देण्यात आलेले असणे, सदरहू पुनर्विकासाकरीता विकासकास दिनांक १३/११/२०१४, ८/७/२०१६ व दिनांक ५/१/२०१८ रोजी असे तीन वेळा देकारपत्रे देण्यात आलेली असणे, तसेच काही अटी व शर्तींच्या अधीन राहून डीसीपीआर-२०३४ मधील वि.नि.नि.३३(५) नुसार ४.०० चटई क्षेत्र निर्देशांक देखील मंजूर करण्यात आलेले असणे, तथापि विकासक हा सहकार पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दिनांक ४/७/२०१९ च्या शासन निर्णयानुसार प्रकल्पाच्या एकूण किंमतीच्या २०ज्ञ् इतकी बँक गॅरंटी देण्यास तयार नसल्याने व सदरहू विकासकाची योजना योजना राबविण्यासाठी फंड कॅपॅसिटी एलएलपी ची कागदपत्रे आढळून येत नसणे, तसेच विकासकाने म्हाडा व बृहन्मुंबई महानगरपालिकेकडे भरावयाच्या शुल्काचा भरणा केलेला नसल्याने या पुनर्विकासाकरीता आवश्यक पुढील परवानग्या अद्याप प्राप्त झालेल्या नसणे, परिणामी उक्त सर्व बाबींमुळे सदरहू पुनर्विकास प्रकल्प गेली १२ वर्षे प्रलंबित असणे, तसेच विकासक मे.श्रीपती रियल व्हेंचर्स एल.एल.पी. यांची आर्थिक स्थिती व्यवस्थित नसल्यामुळे म्हाडाने प्रचलित नियमातील तरतुदीनुसार सदरहू विकासकाची नियुक्ती रद्द करून सदरहू प्रकल्पाचा पुनर्विकास म्हाडाने स्वत: करावा किंवा म्हाडामार्फत अन्य विकासकाची नेमणूक करून सदरहू पुनर्विकासाचा प्रकल्प तातडीने पूर्ण करावा, अशा सूचना शासनपत्र दिनांक १५ डिसेंबर, २०२० अन्वये दिलेल्या असणे, या प्रकरणी सातत्याने होत असलेल्या विलंबाने बाधित नागरिक त्यांच्या हक्काच्या घरापासून गेल्या १२ वर्षांपासून वंचित असल्याने सत्वर योग्य ती कार्यवाही करण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.मुख्यमंत्री, गृहनिर्माण मंत्री, प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग तसेच मुख्य कार्यकारी अधिकारी तथा उपाध्यक्ष, म्हाडा यांना अनुक्रमे दिनांक ३१/०५/२०२१, १३/०५/२०२१, ०२/०७/२०२१ व ०३/१२/२०२१ रोजी वा त्या सुमारास निवेदन सादर करूनही या प्रकरणी अद्यापपर्यंत कोणतीच कार्यवाही न होणे, तथापि सदरहू प्रकल्पाचा पुनर्विकास करण्याच्या अनुषंगाने म्हाडाने संबंधित गृहनिर्माण संस्थेला कळविले असूनही या प्रकल्पावर अन्य विकासकाची नियुक्ती करण्याबाबत अद्याप कोणतीच कार्यवाही करण्यात आलेली नसणे, सदरहू प्रकल्प हा गेल्या १२ वर्षांपासून प्रलंबित असून यातील इमारती या अत्यंत जीर्ण झालेल्या असल्याने भविष्यात दुर्घटना होवून येथील नागरिकांच्या जीवितास धोका निर्माण होण्याची शक्यता निर्माण होणे, उक्त बाब लक्षात घेता सदरहू प्रकल्प म्हाडाने स्वत: तातडीने सुरु करून पूर्ण करण्याची शासन स्तरावरून म्हाडा प्रशासनास पुन्हा नव्याने योग्य ते आदेश देण्याबाबत कार्यवाही करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

**मा.मंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन**

पी.एम.जी.पी कॉलनी, पुनम नगर, जोगेश्वरी, अंधेरी (पूर्व) या म्हाडा वसाहतीमध्ये एकूण १७ इमारती आहेत. सदरहू इमारतींतील सभासदांनी अंधेरी पी.एम.जी.पी. कॉलनी को.ऑप. हौसिंग सोसायटीज असोसिएशन लि., या नावाने असोसिएशनची स्थापना केलेली आहे.

उक्त असोसिएशनने दि.०४.०४.२०११ रोजीच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये उक्त १७ इमारतींचा एकत्रित पुनर्विकास करण्याबाबतचा ठराव मंजूर केला. असोसिएशनमधील ९८४

सभासदांपैकी ८७६ सभासदांनी पुनर्विकासाकरीता संमतीपत्रे दिली. त्यानुसार, संस्थेचा पुनर्विकास करण्याकरीता निविदा काढण्यात आली व मे.श्रीपती इन्फ्रास्ट्रक्चर या विकासकाची संस्थेकडून नेमणूक करण्यात आली. सदर पुनर्विकास प्रकल्पातील म्हाडाच्या हिश्श्याकरिता संस्था, विकासक व म्हाडा यांच्या दरम्यान त्रिपक्षीय करारनामा दि.२७.०८.२०१५ रोजी अंमलात आला व विकासकाने दि.२६.०४.२०१६ रोजी नोंदणीकृत केला. सदरहू विकासक यांना उक्त १७ इमारतींचा एकत्रित पुनर्विकास करण्याकरीता म्हाडाकडून दि.१३.११.२०१४, दि.०८.०७.२०१६ व दि.०५.०१.२०१८ रोजी असे तीन वेळा देकारपत्रे देण्यात आले. परंतू देकारपत्रातील अधिमुल्य रक्कमेचा भरणा न करणे, बृहन्मुंबई महानगरपालिकेला भरावयाच्या शुल्काचा भरणा न करणे, या कारणांमुळे विकासकास पुनर्विकासाकरीता आवश्यक पुढील परवानग्या प्राप्त करून घेता आल्या नाहीत.

तद्नंतर DCPR-२०३४ प्रसिद्ध करण्यात आला. सदरहू विकासकास DCPR-२०३४ मधील तरतुदीनुसार आणखी एक (चौथी) संधी देण्याची शिफारस म्हाडाने केली. त्याअनुषंगाने सहकार विभागाच्या दि.०४.०७.२०१९ रोजीच्या शासन निर्णयानुसार पुनर्विकास प्रकल्पाच्या एकूण किंमतीच्या २० टक्के इतकी बँक गॅरन्टी देण्याच्या अधीन राहून, सदरहू १७ इमारतींचा पुनर्विकास करण्यासाठी ४.०० चटई क्षेत्र निर्देशांक शासन पत्र दि.१५.०२.२०२० अन्वये मंजूर करण्यात आला.

तथापि, सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाच्या दि.०४.०७.२०१९ च्या शासन निर्णयानुसार देकारपत्रातील बँक गॅरन्टी देण्याच्या मुख्य अटी व शर्तीची उक्त विकासकाने पुर्तता केली नाही. रहिवाशांचे हित अबाधित राखण्याच्या दृष्टीने बँक गॅरन्टींची उपाययोजना महत्वाची होती. विकासकाची आर्थिक स्थिती व्यवस्थित नसल्याचे स्पष्ट झाल्याने, मे.श्रीपती रियल व्हेंचर्स एल.एल.पी. या विकासकाची नेमणूक रद्द करून, सदरहू प्रकल्पाचा पुनर्विकास म्हाडाने स्वतः करावा किंवा म्हाडामार्फत अन्य विकासकाची नेमणूक करुन सदरहू पुनर्विकास प्रकल्प पुर्ण करण्याच्या सूचना म्हाडास दि.१५.१२.२०२० रोजी देण्यात आल्या.

उक्त आदेशाच्या अनुषंगाने म्हाडाने प्रकल्पाची व्यवहार्यता तपासण्याकरिता (Feasibility) नेमलेल्या मे.एलोरा प्रोजेक्ट कन्सलटंट यांनी त्यांच्या दि.२७.१०.२०२१ रोजी सादर केलेल्या अहवालानुसार, सदर प्रकल्प म्हाडामार्फत करावयाचा झाल्यास त्यानुसार येणारा बांधकाम दर हा बाजारभावाच्या बांधकाम दराच्या अधिक येत असल्यामुळे सदर प्रकल्प म्हाडास वर्धनक्षम होत नसल्याचे दिसून आले.

दरम्यानच्या काळात सदर पुनर्विकास प्रकल्पाबाबत तत्कालिन मा. मुख्यमंत्री महोदय यांच्याकडे दि.२६.०५.२०२२ रोजी पार पडलेल्या बैठकीतील निर्देशानुसार म्हाडाने दि.२०.०६.२०२२ च्या पत्रान्वये विकासकाची नेमणूक रद्द केली आहे. तसेच, सदरहू मोडकळीस आलेल्या इमारतींचे संरचनात्मक परीक्षण/तपासणी (Structural Audit) करण्याकरीता म्हाडाकडून मे.शिल्प कन्सल्टींग सर्विसेस लिमिटेड यांची स्ट्रक्चरल ऑडिटर म्हणून नियुक्ती करण्यात आली. सदरहू प्रकल्पातील १७ इमारतीपैकी एका इमारतीमधील (इमारत क्र.१३) रहिवाशांनी विरोध केला, तर १६ इमारतींचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्यात आले असून, या इमारती सी-१ वर्गात मोडत असल्याबाबतचा अहवाल म्हाडास दि.०६.१०.२०२२ रोजी सादर करण्यात आला आहे. याबाबत अंधेरी पी.एम.जी.पी. कॉलनी को.ऑप.हौसींग सोसायटीज असोसिएशन लि. यांच्याकडून नवीन विकासकाची नेमणूक करून पुर्नविकासाचा प्रस्ताव म्हाडाकडे सादर झालेला नाही.

सदर प्रकल्प म्हाडामार्फत Construction & Development Agency (C & DA) ची नेमणूक करून राबविण्यासाठी निविदा प्रक्रीयेबाबतची कार्यवाही म्हाडाच्या स्तरावर सुरू आहे.

**********

# महाराष्ट्र विधानसभा

**सन २०२३ चे पावसाळी अधिवेशन** **लक्षवेधी सूचना क्र.३२६**

**श्री. सुनिल प्रभू, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.३२६ पुढीलप्रमाणे आहे :-**

""मुंबईतील मालाड (पूर्व) येथील जानू भोयेनगर येथील पहिल्या मजल्यावर राहणाऱ्या झोपडीधारकांच्या प्रस्तावास राज्य शासनाने दिनांक ११ जून, २०२३ रोजी मंजूरी देण्यात येणे, यामुळे पहिल्या मजल्यावरील झोपडीधारक रहिवाशी कुटुंबांना पंतप्रधान आवास योजनेअंतर्गत घरे मिळण्यास मार्ग मोकळा होणे, एसआरए प्राधिकरणाने राज्य शासनास सादर केलेला प्रस्ताव सन २०१९ पासून मंजुरीसाठी प्रलंबित असणे, उक्त प्रस्तावास शासनाने मंजूरी दिली असल्याने याच धरतीवर मुंबईतील झोपडपट्टी वस्तीतील पहिल्या मजल्यावर घर विकत घेऊन राहणाऱ्या झोपडीधारकांना शासनाने नियम लागू करुन देण्याची आवश्यकता, स्थानिक लोकप्रतिनिधींनी झोपडीधारकांसाठी गेली अनेक वर्षापासून दिलेला लढा यशस्वी ठरणे, सदर योजनेचा लाभ मुंबईतील सर्व झोपडीधारकांना लागू करण्यासाठी कार्यवाही करण्याची आवश्यकता, याकडे झालेले शासनाने अक्षम्य दुर्लक्ष, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व प्रतिक्रिया. ""

---

## मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

मौजे मालाड येथील जानू भोयेनगर, ऐक्यवर्धक, शिवकोकण,शिवसह्याद्री या चार सह.गृनि.संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेत पहिल्या मजल्यावरील एकूण ९४३ झोपड्यांचा समावेश आहे. सदर पहिल्या मजल्यावर राहणाऱ्या झोपडीधारकांना पुनर्वसन योजनेचा लाभ देण्याबाबतच्या कोणत्याही प्रस्तावास शासनाने मंजुरी दिलेली नाही. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेची व्यवहार्यता विचारात घेता, झोपडीच्या पहिल्या मजल्यावरील कुटुंबाला स्वतंत्र झोपडीधारक समजता येत नसल्याने अशा झोपडीधारकाचे पुनर्वसन करणे शक्य होत नाही.

तथापि, जानू भोयेनगर येथील जुन्या चाळीतील पहिल्या मजल्यावर तसेच पोट माळ्यामध्ये राहणाऱ्या रहिवाश्यांना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेचा लाभ देण्याबाबत लोकप्रतिनिधींकडून सातत्याने मागणी होत होती. तशी निवेदने शासनास प्राप्त झाली आहेत.

झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्रातील दि.०१.०१.१९७६ पूर्वीच्या व सध्या अस्तित्वात असलेल्या जुन्या अधिकृत चाळीतील पहिल्या मजल्यावर राहणाऱ्या रहिवाशांना झोपडपट्टी पुनर्वसन

योजनेंतर्गत पुनर्वसन सदनिकेचा लाभ देण्याबाबतच्या प्रस्तावास दि.१३.०६.२०२३ रोजीच्या पत्रान्वये शासनाची तत्वत: मान्यता असल्याचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई यांना कळविण्यात आली आहे. त्यानुषंगाने सविस्तर प्रस्ताव सादर करण्याबाबत झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांना कळविण्यात आले आहे. सदर प्रस्ताव शासनास प्राप्त झाला असून याबाबत शासनामार्फत पुढील कार्यवाही सुरु आहे. सदरची कार्यवाही पूर्ण झाल्यानंतर जानू भोयेनगर येथील जुन्या चाळीतील पहिल्या मजल्यावर राहणाऱ्या रहिवाश्यांना झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत पुनर्वसन सदनिकांचा लाभ घेता येईल.

********

## महाराष्ट्र विधानसभा

**सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन** **लक्षवेधी सूचना क्र.५३५**

**श्री. सुनिल राणे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.५३५ पुढीलप्रमाणे आहे :-**

""मुंबई उपनगर जिल्हा बोरिवली येथील अनेक सरकारी जमिनीवर झोपडपट्ट्या मोठया प्रमाणावर असणे, सदर झोपडपट्ट्यांवर राबविण्यात येणाऱ्या योजनेअंतर्गत झोपडीधारकांचे पुनर्वसन करणे, त्यामुळे बाधित होणाऱ्या प्रकल्पग्रस्तांची पात्रता आणि योजनेचा मिळणारा लाभ याबाबतची निश्चित करणे, बोरिवली, चारकोप, कांदिवली या ठिकाणी म्हाडाच्या जमिनीवर असलेल्या अनेक सोसायट्यांना देण्यात आलेले भूखंड तसेच दिलेल्या भूखंडावर केलेल्या बांधकामाची स्थिती/लोकसंख्येमुळे सार्वजनिक व्यवस्थेवर होणारा परिणाम त्यातच पिण्याच्या पाण्याची जिर्ण झालेली पाईपलाईन, सांडपाणी वाहिन्यांची झालेली जिर्ण अवस्था, त्याचप्रमाणे कचरा वर्गीकरणाचे सुरु न झालेले प्रकल्प, अरुंद रस्ते अशा कात्रीमध्ये सापडलेल्या नागरीकांना दिलासा देऊन राहण्याजोग्या सुविधांबाबत आराखडा मंजूर करण्याची आवशक्यता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ""

---

## मा.मंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

मुंबई उपनगर, जिल्हा बोरीवली अंतर्गत महानगरपालिकेचे पी/दक्षिण, पी/उत्तर आर/उत्तर आर/दक्षिण व आर/मध्य हे प्रभाग येतात. सदर प्रभागातील सरकारी जमिनीवर (शासनाच्या महानगरपालिकेच्या व म्हाडा प्राधिकरणाच्या मालकीच्या) एकूण २७७ झोपडपट्टी पुनर्वसन प्रकल्प राबविण्यात येत आहेत. सदर प्रकल्पांमध्ये एकूण ८३८७२ झोपडीधारकांच्या सदनिका बांधावयाच्या आहेत, त्यापैकी २१२७१ सदनिकांना भोगवटा प्रमाणपत्र देऊन त्यामध्ये झोपडीधारकांना पुनर्वसित करण्यात आले आहे व उर्वरीत सदनिकांचे काम सुरु आहे.

बोरीवली येथील म्हाडाच्या जमिनीवर सद्य:स्थितीत देवीपाडा साईनगर एस.आर.ए. सह.गृह.संस्था व परिवर्तन एस.आर.ए. सह.गृह.संस्थेचे परिशिष्ट-२ बनविण्याची कार्यवाही सुरु असून प्रारुप परिशिष्ट-२ प्रसिध्द करण्यात आलेले आहे. लवकरच देवीपाडा साईनगर एस.आर.ए. सह.गृह.संस्थेचे परिशिष्ट-२ निर्गमित करण्यात येईल. परिवर्तन एस.आर.ए. सह.गृह.संस्थेची झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडून सुनावणी सुरु असल्यामुळे परिशिष्ट-२ ची कार्यवाही तूर्त

प्रलंबित आहे. याव्यतिरिक्त बोरीवली येथील इतर ४० एस.आर.ए. सहकारी गृहनिर्माण संस्थांची परिशिष्ट-२ ची कार्यवाही म्हाडामार्फत पूर्ण करुन निर्गमित करण्यात आली आहे.

झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत पुनर्विकास करण्याबाबतचा प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे प्राप्त होताच सदर प्रस्तावाची छाननी होऊन स्वीकृत झाल्यानंतर प्रस्तावातील झोपडीधारकांची पात्रता ठरविण्यासाठी सक्षम प्राधिकारी, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाकडे सदर प्रस्ताव पाठविण्यात येतात. सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने झोपडीधारकांचे सर्वेक्षण करुन पुराव्यांच्या आधारे शासन निर्णय दि.१६.०५.२०१५ व दि.१६.०५.२०१८ अन्वये झोपडीधारकांची पात्रता निश्चित करुन परिशिष्ट-२ निर्गमित करण्यात येते.

झोपडपट्टीधारकांची पात्रता/अपात्रता निश्चित करुन परिशिष्ट २ कालबद्धरित्या पुर्ण होण्याच्या दृष्टीने शासनाने दि. १२.०८.२०२१ रोजीच्या निर्णयान्वये मुख्य कार्यकारी अधिकारी (झोपुप्रा) यांच्या अंकित सक्षम प्राधिकारी कक्ष स्थापन करून १० सक्षम प्राधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (झोपुप्रा) यांची नियुक्ती केली आहे. तसेच झोपडीधारकांचे बायोमेट्रिक सर्वेक्षण लवकरात लवकर होण्याच्या दृष्टीने निवेदेद्वारे नव्याने ०४ संस्थांची नेमणूक केली आहे. याव्यतीरीक्त झोपडीधारकांची पात्रता जलद गतीने निश्चित करण्याकरीता व कामामध्ये पारदर्शकता आणण्याकरीता स्वयंचलित परिशिष्ट २ प्रणाली (Auto Annexure-II) लवकरच सुरु करण्यात येणार आहे.

आर/मध्य विभागामध्ये विकास नियोजन आराखड्यामधील एफ.पी.३८२, टी.पी.एस.३, बोरिवली (पश्चिम) हा भूखंड घनकचरा व्यवस्थापनाशी निगडीत सुविधेसाठी आरक्षित असून सदर ठिकाणी कचरा वर्गीकरणाचा प्रकल्प सन २०१८ पासून कार्यान्वीत आहे.

बोरीवली, चारकोप, कांदीवली या ठिकाणी म्हाडाच्या जमिनीवर असलेल्या वसाहतीमधील अस्तित्वात असलेल्या जुन्या जीर्ण झालेल्या जलवाहिन्या वेळोवेळी बदलण्यात येतात. वाढीव लोकसंख्या व पाण्याच्या गरजेनुसार योग्य त्या व्यासाच्या जलवाहिन्यां बदलण्यात येतील.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या मलनि:सारण प्रचालन विभागाकडून म्हाडाने विकसित केलेल्या परिसरातील महानगरपालिकेच्या रस्त्यांवर टाकण्यात आलेल्या मलनि:सारण वाहिन्यांचे परिरक्षण विविध संयंत्राद्वारे जसे की पॉवर रॉडिंग मशीन, जेटिंग मशीन, ऍब मशीन इ.द्वारे नियमितपणे केले जाते.

पश्चिम उपनगरातील बोरीवली, चारकोप कांदिवली या ठिकाणावरील म्हाडाने विकसित केलेल्या परिसरातील अस्तित्वात असलेल्या मलनि:सारण मलवाहिन्या येथील लोकसंख्येची वाढ व परिसरातील इमारतींचा होणारा विकास लक्षात घेऊन आवश्यकतेनुसार मलनि:सारण प्रकल्प महानगरपालिकेमार्फत वृध्दिंगत करण्यात येतात. त्यानुसार चारकोप (काडसिध्देश्वर मार्गावरील चारकोप पम्पिंग स्टेशन ते आरडीपी ०५ च्या जंक्शनपर्यंत व गोराई (बाबासाहेब आंबेडकर रोड ते गोराई पम्पिंग स्टेशन) येथील म्हाडाने विकसित केलेल्या परिसरातील महानगरपालिकेच्या रस्त्यांवर १२०० मिमी व्यासाच्या मलवाहिन्या टाकून जुन्या अस्तित्वात असलेल्या कमी क्षमतेच्या मलवाहिन्या वृद्धिंगत करण्यात आल्या आहेत. तसेच गोराई दोन विभागामध्ये आरएससी-३७ मार्गावर मंगलमूर्ती हॉस्पिटल ते ग्लोबल पिल्लई इन्स्टिटयूटपर्यंत अतिरिक्त नवीन ६०० मिमी व्यासाची मलनि:सारण वाहिनी टाकण्याचे काम हाती घेण्यात आले आहे.

पश्चिम उपनगरातील बोरीवली, चारकोप कांदिवली या ठिकाणावरील व इतरही म्हाडा अभिन्यासांमध्ये टाकण्यात येणा-या / परिवर्धित करण्यात येणाऱ्या मलनि:सारण वाहिनींचा अभ्यास, विश्लेषण, योजना, आराखडा, अंदाजपत्र व निविदा तयार करण्यासाठी सल्लागारांची नेमणूक करण्याची प्रकिया महानगरपालिकेच्या मलनि:सारण प्रकल्प खात्याकडून सुरु असून ती अंतिम टप्प्यात आहे. सदर कंत्राटामध्ये ९ म्हाडा अभिन्यास अंर्तभूत करण्यात आलेले आहेत. त्यांचे एकूण क्षेत्रफळ अंदाजे २७२ हेक्टर इतके आहे.

मुंबई महानगरपालिकेमार्फत कांदिवली (आर/दक्षिण प्रभाग)येथील १० रस्त्यांचे सुधारणा करण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे व बोरिवली (आर/मध्य प्रभाग) येथील २३ रस्त्यांचे सुधारणा करण्याचे काम पूर्ण करण्यात आले आहे.

तसेच, कांदिवली (आर/दक्षिण प्रभाग) येथील ६ रस्त्यांचे सुधारणा करण्याचे काम हाती आहे. तसेच, बोरिवली (आर/मध्य प्रभाग) येथील ५ रस्त्यांचे काम प्रगती पथावर आहे.

********

# महाराष्ट्र विधानसभा

**सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन** **लक्षवेधी सूचना क्र.५५८**

**श्री.कैलास गोरंट्याल, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.५५८ पुढीलप्रमाणे आहे :-**

"ओशिवरा, अंधेरी (पश्चिम), मुंबई येथील सी.टी.एस.नं. २६ पै,, ३४ पै., ३६ पै., ३७पै., ३८ पै., ३९पै., ४०पै., ४२ पै. व ४३ पै. येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत मे. लष्करिया कन्स्ट्रक्शन प्रा. लि. या कंपनीने वाढील चटईक्षेत्राचा घोटाळा केला असल्याची बाब माहे, जुलै २०२३ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास येणे, मे. लष्करिया कन्स्ट्रक्शन प्रा. लि. या कंपनीने उक्त ठिकाणचे वाढीव चटईक्षेत्र आपल्या सहभागीदाराच्या मे. हौसिंग डेव्हलपमेंट अॅण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि. (एच.डी.आय.एल.) या कंपनीच्या बांद्रा येथील पथ्थरनगर को. ऑप. हौसिंग सोसायटीच्या झोपडपट्टी पुनर्वसन वापराकरिता विकलेला असणे, मे. हौसिंग डेव्हलपमेंट अॅण्ड इन्फ्रास्ट्रक्चर लि. (एच.डी.आय.एल.) या कंपनीने या वाढीव चटईक्षेत्राचा वापर आपल्या बांद्रा येथिल पथ्थरनगर को. ऑप. हौसिंग सोसायटीच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेकरीता केलेला असणे, वाढीव चटईक्षेत्र एकदा एका ठिकाणी वापरल्यानंतर तो अन्यत्र वापरता येत नसताना मे. लष्करिया कन्स्ट्रक्शन प्रा.लि. या कंपनीने तोच वाढीव चटईक्षेत्र पुन्हा ओशिवरा येथील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेकरीता वापरलेला असणे, या सर्व प्रकरामध्ये मे. लष्करिया कन्स्ट्रक्शन प्रा. लि. या कंपनीने अनेक अनियमीतता केली असून या सर्व अनियमितेमध्ये झोपडपट्टी पुनर्वसन विभागातील अधिकारी व कर्मचारी गुंतलेले असून त्यामध्ये मोठया प्रमाणात आर्थिक देवाण- घेवाण झालेली असणे, मे. लष्करिया कन्स्ट्रक्शन प्रा. लि. या कंपनीने उपरोक्त ठिकाणी बांधलेल्या इमारती या मुळ नकाशाप्रमाणे न बांधता त्यामध्ये अनधिकृत बांधकामे केलेली असणे, ही अनधिकृत बांधकामे तोडण्याऐवजी महानगरपालीकेच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांसोबत आर्थिक व्यवहार करुन विविध ना हरकत प्रमाणपत्र मिळविलेली असणे, मूळ नकाशाप्रमाणे बांधकाम न केल्यामुळे स्थानिक नागरिकांना अनेक अडचणीना समोरे जावे लागत असल्याने त्यांच्यात पसरलेला तीव्र स्वरुपाचा असंतोष व संतापाची भावना, परिणामी मे. लष्करिया कन्स्ट्रक्शन प्रा. लि. या कंपनीने त्यांच्या अन्यत्र सुरु असलेल्या प्रकल्पामध्ये कोणत्याही प्रकारची अनियमितता करु नये याकरीता त्यांच्याकडील सर्व प्रकल्प काढून घेऊन अन्य विकासकाला हे प्रकल्प देण्याबाबत तसेच या मे. लष्करिया कंस्ट्रक्शन प्रा.लि. या कंपनी या विकासकाने वाढीव चटईक्षेत्रामध्ये केलेल्या अफरातफरीची मा. उच्च न्यायालयच्या सेवानिवृत न्यायाधिशामार्फत चौकशी ककरुन नियमानुसार दंड आकारणी करण्याबाबत आणि झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण आणि बृहन्मुंबई महानगरपालिकेतील ज्या ज्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मे.लष्करीया कन्स्ट्रक्शन प्रा.लि.या कंपनी या

222

## महाराष्ट्र विधानसभा

**सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन** **लक्षवेधी सूचना क्रमांक** १३६२

**श्री. संतोष बांगर, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे:-**

“”मौजे गुंदवली, नगरभूक्रमांक क्र. ८३ (१ ते १७२) ८२ प्रकाशवाडी, सिनेमॅक्स समोर, अंधेरी-कुर्ला रोड, अंधेरी (पूर्व) या भूखंडावर वरील सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) तर्फे विकासकाने सन २०१० साली येथील भूखंडावरील ४५० झोपडया आणि माफीकामा इमारत विकासकाकडून निष्कासित करण्यात येणे, तत्कालीन उपजिल्हाधिकारी अंधेरी यांनीही २०७ झोपडीधारकांची व गाळेधारकांची नाव असलेले मुळ परिशिष्ट-२ पारित केलेले असणे, तद्नंतर सदर विकासकाकडून १५ मजली ए,बी,सी, अशा ३ विंग मध्ये इमारत तयार केलेली असून, अद्यापी इमारतीचे काम अपूर्णावस्थेत असणे, या ३ विंगमध्ये एकूण ५३ सदनिका पी.ए.पी. प्रकल्पबाधित व्यक्तीसाठी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणासाठी राखवून ठेवलेला असणे, गृहनिर्माण विभाग, मंत्रालय, शासन निर्णय दि. १४ जुलै, २०२१ मधील परिच्छेद -३ अनुसार सक्षम अधिकारी हे मुख्य कार्यकारी अधिकारी, झोपुप्रा, मुंबई यांच्या प्रत्यक्ष नियंत्रणाखाली राहतील, असे नमूद केलेले आहे. त्यानुसार उपजिल्हाधिकारी या सक्षम प्राधिकरण-४, झोपूप्रा या पदावर कार्यरत असणे, त्यांनी जाणीवपूर्वक तसेच अधिकारांचा दुरुपयोग करुन प्रकाशवाडीतील कामाबाग सहकारी गृहनिर्माण संस्थाच्या मूळ परिशिष्ट- २ मधून मूळ मालकांची नावे बदलून त्याऐवजी अन्य बाहेरच्या अपात्र व्यक्तीची नावे सभाविष्ट करुन २० जणांची पुरवणीपात्रता ठरविण्यात येणे, तसेच सदरहू कोष्टकातील मूळ परिशिष्ट मधून नावे बदलून दुसऱ्या व्यक्तींच्या नावे परिशिष्ट-२ नुसार पुरविणीपात्रता ठरविण्याचे तसेच फोटोपास पत्रिका करुन बोगस व्यक्तीचे फोटोपास बनवणे यादी केलेले गैरप्रकार, त्यासाठी अपात्र झोपडीधारकांची पात्रता ठरविण्यासाठी व परिशष्ट-२ मध्ये नावे समाविष्ट करण्यासाठी गरजूसमवेत निश्चित दरपत्रक ठरवून त्याद्वारे ३ वर्षामध्ये अवैध मार्गाने गोळा केलेली कोट्यावधी रुपयांची संपत्ती व भ्रष्टाचार, परिणामतः अधिकाराचा दुरुपयोग आणि केलेल्या गैरकारभारामुळे अन्याय झालेल्या मूळ स्थानिक पात्र झोपडीधारकांनी सक्षम प्राधिकरण-४ या प्राधिकरणाकडे मागील ४ वर्षापासून सातत्याने पत्र व्यवहार, पाठपुरावाद्वारे तक्रारी केलेल्याअसणे, प्रत्यक्ष भेटी घेवून आपली कैफियत मांडलेली असणे, सक्षम प्राधिकरण-४ व अन्य संबंधीत अधिकाऱ्यासमवेत अनेक वेळा बैठकीही संपन्न झालेल्या असून बैठकीत चर्चा झाल्यानंतर त्यांना आश्वासनेही देण्यात आलेली असणे, मुळ पात्र झोपडीधारका आजही बेदखल झाल्यामुळे मुख्य प्रवर्तक प्रकाशवाडीतील सहकारी गृहनिर्माण संस्था (नियोजित) यांनी, दिनांक ३१ ऑक्टोबर, २०२२, दि. २४ फेब्रूवारी,२०२२ व दि. २३ जानेवारी, २०२३ रोजी जिल्हाधिकारी, मुंबई उपनगरजिल्हा, मा. प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग, मुख्य कार्यकारी झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण, मुंबई, विभागीय आयुक्त, कोकण विभाग, अप्पर जिल्हाधिकारी (अति/निष्का) जिल्हाधिकारी कार्यालय, मुंबई उपनगर आदीकडे



रोटा/एच-१०८३[ ३५०-८-२०२३]-१

सविस्तररीत्या तक्रारवजा निवेदन सादर करणे, (जिल्हाधिकारी) सक्षम प्राधिकरण-४ यांची खातेनिहाय चौकशी होऊन कायदेशीर कारवाई करण्याची बोगस फोटोपासधारकांची पात्रता रद्द व्हावी आणि सर्व संबंधीत अधिकारी व कर्मचाऱ्यावर फसवणूकीचा गुन्हा दाखल करावा म्हणून केलेली मागणी, मात्र आजमितीस कोणतीही कारवाई न होणे व गुन्हेगारांना पाठीशी घालण्याचा तसेच संरक्षण देण्याचा होत असलेला प्रकार, या संपूर्ण प्रकरणासंदर्भात विनाविलंब उच्च स्तरीय चौकशी होऊन दोषींविरोधात कायदेशीर कारवाई करण्याची आवश्यकता, याप्रकरणी शासनाने केलेली कार्यवाही व शासनाची प्रतिक्रीया.""

---

## मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

मौजे गुंदवली, अंधेरी (पूर्व), न.भू.क्र. २६९ २६६१ ते १७२ येथील प्रकाशवाडी एस. आर. ए. गृहनिर्माण संस्थेसाठी झोपडपट्टी योजनेचा प्रस्ताव विकासक मेसर्स ओमकार रिॲल्टर्स ॲण्ड डेव्हलपर्स प्रा. लि. यांच्यावतीने वास्तुविशारद मेसर्स रविराज डिजाईन स्टुडिओ प्रा. लि. यांनी प्राधिकरणाकडे सादर केला होता. नगर भूमापन क्रमांक ८३ (१ ते १७२ ) ८२ असे नसून, मौजे गुंदवली, ता. अंधेरी येथील न.भू.क्र. २६६, २६६/१ ते १७२ असे आहेत. सदरचा प्रस्ताव दि. १४/०७/२००८ रोजी स्विकृत करण्यात आला आहे. सदर योजनेमधे एक संयुक्त इमारत (Composite Building) असून त्यामधे पुनर्वसन विंग A, B, C व विक्री घटक विंग आहे. पुनर्वसन विंग A, B व C चे १५ मजल्यापर्यंतचे बांधकाम पूर्ण झाले असून त्यास भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. तसेच विक्री घटक विंगचे १२ मजल्यापर्यंतचे बांधकाम पूर्ण झालेले असून त्यास भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आले आहे.

सदरच्या योजनेत एकूण ३४४ पात्र सभासद, ०५ बालवाडी, ४ वेल्फेअर सेंटर, ३ सोसायटी ऑफिस, २ अमेनिटी व ६० राखीव पीएपी असे एकूण ४१८ झोपडीधारकांचा समावेश असून, ३४४ पात्र सभासदांना सदनिकांचा ताबा देण्यात आला आहे. ६० राखीव पीएपी सदनिकांमध्ये ०५ अनिवासी + ०१ संयुक्त सदनिका आहे. उर्वरित ५४ पी.ए.पी. सदनिकांपैकी एकूण ३५ सदनिका वाटपाबाबतचा प्रस्ताव विकासकामार्फत प्राप्त झाला असून, त्यानुसार ३५ निवासी सदनिका दि.१५/०४/२०२३ रोजी वाटप करण्यात आल्या आहेत. वाटपास शिल्लक असलेल्या पी.ए.पी सदनिकांमध्ये १३ झोपडीधारकांचे अनधिकृत वास्तव्य निर्दशनास आलेले आहे. या अनधिकृत वास्तव्य असलेल्या झोपडीधारकांच्या निष्कासनाबाबत तहसीलदार- १ (विशेष कक्ष), झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण यांनी दि. २१/०२/२०२३ रोजी महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु. नि. व पु.) अधिनियम, १९७१ चे कलम ३३ नुसार सदनिका रिक्त करणेबाबत आदेश निर्गमित केले आहेत.

गृहनिर्माण विभागाचा शासन निर्णय दि. १६/०५/२०१५ व शासन निर्णय दि. १६/०५/२०१८ अन्वये ज्या झोपडीधारकांनी प्रकरणपरत्वे जोडपत्र ३/४ प्रमाणे सादर केलेल्या पुराव्यांची पडताळणी केल्यानंतर झोपडीधारकांची पात्रता निश्चित करुन, पुरवणी परिशिष्ट-२ वेळोवेळी निर्गमित करण्यात आले आहे. मूळ व पुरवणी परिशिष्टात अपात्र ठरल्यामुळे व्यथित झालेल्या झोपडीधारकांना महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु. नि. व पु.) अधिनियम १९७१ चे कलम ३५ अन्वये, अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा अपिलीय प्राधिकारी, पश्चिम उपनगरे यांचेकडे विहीत मुदतीत अपिल करण्याची तरतूद आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अहवालानुसार १० अपात्र झोपडीधारकांपैकी ०७ झोपडीधारकांनी अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) पश्चिम उपनगरे, मुंबई यांचेकडे अपिल दाखल केलेले असून, सद्यस्थितीत ते सुनावणीसाठी प्रलंबित आहेत. झोपडीधारकांची पात्रता निश्चित करणे हे सक्षम प्राधिकारी यांचे अर्धन्यायिक स्वरुपाचे अधिकार आहेत. याविरुध्द आक्षेप/तक्रार असल्यास झोपडीधारक संबंधीत अपर जिल्हाधिकारी (अति/निष्का) तथा अपिलीय प्राधिकारी यांचेकडे महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु. नि. व पु.) अधिनियम १९७१ चे कलम ३५ अन्वये अपिल दाखल करु शकतात. तद्नंतर तक्रार निवारण समिती व मा. उच्च न्यायालयात अपिल दाखल करण्याची तरतूद आहे.

श्री. लादे यांनी प्रकाशवाडी सहकारी गृहनिर्माण संस्थेमधील झोपडीधारकांचे बोगस सर्वेक्षण करण्यात येवून परिशिष्ट-२ निर्गमित केल्याची सक्षम प्राधिकारी-४ यांच्याविरुध्द तक्रार केली आहे. सदरच्या तक्रारीच्या अनुषंगाने माहिती व तंत्रज्ञान, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण या विभागाकडून उक्त झोपडीधारकांच्या परिशिष्ट-२ ची तपासणी केली असता, ३ झोपडीधारकांची पात्रता सक्षम प्राधिकारी-४ यांनी निश्चित केली असून, त्यापैकी २ झोपडीधारकांना झोपडी गणना २००० सर्वेक्षण पावतीच्या आधारे पात्र केले आहे व एका झोपडीधारकास अन्य पुराव्यांच्या आधारे पात्र केले आहे. सदरची पात्रता प्रचलीत नियमानुसार केली असल्याचे झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने कळविलेले आहे.

*****************

## महाराष्ट्र विधानसभा

**सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन** **लक्षवेधी सूचना क्र.१५८०**

**श्री.मोहन मते, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१५८० पुढीलप्रमाणे आहे :-**

""विक्रोळी (पश्चिम) स्टेशन रोडवरील सिद्धिविनायक एसआरए इमारतीला संरक्षक जाळ्या (ग्रील) नसल्याने आठव्या मजल्यावरील घराच्या खिडकीतून पडून एका साडेतीन ते चार वर्षांच्या मुलाचा मृत्यू झाला असल्याची बाब दिनांक ५जुलै, २०२३ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास येणे, सदरहू २३ मजली इमारतीत २५० घरे असून दोन वर्षांपूर्वी विकासकाने रहिवाशांना घरांचा ताबा दिलेला असणे, या इमारतींमधील अनेक मोकळे भाग, गॅलरी, रहिवाशांनी आपत्कालीन एकत्र येण्यासाठी असलेला रेफ्युज एरिया, तसेच घरांमधील खिडक्यांनादेखील सुरक्षेसाठी लोखंडी जाळ्या बसवण्यात आल्या नसणे, त्यामुळे या इमारतीतील रहिवाशी, लहान मुले यांच्या जीवितास निर्माण झालेला धोका, याबाबत विकासकासह बृहन्मुंबई महानगरपालिका, तसेच झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या अधिकाऱ्यांचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, सदरहू इमारतीत दिनांक ४ जानेवारी, २०२३ रोजी बांधकाम साहित्य वाहून नेणारी लिफ्ट कोसळून एक कामगार ठार झालेला असणे, तरीदेखील सुरक्षेच्या दृष्टीने उपाययोजना हाती घेण्यात विकासकाने केलेले दुर्लक्ष, त्यामुळे स्थानिक रहिवाश्यांत निर्माण झालेली असुरक्षिततेची भावना, यास्तव सदरहू प्रकरणाची सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.""

---

## मा.मंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

विक्रोळी (पश्चिम), मुंबई येथील सिद्धिविनायक सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या झोपडपट्टी पुनर्वसन योजनेंतर्गत पुर्नवसन इमारत तळमजला+२३ मजल्याची असून, सदर इमारतीला दि.०४.०३.२०२२ रोजी भोगवटा प्रमाणपत्र देण्यात आलेले आहे. सदर इमारतीत साडेतीन ते चार वर्षाच्या मुलाचा आठव्या मजल्यावरुन पडून मृत्यू झाल्याची बाब दि. ६ जुलै २०२३ रोजी निदर्शनास आली. त्यानुषंगाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणामधील अधिकाऱ्यांनी सदर इमारतीची स्थळ पाहणी केली. स्थळ पाहणी दरम्यान असे दिसून आले की, मूळ सदनिकाधारक श्री.जसवंतलाल दलसुखदास सोनी यांनी त्यांची सदनिका क्र.८०३/८ ही श्री.दलखतसिंग चौहान यांना भाड्याने दिली असल्याचे स्थानिक रहिवाश्यांनी सांगितले. सदर इमारतीमधील रहिवाश्यांकडे अधिकची चौकशी केली असता भाडेकरु श्री.दलखतसिंग चौहान यांचा मुलगा कु.शिवराजसिंग (वय ३ वर्षे) हा गॅस सिलेंडरवर चढून खिडकीतून बाहेर पडल्याचे सांगण्यात आले. सदर घटनेची स्थानिक पोलीसांमार्फत देखील दखल घेण्यात आलेली आहे. शेजाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार सदर पुनर्वसन सदनिकेमध्ये राहणारे श्री.दलखतसिंग चौहान हे मुलाच्या मृत्यूच्या घटनेनंतर त्यांच्या मूळ गावी गेल्याने त्यांच्याशी संपर्क झालेला नाही.

[कृ.मा.प.

विकास नियंत्रण प्रोत्साहन नियमावली-२०३४ च्या कलम ९(४)नुसार इमारतीच्या खिडकीच्या ग्रीलबाबत "no permission shall be required for provision of safety grills to window/ventilator" असे नमूद केले आहे. तसेच अग्निप्रतिबंधक कायद्याप्रमाणे भोगवटा प्रमाणपत्र देण्यापूर्वी रेफ्युजी एरियामध्ये संरक्षक जाळी बसविणे, हे सदनिकाधारकांच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने अनुज्ञेय नाही. तसेच सदनिकेमधील खिडक्यांना संरक्षक ग्रील बसविण्याकरिता घरमालकाने/विकासकाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाची कोणतीही परवानगी घेणे बंधनकारक नाही. तरी देखील भविष्यात अशा प्रकारच्या घटना घडू नयेत याकरिता, झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या दि.०७.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये सुरक्षिततेच्या सर्व उपाययोजना करण्याकरीता विकासक यांना कळविण्यात आलेले आहे.

तसेच सदर योजनेत दि.०४.०१.२०२३ रोजी पुनर्वसन घटकाच्या विंग 'इ'व 'एफ' लगतच्या पार्कींग टॉवरचे काम करतेवेळी श्री.शिवकुमार मेवालाल जयस्वाल (वय १९ वर्षे) हा मजूर १७ व्या मजल्यावरील पॅनलवरुन कोसळून मृत्युमुखी पडल्याची घटना घडली. सदर घटनास्थळाची झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणातील अधिकाऱ्यांमार्फत पाहणी करण्यात आली. तसेच सदर अपघाताच्या अनुषंगाने योजनेमधील इमारतीच्या संरक्षणात्मक सुरक्षेच्या दृष्टीकोनातून काळजी घेण्यासाठी स्ट्रक्चरल ऑडिट (Structural Audit) करण्याबाबत विकासकास आदेशीत करण्यात आले आहे. सदर उपाययोजना पूर्ण होईपर्यंत विक्री घटकाच्या बांधकामास दि.०५.०१.२०२३ रोजी स्थगिती आदेश देण्यात आले आहेत. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने आदेशीत केल्याप्रमाणे विकासकाने सुरक्षिततेच्या दृष्टीकोनातून उपाययोजना केली असल्याबाबत संबंधित सिध्दीविनायक (विक्रोळी) सहकारी गृहनिर्माण संस्थेच्या सदस्यांनी स्वाक्षरीसह दि.१८.०७.२०२३ च्या पत्रान्वये प्राधिकरणास कळविले आहे. याबाबत ज्या सदनिकाधारकांना ग्रील बसवून हवी होती, त्यांना विकासकाने ग्रील बसवून दिली असून काही सदनिकाधारकांचा असे ग्रील बसविण्यास विरोध असल्याने, त्यांना ती बसवून देण्यात आलेली नाही, असेही निदर्शनास येते.

**********

# महाराष्ट्र विधानसभा

**सन २०२३ चे पावसाळी अधिवेशन** **लक्षवेधी सूचना क्र.१६२८**

**श्री. शांताराम मोरे, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अन्वये लक्षवेधी सूचना क१६२८ पुढीलप्रमाणे आहे :-**

""मुंबई ही महाराष्ट्राची व देशाची आर्थिक राजधानी असणे, झोपडपट्टी ही मुंबईसाठी फार मोठी समस्या असणे, अन्न, वस्त्र व निवारा या मानवाच्या मुलभुत गरजा असणे, त्यांची उपलब्धता करुन देणे ही लोक कल्याणकारी शासनाची जबाबदारी असणे, झोपडपट्टी निमुर्लनसाठी शासनकडून कायदा केलेला असणे, अनेक धोरणे राबविण्यात येणे, अनेक लोकाभिमुख घोषणा होणे, परंतु त्याची हव्या त्या गतीने अंमलबजावणी होत नसणे, समस्याच्या मुळापर्यंत जाऊन तोडगा काढण्यास विलंब होणे, परिणामी वर्षानुवर्ष प्रकल्प रखडले जाणे, त्यातच झोपडपट्ट्यांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत जाणे, पात्र व संरक्षित झोपडपट्टीचे शक्यतो आहे त्या ठिकाणी पुनर्वसन करण्याचे पुर्वी पासुन धोरण असणे, परंतु त्याच्या अमंलबजावणीत येणाऱ्या अडचणीचे निराकरण न होणे,आज रोजी मुंबईमधील अनेक झोपडपट्ट्यांचे पुर्नवसन प्रकल्प हे मालकी हक्काच्या अनुषंगाने रखडलेले असणे, विशेषत: सरकारी, चिल्ड्रन एड सोसायटी सारख्या सरकार नियंत्रित कल्याणकारी संस्थेच्या जमिनीवरील योजना वर्षानुवर्ष रखडलेल्या असणे, या जमिनीवरील प्रकल्प राबविण्यासाठी झोपडपट्टी पुर्नवसन प्राधिकरणांच्या नियमानुसार या संस्थाकडुन ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त करावे लागणे, सदर संस्थे मार्फत ना-हरकत प्रमाणपत्र न देता उलटपक्षी कोर्टात जाऊन पुर्नवसनासाठी विरोध करण्याची भुमिका घेणे, कायद्यानुसार पात्र झोपडपट्टी धारकांना आहे त्या ठिकाणीच पुर्नवसित करण्याचे धोरण असताना ही आशा प्रकारे ना- हरकत प्रमाणपत्रासाठी सक्ती करण्यात येणे, यामुळे प्रकल्प होण्यास बिलंब होत जाणे, संबंधीत जमिनीचे बाजारमुल्य कीती आहे? कोणता बिल्डर/विकासक प्रकल्प रबवित आहे, तो किती कमवतो यासारख्या गोष्टींचा विचार करण्यात येणे, झोपडपट्टी पुर्नवसन योजना या लोकहितकारी योजना असल्याने यात नफा-नुकसान, फायदा-तोटे या दृष्टीकोनातुन न बघता समाजिक हिताचा विचार करण्यास प्राधान्य असण्याची आवश्यकता असणे, जसे शासकीय, निमशासकीय जमिनीवर प्रकल्प राबवितांना जमिनीच्या रेडीरेकनर नुसार येणाऱ्या किंमतींच्या २५ टक्के रक्कम प्रिमियम म्हणुन घेण्याचे असलेले धोरण आशा शासन नियंत्रित कल्याणकारी संस्था, धर्मदाय संस्था यांच्याबाबत विना विलंब लागु करण्याबाबत अनेक वेळा लोकप्रतिनिधी यांनी शासनाकडे मागणी केलेली असणे, परंतु शासनाकडुन अद्याप निर्णय घेतला जात नसणे, परिणामी झोपडपट्टी पुर्नवसन या लोक कल्याणकारी कार्यासाठी दिरंगाई होऊन मुंबईचा विकास खुंटणे, याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना. ""

## मा. मंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

मुंबईतील सुमारे ३८० झोपडपट्टी पुनर्वसन योजना विविध कारणांमुळे रखडलेल्या आहेत. सदर योजना मार्गी लावण्यासाठी शासनामार्फत प्रयत्न करण्यात येत असून, त्याचाच एक भाग म्हणून निविदा प्रक्रियेने विकासकाची नेमणूक करणे व अभय योजना राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे.

१) **निविदा प्रकियेने विकासकाची नेमणूक करणे** :-

निविदा प्रकियेने विकासकाची निवड करण्यासाठी A, B व C अशी वर्गवारी करुन झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाच्या विकासकांची नामिकासूची तयार करण्यात आली असून त्यास शासन मान्यता देण्यात आलेली आहे. झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दफ्तरी दाखल केलेल्या ५१७ योजना व इतर रखडलेल्या योजनांपैकी अंदाजे ३०० योजना निविदा प्रक्रियेने विकासकाची नेमणूक करुन मार्गी लावण्याचे प्रस्तावित आहे.

२) **अभय योजना राबविणे** :-

ज्या वित्तीय संस्थांनी झोपडपट्टी पुनर्वसन योजनेस अर्थपुरवठा केलेला आहे व ज्यांना रिझर्व्ह बँक अथवा SEBI, NHB यांची मान्यता आहे अशा वित्तीय संस्थांना योजनेचे सहविकासक / ऋणदाता म्हणून योजना राबविण्यास मान्यता देण्यात येईल.

३) **संयुक्त भागीदारी (Joint Venture) तत्वावर योजना राबविणे** :-

मुंबई महानगर प्रदेशातील नवीन/रखडलेल्या झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविताना काही झोपडपट्टी पुनर्वसन योजना या झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण व बृहन्मुंबई महानगरपालिका, ठाणे महानगरपालिका, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, सिडको व म्हाडा यासारखी महामंडळे/प्राधिकरणे/स्थानिक स्वराज्य संस्था यांच्यामार्फत संयुक्त भागीदारी तत्वावर Joint Venture (JV) राबविण्याचे प्रस्तावित आहे.

शासनाच्या किंवा शासनाच्या नियंत्रणाखाली असलेल्या संस्थेच्या मालकीच्या जमिनीवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्याकरिता विकास नियंत्रण व प्रोत्साहन नियमावली, २०३४ च्या विनिमय ३३(१०) नियम २.८ अन्वये जमीन मालक प्राधिकरणाची ना-हरकत प्राप्त करुन घेणे आवश्यक असते. त्यानुषंगाने योजनेस आशयपत्र निर्गमित केल्यानंतर जमीन मालक प्राधिकरणाची ना-हरकत प्राप्त होणेकरिता प्रस्ताव पाठविण्यात येतो. सदर प्रस्ताव पाठविल्यानंतर ६० दिवसांच्या आत ना-हरकत/ हरकत प्राप्त न झाल्यास सदर नियमातील तरतुदीनुसार जमीन मालक

प्राधिकरणाची ना-हरकत असल्याचे ग्राह्य (Deemed NOC) धरण्यात येऊन योजनेस पुढील परवानग्या देण्यात येतात.

मौजे बोर्ला येथील चिल्ड्रन्स एड सोसायटीच्या जागेवरील झोपडपट्टी पुनर्वसन योजनेच्या अनुषंगाने विकास नियंत्रण नियमावलीच्या कलम २.८ अंतर्गत विहित कालमर्यादेत ना-हरकत प्रमाणपत्र प्राप्त न झाल्याने उपरोक्त तरतुदीनुसार मानीव ना-हरकत गृहीत धरुन योजनेस आशयपत्र देण्यात आले होते. तथापि, यासंदर्भात मा. उच्च न्यायालयात दाखल झालेली जनहित याचिका, तत्कालीन मा. उपमुख्यमंत्री यांच्याकडे झालेल्या बैठकीतील निर्देश तसेच मौजे बोर्ला येथील भूखंड चिल्ड्रन्स एड सोसायटी या संस्थेस बालकल्याणाच्या उदात्त कामासाठी दिलेला असल्याने तो भूखंड त्याच उद्देशाकरिता वापरणे आवश्यक असून त्यावर झोपडपट्टी विकास योजनेअंतर्गत कोणताही प्रकल्प राबविण्यात येऊ नये, असे स्पष्ट अभिप्राय महिला व बाल विकास विभागाने दिलेले असल्याने सदर योजनेस झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दिलेले आशयपत्र दिनांक २९.०३.२०२३ रोजी रद्द करण्यात आले आहे.

शासकीय/निमशासकीय, तसेच स्थानिक नागरी स्वराज्य संस्थेच्या जागेवर झोपडपट्टी पुनर्वसन योजना राबविण्यासाठी संबंधित गृहनिर्माण संस्था/विकासकाने आशयपत्र निर्गमित करावयाच्या वर्षाच्या रेडीरेकनर दरानुसार जमिनीच्या मुल्याच्या २५% एवढे जमीन अधिमूल्य भरणे आवश्यक आहे. सदरच्या अधिमुल्याची रक्कम संबंधित जमीन मालक प्राधिकरणास अदा करण्यात येईल, अशी तरतूद DCPR-2034 मध्ये करण्यात आली आहे.

शासन नियंत्रित म्हणजेच धर्मदाय आयुक्तांकडे किंवा सहकारी संस्था अंतर्गत नोंदणीकृत असलेल्या संस्थांच्या त्यांच्या खाजगी जमिनीवर स्वत: अथवा त्यांच्यामार्फत नियुक्त विकासकामार्फत योजना राबविण्याचे प्राथमिक अधिकार हे महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम १३(१) नुसार जमीन मालकांना प्रदान करण्यात आले आहेत. अशा नोंदणीकृत संस्था त्यांच्या खाजगी मालकीच्या जमिनीवर योजना राबवित असल्यास नियम २.८ अन्वये ना-हरकत प्राप्त करणे, तसेच २५% अधिमुल्याची रक्कम भरणा करणे आवश्यक नाही.

परंतु महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम ३(क) अन्वये खाजगी मालकीची झोपडपट्टी व्याप्त जमीन झोपडपट्टी पुनर्वसन क्षेत्र म्हणून घोषीत झाल्यानंतर १२० दिवसांच्या आत जमीन मालकास योजना सादर करण्याची मुभा आहे. सदर १२० दिवसांचा कालावधी पूर्ण झाल्यानंतर झोपडपट्टी संस्थेमार्फत महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम १४(१) अन्वये भूसंपादन प्रस्ताव दाखल करण्याची मुभा आहे. अशा प्रकारे

भूसंपादनाचा प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम १४(१) अन्वये भूसंपादनाची प्रक्रिया करण्यात येते.

संपादित करावयाच्या जमिनीकरिता जमीन मालकांना द्यावयाची नुकसान भरपाईची रक्कम महाराष्ट्र झोपडपट्टी क्षेत्र (सु.नि. व पु.) अधिनियम, १९७१ च्या कलम १७(२) (३) व (४) नुसार निश्चित करण्यात येते. सदर तरतुदीनुसार, जमीन मालकासोबत शासनाने अदा करावयाच्या रकमेबाबत कोणताही करार केला असल्यास त्याप्रमाणे नुकसान भरपाई देण्यात येते किंवा कलम १४ खालील नोटीसीच्या प्रसिध्दी दिनांकापासून मागील ५ वर्षातील, जमीन मालकास भाड्याच्या रकमेद्वारे, प्रत्यक्ष मिळालेल्या निव्वळ सरासरी उत्पन्नाच्या ६० पट इतकी नुकसान भरपाई रक्कम देण्यात येते.

***********

## महाराष्ट्र विधानसभा

**सन २०२३ चे द्वितीय अधिवेशन** **लक्षवेधी सूचना क्र.१६९५**

**श्री.कैलास गोरंट्याल, वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम १०५ अनुसार दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१६९५ पुढीलप्रमाणे आहे :-**

""घाटकोपर येथील रमाबाई आंबेडकर नगरातील म्हाडा संक्रमण इमारती मोडकीस आल्यामुळे तेथील शांतीनगर सहकारी संस्थेला नियम ३३ (१०) खाली पुनर्विकासाची परवानगी देण्यात आलेली असणे, हा पुनर्विकास करतांना संक्रमण शिबीरास एकत्रित पुनर्विकास करावयाचा होता त्यात मुळच्या गाळेधारकांना धरुन एकूण १७७२ गाळे पुर्नविकासात बांधावयाचे होते, म्हाडाची जागा असल्यामुळे बांधकानंतर ४५ टक्के गाळे म्हाडाला ५५ टक्के जागा विकासाने ठेवायची असणे, त्या ५५ टक्के जागांमध्ये पोलीसांचा समावेश करावा असे ठरविण्यात आले असणे, सर्व अटी व शर्ती लागू झाल्यानंतर विकासाने १७७२ पैकी ७२८ घरे बांधून झालेली असून ७९८ घरे विकासाने म्हाडाला दिलेले नसणे, या बाबात SRA कडून विकासकाला लेटर ऑफ इंटेन्ड असतानाही विकासकाच्या मुनोर पनामुळे व राजकीय संबंधामुळे पुढे कोणतीही कारवाई झालेली नसणे, परिणामी विकासकाने घर बदली घर न दिल्यामुळे तेथील नागरिकांमध्ये पसरलेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, म्हाडाला द्यावयाची घरे तातडीने विकासकाकडून प्राप्त करुन घेण्याबाबत तसेच विकासकाला मदत करणाऱ्या म्हाडाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द निलंबनाची कारवाई करण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना.""

---

### मा.मंत्री (गृहनिर्माण) यांचे निवेदन

मौजे घाटकोपर येथील न.भू.क्र.१९४ ए (पैकी) हा म्हाडाच्या मालकीचा भूखंड शांतीनगर पोलीस सहकारी गृहनिर्माण संस्थेस ३० वर्षाच्या भाडेपट्टा कराराने देण्यात आला होता. सदर भूखंडावरील विकास नियंत्रण नियमावली, १९९१ च्या नियम क्र. ३३ (१४) (ड) अंतर्गत पुर्नविकासाचा प्रस्ताव शांतीसागर पोलिस सहकारी गृहनिर्माण संस्थेने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास सादर केला. सदरचा प्रस्ताव झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि.१७.०९.१९९९ रोजी स्वीकृत केला. सदर योजनेसाठी स्वत: शांतीनगर पोलीस सहकारी गृहनिर्माण संस्था विकासक आहे. उपरोक्त भूखंडापैकी काही भाग सागरी किनारा नियमन क्षेत्र-२ ने बाधित असून त्यामध्ये

बागेचे/ बगीच्याचे आरक्षण व ना- विकास क्षेत्र अंतर्भूत आहे. या भूभागावर म्हाडाने बांधलेली सुमारे ३०० संक्रमण शिबीरे अस्तित्वात आहेत.

सदर योजनेस विकास नियंत्रण नियमावलीच्या विनियम ३३ (१४) (ड) अनुसार झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरणातर्फे दिनांक ०१.०३.२००१ रोजी प्रथम आशयपत्र (Letter of Intent ) जारी करण्यात आले. तर योजनेचा अभिन्यास (Layout) झो.पु. प्राधिकरणातर्फे दि.२६.११.२००२ रोजी मंजूर करण्यात आला. तद्नंतर सदर योजनेसाठी सुधारित आशयपत्र दिनांक ३० एप्रिल, २००४ रोजी जारी करण्यात आले. भूखंडाचे एकूण क्षेत्रफळ ५४६३२.६१ चौ.मी. इतके गृहित धरण्यात आले.

सदर योजना वर्धनक्षम होण्याच्या दृष्टीकोनातून योजनेचे रुपांतर विकास नियंत्रण नियमावली विनियम क्र.३३(१४)(ड) मधून विनियम क्र.३३(१०) मध्ये करण्याकरीता योजनेच्या वास्तुविशारदाने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास निवेदन सादर केले. गृहनिर्माण विभागाने दि.२९.११.२००४ रोजी सदर योजनेचे रुपांतरण नियम क्र.३३(१०) मध्ये करण्यास तत्वत: मान्यता दिली.

योजनेत एकुण १० इमारतींचे बांधकाम २००५-२००६ पूर्वी झाले असून या १० इमारतींमध्ये ६६० लोक राहत आहेत. यापेकी विंग 'ए' मधील ५७ सदनिकांना दि.०९.०६.२००५ रोजी अंशतः भोगवटा प्रमाणपत्र दिल्याचे दिसून येते. उर्वरित ११ प्रस्तावित इमारतीचे बांधकाम बाकी आहे. यांमध्ये १९१२ सदनिका बांधणार असून त्यापैकी ३१५ सदनिका पोलिसांसाठी व ७९७ सदनिका म्हाडा प्राधिकरणास हस्तांतरीत करावयाच्या आहेत.

मुख्य कार्यकारी अधिकारी (झोपुप्रा) यांनी उप मुख्य अभियंता (झोपुप्रा) यांचे दि.२२.०१.२०१० रोजीचे पत्र रदद् केले असून दि.२७.०८.२०१४ रोजीच्या आदेशान्वये सदर झो.पु. योजनेचे दि.०९.०२.२००९ रोजीचे आशयपत्र पुनर्जिवीत केले आहे. सदर आशयपत्रामध्ये विकासक म्हणून शांतीसागर पोलिस सह. गृह. संस्था व त्यांनी नियुक्त केलेले विकासक मे. चौहान बिल्डर्स इंडीया हो. प्रा. लि. असा उल्लेख आढळून येतो.

तद्नंतर शांतीसागर पोलिस सह. गृह. संस्था व त्यांनी नियुक्त केलेले विकासक मे. चौहान बिल्डर्स इंडीया हौ. प्रा. लि. यांनी नोंदणीकृत हमीपत्र म्हाडा प्राधिकरणात सादर केले असून त्याद्वारे त्यांनी म्हाडा प्राधिकरणासाठी बांधावयाच्या ४५% सदनिकेचे बांधकाम प्रथम प्राधान्याने करण्याबाबत हमीपत्र दिले आहे. सदरचे नोंदणीकृत हमीपत्र व सुधारित अभिन्यास म्हाडा

कार्यालयाने दि. ०९.०९.२०१५ रोजीच्या पत्रान्वये झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणास सादर केला आहे. तसेच योजनेचे काही क्षेत्र सागरी किनारा नियमन क्षेत्राने बाधीत होत असून सदर झो.पु. योजनेला MoEF ची परवानगी अद्यापपर्यंत प्राप्त केली नसल्याने तसेच काही भागाला न.भू.क्र. नसल्याने झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरणाने दि.०१.०९.२०१६ रोजीचे पत्रान्वये खालील मुद्द्यांची पूर्तता करणेबाबत संस्थेस कळविले आहे:-

1) Demarcation of plot boundary from CTSO.

2) NOC / Remarks from MCZMA.

3) Demarcation Plan / HTL, CRZ- II from Authorized Agency.

4) NOC/ Remarks from Civil Aviation Authority

5) Layout Approval.

6) Compliance of Condition No. 52,63,64,65,66 of LOI dated 09/02/2009.

संस्थेकडून/विकासकाकडून वरील बाबींची पुर्तता आजतागायत न झाल्याने झो.पु. प्राधिकरणामार्फत पुढील कार्यवाही करणे शक्य झालेले नाही.

सदर प्रकल्प मार्गी लावण्याबाबत मा. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण यांचे अध्यक्षतेखाली दि. १७.०४.२०२३ रोजी बैठक संपन्न झाली. सदर योजनेचे काम जलदगतीने पुढे नेण्यासाठी एक समिती स्थापन करण्याचे निर्देश देण्यात आले. सदरहू निर्देशांनुसार सचिव (झोपुप्रा), कार्यकारी अभियंता - एन विभाग (झोपुप्रा), सहा. निबंधक, सहकारी संस्था (झोपुप्रा), कार्यकारी अभियंता (म्हाडा) आणि DDTPM (CRZ) यांचा समावेश असणारी समिती गठीत करण्यात आली आहे. सदर समितीची बैठक सचिव (झोपुप्रा) यांचे अध्यक्षतेखाली दि.२६.०५.२०२३ रोजी संपन्न झाली. सदर बैठकीत ठरल्याप्रमाणे प्रकरणी पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

उपरोक्त सर्व बाबींचा विचार करता व सदरील योजनेमध्ये विकासक ही शांतीसागर पोलिस सह.गृह. संस्था व सदर संस्थेने नियुक्त केलेले विकासक मे. चौहान बिल्डर्स इंडीया हौ. प्रा. लि. असल्याने तसेच सदर योजना राबविण्यासाठी आवश्यक कागदपत्रांची पुर्तता न केल्याने आणि म्हाडाला दयावयाची घरे सदर संस्थेने न बांधल्याने त्याचप्रमाणे इतर आवश्यक परवानग्या न प्राप्त केल्याने सदर प्रकल्प रखडलेला आहे, ही वस्तुस्थिती आहे.

*****

२२७

**लक्षवेधी सुचना क्र.४२०**

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३चे द्वितीय(पावसाळी) अधिवेशन

श्री. कैलास घाडगे पाटील, श्री. विजय वडेट्टीवार, श्री. सुनिल केदार, श्री, अस्लम शेख, श्री. अमिन पटेल, श्री. सुभाष धोटे, श्री. विकास ठाकरे, श्री. राजु पारवे, श्री. सुनिल प्रभू, श्री. विनोद अग्रवाल, मा. वि.स.स. यांनी महाराष्ट्र विधानसभा नियम-१०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे :-

"इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या अंतर्गत इतर मागास प्रवर्ग, भटके विमुक्त आणि विशेष मागास प्रवर्गाच्या विदयार्थ्यांसाठी ७२ वसतिगृहे व २१६०० विद्यार्थ्यांसाठी स्वाधार योजना अद्याप लागू करण्यात आलेली नसणे, दहावी, बारावीचे निकाल घोषित होऊन जवळपास एक महिना उलटूनही अद्याप इतर मागास बहुजन कल्याण विभागाअंतर्गत इतर मागास प्रवर्ग, भटके विमुक्त आणि विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांना स्वाधार योजनेपासून वंचित राहण्याची आलेली वेळ, त्याचबरोबर उच्च शिक्षणाकरिता शहराच्या ठिकाणी आलेल्या विद्यार्थ्यांना शहरात वास्तव्याची सोय नसल्याने त्यांना अनेक अडचणींना सामोरे जावे लागणे, ग्रामीण इतर मागास प्रवर्गातील विद्यार्थ्यांना वसतिगृहे व अनुसूचित जातीच्या धर्तीवर स्वाधार योजना लागू व्हावी म्हणून अनेक इतर मागास, भटक्या विमुक्तांच्या संघटनांनी आंदोलने करुन व निवेदने देऊन शासनाकडे केलेली मागणी, इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्गातील १०० मुले व १०० मुली या मर्यादेत प्रति जिल्हा २०० याप्रमाणे ३६ जिल्हयांसाठी एकूण जिल्हानिहाय दोन याप्रमाणे ७२ वसतिगृहे कार्यान्वित करण्यास दिनांक २८ फेब्रुवारी, २०२३ च्या शासन निर्णयान्वये मान्यता तसेच जिल्हानिहाय वसतिगृहे सुरु करण्याबाबत मार्गदर्शन सूचना व नियमावली निश्चित करण्यासंबंधीचे दिनांक १३ मार्च, २०२३ रोजीच्या शासन परिपत्रकांनूसार सूचना देण्यात येणे, तसेच यांसदर्भात मागील सन २०२० च्या नागपूर हिवाळी अधिवेशनात मा.उपमुख्यमंत्री तथा वित्त मंत्री यांनी विद्यार्थ्यांना स्वाधार योजना लागू करण्यात येईल याबाबत केलेली घोषणा, याकडे शासनाचे जाणीवपूर्वक होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, परिणामी इतर मागास बहुजन कल्याण विभागाअंतर्गत इतर मागास प्रवर्ग, भटके विमुक्त आणि विशेष मागास प्रवर्गाच्या विद्यार्थी उच्च शिक्षणापासून वंचित राहणे, याबाबत शासनाने गांभीर्याने लक्ष घालून विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाचा लाभ घेता यावा, याकरिता शासनाच्या विचाराधीन प्रस्तावावर तात्काळ निर्णय घेऊन शासन स्तरावर तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

---

### मा. मंत्री, इतर मागास बहुजन कल्याण यांनी करावयाचे निवेदन:-

राज्यातील इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील मॅट्रीकोत्तर व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी १०० विद्यार्थी क्षमतेचे मुलांसाठी १ व मुलींसाठी १ या प्रमाणे ३६ जिल्हयाच्या ठिकाणी ७२ शासकीय वसतिगृहे मुंबई सार्वजनिक विश्वस्त कायदा, १९५० व संस्था नोंदणी कायदा, १८६० अंतर्गत नोंदणीकृत विविध स्वयंसेवी संस्था (NGO) मार्फत सुरु करण्याबाबत दि.२९.११.२०२२ च्या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात आली होती.

तथापि, लोकप्रतिनिधी व विविध स्तरावरुन होत असलेल्या मागणीनुसार सदर वसतिगृहासाठी शासनाने स्वत: इमारत भाडयाने घेवून जिल्हानिहाय वसतीगृहे कार्यान्वित करण्याचा शासन निर्णय दि.२८.०२.२०२३ अन्वये घेण्यात आला आहे.

सदर वसतीगृहे सुरु करण्याच्या अनुषंगाने शासकीय वसतीगृहासाठी भाडेतत्वावर खाजगी इमारती भाडयाने घेणेबाबत जाहिरात प्रसिद्ध करणेबाबत सहाय्यक संचालक(जाहिरात), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई यांच्यामार्फत वर्तमानपत्रात जाहिरात माहे एप्रिल, २०२३ मध्ये प्रसिद्ध करण्यात आली होती. सदर जाहिरातीत जिल्हयाच्या ठिकाणी वसतीगृहासाठी भाडयाने इमारत उपलब्ध असल्यास अर्ज संबंधित जिल्हयांचे सहायक आयुक्त, समाजकल्याण (इतर मागास बहुजन कल्याण) यांचेकडे दि.०८ मे,२०२३ पर्यंत पाठविणेबाबत प्रसिद्ध केले होते. परंतु, जागा भाडयाने देणेबाबत अर्ज प्राप्त न झाल्याने विभाग स्तरावर जिल्हास्तरीय / विभागीय अधिकाऱ्यांसोबत वेळोवेळी बैठका आयोजित करुन वैयक्तिकरित्या इमारतीचा शोध घेणेबाबत निर्देश देण्यात आले. त्यानुषंगाने १३ जिल्हयातील २२ इमारतीबाबत प्राप्त प्रस्तावांना शासनाने मान्यता दिली असून नव्याने १२ जिल्हयातील १८ इमारतींबाबतचे प्रस्ताव शासनास प्राप्त झाले आहेत. तसेच, उर्वरित जिल्ह्यांकडून इमारती भाडयाने घेणेबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

तसेच, वसतीगृहाचे बांधकाम करणे अथवा भाडयाने उपलब्ध करुन देणे यासाठी लागणाऱ्या खर्चात अधिक विद्यार्थी लाभ घेऊ शकतील ही बाब विचारात घेता, आदिवासी विकास विभागाची स्वयंम योजना व सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाची स्वाधार योजनेच्या धर्तीवर इतर मागास प्रवर्ग, विमुक्त जाती, भटक्या जमाती व विशेष मागास प्रवर्ग या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना प्रति जिल्हा ६०० याप्रमाणे एकूण २१,६०० विद्यार्थी संख्येच्या मर्यादेत आधार योजनेअंतर्गत भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा स्वत: उपलब्ध करुन घेण्यासाठी निश्चित केल्यानुसार भत्याची रक्कम त्यांचे आधार क्रमांक संलग्न असलेल्या बँक खात्यात थेट वितरीत करण्याची योजना विचाराधीन आहे.

********

२२०.

गृह (बंदरे) विभाग

लक्षवेधी सूचना क्र.१६५७

## महाराष्ट्र विधानसभा

## सन २०२३ चे द्वितीय (पावसाळी) अधिवेशन

**श्रीमती मंदा म्हात्रे, विधानसभा सदस्य यांनी महाराष्ट्र विधासभा नियम १०५ अन्वये दिलेली लक्षवेधी सूचना क्र.१६५७ खालीलप्रमाणे आहे :-**

" देशातील दुसरा तसेच राज्यातील पहिला असा नवी मुंबईतील महत्वाकांक्षी मरिना प्रकल्प गेली ७ वर्षे पाठपूरावा करुनही सुरु करण्यात आलेला नसणे, सदरचे काम मे. स्वास्तिक इन्फ्रा लॉजिक प्रा.लि. या कंपनीस देण्यात आलेले असणे. परंतु सदर कंपनीची काम सुरू करण्याची दिरंगाई पाहता सदर कंपनी वेळकाढूपणा करत असल्याचे निदर्शनास येणे, सदर कंपनीला पान्याच्या आतील कामांचे काम करण्याचा अनुभवही नसल्याची माहिती मिळणे, नवी मुंबईकरांना मरिना प्रकल्प उभारणीची प्रतीक्षा असताना अजूनही काम सुरू होत नसल्याने येथील नागरिक अनेक सोयी-सुविधांपासून वंचित राहणे, त्यामुळे स्थानिक नागरिकांमध्ये असलेला नाराजीचा सूर, त्यामुळे सदर काम देण्यात आलेल्या मे. स्वस्तिक इनफ्रा लॉजिक प्रा. लि. या कंपनीला स्थगिती देण्यात येण्याची वारंवार होत असलेली मागणी, सीआरझेडसह इतर सर्व परवानग्या मिळूनही काम सुरू होत नसणे, काम जलद गतीने करण्याकरिता सदरचे काम नव्या कंपन्यांना देण्याची गरज, अनेक मोठ्या कंपन्या सदरचे काम जलद पद्धतीने करू शकत असल्याने, नवी मुंबईत मरीना प्रकल्प उभारल्यास या शहराला अनन्य साधारण महत्व प्राप्त होऊन पर्यटनालाही चालना व महसूल तसेच स्थानिकांना रोजगार उपलब्ध होणार असल्याने यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

## निवेदन

**( श्री.संजय बनसोडे, मा. मंत्री, बंदरे )**

दिनांक ०१/०७/२०१४ रोजी संपन्न झालेल्या महाराष्ट्र सागरी मंडळाच्या (म.सा.मं.) संचालक मंडळाच्या ६७ व्या बैठकीत सीबीडी बेलापूर येथील सेक्टर-१५ येथे खाडीकिनारी सिडकोकडून मंजूर झालेल्या ८० मी. X २० मी. क्षेत्रावर प्रवासी जेट्टी व मरीना प्रकल्प उभारण्यासाठी सिडकोकडून कमाल कालावधीसाठी जागा हस्तांतरित करुन घेण्याच्या अटीवर मंडळाची मान्यता देण्यात आली. प्रकल्पाचा वाव लक्षात घेता, हे क्षेत्र अपुरे पडणार असल्याने सन २०१६ मध्ये महाराष्ट्र सागरी मंडळाला एकूण सुमारे ५ एकर इतके क्षेत्र उपलब्ध करुन देण्याबाबत सिडकोकडे मागणी करण्यात आली.

दरम्यान, मरीना व वॉटरफ्रन्ट प्रकल्प निर्माण करण्यासाठी खाजगी विकासकाची निवड करण्यासाठी महाराष्ट्र सागरी मंडळाने दिनांक १२.७.२०१७ रोजी निविदा प्रसिध्द केल्या.

सिडकोने दिनांक १८.०८.२०१७ रोजीच्या पत्रान्वये मरीना व वॉटरफ्रन्ट विकास प्रकल्पासाठी एकूण ७.२५ एकर क्षेत्र (३ एकर क्षेत्र मरीनासाठी + ४.२५ एकर क्षेत्र वॉटरफ्रन्ट विकासासाठी) काही अटी व शर्तीवर महाराष्ट्र सागरी मंडळास मंजूर केले. सदर पत्रानुसार, महाराष्ट्र सागरी मंडळाने ३ एकर क्षेत्रासाठी सिडकोला रु.१६,२१,६८,०००/- इतका प्रिमियम, ४.२५ एकर क्षेत्रासाठी दरवर्षी रु.१००/- आणि इतर शुल्क द्यावयाचे होते.

महाराष्ट्र सागरी मंडळाने दिनांक १२.१०.२०१७ आणि दिनांक ०१.११.२०१७ च्या पत्रान्वये, उपरोक्त ७.२५ एकर क्षेत्र महाराष्ट्र सागरी मंडळास वार्षिक रु. १/- नाममात्र भाडेपट्टयाने देण्यात यावे, अशी विनंती सिडकोला केली. सिडकोने दि. २१.०२.२०१८ च्या पत्रान्वये मरीना व वॉटरफ्रन्ट विकास प्रकल्पासाठी उक्त ७.२५ एकर क्षेत्र

रोटा H/812 (750-7-23) मु.गा.प.

वार्षिक रु. १/- नाममात्र भाडेपट्टयाने दीर्घ कालावधीसाठी देण्याचे मान्य केले. मरीना प्रकल्पासाठी खाजगी विकासकाची निवड करण्यासाठी जुलै,२०१७ मध्ये निविदा मागविण्यात आल्या. त्यानुसार, मे. स्वस्तिक इन्फ्रालॉजिक या लीड मेंबरच्या नावे महाराष्ट्र सागरी मंडळाच्या दिनांक ०२.११.२०१७ रोजीच्या पत्राव्दारे लेटर ऑफ अवार्ड देण्यात आले. सदरची कंपनी मरीना प्रकल्पाच्या माध्यमातून मिळणा-या महसूलाच्या ४०% हिस्सा महाराष्ट्र सागरी मंडळाला देणार आहे.

लेटर ऑफ अवार्ड मधील अटीनुसार विकासकाने महाराष्ट्र सागरी मंडळाकडे रु. ३ कोटी इतकी अपफ्रंट प्रिमियम रक्कम भरणा केली आहे.

ठाणे जिल्ह्यासाठी Coastal Zone Management Plan (CZMP) तयार होईपर्यंत कोणत्याही प्रकल्पाला पर्यावरणविषयक मंजूरी न देण्याबाबतचे आदेश असल्यामुळे, मरीना प्रकल्पासाठी पर्यावरण दाखल्यास विलंब झाला. CZMP ला केंद्र शासनाच्या पर्यावरण मंत्रालयाकडून दिनांक २८.०२.२०१९ च्या पत्रान्वये मान्यता प्राप्त झाली. त्यानंतर, मरीना प्रकल्पासाठी SEIAA यांच्याकडून दिनांक २०.०७.२०२० अन्वये पर्यावरणविषयक दाखला प्राप्त झालेला आहे. तद्नंतर महाराष्ट्र सागरी मंडळाने मागणी केल्याप्रमाणे सिडकोने प्लॉट क्र. १११ए, क्षेत्र २३४९२.८१ चौ.मी. महाराष्ट्र सागरी मंडळाला देण्यासंदर्भात दिनांक २८.१०.२०२१ रोजी Revised Allotment Letter जारी केले.

नवी मुंबई इंटरनॅशनल मरीना प्रा. लि. (तत्कालीन मे. स्वस्तिक इन्फ्रा लॉजिक) कंपनीने दिनांक ०३.०३.२०२२ रोजीचे पत्रान्वये मरीना प्रकल्पाचे पहिल्या टप्प्याचे पाण्यातील क्षेत्रात (water area) काम सुरु करण्यासाठी Technical drawings/ lay out and details सादर करून काम सुरु करण्याची परवानगी मागितली होती.

पाण्यामध्ये करावयाच्या सागरी बांधकामाची सुरक्षितता आणि स्थिरता यांची खात्री करण्यासाठी लेआऊट/डिझाईन्सची इंडियन रजिस्टर ऑफ शिपींग (IRS) यांच्याकडून तपासणी करुन घेण्याबाबत कंपनीला महाराष्ट्र सागरी मंडळाचे दिनांक ०९.०७.२०२२ चे पत्रान्वये कंपनीला सूचित करण्यात आले होते. तथापि, IRS यांचेकडे मरीना संदर्भात स्वत:चे धोरण/मानके नसल्यामुळे त्यांच्याकडून प्रतिसाद प्राप्त होण्यास विलंब होत असल्याचे नवी मुंबई इंटरनॅशनल मरीना प्रा. लि. कंपनीने कळविल्यामुळे लेआऊट डिझाईनची महाराष्ट्र सागरी मंडळाच्या पॅनलवरील नेव्हल आर्किटेक्टकडून तपासणी करून घेऊन त्याचा अहवाल सादर करण्याबाबत महाराष्ट्र सागरी मंडळाच्या दिनांक ०८.१२.२०२२ च्या पत्रान्वये कंपनीला सूचित करण्यात आले होते. त्यावर, कंपनीने दिनांक ०९.०१.२०२३ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र सागरी मंडळाच्या पॅनलवरील Vector Marine & Offshore Technology या नेव्हल आर्किटेक्टने प्रमाणित केलेले मरीना लेआऊट व डिझाईन सादर केले असून, मरीना प्रकल्पाचे बांधकामास सुरुवात करण्याची परवानगी मिळावी, अशी विनंती केली.

सिडकोकडून महाराष्ट्र सागरी मंडळाकडे हस्तांतरित करण्यात आलेल्या २३४९२.८१ चौ.मी. इतक्या क्षेत्राकरिता सिडको आणि महाराष्ट्र सागरी मंडळ यांच्यामध्ये स्वाक्षांकित करावयाच्या करारनाम्याचा मसुदा सिडकोकडून उपलब्ध करुन देण्यात आला असून या करारनाम्याचे प्रारूप अंतीम करून सिडकोशी लवकरात लवकर करारनामा अंतिम करुन सदरचे क्षेत्र महाराष्ट्र सागरी मंडळामार्फत मरीना विकासक कंपनीला हस्तांतरित करण्यासंदर्भात स्वतंत्र करारनामा स्वाक्षांकित करण्यात येईल.

******